अपार कष्ट आणि नावीन्यपूर्ण प्रयोग
यांच्या बळावर **बाबा आमटे** यांचं मानवमुक्तीचं स्वप्न
साकारणाऱ्या ध्येयवेड्यांची गोष्ट

आनंदवन प्रयोगवन

डॉ. विकास आमटे





बाबा आमटे यांच्या भव्य स्वप्नाचं मूर्त रूप म्हणजे आनंदवन. पण 'आनंदवन म्हणजे कुष्ठकार्य' एवढीच ओळख जनमानसात रुजलेली आहे. प्रत्यक्षात त्यापलीकडे अंध-अपंग-कर्णबधिर-बेरोजगार-शेतकरी-आदिवासी अशा समाजातील उपेक्षित घटकांना न्याय्य, निरोगी आणि अर्थपूर्ण आयुष्य जगण्याची संधी देणारं मॉडेल आनंदवनाने घडवलं आहे.

शेती, पाणी, पर्यावरण, उद्योग, शिक्षण, आरोग्य, रोजगार, घरबांधणी अशा अनेक क्षेत्रांत नानाविध प्रयोग करून अफाट आणि पायाभूत काम आनंदवनात उभं राहिलेलं आहे. विशेष म्हणजे, समाजाने नाकारलेल्या साध्यासुध्या माणसांच्या कष्टातून हा चमत्कार घडला आहे.

आज आनंदवन हे सुखी नांदतं गाव तर आहेच, पण त्याहीपलीकडे गावाखेड्यांच्या सर्वंकष विकासाचं जितं जागतं उदाहरणही आहे. बाबांचं स्वप्न जमिनीत रुजवणाऱ्या प्रयोगशील हातांची ही गोष्ट उभ्या देशाला प्रेरणा देणारी आहे.

आनंदवन प्रयोगवन

डॉ. विकास आमटे

शब्दांकन

गौरी कानेटकर

समकालीन प्रकाशन

आनंदवन प्रयोगवन

सचिव, महारोगी सेवा समिती, वरोरा
मुक्काम-पोस्ट : आनंदवन-४४२ ९१४, ता. वरोरा, जि. चंद्रपूर, महाराष्ट्र
मोबाइल : ९८२२४ ६६७३४ / ९८५०३ ४३२९९ / ९०११० ९४६०६
इमेल : vikasamte@anandwan.in; anandwan@gmail.com
वेबसाइट : www.anandwan.in

मुंबई संपर्क : दिलीप हेर्लेकर ९९६९३ ४३९२३ / ०२२-६५२९६६०६
पुणे संपर्क : प्रा. नरेंद्र नायडू ९९७०० ४६६८६ / ०२०-२७३५८६८६
अमेरिका संपर्क : चंदा आठले (००१) ७०३ ९७८ ५६३० / ५७१ ३३४ ४९२४
chanda.athale@gmail.com

TITLE LETTERING

प्रकाशन क्रमांक : ४४
पहिली आवृत्ती : २६ डिसेंबर २०१४
(बाबा आमटे जन्मशताब्दी)

संपादन : सुहास कुलकर्णी
मुखपृष्ठ आणि कलानिर्देशन : श्याम देशपांडे
मुखपृष्ठ छायाचित्र : डॉ. शीतल विकास आमटे
आतील छायाचित्रं : आनंदवनाच्या सौजन्याने
मुद्रितशोधन : अशोक देव

प्रकाशक
आनंद अवधानी । सुहास कुलकर्णी
समकालीन प्रकाशन
८ अमित कॉम्प्लेक्स, ४७४ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०
पुणे फोन : ०२०-२४४७०८९६ मुंबई फोन : ०२२-२४३११३९८
email : samakaleen@gmail.com

बाबांचं स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी
माझ्या खांद्याला खांदा लावून काम करणाऱ्या
भारतीस आणि माझ्या जीवाभावाच्या सर्व सोबत्यांना...




ग्रामपंचायत आनंदवन

अनुक्रम

गोष्ट सांगण्यापूर्वी

२०१४ हे बाबांचं जन्मशताब्दी वर्ष. त्याचं निमित्त साधून आनंदवनाची गोष्ट सांगणारं हे पुस्तक प्रकाशित होत आहे. बाबांवर आजवर अनेक पुस्तकं लिहिली गेली, पण आनंदवनातल्या कामाचा समग्र दस्तावेज मांडणारं जवळपास एकही पुस्तक नाही. असं पुस्तक आमच्यापैकीही कुणी लिहिलं नाही. कारण बाबा काय किंवा आम्ही कार्यकर्ते काय, कामांमध्येच इतके गढलेलो होतो की लिहिण्यासाठी आमच्याकडे फुरसतच नव्हती.

खरं तर आताही आनंदवनावर पुस्तक लिहावं अशी माझी इच्छा नव्हती. त्यातून स्वतःबद्दल काही बोलावं-लिहावं असं तर मला अजिबातच वाटत नव्हतं. कारण हे काम बाबांचं, त्यांना भक्कम साथ देणाऱ्या 'ताई'चं आणि या दोघांना येऊन मिळालेल्या शेकडो कार्यकर्त्यांचं. मीसुद्धा त्यातलाच एक. माझं हे बोलणं कोणाला तोंडदेखलं वाटलं तर त्याने खुशाल आनंदवनात किंवा सोमनाथला येऊन बघावं. या प्रकल्पांचा पसारा पाहिला की कुणाच्याही लक्षात येईल, ही कामं कुण्या एकट्या-दुकट्या व्यक्तीच्या बळावर उभी राहू शकत नाहीत. मग कुण्या एकट्याने त्याबद्दल कशाला लिहा, असं माझं म्हणणं होतं.

पण माझी पत्नी डॉ. भारती, आनंदवनातले सहकारी आणि माझ्या मुलांचं म्हणणं पडलं, की आनंदवनाची गोष्ट सांगणारं एक पुस्तक असायला हवं. कारण 'आनंदवन म्हणजे कुष्ठकार्य' एवढीच बहुतेकांची धारणा आहे. ही धारणा अपुरी आहे. कारण गेल्या पासष्ट वर्षांमध्ये आनंदवनात विविध क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणात मूलभूत काम उभं राहिलेलं आहे. शेती असो किंवा जलसंधारण, उद्योग असोत किंवा पर्यावरण, अनेक क्षेत्रांत आनंदवनाने काम उभं केलं आहे. हे सर्व काम आणि हे काम उभं करण्याची गोष्ट समाजापर्यंत पोहोचणार कशी? शिवाय आजवर आनंदवनावर किंवा बाबांवर जी पुस्तकं लिहिली गेली त्यातली बरीचशी कधी अपुऱ्या तर कधी चुकीच्या माहितीवर आधारित आहेत. त्यामुळे एक बिनचूक आणि सर्वंकष पुस्तक असायला हवं असं वाटणं स्वाभाविक होतं. मलाही ते पटत गेलं. आनंदवनातल्या या सगळया कामांचा, प्रयोगांचा मी सुरुवातीपासून साक्षीदार आहे आणि भागीदारही. माझ्याइतकं जवळून आणि दीर्घकाळ आनंदवन फारच कमीजणांनी अनुभवलं असेल. ही बाब लक्षात घेऊन आनंदवनाची गोष्ट सांगायला मी होकार दिला.

गेली चार-साडेचार दशकं आनंदवनात काम करताना माझी भूमिका मला स्पष्ट आहे. मी स्वतःला बाबांच्या स्वप्नांचा ठेकेदार मानतो आणि माझ्या सहकाऱ्यांच्या मदतीने मी बाबांचं स्वप्नं पूर्ण करण्याचं काम करतो आहे. या पुस्तकातून आनंदवनाची गोष्ट सांगत असतानाही माझी ही भूमिका कायम आहे. बाबांनी पाहिलेलं स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी आम्ही आजवर जे जे प्रयत्न केले ते वाचकांपर्यंत पोहोचवणं हा या पुस्तकाचा मुख्य हेतू आहे.

बाबांनी कोणतं स्वप्न पाहिलं होतं?

बाबांचं स्वप्न फक्त कुष्ठरुग्णांच्या किंवा अपंग-अंधांच्या पुनर्वसनाचं नव्हतं. बाबांच्या

व्यापक स्वप्नाचे हे केवळ काही तुकडे होते. माझ्या मते ते स्वप्न प्रत्येक माणसाला न्याय्य, निरोगी, समृद्ध आणि अर्थपूर्ण आयुष्य जगता यावं यासाठी प्रयत्न करण्याचं होतं. मग ते कुष्ठरोगी असोत, अंध-अपंग असोत, बेरोजगार तरुण असोत किंवा आत्महत्याग्रस्त शेतकरी. बाबांचा दृष्टिकोन व्यापक होता. अगदी सुरुवातीपासूनच. त्यामुळेच, आनंदवन सुरू करण्याआधी त्यांनी सर्व जातिपाती आणि व्यवसायांच्या माणसांसोबत एकत्र राहण्याचा 'श्रमाश्रम' प्रयोग केला होता. आनंदवनातल्या कामाचा व्याप वाढत असताना ते आदिवासींसाठी भामरागडच्या जंगलात उतरले. अगदी वयाची नव्वदी ओलांडल्यावरही विदर्भातल्या आत्महत्या-ग्रस्त शेतकऱ्यांसाठी आनंदवनाने काही तरी केलं पाहिजे, ही तळमळ त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. यवतमाळ जिल्ह्याच्या झरी-जामणी या आत्महत्याग्रस्त तालुक्यामध्ये आम्ही काम सुरू केलं ते त्यामुळेच. बाबांबद्दल कुणी तरी असं म्हटलं होतं, की 'बाबांचा प्रवास हा उजेडाकडून अंधाराकडे जाणारा आहे.' हे म्हणणं मला मार्मिक वाटतं. कारण एरवी अन्यायाविरुद्ध झगडणाऱ्यांचा प्रवास अंधाराकडून उजेडाकडे होत असतो. बाबांनी हा प्रवास केलाच, पण ते तिथे थांबले नाहीत. उपेक्षितांना त्यांनी अंधारातून उजेडाकडे आणलं आणि पुन्हा नव्या अंधाऱ्या कोपऱ्यांचा शोध घेत राहिले, त्यांच्यासाठी कार्यरत राहिले.

म्हणूनच मला असं वाटतं, की बाबांचं स्वप्न हा एक मोठा 'अनफिनिश्ड अजेंडा' आहे आणि तो अजेंडा पूर्ण करण्यासाठी आपल्याला आनंदवनासारख्या प्रयोग करणाऱ्या चळवळ्या संस्थांची गरज आहे. तो अजेंडा पूर्ण करण्याच्या दृष्टीने आम्ही केलेले प्रयत्न समाजापर्यंत पोहोचावेत आणि त्याचा समाजातल्या प्रश्नांवर उत्तरं शोधण्यासाठी वापर केला जावा, या हेतूने आनंदवनाची गोष्ट मी तुम्हाला सांगणार आहे. अर्थात त्याआधी आजचं आनंदवन हे नेमकं काय प्रकरण आहे हे थोडक्यात सांगायला हवं. चला माझ्यासोबत, जरा आनंदवनाचा फेरफटका मारून आणतो तुम्हाला.

बाबांनी १९४९मध्ये 'महारोगी सेवा समिती, वरोरा'ची स्थापना केली आणि त्यानंतर वर्षभरातच त्यांना सरकारकडून चंद्रपूर जिल्ह्यातल्या वरोरा गावाजवळची पन्नास एकर जमीन मिळाली. त्या जागेवर आनंदवनाची सुरुवात झाली. हळूहळू आनंदवनाकडे येणाऱ्या कुष्ठरुग्णांची, अंध-अपंग आणि समाजातल्या हर प्रकारच्या उपेक्षितांची संख्या वाढत गेली. सरकारकडून आणखी जमीन मिळाली. या जमिनीवर शेती होऊ लागली, उद्योग सुरू झाले. काम करून आत्मसन्मानाने जगणारं एक गाव वसू लागलं.

आज तेच आनंदवन समाजातल्या नाना प्रश्नांवर उत्तर शोधणारं, सुखासमाधानाने नांदणारं गाव आहे. खरोखरचं गाव. २००० सालापासून आनंदवनाला ग्रामपंचायतीचा दर्जा मिळालेला आहे. २००९ पासून आनंदवनातले नागरिक एकमताने स्वतःचा सरपंचही निवडून देताहेत. गेल्या पासष्ट वर्षांमध्ये नाना प्रकारच्या वंचित-उपेक्षितांनी आनंदवन आपलं मानलं आहे. त्या साऱ्यांनी आपापली शक्ती-क्षमता-कौशल्य पणाला लावून विणलेल्या असंख्य धाग्यांमुळे आनंदवनाचं एकसंध असं सुंदर चित्र तयार झालं आहे. तुमचा विश्वास बसणार नाही, पण आज आनंदवनात रोज तब्बल आठ-दहा हजार

लोकांचा राबता असतो. आनंदवनाची निवासी लोकसंख्या आहे अडीच हजार. त्याशिवाय आनंदवनातल्या शाळा-कॉलेजांमधली मुलं आणि बाहेरून कामासाठी येणारी मंडळी पकडली तर आणखी साडेतीन-चार हजार लोक दिवसभरासाठी आनंदवनात असतात. शिवाय वरोऱ्याहून काही ना काही कामासाठी आनंदवनात बरेच लोक येत असतात. आनंदवन बघायला राज्यभरातून-देशभरातून आलेले पाहुणे असतातच. एवढ्या साऱ्या लोकांसह आनंदवन रोजच्या रोज नांदत असतं.

आनंदवनाच्या मुख्य कमानीतून आत शिरताना डावीकडे आमचं आनंद निकेतन आर्ट्स, सायन्स आणि कॉमर्स कॉलेज दिसतं, तर दुसऱ्या बाजूला आहे आनंद निकेतन अॅग्रिकल्चर कॉलेज. कमानीतून आत गेलं की कुष्ठरुग्णांचं हॉस्पिटल, जनरल हॉस्पिटल,वृद्ध कुष्ठरुग्णांसाठीचं 'स्नेहसावली'संकुल, आनंदवन ग्राम-पंचायतीचं कार्यालय, डेअरी असं करत करत आपण एका छोट्या चौकात येऊन पोहोचतो. हे आमच्या आनंदवनातलं मध्यवर्ती ठिकाण. आमचे प्रमुख कार्यकर्ते आणि येणारे-जाणारे पै-पाहुणे यांनी सकाळ-संध्याकाळ हा भाग गजबजलेला असतो. इथे कामांचा आढावा घेतला जातो आणि नवी स्वप्नंही पाहिली जातात. इथेच 'महारोगी सेवा समिती'चं ऑफिस, कार्यकर्त्यांचे निवास, अतिथी निवास, वर्कशॉप्स असा सगळा पसारा आहे. इथेच काय, पण सगळ्या आनंदवनात जागोजागी लोकांना बसण्यासाठी झाडांखाली केलेले कट्टे, छोटे बगीचे, फुटक्या टाइल्स लावून सजवलेल्या भिंती आणि हसत-खेळत वावरणारी माणसं दिसतात. यामुळे आमचं आनंदवन कसं प्रसन्न वाटतं!

त्याखेरीज याच परिसरात 'संधिनिकेतन' हे आमचं निवासी व्यवसाय प्रशिक्षण केंद्रही आहे. इथे नेहमीच शंभरेक अपंग मुलं-मुली मुक्कामी असतात. प्रामुख्याने ग्रामीण भागातून आलेली ही मुलं आनंदवनाच्या वातावरणात मिसळून जातात, आणि बाहेर पडतात ती कामालाच देव मानण्याचा इथला मंत्र घेऊन. त्यांच्याबरोबरच अंध आणि कर्णबधिरांसाठी निवासी शाळांमध्ये राहणाऱ्या मुलांच्या उत्साही किलबिलाटानेही आनंदवनाचा परिसर कायम गजबजलेला असतो.

हा परिसर ओलांडून पुढे गेलं की आनंदवनातली शेती सुरू होते आणि त्या शेतांजवळच आनंदवनातल्या वसाहती (म्हणजेच कम्युन्स) वसलेल्या आहेत. साधारण पन्नासेक घरांची एक छोटी वसाहत अशा एकूण नऊ वसाहती आनंदवनात आहेत. या वसाहती म्हणजे सहकाराचं उत्तम उदाहरण म्हणता येईल. कुष्ठरुग्ण आणि अपंग, कुष्ठरुग्ण आणि अंध, अपंग आणि कर्णबधिर अशी वेदनेच्या नात्याने एकत्र आलेली अनेक जोडपी इथे राहतात. अर्धवर्तुळाकार छतांची एकाला एक जोडून उभी असलेली घरं, त्यासमोर सारवलेलं स्वच्छ अंगण आणि परसदारी फुललेले फळभाज्यांचे वेल असं प्रसन्न दृश्य इथे कायम असतं.

आनंदवनातल्या 'आनंदसागर तलावा'च्या काठाशी उभं राहिलं की त्यापलीकडे दिसणारी शेती अक्षरशः नजरेत मावत नाही. अगदी गुगल मॅप्सवर जाऊन पाहिलंत तरी आनंदवनाचा परिसर तुम्हाला हिरव्या पट्ट्याने वेढलेला दिसेल. आनंदवनातल्या ६३१

एकर जमिनीपैकी घरं, हॉस्पिटल्स, वर्कशॉप्स, शाळा, होस्टेल्स, तलाव वगैरेंची जागा सोडली तर तब्बल दोनशे एकरांवर आम्ही शेती करतो. वर्षातून तीन वेळा इथे हरतऱ्हेची पिकं घेतली जातात. भात, गहू, ज्वारी-बाजरी, हळद, कांदा, ऊस, भाज्या, फळं, सगळं काही होतं आमच्याकडे. शेतीच्या बांधावरून चालत चालत फिरलात तर आमची शेतकरी मंडळी तुम्हाला इथल्या पिकांच्या सुरस कहाण्या सांगतील. या शेतीसाठी आनंदवनात चाळीस एकरांवर पसरलेले बारा तलाव आहेत. अगदी उन्हाळ्यातही यातील काही तलाव पाण्याने लबालब भरलेले असतात. शेतीतलं बरचसं अन्नधान्य आनंदवनातच वापरलं जातं, तर काही प्रमाणात त्याची विक्रीही होते.

ही झाली शेती. आता आनंदवनातल्या उद्योगधंद्यांकडे वळू.

इथल्या उद्योगधंद्यांना आम्ही गमतीने 'आनंदवन एमआयडीसी' म्हणतो. तिथे हरतऱ्हेची उत्पादनं तयार होतात. अगदी एअर कूलर्सपासून सतरंज्यांपर्यंत आणि अपंगांसाठी आम्हीच डिझाइन केलेल्या तीन चाकी सायकलींपासून ते ग्रीटिंग कार्डांपर्यंत. मध्ये कधी तरी आम्ही यादी करत बसलो तर लक्षात आलं, की आजवर आम्ही जवळपास एकशे चाळीस प्रकारच्या उत्पादनांमध्ये गुंतलेलो आहोत. आमच्या उद्योगधंद्याची वार्षिक उलाढाल आज अडीच कोटींवर जाऊन पोहोचली आहे. या परिसरातून फेरफटका मारला तर नाना प्रकारची व्यंगं असणारी माणसं त्यावर मात करून जोमाने काम करताना दिसतील. आपल्या क्षमता ताणून काम करण्यात मजा असते, हे तुम्हाला त्यांच्या चेहऱ्यावर दिसल्याशिवाय राहणार नाही.

तर असं आहे आमचं आनंदवन. या छोट्याशा फेरफटक्यावरून तुमच्या लक्षात येईल, की हा फक्त कुष्ठरुग्णांसाठी चालवला जाणारा प्रकल्प नाही. हे फक्त अंध-अपंग - कर्णबधिरांसाठीचं काम नाही. ही इतर चार वसाहतींसारखी एक वसाहतही नाही. मग आनंदवन नेमकं आहे तरी काय? मला वाटतं, आनंदवन ही एक प्रवृत्ती आहे. इथे दुसऱ्याची वेदना जाणून त्याच्याशी एकरूप होण्याचा प्रयत्न करणारी माणसं आहेत. इथे स्वतःच्या वेदनांवर मात करून नवनिर्माण करण्याचा ध्यास आहे. इथे आत्मनिर्भर बनण्याची जिद्द आहे, उपक्रमशीलता आहे, सहकार आहे, जगण्याची नवी दृष्टी आहे.

हे झालं आनंदवनाचं. पण आम्ही आनंदवन म्हणतो तेव्हा त्यात सोमनाथचा प्रकल्प येतो, हेमलकशातला लोकबिरादरी प्रकल्प येतो, नागपूरजवळचं अशोकवन येतं आणि यवतमाळ जिल्ह्यातल्या मूळगव्हाण या गावात आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांसाठी उभा केलेला प्रकल्पही येतो. या सर्व ठिकाणी आमच्या कार्यकर्त्यांनी आनंदवनाप्रमाणेच सर्वंकष विकासाची मॉडेल्स उभी केली आहेत. माझ्या जिवाभावाच्या सोबत्यांनी इथे आयुष्यं टाकली आहेत तेव्हा कुठे हे प्रकल्प आकाराला आले आहेत.

आनंदवन असो किंवा या इतर प्रकल्पांमधली कामं, ती काही एका रात्रीत उभी राहिलेली नाहीत. बाबांनी कुठे तरी लिहून ठेवलं आणि त्यानुसार माणसं कामाला लागली, असंही झालेलं नाही. जसजशी परिस्थिती येत गेली तसतसे बाबांनी नवे प्रयोग केले, नवी उत्तरं शोधण्याचा प्रयत्न केला. आम्ही कार्यकर्तेही तीच दृष्टी बाळगून, पण स्वतःच्या

क्षमतांनुसार, स्वतःच्या बुद्धीनुसार काम करत गेलो आणि आनंदवन घडत गेलं. अजूनही घडतं-बदलतं आहे.

हे पुस्तक म्हणजे या सर्वांची गोष्ट आहे. ही गोष्ट आहे आनंदवनाला प्रयोगवन बनवणाऱ्या असंख्य हातांची. कामाचा ध्यास घेतला की अशक्यही शक्य होऊ शकतं हे दाखवून देणारी. आम्ही कुष्ठरुग्ण, अंध, अपंग, कर्णबधिर हे काम करू शकतो, तर जगातलं कोणीही ते करू शकतं; फक्त इच्छाशक्ती पाहिजे हे सांगणारी! गावा-खेड्यांचा सर्वंकष विकास करण्यासाठी आम्ही विकसित केलेल्या मॉडेलची. या सर्व कामांचा परीघ एवढा मोठा आहे की त्याला एक पुस्तक पुरं पडू शकत नाही. आनंदवनातल्या प्रत्येक प्रकल्पावर, उपक्रमावर एक स्वतंत्र पुस्तक लिहिता येऊ शकतं. त्या अर्थाने ही गोष्ट म्हणजे म्हणजे पुढच्या पुस्तकांची निव्वळ झलक आहे.

गोष्ट सुरू करण्यापूर्वी हे पुस्तक कसं तयार झालं याची गोष्ट सांगायलाच हवी. माझा धाकटा भाऊ डॉ. प्रकाश याचं ‘प्रकाशवाटा’ हे आत्मचरित्र प्रकाशित करण्याची कल्पना पुढे आली, तेव्हापासूनच ‘समकालीन प्रकाशना’चे सुहास (कुलकर्णी) आणि आनंद (अवधानी) मला पुस्तक लिहिण्यासाठी आग्रह करत होते. पण मी काही लेखक माणूस नाही. शिवाय आधी म्हटल्याप्रमाणे पुस्तक लिहावं असं मला वाटतही नव्हतं. आनंदवनावर पुस्तक लिहायचं असेल तर ते बाबांच्या आणि माझ्या सर्व सहकाऱ्यांवर लिहिलं जायला हवं, असं माझं ठाम मत होतं. त्यामुळे हे पुस्तक माझं आत्मचरित्र न बनता आम्हा कार्यकर्त्यांनी केलेल्या प्रयोगांची आणि प्रयत्नांची गाथा बनावी, अशी माझी अपेक्षा होती. त्यानुसार हे पुस्तक करायचं ठरलं. ही गोष्ट साधायची तर त्यासाठी आनंदवनात राहून, इथल्या कार्यकर्त्यांशी सविस्तर चर्चा करून पुस्तक लिहिलं जाणं, ही पूर्वअट होती. त्यानुसार सुहास, आनंद आणि युनिक फीचर्स-समकालीन प्रकाशनातील त्यांची सहकारी गौरी (कानेटकर) असे तिघं जानेवारी २०१४ मध्ये आनंदवनात आले. इथे मुक्काम ठोकून त्यांनी हे सगळं खटलं समजून घेतलं. आम्हा कार्यकर्त्यांच्या नजरेतून आनंदवन बघण्याचा प्रयत्न केला. आमच्या प्रमुख तीसेक कार्यकर्त्यांशी चर्चा केल्या. त्यांच्या मुलाखती रेकॉर्ड केल्या. माझ्याशीही दोन-तीन टप्प्यांत सविस्तर चर्चा झाल्या. या साऱ्या माहितीचं शब्दांकन करण्याचं जिकिरीचं काम गौरीने केलं. या सर्व प्रक्रियेनंतर हे पुस्तक आकाराला आलं आहे. पुस्तक लिहिण्याची ही पद्धत नवी आहे. माझ्या आणि आनंदवनावरील प्रेमामुळेच या मंडळींनी एवढा सारा खटाटोप केला हे मला माहिती आहे. गौरी आणि सुहास यांनी या पुस्तकासाठी जे अथक परिश्रम केले आहेत त्याला तर काही तोडच नाही. सुहास हा आमटे कुटुंबाशी आधीपासून जोडलेला. या पुस्तकामुळे त्याची संस्था आणि सहकारीही आनंदवन परिवाराचा एक भाग बनले, ही आनंदाची गोष्ट आहे.

या पुस्तकाच्या निमित्ताने आणखीही एक गोष्ट सांगायला हवी. आनंदवन उभं करण्यात अक्षरशः हजारो व्यक्तींचे हात लागलेले आहेत. आनंदवनात आजवर किती कुष्ठरुग्ण किंवा इतरही कार्यकर्ते येऊन गेले याची मोजदाद ठेवणंही शक्य नाही. त्यातल्या प्रत्येक व्यक्तीमुळे आनंदवनात मोलाची भर पडली आहे. आनंदवन ज्या गावात आहे त्या वरोऱ्यापासून ते पार परदेशापर्यंतच्या असंख्य हितचिंतकांनी आनंदवनाला नाना प्रकारचं

पाठबळ पुरवलं आहे. गावोगावच्या आनंदवन मित्रमंडळांनी आम्हाला तनमनधन देऊन मदत केली. या सर्वांची नावं पुस्तकात समाविष्ट करण्याची आमची इच्छा असली तरी ते अशक्य होतं. एवढंच काय, आज आनंदवनात काम करणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांची नावंही इथे घेता आलेली नाहीत. पण ही सारी आपलीच माणसं आहेत. पुस्तकाच्या मर्यादा ते समजून घेतील याची मला खात्री आहे. तरीही आनंदवनाला कोणत्या ना कोणत्या प्रकारची मदत करणाऱ्या सर्व ज्ञात-अज्ञात, आजी-माजी मित्रमंडळींचे आनंदवनातील सर्व सहकाऱ्यांच्या वतीने मनःपूर्वक आभार मानू इच्छितो. हे काम ‘आम्ही साऱ्यांनी’ उभं केलं आहे असं मी पुस्तकात वारंवार आणि मनापासून म्हटलं आहे. त्या ‘आम्ही’मध्ये आनंदवनाशी जोडलं गेलेलं हे सगळं गणगोत आहे. जसं ‘बाबा’ म्हटलं की सोबत ‘ताई’ आलीच, तसंच आनंदवन म्हटलं की जगभर पसरलेला हा मित्रपरिवार आलाच.

आनंदवनाच्या या गोष्टीचं बीज महाराष्ट्रात, भारतात जिथे गरज असेल तिथे जाऊन पडावं, रुजावं आणि त्यातून उत्तरांच्या दिशेने प्रवास सुरू व्हावा, एवढीच आमची इच्छा आहे. तसं होणं हीच बाबांच्या स्वप्नपूर्तीच्या दिशेने झालेली वाटचाल असेल!


- डॉ. विकास आमटे

झडलेली बोटं, निर्मितिक्षम हात

माझा आणि प्रकाशचा जन्म आनंदवन सुरू होण्यापूर्वीचा. त्यामुळे आनंदवनाच्या पहिल्या दिवसापासून आम्ही त्याचे साक्षीदार आहोत, असं मी म्हणू शकतो. मी पाच-सहा वर्षांचा होईपर्यंतच्या थेट आठवणी माझ्यापाशी नाहीत, पण ताई-बाबा आणि इतर कार्यकर्त्यांच्या तोंडून अनेक वेळा ऐकल्यामुळे आनंदवनाच्या जन्माचा काळ मी स्वतः अनुभवल्यासारखाच माझ्या सोबत आहे. आनंदवन सुरू होण्याआधी बाबांनी केलेल्या ‘श्रमाश्रम’ प्रयोगाबद्दलही तसंच म्हणता येईल. त्या वेळी मी अवघा एखाद वर्षाचा असेन. पण ते दिवस जणू माझ्याही आठवणींचा भाग झाले आहेत. त्यातून मिळालेल्या पोषणावरच मी वाढलो-घडलो आहे.

आनंदवनाबद्दल माहिती नाही असा माणूस महाराष्ट्रात सापडणं कठीण, असं लोक नेहमी बोलतात. पण हेही खरं, की आनंदवनाआधी बाबांनी केलेल्या ‘श्रमाश्रम’ प्रयोगाबद्दल फारसं कुणाला माहिती नसेल. माझ्या मते बाबांनी आनंदवनामध्ये जे काम उभं केलं त्याचा पाया ‘श्रमाश्रमा’च्या उपक्रमामध्ये होता, किंवा त्याआधी सहकार तत्त्वावर वकिली करण्याच्या प्रयत्नांमध्ये होता.

बाबांचं घराणं मालगुजार. जमीनजुमला असलेलं संपन्न. बाबांचे वडील सरकारी नोकरीत होते. ते मूळ चंद्रपूरचे, म्हणजे तेव्हाच्या चांद्याचे. पुढे त्यांनी नागपूरच्या धरमपेठ या उच्चभ्रू भागात बंगला बांधला. त्यामुळे शाळकरी वयापासून बाबांचं राहणीमान अन् छंद त्या इतमामाला साजेसे होते. बाबांना शाळेत सोडायला घोडागाडी येत असे. पुढे ते कॉलेजमध्ये गेल्यावर त्यांच्या हातात मोटार आली. उंची कपडे, खाणंपिणं, मौजमस्ती यासाठी बाबांच्या हातात सतत पैसा खुळखुळत असे. कॉलेजमध्ये असताना ते कुस्तीच्या आखाड्यावर जाऊ लागले. रोज हजार दंड-बैठका ते काढायचे. कुस्तीत मिळालेली पदकं शर्टाला नव्हे तर थेट छातीला पिना टोचून अडकवायचे! पुढे त्यांना शिकारीचा छंद जडला. तोही कसा, तर मचाणाचा आसरा न घेता ढाण्या वाघाला थेट सामोरं जाण्याचा. संगीताच्या मैफिलींना त्यांची कायम हजेरी असायची. इंग्रजी चित्रपट पाहणं आणि त्यावर परीक्षणं लिहिणं हाही त्यांचा आवडता छंद होता. त्यातून ग्रेटा गार्बो आणि नॉर्मा शिअररसारख्या त्या काळातल्या हॉलिवुड गाजवलेल्या नट्यांशी त्यांची पत्रमैत्रीही झाली होती.



तरुणपणीचे बाबा

-तर एकुणात आमचा बाप अवलिया होता. एखादी गोष्ट करायची ठरवली की त्याचं टोक गाठायचं, हा त्यांचा स्वभाव. त्यांना लहानपणापासून रवींद्रनाथ टागोरांची ओढ होती. टागोरांचं 'गीतांजली' वाचण्यासाठी त्यांनी बंगाली शिकून घेतली होती. रवींद्रनाथांना भेटण्यासाठी ते थेट शांतिनिकेतनलाही जाऊन पोहोचले होते. अशा या उत्कट माणसाला त्या काळच्या क्रांतिकारी चळवळींबद्दल प्रेम वाटलं नसतं तरच नवल! बाबा श्रीमंत असले तरी ते समाजापासून अलिप्त नव्हते. उलट, त्यांना माणसांबद्दल, समाजाबद्दल प्रेम होतं. नागपूरमध्ये कॉलेजात असताना त्यांचा क्रांतिकारक राजगुरूंशी संबंध आला होता. त्या चळवळीमध्ये ते झपाट्याने ओढले गेले होते. पण नंतर तितक्याच झपाट्याने ते त्यातून बाहेरही आले. कोणाला ही एका श्रीमंत पोराची उथळ धरसोड वाटू शकते. पण माझ्या मते त्यांचा आत्मशोध सुरू होता. आपल्या जगण्याचं उद्दिष्ट काय याचा प्रयोगशील शोध!

बाबांचा क्रांतिकारी चळवळींशी संबंध संपला तरी समाजाबद्दलचं प्रेम तसंच टिकून राहिलं, अधिकाधिक घट्ट होत गेलं. त्यांच्या मनाने घेतलं की डॉक्टर होऊन समाजाची सेवा करायची; पण बाबांनी वकील व्हावं अशी त्यांच्या वडिलांची इच्छा होती. त्यावरून दोघांचे अनेकदा खटके उडत. खरं तर बाबांनी डॉक्टरकीच्या प्रवेशाची तयारीही केली होती; पण शेवटी वडिलांच्या इच्छेला मान देऊन ते वकील झाले. सुरुवातीला मध्य प्रांतातल्या दुर्ग या गावी माजी आमदार आणि वकील विश्वनाथ तामस्कर यांच्याकडे त्यांनी वकिली केली. राष्ट्रीय आंदोलनात तामस्कर वकील पकडले गेले, तेव्हा बाबांनीच त्यांचा व्यवसाय यशस्वीरीत्या सांभाळला. पण फौजदारी दाव्यांमधला एकूण व्यवहार त्यांना उबग आणणारा होता. त्यामुळे त्यांनी आपल्या वडिलांकडे वकिली सोडून देण्याचा विचार बोलून दाखवला. पण वडिलांचं म्हणणं होतं, की वाटल्यास बाबांनी फौजदारी सोडून फक्त दिवाणी दावे स्वीकारावेत पण वकिली सोडू नये.

शेवटी १९३९ मध्ये दुर्गमधली वकिली सोडून ते वरोऱ्यात आले. वडिलांच्या इच्छेप्रमाणे इथे राहून वकिली करायची, असं त्यांनी ठरवलं असलं तरी त्यांच्या डोक्यात काही वेगळाच विचार सुरू होता. या काळात बाबांवर महात्मा गांधींच्या विचारांचा प्रभाव पडायला सुरुवात झाली. वकिली करून पैसा मिळवण्यात त्यांना रस वाटेनासा झाला होता. उलट, वकिली पेशाबद्दल त्यांच्या मनात नाराजी दाटून येत होती. गुन्हेगारांचे संरक्षण करणारे वकील खोऱ्याने पैसा ओढतात. पण श्रमिकांची वकिली

करण्यासाठी कोणीच पुढे येत नाही, याची त्यांना मनापासून खंत होती. त्यामुळे त्यांनी वरोऱ्यात एक वेगळा प्रयोग करायचं ठरवलं. वामनराव स्वान आणि बाबुकाका खिस्ती अशा दोघा वकील मित्रांबरोबर सहकारी तत्त्वावरचा वकिली व्यवसाय थाटायचं त्यांनी ठरवलं. बाबांच्या डोक्यात अशा कल्पना कुठून यायच्या कोण जाणे! या तिघांचं बँकेत एकच खातं होतं. कोणीही, केव्हाही, कितीही पैसे काढावेत! मुख्य म्हणजे हे तिघं फक्त गरीब अशिलांची प्रकरणंच हातात घेत असत. त्यांच्या या नव्या उपक्रमामुळे वरोऱ्यातल्या श्रमजीवींचं जग बाबांना सामोरं आलं. त्यांचे कष्ट, त्यांच्या समस्या, त्यांचं उपेक्षित-भिरकावून दिलेलं जगणं बाबांना समजू लागलं. मला वाटतं, हाच बाबांच्या आयुष्यातला टर्निंग पॉइंट होता. पुढे बाबांनी वकिली पेशा सोडला, पण उपेक्षित-वंचितांची वकिली (अॅडव्होकसी) करणं हेच जीवितध्येय मानलं!

त्यांच्या मनात असलेली न्याय-समतेबद्दलची ओढ आणि वरोऱ्यात त्यांच्यासमोर उभं असलेलं याच्या नेमकं विरोधी वास्तव यामुळे बाबा ढवळून निघाले. एखादा वकील पंधरा मिनिटांच्या बडबडीचे पन्नास रुपये आकारतो आणि त्याच वेळी एखाद्या मजुराला बारा तास खपून बारा आणेही मिळू शकत नाहीत, या विरोधाभासाने ते प्रचंड अस्वस्थ झाले. प्रत्येक माणसाला सन्मानाने आणि सुखाने जगण्याचा हक्क आहे. तो त्यांना मिळत नसेल तर तो मिळवून देण्यासाठी त्यांना मदत करणं हे आपलं कर्तव्य आहे, ही भावना त्यांच्या मनात जन्मली ती बहुतेक याच काळात. मनातल्या अस्वस्थतेला प्रतिसाद देत त्यांनी वरोऱ्यात तळागाळातल्या श्रमिकांच्या संघटना बांधायला सुरुवात केली. त्यात विणकर होते, झाडूवाले होते, सफाई कामगार होते. समाजाने उपेक्षिलेल्या, अस्पृश्य म्हणून गणल्या गेलेल्या जातींतल्या श्रमिकांसाठी त्यांनी त्या काळात जवळपास सोळा संघटना बांधल्या. विशेषतः डोक्यावरून मैला वाहून नेणाऱ्या समाजामध्ये त्यांची ऊठबस जास्त होती. त्यांचे प्रश्न समजून घेण्यासाठी त्यांनी स्वतः मैला वाहून न्यायला सुरुवात केली. त्यासाठी पहाटे चार वाजता ते कामाला भिडलेले असायचे. सकाळी आठपर्यंत हे मैला सफाईचं काम आणि मग इतर कामं, असा उद्योग जवळपास नऊ महिने सुरू होता. जे करायचं ते मनापासून आणि झोकून देऊन, असा बाबांचा स्वभाव. काठावर राहणं जणू त्यांना माहितीच नव्हतं. त्यामुळे ते दलितांमध्ये मिसळले तेही त्यांच्यातलेच एक बनून.

बाबांच्या आयुष्यातलं पुढचं पाऊल होतं ते ‘श्रमाश्रम’ प्रयोगाचं. जिथे सर्व जाति-धर्मांचे लोक एकत्र येऊन श्रम करतात आणि गुण्यागोविंदाने एकत्र राहतात असा आश्रम म्हणजे श्रमाश्रम. हा एक साम्यवादाचा प्रयोगच होता म्हणा ना. वरोऱ्यातले बाबांचे मित्र बॅरिस्टर रा. कृ. पाटील (आयसीएस) यांच्या आऊटहाऊसवर बाबांनी अठरापगड मागास जातींना घेऊन राहायला सुरुवात केली. बाबा तेव्हा ऐन तिशीत होते. नुकतंच लग्न झालेलं होतं. त्यामुळे सोबत पत्नी साधना (पूर्वाश्रमीची इंदू) होती. सकाळी उठून प्रत्येकाने आपापल्या कामावर जायचं, संध्याकाळी परत आल्यावर सर्वांची दिवसभराची कमाई एकत्र करायची आणि त्यातून सर्वांचा खर्च चालवायचा, अशी पद्धत इथे अवलंबली गेली. संध्याकाळी सगळे मिळून प्रार्थना म्हणत आणि मग एकत्रच जेवण होई. प्रार्थनाही कशी, तर सर्वधर्मीय! पुढे आनंदवनातही बाबांनी तीच पद्धत रूढ केली. आजही आमच्या

आनंदवनात ना मंदिर आहे ना मशीद. तिथे प्रार्थना होते ती फक्त मानवतेची.



वरोऱ्यातल्या या आऊटहाऊसमध्ये बाबांनी अठरापगड जातींच्या लोकांना सोबत घेऊन साम्यवादाचा 'श्रमाश्रम' प्रयोग केला.

हे आऊटहाऊस अगदी आडबाजूला एका मुस्लिम दफनभूमीजवळ होतं. आऊटहाऊसजवळ पाटलांचीच थोडीफार जमीन होती. तिथे सगळे मिळून भाजीपाला पिकवत. बाबा वरोऱ्याच्या बाजारपेठेत जाऊन तो विकत. विकणं कसं, तर खरेदी करणाऱ्याने त्याला योग्य वाटेल तेवढे पैसे द्यावेत आणि हवा तेवढा माल घेऊन जावं! या पद्धतीमुळे समाजात कोण खरं श्रीमंत आणि कोण गरीब यातला भेदाभेदही उघड होऊन जायचा. श्रीमंत लोक चारदोन पैसे टाकून टोपलीभर वांगी घेऊन जायचे आणि या पागल वकिलाची कशी जिरवली, असं मनोमन म्हणायचे. तर दुसरीकडे, मोलमजुरी करणारी गरीब माणसं मात्र भाजीपाल्याचा जो काही भाव असेल त्यापेक्षा जास्त पैसे देऊन भाजी खरेदी करून जायची. या श्रमाश्रम प्रयोगात अस्पृश्यतेलाच काय, विषमतेलाही स्थान नव्हतं. सारे एकाच पातळीवर. ना जातीचा भेद, ना श्रमजीवी-बुद्धिजीवी यांच्यात फरक.

श्रमाश्रमाच्या प्रयोगामागची कल्पना बाबांची असली तरी या प्रयोगाचा कणा होती आमची आई, म्हणजेच 'ताई'. बाबा आणि इतर पुरुष मंडळी कामासाठी बाहेर असत; पण एवढ्या मोठ्या कुटुंबाचा डोलारा सांभाळण्याचं काम ताईने केलं. खरं तर ताई अतिशय कर्मठ ब्राह्मण कुटुंबात वाढलेली होती. नाना जातिधर्मांच्या मंडळींसोबत राहणं हा तिच्यासाठी मोठा सांस्कृतिक धक्का होता; पण ताईने तो पचवला. एवढंच नव्हे, तर बाबांचे पुरोगामी विचार तिने स्वतःच्या अंगी मुरवले. श्रमाश्रमाच्या प्रयोगात ताईने अफाट कष्ट केले. सर्वांचा स्वयंपाक, झाडलोट, पाणी भरणं, कुटुंबातल्या सर्व मुला-मुलींची काळजी घेणं ही कामं थकवणारी होती; पण हे सर्व करून ती झाडू विणण्यासारखी अनेक कामंही शिकली. असल्या कामाची सवय नसल्यामुळे सुरुवातीला तिच्या हाताची सालटी निघत, पण ती नेटाने ते काम करत राही. बाबांच्या प्रत्येक कामात तिचा मनापासून सहभाग असे. त्यामुळे बाबा कायम म्हणत, 'इंदू हा माझा आत्मा आहे.'

श्रमाश्रमाचा प्रयोग वर्ष-दीड वर्ष चालला, पण नंतर साथीचे रोग आणि आणखी काही कारणांमुळे तो बंद पडला. पण बाबा खचले नाहीत. त्यांचं म्हणणं होतं, 'हे मूल पडलं आहे ते पुन्हा उठून धावण्यासाठी. या प्रयोगातून जे मिळायचं ते मला मिळालं आहे. अशा अपयशांतूनच पुढील दिशा निश्चित होत जातात.' श्रमाने आत्मशुद्धी होते, श्रमातून

निर्मिती होते, ही जीवनदृष्टी बाबांना या प्रयोगातून मिळाली होती. पुढे त्यांनी शून्यातून आनंदवनासारख्या प्रतिसृष्टीची निर्मिती केली ती याच दृष्टीच्या बळावर. बाबांच्या कामाकडे केवळ कुष्ठरुग्ण किंवा अंध-अपंगांसाठी केलेलं काम या दृष्टीने बघणं अपुरं आहे, असं मी म्हणतो ते त्यामुळेच. बाबांना समाजातल्या उपेक्षित वर्गावर होणाऱ्या अन्यायाची चाड होती आणि या वर्गाबद्दल बंधुत्व. लक्षात घ्या, करुणा नव्हे, तर बंधुत्व! समाजात समता, बंधुता आणि न्याय प्रस्थापित होण्यासाठी प्रयोग करत राहण्याची त्यांची धडपड होती.

श्रमाश्रमाचा प्रयोग बंद होत असतानाच बाबांच्या आयुष्याची दिशा निश्चित करणारा तो प्रसंग घडला. मैला वाहून नेण्याच्या कामावरून परतताना त्यांना गटारात पडलेला कुष्ठरोगी दिसला. तुळशीराम त्याचं नाव. नाक-कान झडून गेलेले. अंगावरच्या जखमांमधून अळया बाहेर येत होत्या. वरून रपारप पडणाऱ्या पावसात एखाद्या निर्जीव गोळयासारखा तो रोगी रस्त्यावर पडलेला होता. त्या दृश्याने बाबा पुरते हादरले. त्यांच्या मनात पहिला विचार आला तो तिथून ताबडतोब पळून जावं हाच; पण त्यांनी स्वतःला सावरलं. पावसापासून रक्षण करण्यासाठी स्वतःकडचं एक तरट त्याच्या अंगावर टाकून ते घरी आले. एका रोगाने पूर्णपणे उद्ध्वस्त केलेलं माणसाचं शरीर पाहिल्याने बाबा हलून गेले होते. ती अमानुष अवस्था पाहून बाबांच्या मनात पहिल्यांदाच भीती निर्माण झाली. 'त्या माणसाप्रमाणेच मलाही कुष्ठरोग झाला तर काय, माझ्या पत्नीला-मुलांना-सहकाऱ्यांना झाला तर काय,' या प्रश्नांनी त्यांचा ताबा घेतला होता.

गांधीजींनी बाबांना 'अभय साधक' म्हटलं होतं. ट्रेनमध्ये एका नववधूवर हात टाकणाऱ्या ब्रिटिश सैनिकांशी बाबांनी निडरपणे दोन हात केले म्हणून गांधीजींनी त्यांना ही उपाधी दिली होती. पण आता त्या पदवीची बाबांना स्वतःला लाज वाटू लागली. 'एका रोगाला घाबरून पळणारा मी कसला आलोय निडर', असा सवाल त्यांचं मन रोज त्यांच्यासमोर उभं करू लागलं. आणि त्यातून त्यांची खरी अभय साधना सुरू झाली. जीवनाची दिशा निश्चित झाली. आता पुढे आयुष्यभर कुष्ठकार्याला वाहून घ्यायचं हा निर्णय पक्का झाला. बाबा म्हणायचे, "कुष्ठरोगाच्या कामात मी का शिरलो? कुष्ठरोगाची माझी भीती जावी म्हणून. स्वतःची भीती घालवावी आणि समाजाचीही भीती नष्ट करावी म्हणून."

कुष्ठरोगाच्या कामाला वाहून घ्यायचं ठरवल्यावर बाबांनी या रोगाचा अभ्यास करायला सुरुवात केली. कुष्ठरुग्णांसाठी जगभरात काम केलेल्या व्यक्ती आणि संस्थांबद्दल त्यांनी वाचायला सुरुवात केली. कुष्ठरुग्णांवरील उपचारांचा प्रत्यक्ष अनुभव घ्यायचं ठरवलं. त्यांच्या स्वभावाप्रमाणे त्यात पूर्ण झोकून दिल्याशिवाय त्यांना स्वस्थ बसवणार नव्हतं. आचार्य विनोबा भावे यांच्या सल्ल्याने त्यांनी मनोहर दिवाण यांच्या वर्ध्याजवळच्या दत्तपूर कुष्ठधामात जायला सुरुवात केली. दिवाण यांना गांधीजींनी 'पहिले भारतीय मिशनरी' या शब्दांत गौरवलं होतं. दिवाण यांच्या कुष्ठधामात कुष्ठसेवेच्या प्रशिक्षणाची सोय होती. ते करण्यासाठी बाबा वरोरा ते वर्धा आणि वर्धा ते

दत्तपूर असा प्रवास करत.

तिथे अनुभव मिळाल्यावर बाबांनी वरोऱ्याच्या सरकारी हॉस्पिटलमध्ये, नव्हे हॉस्पिटलबाहेर कुष्ठरुग्णांना तपासण्याचं केंद्र उघडलं. तिथे लवकरच मोठ्या संख्येने कुष्ठरुग्ण येऊ लागले. कुष्ठरुग्णांची संख्या डोळ्यात अंजन घालणारी होती. हे कुष्ठरोगी केवढी शारीरिक अन् मानसिक वेदना सहन करत होते! समाजाची ही बाजू आजवर आपल्याला दिसलीच नव्हती, या विचाराने बाबा अस्वस्थ होत आणि आता एक मिनिटही वाया घालवायचा नाही, असं ते मनोमन ठरवत.

बाबांनी कुष्ठरुग्णांसाठीचं काम सुरू केलं तेव्हा घरच्या आघाडीवर काय परिस्थिती होती? त्या वेळेस मी अजून वर्षाचाही झालो नव्हतो आणि प्रकाश ताईच्या पोटात होता. वरोऱ्याला श्रमाश्रमाच्या प्रयोगात काम करून ताईची तब्येत अगदीच नाजूक झाली होती. तिला टीबीसदृश आजार झाला होता. त्यामुळे कधी वर्ध्याच्या कस्तुरबा हॉस्पिटलमध्ये, तर कधी निसर्गोपचारासाठी पुण्याजवळच्या उरळीकांचनला, अशी तिची धावपळ सुरू होती. अशा सगळ्या गोंधळात बाबांचं काम सुरू होतं.

फक्त रुग्णसेवा हे बाबांचं उद्दिष्ट नव्हतं. त्यामुळे त्यांनी रुग्णांच्या पुनर्वसनासाठी जगभरात झालेल्या प्रयत्नांचा अभ्यास सुरू केला. मला बाबांचं वेगळेपण जाणवतं ते मुळावर घाव घालण्याच्या त्यांच्या या वृत्तीत. कुष्ठरुग्णांवर वैद्यकीय उपचार करायचे आणि त्यांचा सांभाळ करायचा, एवढा मर्यादित विचार बाबांनी कधीच केला नाही. कुष्ठरोगाकडे त्यांनी एक सामाजिक प्रश्न म्हणून पाहिलं आणि तो प्रश्न सोडवण्यासाठी फुकट सल्ले न देता ते थेट कामाला लागले. या प्रश्नावर उत्तर म्हणून एक सणसणीत मॉडेल त्यांनी उभं केलं. बाबांचं एक लाडकं वाक्य होतं. ते म्हणायचे, ‘मला थोर नेता वगैरे व्हायचं नाही. मला फक्त हातात तेलाची बुधली घेतलेला मेकॅनिक व्हायचं आहे. जिथे कुठे गरज भासेल तिथे तेलपाणी अन् दुरुस्ती करणारा मेकॅनिक!’

१९४९ मध्ये त्यांनी आपल्या काही मित्रांच्या मदतीने ‘महारोगी सेवा समिती, वरोरा’ ही संस्था सुरू केली आणि तिची कायदेशीर नोंदणीही केली.

सुरुवातीचा काळ प्रश्न समजून घेण्याचा होता. त्यातूनच हळूहळू पुढच्या कामाची दिशा निश्चित होणार होती. कुष्ठरुग्णांसाठी काम करायचं तर केवळ दत्तपूरचा अनुभव पुरेसा नव्हता. या रोगाविषयी शास्त्रशुद्ध माहिती आणि प्रशिक्षण असणं गरजेचं होतं. त्यासाठी कलकत्ता इथल्या ‘स्कूल ऑफ ट्रॉपिकल मेडिसिन’ या संस्थेचा पदविका अभ्यासक्रम पूर्ण करण्याचं बाबांनी ठरवलं. पण थोडी अडचण होती. तिथलं शिक्षण अर्थातच फक्त वैद्यकीय पदवीधरांसाठी होतं. तिथे एका वकिलाला कसा प्रवेश मिळावा? पण बाबांनी ठरवलेली गोष्ट ते करणार नाहीत, हे शक्यच नव्हतं. बाबांनी विनोबांच्या मदतीने आणि पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या मध्यस्थीने या संस्थेत प्रवेश मिळवला. त्या वेळी प्रसिद्ध संशोधक आणि कुष्ठरोगतज्ज्ञ डॉ. धर्मेंद्र या संस्थेचे अधिष्ठाता होते.

या संस्थेत शिकत असताना बाबांनी एक अचाट प्रयोग केला. एकदा विद्यार्थ्यांशी बोलता बोलता डॉ. धर्मेंद्र म्हणाले, की 'माणसाव्यतिरिक्त कोणत्याही प्राण्याच्या शरीरात कुष्ठरोगाचे जंतू वाढत नाहीत. त्यामुळे प्रयोगासाठी माणूस हा एकच संभाव्य प्राणी उरतो. आणि म्हणूनच आजवर कुष्ठरोगावरची लस तयार करण्यात यश मिळालेलं नाही.' डॉ. धर्मेंद्र हे सहजपणे बोलून गेले; पण बाबांनी ते मनावर घेतलं आणि त्यांनी प्रयोगाखातर स्वतःच्या शरीरात कुष्ठरोगाचे जंतू टोचून घेण्याची तयारी दाखवली. तयारी दाखवली कसली, जंतू टोचून घेण्यासाठी ते आपल्या प्राध्यापकांच्या मागेच लागले. प्राध्यापकांनी अर्थातच या वेड्या धाडसाला नकार दिला. पण बाबा थोडेच ऐकणार होते? त्यांनी आग्रह धरून स्वतःवर दोन चाचण्या करून घेतल्या. एकदा मृत जंतू, तर एकदा जिवंत. सुदैवाने दोन्ही प्रयोगांचा बाबांवर काहीही परिणाम झाला नाही. संकटाला सामोरं जाण्याची बाबांची रीत काय होती ते या एका उदाहरणावरून कळावं. हे प्रशिक्षण बाबांनी पहिला क्रमांक मिळवून पूर्ण केलं, पण डॉक्टर नसल्यामुळे त्यांना सर्टिफिकेट मात्र मिळालं नाही.

या प्रशिक्षणाहून परतल्यावर १९५१मध्ये संस्थेला तत्कालीन मध्य प्रांत आणि वऱ्हाड (सीपी अँड बेरार) सरकारकडून वरोऱ्यापासून पाच किलोमीटर अंतरावर ५० एकर जंगल जमीन मिळाली. त्यांचा पहिला कार्यकर्ता ताई. त्या वेळी माझं वय होतं चार, तर प्रकाशचं तीन. बाबा त्या वेळी होते ३७ वर्षांचे. दत्तपूरच्या कुष्ठधाममधील सहा कुष्ठरुग्ण, ती ५० एकर काटेरी झाडाझुडुपांनी भरलेली जमीन, १४ रुपये रोख आणि विनोबांनी आवर्जून पैसे देऊन घ्यायला लावलेली एक गाय, एवढ्या पुंजीवर ताई-बाबांनी कामाला सुरुवात केली. ताई नुकती आजारातून उठलेली होती आणि बाबांचीही प्रकृती यथातथाच होती. पूर्वी क्वेट्ट्यातल्या भूकंपग्रस्तांच्या मदतीसाठी जात असताना ट्रेनमध्ये झालेल्या अपघातात बाबांचा खांदा दुखावला होता. त्यामुळे शारीरिक श्रम करणं त्यांच्यासाठी तसं धोक्याचंच होतं. पण त्याची पर्वा न करता बाबा-ताई कामाला लागले. कोणाचीही साथ नसताना या दोघांनी तरुण वयात केलेला निर्धार खरोखरच अजब होता.


आनंदवनात जंगल साफ करून उभारलेल्या अशा झोपड्यांमध्येच सुरुवातीला बाबांचा मुक्काम होता.

तेव्हा आम्ही सारेच वरोरा गावात राहत होतो. आनंदवनात राहायला यायचं तर

पहिली गरज होती ती ही जागा राहण्याजोगी करण्याची. तेच काम डोंगराएवढं होतं. दगडधोंडे बाजूला सारायचे आणि जमीन सपाट करून त्यावर एक झोपडी उभी करायची, हे पहिलं काम करावं लागणार होतं. त्यासाठी मजूर बोलवून काम करून घेण्याचा पर्याय त्यांच्यासमोर उपलब्ध नव्हता. त्या काळी समाजात भुताखेताची नसेल एवढी कुष्ठरोगाची भीती होती. त्यामुळे कुष्ठरोग्यांच्या मदतीला कोणी गावकरी येईल किंवा पैसे देऊनही मजूर येतील, अशी शक्यता नव्हती. शिवाय अशी तयारी कोणी दाखवली असती तरी त्यांना द्यायला बाबांकडे पैसे तरी कुठे होते? हे काम सुरू करण्यापूर्वीच बाबांनी वडिलोपार्जित मिळकतीकडे साफ दुर्लक्ष केलं होतं. काम करण्याची तळमळ आणि कोल्हापूरच्या कोरगावकर ट्रस्टकडून दरमहा मिळणारं १०० रुपये मानधन, एवढीच पुंजी त्यांच्याकडे होती. त्यामुळे जंगल साफ करण्यापासून ते विहीर खोदण्यापर्यंत प्रत्येक कामात रोगामुळे अपंगत्व आलेले सहा कुष्ठरुग्ण आणि खांदा दुखावलेले बाबा अशा सातजणांची फौज होती.

पहिली झोपडी उभी राहीपर्यंत कुष्ठरुग्णही वरोऱ्याला आमच्या घरातच राहत होते. तिथून सगळ्यांसाठी जेवण तयार करून आणि आम्हा दोघा भावांना बखोटीला बांधून हे सर्वजण जंगलाकडे चालू लागत. दिवसभर जंगल साफ करून पुन्हा रात्री घरी परतत. हळूहळू आसपास वावरण्याएवढं जंगल साफ झालं. पहिली झोपडी बांधून झाल्यावर हे कुष्ठरोगी त्या जंगलात राहू लागले. मग पुढची झोपडी बांधण्याचं काम हाती घेतलं गेलं. पण ती झोपडी पूर्ण होईपर्यंत बाबा अन् ताईची पायपीट तशीच चालू राहिली. हळूहळू दुसरीही झोपडी उभी राहिली आणि आम्ही सगळे त्या जंगलात मुक्कामाला गेलो. ताई सांगायची, की आम्ही राहायला गेल्यावरही त्या जागेत जंगली प्राण्यांचा वावर होता. अगदी वाघ आणि बिबट्याचंही दर्शन घडायचं. साप, विंचू यांचं तर ते हक्काचं घरच होतं. आम्हीच त्यावर अतिक्रमण केलेलं होतं. त्यामुळे या प्राण्यांनी दिलेला प्रसाद घेतच आमचं जगणं सुरू होतं.

झोपड्या बांधून होत असतानाच दुसरीकडे विहीर खणण्याचं काम बाबांनी हातात घेतलं. तेव्हा आनंदवनाजवळ वडारांची वस्ती होती. बाबांचा त्यांच्याशी चांगला संवाद होता. पुढे बाबांनी त्यांच्यासाठी शबरी कोऑपरेटिव्ह सोसायटीही काढली. त्या वस्तीतल्याच बोदूलाल नावाच्या वडाराने बाबांना सुरूंग वापरून विहीर खणायला शिकवलं होतं. अर्थात प्रत्यक्ष विहीर खणण्याचं काम कुष्ठरुग्णांनाच करावं लागायचं. सर्व कुष्ठरुग्णांच्या हातापायांची बोटं झडलेली. त्यामुळे हातात कुदळ किंवा पहार पकडणं जवळपास मुश्किलच. अशा स्थितीत खडकाळ जमीन खोदणं किती कठीण असेल याची कल्पना करून बघा. त्यात बाबांच्या खांद्याचं दुखणं सतत फणा काढून वर येणारं. पण सर्वांच्या मनात जबरदस्त इच्छाशक्ती. आपण केलं तरच हे काम होईल, असं साधं गणित सर्वांच्या मनात होतं. त्यामुळे सारेजण जमेल तेवढी शक्ती लावून कामाला लागायचे. या श्रमांना एके दिवशी फळ आलं. पाण्याचा एक छोटा झरा लागला. पाणी मिळू शकतं अशी आशा त्यातून तयार झाली.

त्या आशेच्या जोरावर ओसाड जागेचा कायापालट होऊ लागला. आत्मसन्मानाने

जगण्याच्या ध्यासाने कुष्ठरुग्ण इथे अक्षरशः वेड्यासारखे शारीरिक कष्ट करत राहिले. बाबा कायम म्हणायचे, 'आनंदवनातला आनंद हा इथल्या रोगापेक्षा अधिक लागट आहे.' मला वाटतं, बाबांनी आपल्या ध्येयवेडाची लागणही या कुष्ठरुग्णांमध्ये अशीच झपाट्याने पसरवली. कारण पहिल्या काही वर्षांमध्ये या लोकांनी केलेलं काम राक्षसी वाटावं असंच होतं.

संस्थेचं नाव 'महारोगी सेवा समिती' असं असलं तरी बाबांनी या जागेचं नाव ठेवलं 'आनंदवन'- फॉरेस्ट ऑफ ब्लिस! आता कोणी कोणी आनंदवनाचं भाषांतर 'फॉरेस्ट ऑफ जॉय' असं करतात. पण बाबांना अपेक्षित होता तो सर्वोच्च आनंद-ब्लिस. हे नावदेखील बाबांच्या पुढच्या कामाची नांदी होती. जन्मलेल्या प्रत्येकाला, मग ते कुष्ठरोगी असोत किंवा अंध-अपंग, आनंदाने जगण्याचा हक्क आहे, हा बाबांचा विचार होता. हा हक्क मिळवून देण्यासाठी जे लागेल ते उभं करण्याचा ध्यास बाबांनी घेतला होता. त्यामुळे अगदी सुरुवातीच्या काळात आनंदवनात येणाऱ्यांना मोठाच धक्का बसत असे. कुष्ठरुग्णांची वसाहत म्हणून जे चित्र बाहेरून येणाऱ्यांच्या डोळ्यांसमोर असायचं त्याच्या अगदीच विपरीत इथलं जगणं होतं.


कष्ट अमाप होते, पण ते कष्ट करण्यात आनंद होता. केवळ माणसाच्या कष्टांनी एकरच्या एकर जंगल साफ करून ती जमीन शेतीसाठी नांगरून काढायची, पिकं लावायची, विहिरी खणायच्या, नवी घरं उभी करायची म्हणजे सोपं काम नव्हे. पण हे काम आपण स्वतःच्या हक्कासाठी, आनंदासाठी करतो आहोत याची जाणीव बाबांनी कुष्ठरुग्णांमध्ये जागृत केली होती. त्यामुळेच जी कामं व्हायची ती मनापासून. विहिरीला पाणी लागल्या लागल्या बाबांनी त्यावर मोट बसवली आणि शेतीला सुरुवात झाली. पाण्याचा एक थेंबही वाया जाऊ द्यायचा नाही यावर बाबा ठाम. 'मोअर क्रॉप पर ड्रॉप' हे बाबांचं तेव्हापासूनचं तत्त्व! त्यामुळे एकीकडे विहिरी खणल्या जाताहेत आणि दुसरीकडे शेतांची लागवड होतेय, असं दृश्य आमच्याकडे कायम दिसायचं.

कामं झाली की सारे एकत्र जेवायचे. एकत्र गप्पा-गोष्टी चालायच्या. भजनं म्हटली जायची. रात्री प्रार्थना व्हायच्या. त्यात तुकडोजी महाराजांची भजनं, विनोबा भावे यांच्या गीताईतले अध्याय, गांधीजींच्या सर्वधर्मीय प्रार्थना असायच्या. त्या प्रार्थनांमध्ये दिवसभराचा शीण विसरून नव्या जोमाने अन् एकदिलाने कामाला लागण्याची ताकद होती. अशा रीतीने आनंदवनात सगळे आनंदाने अन् समरसून जगायचे.

२१ जून १९५१ रोजी विनोबा आनंदवनात आले. भूदान यात्रेदरम्यान तेलंगणातून परतताना ते वाटेत थांबले होते. त्यांच्यासोबत गौतम बजाज आदी सहकारी होते. तेव्हा दोन झोपड्या बांधून झालेल्या होत्या. विनोबांनी कुष्ठरुग्णांना स्वतःच्या हाताने झोपडीत नेलं. विनोबांच्या हातून आनंदवनाचं प्रतीकात्मक उद्घाटन झालं म्हणा ना! मी तेव्हा अवघा चार वर्षांचा होतो, त्यामुळे विनोबा काय म्हणाले होते हे आठवणं शक्यच नाही. पण विनोबांचं बोलणं पुढे ताईच्या तोंडून अनेकदा ऐकलं. विनोबा म्हणाले होते, "स्वतःच्या श्रमांतून तुम्ही जीवनात आनंद निर्माण केला आहे, त्यामुळे आनंदवन हे नाव

सार्थ आहे. इथे सेवेचे रामायण लिहिले जाईल.”

हा सुरुवातीचा काळ खरोखरच धामधुमीचा होता. बाबा आणि ताईला एकाच वेळी अनेक जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागत. बाबांना एकीकडे आनंदवनात घरं, शेती, विहिरी असं सगळं उभं करायचं होतं, तर दुसरीकडे आसपासच्या गावांतल्या कुष्ठरुग्णांचा शोध घेऊन त्यांच्यावर उपचार सुरू करायचे होते. समाजाने या रुग्णांना स्वीकारावं यासाठी प्रयत्नही करायचे होते. रुग्णांवर उपचार करण्याचं काम फक्त बाबाच करू शकत होते. आनंदवनाच्या रसोड्याची, म्हणजे स्वयंपाकघराची जबाबदारी ताईवर होती. त्याशिवाय भांडी घासणं, पाणी भरणं, गाईचं दूध काढणं, जमेल तेवढी शेतीतली कामं करणं अशी किती तरी कामं. आनंदवनाचं स्वप्न बाबांनी पाहिलं, पण ते प्रत्यक्षात आणण्यात मोठा वाटा होता तो ताईचाच. तिने आनंदवनात स्वतःला अक्षरशः गाडून घेतलं होतं. ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत अण्णासाहेब सहस्रबुद्धे त्या वेळी अनेकदा आनंदवनात यायचे. बाबांबद्दल तर त्यांना प्रेम होतंच, पण त्याहूनही त्यांना कौतुक वाटायचं ते ताईचं. ते आले की ताईला स्वयंपाकात मदत करू लागायचे. ताईला ‘जगदंबा’ मानून साष्टांग नमस्कार घालायचे ते तिला.


आनंदवन उभं करण्यासाठीच्या इतर हजार कामांबरोबरच रसोड्याची सगळी जबाबदारीही साधनाताईंवरच होती.

तर सांगत असं होतो, की ताई-बाबा आम्हाला दिवस-रात्र कामाला जुंपलेले दिसायचे. आमचं अख्खं बालपण असंच कष्टकरी माणसं पाहण्यात गेलं. आम्हीही जमेल तशी कामं करत राहायचो. सुरुवातीच्या काळात ‘लोखंडी’ नावाच्या झाडाची जळती फांदी घेऊन ती गोल गोल फिरवत आम्ही काटेरी झुडपं साफ करायचो, ते मला अजूनही आठवतं. पाणी भरणं, ताईला स्वयंपाकात मदत करणं, घराची साफसफाई, अशीही कामं खूप असायची. ताई-बाबांनाही आपल्या पोरांकडे खास लक्ष देण्यासाठी वगैरे वेळ नव्हता. त्यांनी आम्हाला खायला-प्यायला काही वेगळं केलंय, आमचे लाड केलेत असंही मला आठवत नाही. आनंदवनातल्या कुष्ठरोग्यांसोबत आम्हाला जमतील तेवढी कामं करत आणि

शाळा सांभाळत आम्ही दोघं भाऊ वाढलो.



लहानपण एकटेपणाने भरलेलं असल्याने आपला आपणच विरंगुळा शोधावा लागत असे. चुलीशेजारी लहान विकास.

मोठे झालो आणि पोरांची काळजी घेणारे इतर आई-वडील पाहू लागलो तेव्हा कळलं की आपलं बालपण वेगळं होतं. पण लहान असताना मात्र त्यात वेगळं असं काही वाटायचं नाही. कारण तेव्हा बाकीचं जग आम्ही पाहिलेलंच नव्हतं. आमच्या दृष्टीने आनंदवन हेच आमचं जग होतं आणि ताई-बाबा अन् आनंदवनातले कुष्ठरुग्ण हेच आमचं कुटुंब. कुणाला आश्चर्य वाटेल, पण आम्ही पुढे शाळेत जाऊ लागल्यावरही आमचं जग मर्यादितच राहिलं. कारण कुष्ठरुग्णांच्या वसाहतीत राहणाऱ्यांना कोण कसं आपलंसं करणार? काही अपवाद सोडले तर अगदी सुरुवातीच्या काळात आनंदवनाचा वरोऱ्याशी अन् आसपासच्या इतर गावांशी काहीच संबंध नव्हता. लोक आसपास फिरायचे, आमचा अंदाज घ्यायचे पण आत येऊन बोलायला धजावायचे नाहीत.

पण या साऱ्याची बाबांना पर्वा नव्हती. त्यांनी आपलं काम सुरूच ठेवलं होतं. एकीकडे आनंदवनाचं रोपटं जोपासत असताना बाबा आसपासच्या गावांमध्ये कुष्ठरुग्णांवर उपचार करण्यासाठी फिरायचे. या मोहिमेला त्यांनी नाव दिलं होतं, 'ट्रेस अँड ट्रीट कँपेन' म्हणजे कुष्ठरोगी शोधून त्यावर उपचार करण्याची मोहीम. आसपासच्या खेड्यांमधले कुष्ठरुग्ण शोधायचे, शक्य तितक्या रुग्णांवर तिथल्या तिथेच उपचार करायचे, त्यांच्या घरच्यांना या रोगाबद्दल माहिती सांगायची, त्यांच्या मनातला गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न करायचा, असं काम बाबा एकहाती करत होते. भल्या पहाटे हे काम करून आनंदवनात परतलं की इथल्या रुग्णांवर उपचार. हे काम संपवल्यानंतर बाबा आनंदवनातल्या इतर दैनंदिन कामांकडे वळत. तिथे कामांचा डोंगर त्यांची वाटच पाहत असे.

त्यांच्या कामाचं हे स्वरूप पाहिलं की वाटतं, एखादा माणूस एवढं अवाढव्य काम कसं काय करू शकतो? सहसा अशा प्रश्नांना सोपी उत्तरं शोधण्याचा कल आपल्याकडे असतो. विलक्षण काम करून दाखवलेल्या कोणत्याही माणसाला संत वगैरे पदवी दिली, त्याला महामानव, दैवी चमत्कार म्हटलं की हे काम कसं उभं राहिलं असेल हे समजून घेण्याच्या फंदात पडावं लागत नाही. बहुतेक त्यामुळेच तशा प्रकारचं काम अन्यत्र कुठे उभंही राहत नाही. पण बाबांनी आनंदवनात फक्त स्वतः काम केलं असं नाही, तर

कुष्ठरुग्णांकडूनही तसंच काम करून घेतलं. 'जर कुष्ठरुग्ण हे करू शकत असतील तर कोणीही करू शकतं', हे त्यांचं एक लाडकं वाक्य होतं.

प्रत्येक व्यक्तीने स्वतःची क्षमता आणि कल ओळखून त्या क्षमता ताणण्याचा प्रयत्न केला पाहिजे, असं बाबांचं म्हणणं होतं. आपण कशासाठी काम करतो आहोत याची जाणीव असेल, काय करायचं याचं ध्येय असेल, नियोजन असेल आणि स्वतःला ताणण्याची तयारी असेल तर कोणतीही गोष्ट अशक्य नाही यावर त्यांचा ठाम विश्वास होता. आनंदवनाचा सुरुवातीचा इतिहास पाहिला तर त्यांचं म्हणणं किती खरं होतं हे आपल्याला लख्ख दिसून येतं. अन्यथा, सहा अपंग कुष्ठरुग्ण ओसाड माळरानावर आनंदवन फुलवूच शकले नसते. हात-पाय झडलेला कुष्ठरोगी काय काम करणार, असा प्रश्न अन्य कोणालाही पडला असता; पण बाबांना तो कधीच पडायचा नाही. त्यांच्याकडे प्रत्येकासाठी काम तयार असायचं. एखाद्याला शारीरिक कष्टाचं कोणतंही काम शक्य नसेल तर ते म्हणायचे, "तुझं तोंड तर चालू आहे ना? मग जा, शेतावर जाऊन हाकारे दे अन् पाखरं हाकल."


बाबांच्या कार्यपद्धतीचं मला भिडलेलं आणखी एक वेगळेपण सांगतो. आनंदवन उभं करताना बाबांनी कधीच उंटावरून शेळ्या हाकल्या नाहीत. प्रत्येक काम करायला ते इतरांच्या पुढे असायचे. कुष्ठरुग्णांपेक्षा आपण कुणी वेगळे आहोत असं त्यांना कधीही वाटायचं नाही. कामं करताना, एकत्र जेवताना, प्रार्थना म्हणताना ते रुग्णांमधलेच एक होऊन गेलेले असत. कार्यकर्त्यांशी समतत्त्व होऊन जगल्याने त्यांच्यात भावंडभाव तयार झाला होता. त्यामुळे कुष्ठरुग्णांमध्येही सतत कार्यरत राहण्याची ऊर्मी निर्माण झाली असावी असं मला वाटतं. हा संस्कार मनावर झाल्यामुळे पुढे मीही आनंदवनातल्या साऱ्या कार्यकर्त्यांमधला एक म्हणूनच वावरलो.

१९५४ सालापर्यंत आनंदवनातल्या कुष्ठरुग्णांची संख्या सहावरून साठवर गेली. दत्तपूर, डॉ. शिवाजीराव पटवर्धनांचं 'तपोवन' अशा कुष्ठधामांतून आणि बाहेरूनही कुष्ठरुग्ण आनंदवनात येऊ लागले होते. या रुग्णांनी आनंदवनात स्वतःच्या जोरावर सहा विहिरी खणल्या. शेती होऊ लागली, भाजीपाला घेतला जाऊ लागला. तो आनंदवनाला पुरून उरू लागला. हे जास्तीचं धान्य, फळफळावळ वरोरा आणि आसपासच्या गावांमध्ये जाऊन विकायचं, अशी बाबांची कल्पना होती. त्यामागे मुख्य हेतू होता तो समाज आणि कुष्ठरुग्ण यांच्यातली दरी कमी करण्याचा, कुष्ठरुग्णांना आत्मसन्मान मिळवून देण्याचा. कुष्ठरोग्यांनी तयार केलेली उत्तम प्रतीची कृषी उत्पादनं बाहेरच्या बाजारपेठेत जातील तेव्हा कुष्ठरोगाबद्दलचे गैरसमज दूर होतील आणि कुष्ठरुग्णांना समाजात स्थान मिळेल, असं त्यांना वाटत होतं. पण लोकांमध्ये कुष्ठरोगाबद्दल जबरदस्त भीती होती. कुष्ठरुग्णांनी तयार केलेलं धान्य खाल्ल्यामुळे आपल्यालाही हा रोग होईल, असं लोकांना वाटायचं. त्यामुळे सुरुवातीला बाजारात मालाला अजिबात उठाव नसे. परिणामी, आनंदवनातलं हे जास्तीचं धान्य, भाजीपाला, फळं, दूध सगळं वाया जायचं. वरोऱ्यातले काही तुरळक सुजाण लोक तेवढे आपल्या गरजेपुरता माल विकत घ्यायचे, पण एकूण समाज बाबांच्या

स्वप्नापासून कोसो दूर होता.

हा दुरावा तुटला तो ‘सर्व्हिस सिव्हिल इंटरनॅशनल’ (एस.सी.आय.) या आंतरराष्ट्रीय संस्थेमुळे. त्याचं झालं असं, की श्रमसहकारातून आंतरराष्ट्रीय मैत्री जोपासणाऱ्या या संघटनेच्या पन्नास स्वयंसेवकांचं पथक १९५४ साली भारतात आलं. त्यात चौदा देशांतली, तेवीस वेगवेगळया भाषा बोलणारी मंडळी होती. ‘डीड्स, नॉट वर्ड्स’ असं या संस्थेचं ब्रीदवाक्य होतं. हे पथक सुरुवातीला वर्ध्याजवळच्या सेवाग्राम आश्रमात गेलं होतं; पण तिथे त्यांनी करण्याजोगं कोणतंच काम नव्हतं. तिथे त्यांना आनंदवनाची माहिती कळली आणि ते लगेच आमच्याकडे येऊन पोहोचले. त्यांच्यासोबत गांधीजींचे सहकारी शंकरराव (नाना) वेले आणि मृगप्पा गंगणे, प्रसिद्ध विचारवंत वसंत पळशीकर, सेवाग्रामच्या कस्तुरबा हॉस्पिटलचे सुपरिंटेंडंट डॉ. अनंतराव रानडे, दत्तपूर कुष्ठधामाचे मेडिकल ऑफिसर आणि ‘कलकत्ता स्कूल ऑफ ट्रॉपिकल डिसिजेस’मधले बाबांचे सहाध्यायी डॉ. गो. य. जोशी वगैरे मंडळी होती. त्यांनी बाबांची भेट घेतली. स्वतःला जगापासून तोडून बाबा जंगलात येऊन राहिलेले असले तरी त्यांना जगाचा आवाका होता. बाबांचं इंग्रजी उत्तम होतं आणि मुख्य म्हणजे स्वतःच्या कामाबद्दल त्यांच्या मनात पुरेपूर स्पष्टता होती. त्यामुळेच बाबांना एस.सी.आय.चं ब्रीद जवळचं वाटलं असणार. बाबांनी त्यांना आपल्या कामात सामावून घेण्याचं ठरवलं.

आल्या दिवसापासून या पथकाने कामाला सुरुवात केली. तेव्हा आनंदवनात काहीच सोई-सुविधा नव्हत्या. वीजही आलेली नव्हती. या पथकाने स्वतःला राहण्यासाठीच्या झोपड्याही स्वतः बांधून काढल्या आणि पुढच्या कामांना हात घातला. बाबांच्या मनात पुढच्या योजनांचा आराखडा तयारच होता. त्यामुळे या स्वयंसेवकांनी आनंदवनातल्या पहिल्या पक्क्या इमारतीचं काम हाती घेतलं. आता मागे वळून बघताना जाणवतं, ही घटना आनंदवनासाठी अनेक अर्थांनी मैलाचा दगड ठरली. आजवर बाबा-ताई आणि त्यांचे शिलेदार आनंदवनात एकाकी काम करत होते. त्यांना साथ होती ती अगदी हाताच्या बोटांवर मोजता येतील इतक्याच सुहृदांची. सुरुवातीच्या काळात विनोबा भावे, अण्णासाहेब सहस्रबुद्धे, डॉ.शिवाजीराव पटवर्धन आणि नंतरच्या काळात यदुनाथ थत्ते, दामोदर वेले, मधुभाई पंडित, डॉ. रामचंद्र वारदेकर अशी मंडळी आनंदवनात येऊन जाऊन असत. पण एस.सी.आयच्या स्वयंसेवकांमुळे पहिल्यांदाच वरोऱ्यातल्या लोकांचं आनंदवनाकडे लक्ष वेधलं गेलं. पांढरी कातडी इथे येऊन काम करते, त्याअर्थी हे काही तरी वेगळं पाणी दिसतंय, असं वरोऱ्यातल्या लोकांना वाटलं. त्यानंतर खऱ्या अर्थाने आनंदवन आणि बाहेरचं जग यांच्यातली दरी कमी होऊ लागली. अर्थात, काहीही झालं तरी आनंदवनावर टीकाच करायची, असं ब्रीद असणारी मंडळीही तेव्हा कमी नव्हती. त्यामुळे एस.सी.आय.चं पथक इथे येण्यावरूनही बाबांवर टीका झाली. कुणी तर ‘आनंदवन म्हणजे आंतरराष्ट्रीय हेरगिरीचा अड्डा आहे’ असाही आरोप केला. पण असल्या बिनबुडाच्या आरोपांकडे लक्ष द्यायला बाबांना वेळ कुठे होता?





परदेशी स्वयंसेवक आनंदवनात येऊन काम करू लागले आणि मग बाहेरच्या समाजाशी असलेला दुरावा कमी होत गेला.

एस.सी.आय.चे स्वयंसेवक आनंदवनात साडेतीन महिने राहिले. सुरुवातीच्या काळात इमारतीच्या कामासाठी लागणारे सुतार, गवंडी नागपूरहून आणावे लागत. कारण वरोऱ्यातले कामगार आनंदवनात येण्यासाठी राजी नसत. पण या तीन महिन्यांच्या काळात गावातल्या लोकांची आनंदवनात आवक-जावक वाढली, संबंध निर्माण होऊ लागले. आपल्या गावातल्या संस्थेसाठी परदेशी लोक राबताहेत हे बघून वरोऱ्यातल्या काही नागरिकांनी पुढाकार घेऊन या स्वयंसेवकांच्या जेवणाची जबाबदारी स्वीकारली. गावातले काही लोक, विद्यार्थी श्रमदानासाठी आनंदवनात येऊ लागले. वरोऱ्याच्या रेल्वे स्टेशनवरील कर्मचारीवर्गाने तर आनंदवनासाठी विहीर खोदून देण्याचा संकल्प केला आणि तो पारही पाडला.

अशा रीतीने १९५४ पर्यंत केवळ कुष्ठरुग्णांच्या साथीने सुरू असलेल्या आनंदवनाच्या विकासात बाहेरच्या जगाची साथ मिळायला सुरुवात झाली. पण तोपर्यंत बाबांनी कुष्ठरुग्णांमध्ये एक आत्मविश्वास तयार केला होता. त्यामुळे बाहेरच्या जगाकडून मदत स्वीकारताना आनंदवनाने कधीही लाचारी स्वीकारली नाही. आमच्या पाठीशी उभं राहणं ही आनंदवनाइतकीच तुमचीही गरज आहे, अशा आत्मसन्मानाने कुष्ठरुग्णांनी ही मदत स्वीकारली. बाबांच्या कामाचं वेगळेपण होतं ते या दृष्टिकोनात.



सुरुवातीच्या काळातला आनंदवन परिसर.

हा सगळा इतिहास ऐकत-अनुभवत आम्ही मोठे होत होतो. यातल्या काही घटना आठवतात. काहींची केवळ धूसर चित्रं डोळ्यांसमोर आहेत. एक नक्की, आम्ही लहान असतानाचं आनंदवन आठवतं ते भरपूर कामं करणाऱ्या माणसांनी भरलेलं, अशक्य हा शब्द शब्दकोशात नसलेलं, सतत काही ना काही नवं करून पाहण्याची इच्छा असलेलं, एकमेकांची काळजी घेणारं आणि दाराशी आशेने आलेल्या प्रत्येकाला आपल्या कुटुंबात सामील करून घेणारं.

पन्नास ते साठ या दशकाचा एकत्रितपणे विचार केला तर या काळात आनंदवनात प्रामुख्याने शेती बहरली, गाई-म्हशी आल्या, डेअरी सुरू झाली. आनंदवनाची माहिती हळूहळू बाहेर पोहोचू लागली. त्यामुळे समाजाने-कुटुंबाने वाळीत टाकलेले अनेक कुष्ठरुग्ण आशेने आनंदवनात येऊ लागले. कुष्ठरुग्णांची संख्या वाढू लागल्यावर नव्या इमारती उभ्या राहू लागल्या. उद्योग सुरू झाले. या सगळ्या कुष्ठरुग्णांना सामावून घेऊन नवा समाज उभा करायचा, या ध्यासाने बाबा पछाडलेले होते. कुष्ठरुग्णांना समाजाची भीक नको आहे, ते स्वतःच्या पायावर उभे राहू शकतात, हे समाजाला दाखवून देण्याच्या ईर्ष्येने ते पेटलेले होते. आनंदवनाला आत्मनिर्भर बनवण्यासाठी बाबांनी स्वतःला अक्षरशः गाडून घेतलं. या काळात बाबांच्या जोडीने अनेक कार्यकर्तेही तयार होत गेले. त्यातले बरेचसे अशिक्षित होते, पण तरीही समोर येतील ती सगळी कामं ही मंडळी शिकून घेत होती. शंकरदादा जुमडे हे त्याचं उत्तम उदाहरण. शंकरदादा हे आनंदवनात दाखल झालेल्या कुष्ठरुग्णांच्या पहिल्या फळीतले. त्यांना अगदी तरुण वयात कुष्ठरोग झाला होता. पहिली काही वर्षं ते दत्तपूर कुष्ठधामात उपचार घेत होते. नंतर १९५३ च्या दरम्यान ते आनंदवनात दाखल झाले. बाबांच्या तालमीत ते असे काही तयार झाले होते की बस! त्यांनी सोमनाथचा प्रकल्प तर समर्थपणे उभा केलाच, पण बाबांप्रमाणेच अनेक कार्यकर्तेही घडवले. भाऊ नागेलवार हे आणखी एक वेगळं उदाहरण. ते कुष्ठरुग्ण नव्हते. कामासाठी आनंदवनात आले आणि इथलेच झाले. तेही अशिक्षितच, पण आनंदवनातलं सुरुवातीचं सगळं बांधकाम त्यांनीच केलं. त्यांच्या हाताखालीही किती तरी माणसं तयार झाली. बाबा त्यांना आनंदवनाचा ‘चीफ इंजिनियर’ म्हणायचे. अशी इतरही अनेक उदाहरणं देता येतील. शिवाय प्रत्येक माणूस मल्टिटास्किंगमध्ये पटाईत.

सुरुवातीच्या काळात आनंदवनातल्या कुष्ठरुग्णांमध्ये आपापसात लग्नं होत नव्हती, पण नंतर ताईच्या आग्रहानेच बाबांनी या लग्नांना संमती दिली. आनंदवनाने कुष्ठरुग्णांना आत्मसन्मान आणि आर्थिक स्थैर्य मिळवून दिलं होतं; पण आपली सुख-दुःखं वाटण्यासाठी जोडीदार असणं हीदेखील एक माणूस म्हणून त्यांची गरज होतीच. ती ताईने ओळखली. केवळ कुष्ठरोग झाला म्हणून त्यांना प्रेमापासून आणि शारीरिक गरजांपासून वंचित ठेवता कामा नये याची जाणीव बाबांनाही होती. त्यामुळे कुष्ठरुग्णांची आपापसात लग्नं होऊ लागली. त्यातले बरेचसे पुनर्विवाह होते. नवऱ्यांनी सोडलेल्या बायका आणि बायकांनी सोडलेले नवरे. काही वेळा कुष्ठरोग नसलेल्या व्यक्तींनीही कुष्ठरुग्णांचा जोडीदार म्हणून स्वीकार केला आणि आनंदवनातल्या एका वेगळया अध्यायाला सुरुवात झाली. आनंदवनात अगदी पहिल्या काळात झालेल्या लग्नांमध्ये मंगलाष्टकं म्हणायला गो. नी. दांडेकर, तुकडोजी महाराज, रावसाहेब पटवर्धन अशी मंडळी होती, हेही आठवतं.

लग्नं झाल्यामुळे कुष्ठरुग्णांच्या निवासाची रचना बदलली. एकाच वसाहतीमध्ये पण छोटी छोटी स्वतंत्र घरं असलेल्या इमारती बाबांनी बांधून घेतल्या. बाबांनी या वसाहतीला दिलेलं नाव होतं- कम्युन. सर्वांनी एकत्र राहावं, एकत्र काम करावं, एकत्र खावं-प्यावं-मजा करावी आणि त्याचबरोबर प्रत्येकाचं खासगीपणही जपलं जावं अशी या कम्यूनची रचना होती. आनंदवनातलं पहिलं कम्युन बांधलं गेलं ते 'स्विस एड अॅब्रॉड' या स्वित्झर्लंड येथील संस्थेच्या मदतीने. या कम्युनला बाबांनी नाव दिलं 'मुक्तिसदन'. या वसाहतीची रचनाही बाबांनी विचारपूर्वक केलेली होती. एका वर्तुळाकार ब्लॉकमध्ये तीन घरं होती. यातल्या दोन घरांमध्ये दोन कुटुंबं राहतील, तर तिसऱ्या छोट्या खोलीत एखादं वृद्ध जोडपं. त्या दोन तरुण कुटुंबांचा आधार या वृद्ध निराधार जोडप्याला होईल आणि कुटुंबालाही घराशेजारी कोणीतरी वडीलधारं माणूस मिळेल, असा विचार त्यामागे होता. तरुण कुटुंबांनी वृद्ध पालकांना दत्तक घ्यावं, अशी बाबांची कल्पना होती. १९६० मध्ये 'मुक्तिसदन'च्या उद्घाटनावेळी स्वित्झर्लंडचे भारतातील राजदूत जॅक्स अल्बर्ट कुता आनंदवनात आले होते. त्यांनी या वेळी काढलेले ऐतिहासिक उद्गार माझ्या अजूनही लक्षात आहेत. कोणत्याही सामाजिक संस्थेच्या कामाचं ब्रीदवाक्य असायला हवं, असं त्यांचं वाक्य होतं. ते म्हणाले होते, "यू हेल्प मी टू हेल्प यू टू हेल्प युवरसेल्फ." या उद्घाटनावेळी बाबा म्हणाले, "इथे पन्नास रोगमुक्तांचे संसार फुलणार. त्यांच्या खुरटलेल्या जीवनाला इथे नवी पालवी फुटणार." पण या कुष्ठरुग्णांनी तिथे केवळ उपचार घेत राहावं, असा त्यांचा विचार नव्हता. आनंदवनात दाखल झालेला प्रत्येकजण नवनिर्मिती करेल, नवे प्रयोग करेल, असं बाबांना वाटायचं. ते म्हणायचे, "कम्युन्समधले रोगमुक्त इथे सहकारी पद्धतीने आधुनिक तंत्राने शेती करतील, गोपालन-कुक्कुटपालन करतील- निरनिराळे कारखाने चालवतील. या नव्या प्रयोगाला ग्रामीण विद्यापीठाचे स्वरूप येईल."

पुढे अशी अनेक कम्युन्स आनंदवनात उभी राहिली आणि बाबांच्या कल्पनेनुसार तिथे शेती आणि व्यवसाय या दोन्हींमध्ये प्रयोग होत गेले. मुख्य म्हणजे एकत्र जगण्याचा, एकत्र शेती-उद्योग करण्याचा, सहकाराचा प्रयोग या कम्युन्समध्ये यशस्वी झाला.

या सगळ्या घडामोडींचा एक भाग बनूनच आम्ही वाढत होतो. सुरुवातीच्या काळात, जेव्हा आनंदवन समाजापासून तुटलेलं होतं तेव्हा आम्ही दोघं भाऊच एकमेकांचे मित्र होतो. पुढे शाळा सुरू झाली तेव्हाही 'कुष्ठरोग्यांच्या वसाहतीतून आलेली पोरं' म्हणून आमच्यासोबत बोलायलाही कोणी तयार नसायचं. आम्ही बापुडवाणे एकटेच वरोऱ्याच्या शाळेत जायचो आणि एकटेच परत यायचो. सोबत असायची ती आनंदवनातल्याच सोडायला-आणायला येणाऱ्यांची. महादेव आंबेकर हे बाबांचे पाठीराखे अनेकदा आमच्यासोबत असायचे. महादेवभाऊ वरोऱ्याचे. ते नगर परिषदेच्या वाचनालयात साफसफाईचे काम करत. त्यांचा स्वभावगुण बघून बाबांनी त्यांना श्रमाश्रमाच्या प्रयोगात स्थान दिलं. ते बाबांच्या कामात सामील झाले ते कायमचेच. आनंदवनाच्या उभारणीत त्यांचा मोठा हातभार होता. विशेषतः आम्हा भावंडांना सांभाळण्याचं काम त्यांनी केलं. ताईलाही त्यांचा खूप आधार असायचा. ते राहायचे वरोऱ्यात, पण आनंदवनात येण्यासाठी रोज दहा किलोमीटर सायकलने प्रवास करायचे. अगदी शेवटच्या काळापर्यंत ते 'महारोगी सेवा समिती'चे ज्येष्ठ सभासद आणि इंटर्नल ऑडिटर म्हणून काम बघत होते. आमच्या लहानपणीच्या आठवणी त्यांच्याशी जोडल्या गेलेल्या आहेत. लहानपणी आम्हाला सोबत होती ती अशा मोठ्या मित्रांचीच.




आमटे परिवार
ताई-बाबा, ताईंच्या खांद्यावर रेणुका,
तसेच प्रकाश, विकास, नारायण आणि
ताईंची बहीण सुमा

पुढे हळूहळू ही दरी कमी होत गेली आणि आम्हाला मित्र मिळू लागले. शाळेत आणि बाहेरही. शेजारच्या चिनोरा गावाचा नारायण हक्के हा आमचा पहिला मित्र. त्याची गुरं तो आनंदवनाच्या परिसरात चारायला आणायचा. त्याच्याशी आमची दोस्ती झाली. मग तो आमच्याबरोबर शाळेत येऊ लागला. आमच्याच वर्गात बसू लागला. आम्हा दोघांना कोणी तरी मित्र मिळाल्याचा ताईलाही आनंद झाला. नारायणच्या घरची परिस्थिती तेव्हा फारशी बरी नव्हती. मग ताईने नारायणच्या घरी विचारलं आणि त्याला आमच्याकडेच राहायला बोलावलं. तेव्हापासून आम्ही दोघांचे तिघं झालो. नारायण

आमच्या घरातलाच एक झाला तो आजतागायत. आज नारायण आनंदवनातल्या शेतीची सगळी जबाबदारी समर्थपणे सांभाळतो आहे.

आम्ही हायस्कूलमध्ये शिकत होतो तेव्हाचा काळ मला नीट आठवतो. त्या वेळी आनंदवनाची घडी बऱ्यापैकी व्यवस्थित बसली होती आणि बाबांना काम वाढवण्याचे वेध लागले होते. नवी आव्हानं शोधण्याचं जणू व्यसनच होतं त्यांना. ते म्हणायचेही, 'वुई क्रेव्ह टु डिस्कव्हर न्यू चॅलेंजेस अँड अॅक्सेप्ट देम' १९५५ मध्ये बाबांनी नागपूरजवळ 'अशोकवन' हा प्रकल्प सुरू केला. तिथे बाबांनी शहरी कुष्ठरुग्णांसाठी वसाहत उभी केली. तिथेही शेती बहरू लागली. आनंदवनाचा व्याप सांभाळून बाबांच्या तिकडे खेपा सुरू असायच्या. पुढे 'अशोकवन' एक स्वतंत्र प्रकल्प म्हणून उभा राहिला. शिवाय नागपूरजवळ असल्याने आनंदवनासाठीचं लॉजिस्टिक्स सेंटर म्हणून त्या प्रकल्पाचा खूपच उपयोग झाला. अशोकवनाची घडी बसेपर्यंत बाबांना आनंदवनात कॉलेज सुरू करण्याचे वेध लागले होते. हे कॉलेज आनंदवनातल्या मुलांसाठी नव्हतं. आनंदवनात कुठून येणार कॉलेजमध्ये जाऊ शकतील एवढी मुलं? मग कॉलेज सुरू करावं असं बाबांनी का मनावर घेतलं असेल? 'समाजाने कुष्ठरुग्णांना कायम वाळीत टाकलं असलं, तरी स्वतःच्या पायावर उभ्या राहिलेल्या या रुग्णांना सामाजिक बांधिलकीची चाड आहे. त्यामुळे समाजाची गरज म्हणून आनंदवनाने कॉलेज सुरू करायला हवं', असं बाबांचं म्हणणं होतं. आनंदवनातल्या कुष्ठरुग्णांसोबत या विषयावर चर्चा करणारे आणि आपलं म्हणणं ताईला व इतर मंडळींना समजावून सांगणारे बाबा मला नीट आठवतात.


मित्रमेळाव्यांमधील थोरामोठ्यांच्या सहभागामुळे आनंदवनाला भक्कम मानसिक आधार मिळाला. (१९८१चा मित्रमेळावा)

त्यानंतर नाना खस्ता खात, अनेक सरकारी सोपस्कार पूर्ण करत अखेर १९६४मध्ये बाबांनी आनंद निकेतन आर्ट्स, सायन्स, कॉमर्स आणि अॅग्रिकल्चर कॉलेज सुरू केलं. मी आणि प्रकाश त्या कॉलेजच्या पहिल्या बॅचचे विद्यार्थी. या कॉलेजमुळे आनंदवनात एक वेगळं पर्व सुरू झालं. अर्थात त्याची गोष्ट मी तुम्हाला पुढे सांगेनच.

साठीच्या दशकात आनंदवनात सुरू झालेला 'मित्रमेळावा' हेही एक वेगळंच प्रकरण

होतं. आनंदवन सुरू झाल्यानंतर पहिल्या दहा वर्षांत पुण्या-मुंबईतून काही मोजकी मंडळी आमच्याकडे येत असत. गो. नी. दांडेकर, यदुनाथ थत्ते वगैरे. पण ते प्रमाण कमीच होतं. बाबांना ते खटकत होतं. बाहेरच्या उदासीन जगाला आनंदवनाजवळ आणण्याचा एक प्रयत्न म्हणून बाबांनी वर्षातून एकदा 'मित्रमेळावा' घेण्याचं ठरवलं. या मेळाव्यामुळे महाराष्ट्रातली अनेक ज्येष्ठ-श्रेष्ठ मंडळी आनंदवनात येऊ लागली. बाबांना विचारांच्या देवाण-घेवाणीसाठी नवा मित्रपरिवार मिळाला. आम्ही तर या मेळाव्याची अतिशय आतुरतेने वाट बघत असू. बाहेरच्या जगाशी संपर्क होण्याची तेवढी एकच संधी आमच्याकडे होती. मला आठवतं त्याप्रमाणे पहिल्या मेळाव्याला तुकडोजी महाराज, डॉ. शिवाजीराव पटवर्धन, मनोहर दिवाण, दादा धर्माधिकारी, अण्णासाहेब सहस्रबुद्धे, डॉ. रामचंद्र वारदेकर, अण्णासाहेब कोरगावकर, नाना वेले, कमलाताई होस्पेट, गो. नी. दांडेकर अशी मोठमोठी मंडळी आली होती. हळूहळू या मित्रमेळाव्याचं लोण महाराष्ट्रभर पसरलं आणि वेगवेगळ्या क्षेत्रांतले लोक आनंदवनाकडे ओढले जाऊ लागले. बाहेरच्या माणसांनी इथे यावं, आनंदवनातलं काम पाहावं, कुष्ठरुग्णांच्या सुखदुःखांशी समरस व्हावं ही जशी आमची गरज होती तशी ती समाजाचीही होती. बाबांनी हे कसं काय जाणलं होतं कोण जाणे! पण त्यांची ही मात्रा लागू पडली आणि आमच्याकडे मित्रमंडळींचा पाऊस पडू लागला. पु. ल. देशपांडे, वसंतराव देशपांडे, कुमार गंधर्व, विष्णू चिंचाळकर अशी एकाहून एक माणसं बाबांशी जोडली गेली. या मित्रमेळाव्यांनी बाबांसह सगळ्या कार्यकर्त्यांना भक्कम मानसिक आधार दिला, आर्थिक मदत केली. एवढंच नव्हे, तर या मेळाव्यांमधून पुढे अनेक कार्यकर्तेही उभे राहिले.

मला आठवतं, मित्रमेळाव्याच्या दिवसांमध्ये आनंदवनात जणू उत्सवाचंच वातावरण असायचं. हजारोंच्या संख्येने येणाऱ्या देशविदेशातील नव्या-जुन्या पाहुण्यांचं आदरातिथ्य करायला बाबा-ताईंना अतिशय आवडायचं. त्यांच्या जेवणाखाणाची बडदास्त ठेवण्याचं काम आनंदवनातल्या बल्लवाचार्यांनी मोठ्या कौशल्याने केलं. खरं तर आनंदवनाचा स्वतःचा व्याप इतका मोठा झाला होता की भोजनव्यवस्था हा इथला एक उद्योगच होता. सुरुवातीला या व्यवस्थेची जबाबदारी ताईकडेच होती. मग हळूहळू आनंदवनातल्या इतर महिलांची ताईला मदत होऊ लागली. साठेमावशी, सिंधूताई, दिवाळे काकू, दिवेमावशी अशा अनेक महिलांनी ही व्यवस्था समर्थपणे सांभाळली. पुढे खास स्वयंपाकाचं काम करणारे आचारीही आम्हाला मिळत गेले. रामसिया आणि रामलखन पटेल, भगवानदीन, बिंजू, हरी रामटेके, अशोक, चंद्रभान मेश्राम अशी किती तरी नावं. या साऱ्यांनी आनंदवनाच्या उदरभरणाचं फार महत्त्वाचं काम केलं आहे.

एकीकडे औपचारिक शिक्षणासाठी कॉलेज सुरू केलेलं असतानाच बाबांच्या मनात आणखी एक स्वप्न आकार घेत होतं- 'श्रमिक कार्यकर्ता विद्यापीठा'चं. एखाद्या प्रकल्पावर शेती आणि उद्योगधंदे उभारून त्यात ग्रामीण युवकांनी काम करून शिक्षण घ्यावं, असं त्यांचं स्वप्न होतं. त्या दृष्टीने जागा मिळवण्यासाठी ते प्रयत्न करत होते. १९६७ मध्ये आम्हाला चंद्रपूर जिल्ह्यातच मूल या गावाजवळ जागा मिळाली आणि बाबांनी नव्या उत्साहाने तिथे कामाला सुरुवात केली. तेव्हा बाबांचं वय होतं ५३. पण या वयात एवढ्या

महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला आपण कसा हात घालणार, वगैरे भावना त्यांच्या मनाला कधी शिवल्या असतील असं मला वाटत नाही.

कुष्ठमुक्त जोडप्यांची लग्नं होऊ लागली असली, तरी त्यांनी मूल होऊ देऊ नये, असा दंडक आनंदवनात होता. त्यांच्या मुलांमध्ये कुष्ठरोग किंवा अन्य व्यंग तयार होऊ नये यासाठीची ही खबरदारी होती. पण पुढे कुष्ठरोगावरची नवनवी औषधं येऊ लागल्यावर हा धोका टाळणं शक्य झालं. त्यामुळे १९८० च्या दरम्यान कुष्ठमुक्तांना मूल होऊ देण्याचा निर्णय घेतला गेला. पुढे कुष्ठमुक्तांच्या या मुलांसाठी बाबांनी शाळा सुरू केली. या शाळेचं नाव होतं आनंद बुनियादी विद्यालय. आनंदवनाची माहिती बाहेरच्या खेड्यापाड्यांमध्ये पोहोचू लागल्यावर कुष्ठरुग्णांसोबतच आणखी एका वर्गाचा ओढा इकडे सुरू झाला. अंध-अपंग-कर्णबधिर माणसं अन् मुलं. बाबांनी या साऱ्यांना आनंदवनात सामावून घेतलं. खरं तर आनंदवन ही संस्था कुष्ठरुग्णांची. त्यामुळे आम्ही अंध-अपंगांना घेऊ शकत नाही, असं बाबांनी म्हटलं असतं तरी ते चूक ठरलं नसतं. पण बाबांच्या दृष्टीने कुष्ठरुग्ण हे एक निमित्त होतं. समाजाने अव्हेरलेल्यांना निर्मितिक्षम आणि स्वयंपूर्ण बनवण्याच्या ध्यासाने ते पछाडलेले होते. त्यामुळे आश्रयाच्या अपेक्षेने आलेल्या प्रत्येकाला आनंदवनात स्थान मिळालं आणि त्यातल्या प्रत्येक माणसामुळे आनंदवनाला नवं आव्हान अन् नवं काम उभं करण्याची प्रेरणा मिळाली.


आनंदवनाचा पसारा वाढत गेला तसं एक गाव म्हणून लागणाऱ्या सोई-सुविधांचाही विचार करावा लागू लागला. त्यामुळे आनंदवनात रस्ते उभे राहू लागले, पोस्ट सुरू झालं, बँकही आली.

सांगायचा मुद्दा असा, की १९६६ मध्ये मी आणि प्रकाश डॉक्टरकीच्या शिक्षणासाठी नागपूरला गेलो तोपर्यंतचं प्रत्येक वर्ष नव्या घडामोडींनी भरलेलं आणि भारलेलं होतं. आनंदवन सुस्थिर करणं, वाढवणं, नवे प्रकल्प सुरू करणं, नव्या योजना आखणं यात बाबा आकंठ बुडालेले असायचे. हे सगळं प्रत्यक्षात आणण्यात ताई आणि आनंदवनातल्या इतर साऱ्या सहकाऱ्यांचाही तितकाच वाटा असायचा. त्यामुळे आपलं स्वप्न साकार करण्यासाठी भरपूर कष्ट करायचे आणि त्या कष्टांचा भरपूर आनंद लुटायचा हेच खरं जगणं, असं आम्हाला कोणी वेगळं सांगण्याची गरज नव्हती. आमच्या दृष्टीने जगण्याचा तो एकच मार्ग होता.

त्यामुळे १९७२ मध्ये डॉक्टरकी करून परतलो तेव्हा रिले रेसमधल्या साथीदाराने बॅटन घेऊन सहजतेने पुढे पळू लागावं तसे आम्ही कामात सामील झालो. मी आणि माझे सहकारी आनंदवनात, तर प्रकाश आणि त्याचे सोबती हेमलकशात. अर्थात आमच्याकडे बॅटन सोपवून बाबा निवृत्त झाले नाहीत. शेवटच्या श्वासापर्यंत ते कोणत्या ना कोणत्या कामात गुंतलेले राहिले. आनंदवनात तर ते होतेच, पण सोमनाथ, हेमलकसा, भारत जोडो, पंजाबमधलं 'पीस बाय पीस मिशन', नर्मदा बचाव आंदोलन, अशा नाना स्वप्नांना ते आकार देत राहिले. या सर्व काळात आनंदवनातील आम्ही सर्व कार्यकर्ते त्यांच्या साथीने, त्यांच्या मार्गदर्शनाखाली, बहुतेकदा त्यांच्या सहमतीने, कधी त्यांच्या विरोधात जाऊनही

आनंदवनाचं कार्य अन् विचार पुढे नेण्याचं काम करत राहिलो. साधारण चाळीस वर्षांपूर्वी माझ्यासोबत आनंदवनात एक नवी पिढी कामात रुजू झाली. या पिढीने बाबांचं स्वप्न स्वतःच्या अंगी भिनवलं आणि आपली वाट चालायला सुरुवात केली. त्या वाटचालीतला पहिला अध्याय आहे आरोग्यसेवेचा.

•



सोमनाथच्या सुरुवातीच्या घरामध्ये रेणुका, बाबा, ताई, बिजली.
खाली बसलेले तरुण प्रकाश आणि विकास.

रोगमुक्तीचा वाढता परीघ

१९५१ मध्ये कुष्ठरुग्णांना घेऊन बाबा आनंदवनात आले, तेव्हा बाबाच रुग्णांवर उपचार करत हे मी तुम्हाला आधीच सांगितलं आहे. बाबांकडे डॉक्टरकीची डिग्री नव्हती, पण डॉक्टर म्हणून काम करण्याची त्यांना फार इच्छा होती. त्यांची ही इच्छा आनंदवनात पूर्ण तर झालीच, शिवाय डॉक्टर नसतानाही त्यांनी केलेल्या आरोग्यसेवेची दखल जगाने घेतली. पुढे १९८३ साली कुष्ठरुग्णसेवेसाठी डॉक्टरांना दिला जाणारा सर्वोच्च 'डेमियन डटन' पुरस्कार बाबांना सन्मानाने देण्यात आला होता. कुष्ठकार्यातला हा सर्वोच्च पुरस्कार मिळवणारे ते भारतातले पहिले नॉन-मेडिको व्यक्ती ठरले.

आनंदवन सुरू झालं तेव्हा चंद्रपूर जिल्हा सरकारच्या कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमात समाविष्ट नव्हता. त्यामुळे या जिल्ह्यातल्या रुग्णांना शोधून काढून त्यांच्यावर उपचार करण्याचं काम सरकारी यंत्रणेकडून सुरू झालेलं नव्हतं. बाबांनीच ते काम पहिल्यांदा हातात घेतलं. अगदी सुरुवातीच्या काळापासून बाबा वरोऱ्याच्या आसपासच्या गावांमध्ये रुग्णांचा शोध घेत पायी फिरायचे. सोबत औषधांची पिशवी आणि स्वतःचा जेवणाचा डबा घेऊन बाबांनी वरोरा तालुक्यात किती पायपीट केली ते त्यांचं त्यांनाच माहिती! बाबांचा उद्देश दुहेरी होता. एक, या गावांचं कुष्ठरोगाच्या दृष्टीने सर्वेक्षण करून रुग्ण शोधून काढणं, त्यांच्यावर उपचार करणं आणि दुसरं, कुष्ठरोगाबद्दलचे समाजातले गैरसमज दूर करणं. त्यामुळे ते जिथे जातील तिथे रुग्णाच्या नातेवाइकांना कुष्ठरोग बरा होऊ शकतो हे पटवून देण्यासाठी ते प्रयत्न करत. रोगाच्या पहिल्या टप्प्यातच निदान झालं तर रुग्ण बरा होण्याची आणि मुख्य म्हणजे त्याला समाजातून बहिष्कृत व्हावं न लागण्याची शक्यता वाढते याची बाबांना जाणीव होती. त्यासाठीच बाबांचा सगळा आटापिटा होता.

कुष्ठरोग म्हणजे काय हे बाबांना तुळशीराम भेटला तेव्हाच कळलं होतं. कुष्ठरोग म्हणजे फक्त शरीर कुरतडत जाणारा आजार नव्हे. कुष्ठरोग म्हणजे बायकापोरांनी घराबाहेर काढणं. कुष्ठरोग म्हणजे समाजाने माणुसकीची वागणूक नाकारणं. कुष्ठरोग म्हणजे मृत्यूची वाट बघत गटारीच्या कडेशी ऊन-पाऊस झेलत पडून राहणं. कुष्ठरोग म्हणजे माणूस म्हणून जगणं संपणं. कुष्ठरोगावर औषधं शोधण्याचं काम जगभरातले शास्त्रज्ञ करत होते; पण कुष्ठरोगाबद्दलचे गैरसमज समाजातून दूर करण्याचं कामही कुणी तरी करायला हवं होतं. हे काम बाबांनी स्वतःकडे घेतलं. त्यासाठी एखाद्या डॉक्टरप्रमाणे त्यांनी कुष्ठरोगाचा अभ्यास केला.

कुष्ठरोग हा 'मायक्रोबॅक्टेरियम लेप्री' या सूक्ष्मजंतूंमुळे होतो. कुष्ठरोगाचे हे जंतू शरीरात शिरल्यावर ते मज्जासंस्था किंवा चेतासंस्थेवर हल्ला करतात. सुरुवातीला रुग्णाच्या अंगावर फिकट तांबूस न खाजणारे चट्टे दिसू लागतात. त्वचेचा रंग आणि पोत बदलू लागतो. त्या भागाचं स्पर्शज्ञान नष्ट होतं. हातापायांची बोटं, नाक यावर या जंतूंचा परिणाम लवकर होतो. एकदा का स्पर्शज्ञान गेलं की मग काही दुखलं-खुपलं-भाजलं, हातापायाला जखमा झाल्या तरी रुग्णांना वेदना होत नाहीत आणि त्यामुळे अनेकदा

जखमा झाल्याचं समजतही नाही. त्यामुळे जखमा वाढत जाऊन त्या हाडापर्यंत पोहोचतात आणि मग रुग्णांमध्ये विकृती निर्माण होते. हातापायांची बोटं वाकडी होऊन झडतात. नाकाची केवळ भोकं उरतात. चेहरा विद्रूप, अमानवी दिसू लागतो. रुग्णाचं शरीर अशा प्रकारे उद्ध्वस्त करून हे जंतू आपोआप नाहीसेही होतात. या विकृतीमुळे या रोगाला महारोग असं नाव पडलं असावं. खरं तर निदान लवकर झालं तर हा रोग पूर्णपणे बरा होऊ शकतो; पण केवळ अज्ञानामुळे रोग वाढत जातो आणि तो रुग्णाला आयुष्यातून उद्ध्वस्त करतो. तेव्हाही संसर्गजन्य कुष्ठरुग्ण अगदी कमी, म्हणजे केवळ १०-१५ टक्के असत, पण त्याबद्दल लोकांना आजही फारशी माहिती नाही, तर पन्नासच्या दशकात काय परिस्थिती असेल याचा विचार करा.

कुष्ठरोगाचं नाव ऐकलं तरी माणसं लांब पळतील अशीच तेव्हा परिस्थिती होती; पण बाबांनी मात्र कुष्ठरोगाच्या भीतीवर विजय मिळवला होता. एवढंच काय, कुष्ठरुग्णच आता त्यांचे साथी होते. त्यांच्यासोबतच राहत असल्यामुळे या रुग्णांची मनोवस्था काय असते, ते विचार काय करतात याचा अंदाज यायला त्यांना मदत होत होती. त्यामुळे गावागावांमध्ये चौकशा करून कुष्ठरुग्ण शोधायचे, त्यातल्या रोग बळावलेल्या रुग्णांना आनंदवनात घेऊन यायचं, प्राथमिक टप्प्यातल्या रुग्णांना त्यांच्या घरीच औषधोपचार पुरवायचे आणि त्यांचा पाठपुरावा करायचा, असं अंगभर काम होतं. सुरुवातीला बाबांनी इतक्या गावांमध्ये ही शोधमोहीम काढली, की अनेकदा प्रत्येक गावात जाऊन प्रत्येक रुग्णाला औषधपाणी करणं अवघड होऊन बसे. मग बाबांनी त्यावर एक उपाय शोधून काढला. यातल्या अनेक गावांचे गावकरी एखाद्या गावी आठवडा बाजारासाठी जमत. बाबा या आठवडी बाजारात पोहोचत आणि गुपचूप एका कडेला जाऊन बसत. ज्यांच्या रोगाबद्दल गावात अजून वाच्यता झालेली नाही असे अनेक रुग्ण बाबांकडे येऊन औषधोपचार घेत आणि आपापल्या गावांना परतत. इतर कोणासमोर भेट झाली तर बाबा त्यांना ओळखही दाखवत नसत. समाजाने या लोकांना वाळीत टाकू नये, एवढाच त्यामागचा हेतू. एकीकडे लपून-छपून उपचार, तर दुसरीकडे कुष्ठरुग्णांना सोबत घेऊन प्रबोधन, अशी तारेवरची कसरत होती ती. गावच्या कोतवालांकडे असलेल्या नकाशाच्या आधारे बाबांचं हे काम चाले. गावात संसर्गजन्य रुग्ण सापडला, तर बाबा त्या नकाशावर पंचिंग मशिनने छोटा लाल ठिपका काढत आणि संसर्गजन्य नसलेला रुग्ण सापडला तर निळा ठिपका. हे त्यांचंच इनोव्हेशन. असं सगळं पद्धतशीर काम होतं त्यांचं.



'ट्रेस अँड ट्रीट कँपेन'च्या निमित्ताने बाबांनी वरोऱ्याच्या आसपासची सर्व गावं पालथी घातली.

काही वेळा बाबांसोबत आनंदवनात कुष्ठरोग्यांनी पिकवलेला भाजीपाला असे. त्यांचे कुष्ठमुक्त सहकारी हा भाजीपाला विकत असत. स्वतः निर्माण केलेला माल आत्मसन्मानाने विकणारे कुष्ठरुग्ण पाहून लोकांचं कुष्ठरोगाबद्दल मतपरिवर्तन होईल, अशी आशा त्यामागे होती; परंतु अशा प्रयत्नांना फारच कमी वेळा यश येत असे. बहुतेक वेळा रुग्णांना बाबांच्या हवाली करून त्यांचे नातेवाईक सुटकेचा नि:श्वास टाकत आणि निघून जात. पहिल्या पाच वर्षांमध्ये बाबांचं आठवडी बाजारातलं 'ट्रेस अँड ट्रीट कँपेन' एकहाती पण जोरात सुरू होतं. तेवढ्या काळात त्यांनी आनंदवनापासून तीस मैल परिघात अकरा उपचार केंद्रं सुरू केली. दर आठवड्याला ते प्रत्येक उपचार केंद्राला भेट देत, तिथल्या रुग्णांवर औषधोपचार करत, नव्या रुग्णांची माहिती काढत. बाबा सगळीकडे सायकल किंवा छकड्यातून फिरत. हे काम जवळपास १९६०-६५ पर्यंत सुरूच होतं. मला आठवतं, आमचा नारायणही अनेकदा बाबांबरोबर किंवा स्वतंत्रपणेही या केंद्रांवर रुग्णांवर उपचार करण्यासाठी जात असे. त्यानेही औषधांपासून ते इंजेक्शन देण्यापर्यंत सगळं काही बाबांकडून शिकून घेतलं होतं.

आनंदवनात पहिल्या दोन झोपड्या उभ्या राहिल्यानंतर बाबांनी लगेचच दवाखान्यासाठीही एक झोपडी उभी केली होती. हाच आनंदवनातला पहिला दवाखाना. दवाखाना म्हणावा असं त्या झोपडीत काहीच नव्हतं; पण सोई-सुविधा नसल्या तरीही बाबांचं औषधोपचार करणं मात्र अगदी काटेकोर आणि शास्त्रीय होतं. बाबा स्वतःच कुष्ठरुग्णांच्या जखमा साफ करत, त्यावर ड्रेसिंग करत. अगदी कुष्ठरुग्णांच्या जखमांमधल्या अळया काढण्यासही ते मागेपुढे बघत नसत. रोगी कितीही वाईट अवस्थेतला असला तरी बाबांच्या मनाची चलबिचल होत नसे.

लहानपणी या झोपडीबद्दल आम्हाला फारच कुतूहल वाटत असे. आम्ही तेव्हा असू सहा-सात वर्षांचे. आम्ही अनेकदा त्यांच्या दवाखान्यात डोकावून त्यांचं काम बघत बसायचो. किती तरी रुग्णांचं अंग जखमांनी भरलेलं असायचं. अगदी चेहराही जखमांनी झाकून गेलेला. आज विचार केला की वाटतं, खरोखरच अंगावर काटा आणणारं दृश्य असायचं ते. रुग्णांच्या जखमांकडे आजवर कोणी लक्ष दिलेलं नसायचं. त्यामुळे एखाद्या


मांसाचा गोळाच वाटायची ती माणसं. जणू जिवंत शरीरं नाहीतच. पण बाबांच्या चेहऱ्यावर आपण काही जगावेगळं करतो आहोत याचा मागमूसही नसे. जखमा साफ करताना बाबा एकीकडे त्या रुग्णाशी सहजपणे बोलत असायचे. हाही एक उपचारच. किंबहुना, हाच कुष्ठरोगावरचा महत्त्वाचा उपचार होता. औषधं दिली की रोग बरा होई; पण आपल्या कुटुंबाने आपल्याला नाकारलं याचा रुग्णाच्या मनावर इतका परिणाम झालेला असे की जगण्याची इच्छाच तो हरवून बसलेला असे. अशा परिस्थितीत बाबांचं बोलणं-वागणं त्यांच्या मनावर फुंकर घालत असे. कुष्ठरोग झाल्यापासून आजवर त्यांच्याशी कोणीच इतक्या प्रेमाने बोललेलं नसे. तेव्हा हे सगळं पाहताना मनात नक्की काय यायचं आठवत नाही, पण त्या दृश्यांचा संस्कार आमच्या मनावर नक्कीच झाला असणार. कारण कुष्ठरोग हा इतर चार रोगांसारखा रोग आहे, त्याचा एवढा बाऊ करण्याची गरज नाही, हे मला कधी कोणी सांगावं लागलं नाही, किंवा कुष्ठरोगावर खरा उपचार म्हणजे आईच्या मायेने रुग्णांना जवळ करणं, अशी फोड करूनही बाबांनी मला कधी सांगितलं नाही. त्याची तशी गरजच भासली नाही कुणाला. बाबांच्या वागण्यातूनच हे सगळं आम्हाला कळत होतं. आम्ही लहानपणापासून कुष्ठरुग्णांमध्ये वाढल्यामुळेच की काय, पुढे डॉक्टर झाल्यानंतर कुष्ठरुग्णांच्या जखमांवर उपचार करताना माझाही हात कधी अडखळला नाही की मनात किळस उत्पन्न झाली नाही. उलट, या रोगाशी आपलं काही नातं आहे, असंच मला वाटायचं.



कुष्ठरुग्ण कोणत्याही अवस्थेतला असो, त्याच्यावर जवळ जाऊन उपचार करताना बाबांच्या मनाची चलबिचल होत नसे.

बाबांच्या काळात कुष्ठरोगावर डीडीएस (डायअमिनो डायफेनिल सल्फोन) हे एकच औषध होतं. भारतात डॉ. रॉबर्ट. जी. कॉक्रेन यांनी हे औषध १९४७ साली पहिल्यांदा वापरलं. आनंदवनातही सुरुवातीच्या काळात हेच औषध वापरलं जायचं. रोगाच्या कमी-जास्त प्रमाणानुसार रोज ५० ते १०० मिलिग्रॅमचा डोस सहा महिने घेतला की बरेचसे कुष्ठरुग्ण बरे होत असत; पण ही नियमितता पाळणं बहुतेक कुष्ठरुग्णांना जमत नसे. त्यामुळे अर्थातच रोग बरा होण्याचा कालावधी दोन वर्षं ते दहा वर्षं असा कितीही असायचा. ही बाब लक्षात घेऊन रुग्ण नियमितपणे औषधं घेतात की नाही हे तपासण्याची यंत्रणाच बाबांनी उभी केली होती. बाबांचं सर्वांच्या तब्येतीकडे अगदी बारीक लक्ष

असायचंच, पण सर्व रुग्णांनीही एकमेकांच्या औषधपाण्याची काळजी घ्यायची, असा बाबांचा अलिखित नियम होता. बाहेरच्या रुग्णांच्या बाबतीत मात्र तसं होत नसे. त्यामुळे रुग्ण बरा व्हायला बराच काळ लागत असे. शिवाय १९७० नंतर कुष्ठरोगावर संशोधन करणाऱ्या शास्त्रज्ञांच्या असं लक्षात येऊ लागलं, की कुष्ठरोगाचे जंतू डीडीएस औषधाला इम्युन झाले आहेत. म्हणजेच या औषधाचा परिणाम न होणारे काही जंतू तयार होऊ लागले होते. त्यामुळेच शास्त्रज्ञांनी कुष्ठरोगासाठी एकापेक्षा जास्त प्रकारची औषधं वापरण्यास सुरुवात केली. अर्थात ही बरीच उशिराची म्हणजे १९८०च्या दरम्यानची गोष्ट. मी डॉक्टर होऊन कामाला सुरुवात केली तेव्हाही भारतात डीडीएस हे एकच औषध वापरलं जात होतं.



बाबांनी तयार केलेल्या
आरोग्य कार्यकर्त्यांच्या पहिल्या फळीतील
गीताबाई नेमाडे परदेशी पाहुण्यांसोबत

आनंदवनात एखादा पदवीधर डॉक्टर आणि प्रशिक्षित नर्स असावी यासाठी बाबांनी खूप प्रयत्न केले, पण त्याचा काही उपयोग झाला नाही. एक-दोन डॉक्टर आलेही; पण त्यांनाच कुष्ठरोगाची इतकी भीती वाटे की बस! एक रिटायर्ड डॉक्टर आमच्याकडे आले होते. ते तर कुष्ठरुग्णांवर उपचार करून झाले की स्वतःची सायकलही लायसॉलने धुऊन काढत. अर्थातच हा माणूस फार दिवस टिकला नाही. त्यामुळे आपल्या कुष्ठरुग्णांमधूनच आरोग्य कार्यकर्ते घडवण्याचं काम बाबांनी सुरू केलं. सुरुवातीच्या काळातले जवळपास सगळे कुष्ठरुग्ण अशिक्षित होते; पण बाबांच्या कामाची पद्धत बघून तेही हळूहळू औषधं देणं, मलमपट्टी करणं शिकू लागले. काही रुग्णांनी इंजेक्शनं देण्याचंही काम शिकून घेतलं. बाबांवरचा भार त्यामुळे कमी होऊ लागला.

गीताबाई नेमाडे, शंकरदादा जुमडे आणि कौसल्याताई वानेरे हे बाबांनी प्रशिक्षण दिलेले आनंदवनातले पहिले आरोग्य कार्यकर्ते. औषधांची मिक्श्चर्स तयार करणं, रुग्णांना वेळच्या वेळी ती औषधं देणं, त्यांच्या जखमांना ड्रेसिंग करणं, दवाखान्याची व्यवस्था बघणं अशी कामं हे तिघं करत. ही सगळी मंडळी अशिक्षित असल्यामुळे औषधांवरच्या इंग्रजी सूचना वाचून त्यांना मार्गदर्शन करण्याचं काम मी आणि प्रकाशही करत असू. पुढे बाबांनी त्यांना इंजेक्शन देण्याचं कामही शिकवलं. त्यांनीही मग पुढचे कार्यकर्ते तयार

करायला सुरुवात केली. महात्मा गांधींच्या सहयोगी सुशीलाबाई केळकर याही त्याच फळीतल्या. ही सगळी माणसं बाबांनी कामात तरबेज केली होती. रुग्णांची सेवा करताना बाबा कधीच मागेपुढे बघत नसत. अगदी बेडपॅन देण्यापासून सगळं ते स्वतः करत. त्याचा परिणाम त्यांच्या कार्यकर्त्यांवरही झाल्याशिवाय राहायचा नाही.

बाबांच्या या कामात हातभार लावणारं आणखी एक वेगळंच व्यक्तिमत्त्व म्हणजे सिस्टर लीला. या बाईंचं खरं नाव गॅव्हरिलिया पापायानी. त्या ग्रीसमधल्या किरोपॅडिस्ट, म्हणजे ग्रीसमधलं फिजिओथेरपीचं पारंपरिक शास्त्र शिकलेल्या होत्या. १९५६ मध्ये वयाच्या साठाव्या वर्षी त्या आनंदवनात येऊन दाखल झाल्या. बाबांच्या कामाबद्दल त्यांना कोठून तरी कळलं अन् पत्ता विचारत विचारत त्या आमच्याकडे आल्या. भारतात त्या विविध आश्रमांमध्ये, सामाजिक कामांच्या ठिकाणी फिरून आल्या होत्या. आल्या आल्या जणू त्या आनंदवनाच्या झाल्या. आनंदवनातलं सगळयात अवघड, कुष्ठरोग्यांच्या ड्रेसिंगचं काम त्यांनी आपणहून अंगावर घेतलं. रोज पहाटे त्या बाबांबरोबर दवाखान्यात जाऊन रुग्णांच्या जखमांवर मलमपट्टी करायच्या. कुष्ठरुग्णांना अन् रात्रंदिवस काम करून थकलेल्या ताई-बाबांनाही त्या मसाज करून द्यायच्या. त्यांच्या हातात जादू होती. त्या अशा काही मसाज करायच्या की माणसाच्या सगळया वेदना गायब होऊन जाव्यात. त्यांचा आनंदवनात कायमस्वरूपी मुक्काम नसायचा. भारतात अनेक ठिकाणी त्या फिरायच्या. त्या भारतभर फिरायच्या आणि आनंदवनासाठी निधीही गोळा करायच्या. वेगळंच व्यक्तिमत्त्व होतं ते. मी, प्रकाश आणि नारायण या तिघांना त्यांनी सॉक्रेटिस, प्लेटो आणि अॅरिस्टॉटल अशी नावं ठेवली होती. आनंदवनातून बाहेर पडल्यावर आम्हाला पत्रं लिहायच्या तेही याच नावांनी. आम्हा सर्वांशीच त्यांनी एक वेगळं मैत्र जोडलं. ते त्यांच्या मृत्यूनंतरही तितकंच जिवंत आहे.




आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या किरोपॅडिस्ट सिस्टर लीला
आत्मीयतेने आनंदवनातल्या कुष्ठरुग्णांवर उपचार करत.

त्यांच्यासारखीच आणखीही काही परदेशी मंडळी वेळोवेळी या रुग्णसेवेच्या कामात सहभागी होत गेली. कुठकुठल्या देशांमधून ही मंडळी आनंदवनात येऊन थडकायची आणि लगेच दुसऱ्या दिवशीपासून कामाला लागायची. त्यातल्या कित्येक जणांनी रोज दीडदोनशे रुग्णांच्या जखमांची ड्रेसिंग्ज केली असतील.

पण ही सगळी मदत तशी परावलंबीच. आनंदवनात येणाऱ्या कुष्ठरुग्णांची संख्या

झपाट्याने वाढत असल्याने हक्काचा डॉक्टर असणं गरजेचं होतं. ही गरज आमच्या असण्यात इतकी भिनली होती, की प्रकाश आणि मी मॅट्रिक झालो तेव्हा डॉक्टरकीसाठी प्रवेश घ्यायचा हे जणू ठरलेलंच होतं. खरं तर मला डॉक्टर बनण्यापेक्षा इंजिनियर होणं जास्त आवडलं असतं. पण आनंदवनातली परिस्थिती अशी होती की डॉक्टरकीपेक्षा वेगळा विचार करणं शक्य नव्हतं. त्यामुळे माझं इंजिनियरिंगचं वेड मी बाजूला ठेवलं आणि डॉक्टरकी स्वीकारली. प्रत्यक्ष बोलून दाखवलं नसलं, तरी बाबांच्याही मनात आम्ही दोघांनी डॉक्टर झालं पाहिजे अशी अपेक्षा होतीच. मी नाही म्हणालो असतो तर बाबांनी कोणत्या ना कोणत्या पद्धतीने माझं मन वळवलं असतंच. पुढे माझ्या मुलीला, शीतलला बाबांनी असंच डॉक्टरकीला जाणं भाग पाडलं. तिच्या मनात आर्किटेक्चरचं शिक्षण घ्यायचं होतं, पण बाबा तिला म्हणाले, “तू डॉक्टर व्हावंस ही माझी शेवटची इच्छा आहे.” त्यावर ती काय बोलणार? पुढे हळूहळू आनंदवनातल्या अनेकांकडून बाबांच्या अशा बऱ्याच शेवटच्या इच्छा तिच्या कानावर येऊ लागल्या आणि ती समजून चुकली, की बाबांनी आपल्याला चक्क इमोशनल ब्लॅकमेल केलंय! मी डॉक्टर व्हायला नकार दिला असता तर कदाचित बाबांनी माझ्या बाबतीतही अशीच काही तरी जादू केली असती. अर्थात बाबांचं हे रूप आम्हाला तेव्हा माहिती नव्हतं. १९६६ मध्ये प्रकाश आणि मी वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी नागपूरच्या गव्हर्नमेंट मेडिकल कॉलेजमध्ये दाखल झालो. मी विचार केला, डॉक्टर झाल्यावरही इंजिनियरिंगचं डोकं चालवायला आपण मुखत्यार असूच. दुसरं म्हणजे मला शेती, आर्किटेक्चर, पर्यावरण अशा अनेक बाबींमध्ये रस होता. त्या सगळयाचंच औपचारिक शिक्षण घेणं शक्य नव्हतं. उलट, त्यापैकी कोणत्याही क्षेत्रातले प्रयोग करायला आनंदवनाचं आकाश मला मोकळं होतं. तसंही आनंदवनात माणसं कमी आणि कामं फार, अशीच परिस्थिती होती. त्यामुळे माणूस आणि मशिन अशा दोघांवरही उपचार करण्याची संधी मला मिळणार होती.

आम्ही नागपूरला गेलो आणि पुढच्याच वर्षी बाबांनी सोमनाथ प्रकल्प सुरू केला. या प्रकल्पाचं बस्तान बसवण्यासाठी बाबा बऱ्याचदा तिकडेच असायचे. सोमनाथची उभारणी चालू असतानाच बाबांच्या डोक्यात आणखी एक नवा किडा वळवळला. बाबांचं हे अगदी वैशिष्ट्यच होतं. एखाद्या उपक्रमाचा, प्रकल्पाचा जम बसत आला की त्यांना नवी स्वप्नं पडायची. या वेळी भामरागडच्या दुर्गम भागातल्या आदिम जातींच्या सर्वंकष विकासासाठी प्रकल्प सुरू करावा, असं त्यांच्या मनाने घेतलं होतं. त्यानुसार त्यांना अहेरी-आलापल्ली जंगलातल्या हेमलकसा रेंजमध्ये जागा मिळाली आणि डॉक्टरकी शिकून आल्यानंतर प्रकाशने त्या प्रकल्पाची जबाबदारी उचलली. त्याबद्दल पुढे सांगेनच.

आधी सोमनाथ आणि आता नव्याने सुरू झालेला हेमलकसा प्रकल्प यामुळे बाबा आनंदवनात फारसे नसायचेच. त्यामुळे आनंदवनाचा सगळा भार आपोआपच माझ्यावर येऊन पडला. आनंदवनात साऱ्या शेतीउद्योगांसाठीच्या व्यवस्था लागलेल्या होत्या, पण दवाखाना मात्र आता मलाच सांभाळावा लागणार होता. तेव्हा माझं वय होतं २७. मला आनंदवनात कुष्ठरुग्णांसाठी काम करायचं असल्याने केवळ एमबीबीएसची पदवी पुरेशी नव्हती. कुष्ठरोगावरील उपचारांचं प्रशिक्षण घेणंही गरजेचं होतं. त्यानुसार मी

तामिळनाडूच्या चिंगलपट्टू इथल्या 'सेंट्रल लेप्रसी ट्रेनिंग अँड रिसर्च इन्स्टिट्यूट'मध्ये प्रवेश घेतला. कुष्ठरोग मला नवीन नव्हता. बाबा आणि त्यांच्या कुष्ठरोगी सहकाऱ्यांचं एकमेकांमध्ये होणारं बोलणं मी आधीपासूनच लक्ष देऊन ऐकायचो. आनंदवन बघायला येणाऱ्या पाहुण्यांशी बोलतानाही बरंच विचारमंथन व्हायचं. त्यामुळे कुष्ठरोगाबद्दल कोणी काही वेगळं सांगावं, शिकवावं अशी परिस्थिती नव्हती. पण इतर अनेक दृष्टींनी या प्रशिक्षणाचा मला उपयोग झाला. बाबा कलकत्त्याला जाऊन कुष्ठरोग उपचारांचं प्रशिक्षण घेऊन आले त्याला आता पंचवीस वर्षं होऊन गेली होती. त्यामुळे या दरम्यान उपचारांमध्ये बरेच बदल झाले होते. नवी संशोधनं होत होती. नव्या औषधांच्या चाचण्या झाल्या होत्या. त्या सगळ्याची माहिती मला या प्रशिक्षणात मिळाली. तिथे प्रत्यक्ष उपचारांचं शिक्षण तर मिळालंच, पण कुष्ठरोगाच्या उपचारांमध्ये सध्या जगात काय चाललं आहे याचा आवाकाही आला.

त्या काळात आनंदवनात कुष्ठरुग्णांची संख्या वाढतच होती. कुष्ठमुक्त न झालेल्यांवर औषधोपचार करणं आणि काही कुष्ठमुक्त पेशंट्सच्या जखमांवर उपचार करणं असं दुहेरी काम तिथे चाले. या काळापर्यंत आनंदवनाची अंध-अपंग आणि कर्णबधिर मुला-मुलींची आणि व्यक्तींची संख्याही बरीच वाढली होती. कुष्ठरुग्णांनाही सर्वसामान्यांप्रमाणे इतर आजार होत असायचे. त्यामुळे दवाखान्याचं एकूण खटलं बरंच वाढलं होतं. मधल्या काळात झोपडी जाऊन त्याऐवजी दवाखान्यासाठी दोन खोल्यांचं पक्कं बांधकाम झालं होतं. पण या दवाखान्याला कुणी एक वाली नसल्यामुळे कारभारात शिस्त आणण्याची गरज होती. त्यामुळे मी पहिलं काम हातात घेतलं ते व्यवस्था लावण्याचं. मुख्यतः दवाखान्याच्या दैनंदिन व्यवहारांची कागदोपत्री नोंद होणं गरजेचं होतं. त्यासाठी मी सरळ शिकलेल्या कुष्ठमुक्तांना हाताशी घेतलं आणि काम सुरू केलं. सध्याच्या रुग्णांचं वर्गीकरण करून त्या सर्वांच्या नोंदी तयार केल्या आणि नव्या रुग्णांच्या वर्गीकरणाचीही एक पद्धत आखून घेतली. माझ्याऐवजी उद्या आणखी कोणी इथे काम बघू लागलं तरी त्याचं अडता कामा नये, एवढी तजवीज झाली.

मी डॉक्टर असल्याचा आणखी एक मोठा फायदा झाला. नव्या-जुन्या रुग्णांना तपासताना मला त्यांच्यातल्या इतर आजारांची-कमतरतांची लक्षणंही दिसत होती. जखमांचं ड्रेसिंग करताना त्वचा फिकुटलेली दिसायची, तर कुणाला अॅनिमिया असल्याचं लक्षात यायचं. कुणात कॅल्शियमची कमतरता होती, कोणात व्हिटॅमिन्सची. कुणी इतर कसले कसले आजार अंगावर काढत होतं. ते सगळेच आजार गंभीर होते अशातला भाग नाही, पण आजवर त्या आजारांकडे त्यांना लक्षच देता आलं नव्हतं. त्यामुळे बाबा जसे गावोगाव फिरून कुष्ठरोगी शोधत, तसा मी आनंदवनात माझ्या दवाखान्यात बसल्या बसल्या आजार शोधू लागलो.



आनंदवनातील दवाखान्याचा
भार सांभाळणारे तरुण डॉ.विकास.

अशा तपासण्या सुरू झाल्यावर आम्हाला औषधांची मोठ्या प्रमाणात गरज भासू लागली. त्या वेळी आम्हाला कुष्ठरुग्णांसाठी सरकारी अनुदान मिळायचं, पण ते इतकं कमी असायचं की त्यातून मूळ औषधांचा खर्च निघाला तरी खूप झालं. त्यामुळे कुष्ठरुग्णांचं जेवण, राहणं, कपडेलत्ते या सगळ्यासाठी निधा गोळी करत राहणं हे एक मोठं कायमस्वरूपी कामच बनून गेलं. त्यामुळे औषधांचा वाढता खर्च कसा भागवायचा याचा मी विचार करू लागलो. मग तिथून एका वेगळ्या प्रवासाला सुरुवात झाली. आनंदवनाच्या पहिल्या वीस वर्षांमध्ये महाराष्ट्रातली आणि परदेशांतलीही अनेक मित्रमंडळी आनंदवनाशी जोडली गेली होती. पण आता एक डॉक्टर म्हणून बाहेरच्या जगातल्या डॉक्टरांशी जोडून घ्यावं असं मी ठरवलं. मग मी आनंदवनातल्या औषधांच्या गरजांबद्दल परदेशांतल्या संस्थांशी संपर्क करायला सुरुवात केली. बाहेरच्या जगातली नवी संशोधनं, नव्या उपचारपद्धती, नवी औषधं समजत राहावीत यासाठी पत्रव्यवहार करायला सुरुवात केली. त्यातून आनंदवनात औषधांचा ओघ सुरू झाला. पाहता पाहता माझी एक मोठी काळजी मिटली, शिवाय आपलं काम काळाच्या मागे नाही याची खातरजमा करून घेणंही शक्य झालं.






कुष्ठरोग टोकाला गेल्याने सुरुवातीच्या काळातले रुग्ण असे विद्रूप झालेले असत.

त्या काळातही कुष्ठरोग अगदी टोकाला गेलेले रुग्ण आनंदवनात यायचे. रोग होऊन बराच काळ होऊन गेलेला असायचा, पण कुठे तरी आडगावात लोकांपासून लपून राहिल्याने औषधोपचार मिळालेले नसायचे. जखमांची नीट काळजी घेतलेली नसायची. कुणाकडून तरी आनंदवनाचं नाव ऐकून मजल-दरमजल करत हे लोक इथे येऊन पोहोचत. किंवा कधी कुणाचे नातेवाईक आनंदवनाच्या गेटजवळ त्यांना सोडून आल्या पावली परत जात. अनेकदा अशा रुग्णांचं शरीर जखमांनी भरलेलं असायचं. हे एवढे मोठाले फोड फुटून जखमांमधून अळया बाहेर येत असायच्या, पू वाहत असायचा. भयंकर दृश्य असायचं ते. अनेकदा आमच्या इथले कुष्ठरोगीही असे गंभीर रुग्ण बघून मागच्या मागे पळून जात. पण मला तशी सोय नव्हती. आणि खरं सांगायचं तर आम्ही अशा परिस्थितीत वाढलो होतो, की कुष्ठरुग्ण माझ्या आयुष्याचा अविभाज्य भाग आहेत असंच वाटायचं. त्यामुळे कुष्ठरुग्णांच्या जखमा साफ करताना घृणा निर्माण झाल्याचं मला कधी आठवत नाही. माझ्या आजूबाजूच्या मंडळींना वाटायचं, अशा जखमा साफ करून झाल्यावर विकासभाऊ दोन-तीन वेळा तरी अंघोळ करतील. पण मी तिथेच दवाखान्यात दोन वेळा साबणाने हात स्वच्छ धुवायचो आणि अगदी त्या कुष्ठरुग्णासोबतच डबा खायला बसायचो. आता इतक्या काळानंतर त्या दिवसांची आठवण कुणी काढतं तेव्हा लक्षात येतं, की आपण काही वेगळं करतोय याची जाणीवही मला तेव्हा नव्हती. मी आपल्याच तंद्रीत असायचो.

मी दवाखाना सांभाळू लागलो तेव्हा बाबांचे सहकारी तिथे काम करत होते. (आनंदवनातल्या बाबांच्या सहकाऱ्यांना मी त्यांचे ‘जनरल्स’ म्हणतो.) ते बाबांच्या पठडीत तयार झालेले होते. बाबा जे सांगतील ती पूर्व दिशा, असा त्यांचा खाक्या होता. त्यामुळे नव्या पद्धतींशी जुळवून घ्यायला ही मंडळी राजी नसत. गीताबाई त्यातल्याच एक. त्या अतिशय प्रामाणिक कार्यकर्त्या होत्या, पण माझ्या प्रयोगांमुळे मी आनंदवनाचं नुकसान करणार असं त्यांना ठामपणे वाटायचं. त्यामुळे मी कोणतीही नवी गोष्ट करतो म्हटलं की त्यांचा विरोध असायचा. त्यांचंही बरोबर होतं म्हणा. त्यामुळे मी माझे सहकारी तयार करायला सुरुवात केली.

त्यातला पहिला मुरलीधर गभणे. मुरलीधरची उजवी बाजू पूर्णपणे अपंग होती. त्याच्या आई-वडिलांनी त्याला कुष्ठरोगी समजून घरातून बाहेर काढलेलं. आनंदवनात येण्याआधी तो नागपूरच्या मेडिकल कॉलेजमध्ये काम करत होता. तिथे त्याची औषधांशी ओळख झालेली होती. मला आधी हे काही माहिती नव्हतं. एकदा मी दवाखान्यात बसलेलो असताना तो काही मुलांना घेऊन तिथे आला आणि अगदी सहजपणे त्याने मुलांना औषधांची नावं सांगितली. मला आश्चर्य वाटलं, या माणसाला ही नावं कशी काय माहिती? त्याच्याशी गप्पा मारायला लागल्यावर त्याचा सगळा इतिहास समोर आला. मग काय, मी त्याला हाताशी घेतलं. त्यानेही फार भराभर गोष्टी शिकून घेतल्या. औषधं देणं तर सोडाच, पण तो एका हाताने इंजेक्शनही द्यायचा. अगदी रक्ताच्या तपासणीसाठी स्लाइड तयार करण्यातही तो लवकरच तरबेज झाला. पुढे आम्ही एक्स-रे मशीन घेतलं, तेव्हा तो एक्स-रे धुवायला शिकला. एखाद्या डॉक्टरलाही जमणार नाहीत अशा गोष्टी त्याने केल्या.

कुष्ठमुक्तांमधूनच कुष्ठरुग्णांवर
उपचार करणारे कार्यकर्ते तयार झाले.



मला नेहमी वाटतं, की मी दवाखाना सांभाळला यात विशेष काहीच नाही. मी लहानपणापासून त्याच वातावरणात वाढलो होतो आणि शिक्षणाने डॉक्टरही होतो. पण मुरलीधरसारख्या लोकांनी स्वतःच्या कमतरतांवर मात करत आनंदवनात जे काम उभं केलं त्याला खरोखरच तोड नाही. अब्दुल करीम, शालिक सौसागडे, विठ्ठलराव उसकेवार, मधुकर डांगरे, तुळशीदास परांजपे, विनायक नेवलकर अशा अनेक कार्यकर्त्यांनी माझ्या खांद्याला खांदा लावून दवाखान्यात काम केलं. हे आमचे पॅरामेडिकल वर्कर्स. रुग्णांच्या नोंदी करण्यापासून ते अधूनमधून होणाऱ्या ऑपरेशन्ससाठी मला मदत करण्यापर्यंत सगळी कामं त्यांनी शिकून घेतली होती. कुष्ठरुग्णांवर उपचार करण्यासाठी बाहेरून स्टाफ मिळणं तेव्हा जवळपास अशक्य होतं. शिवाय इथल्या लोकांच्या हाताला काम मिळणंही गरजेचं होतं. काम करता करता दुःखाची टोचणी थोडी कमी व्हायची. काम हाच त्यांच्यावर सर्वांत उत्तम उपचार होता, असं माझ्या लक्षात आलं. त्यामुळे या दोन्ही दृष्टीने ही व्यवस्था सोईची होती. पण या घरातल्याच आरोग्य कार्यकर्त्यांचा सगळ्यात मोठा फायदा होता, तो म्हणजे हे सारेजण रुग्णांचं खूप मायेने करत. कारण सारेच समदुःखी. त्यामुळे एकमेकांची काळजी घेणं हे त्यांना आपलं काम वाटे. या कार्यकर्त्यांचा हॉस्पिटलच्या इतर कामांमध्येही हातभार असायचा.

अशा रीतीने दवाखान्यातल्या नेहमीच्या कामांची घडी हळूहळू बसली, पण कुष्ठरुग्णांच्या आरोग्यासंबंधी काही गोष्टी मला सतत सतावत होत्या. जखमा हाडापर्यंत गेल्यामुळे अनेक कुष्ठरुग्णांना अपंगत्व आलेलं होतं. नव्या कुष्ठरुग्णांमध्येही कोणत्या ना कोणत्या प्रकारचं अपंगत्व आढळून येत होतं. कुष्ठरोग बरा झाल्यानंतरही या व्यक्तींना अपंगत्वासोबतच जगावं लागत होतं. छोटी-मोठी कामं करण्यामध्ये त्यांना अडचणी यायच्या. त्यामुळे त्यांचं आयुष्य सुकर व्हावं यासाठी या अपंगत्वावर मात करणारे उपाय शोधणं गरजेचं होतं.

हे काम माझ्यातल्या इंजिनियरिंगच्या डोक्याला आव्हान देणारं होतं. बहुतेक वेळा हे अपंगत्व हाता-पायांत असायचं. कुष्ठरोगामुळे पायाची बोटं झडलेली असत. पायाचा

आकार बदललेला असे. हाताची बोटं जाऊन थोटा हात उरलेला असे. त्यातल्या शक्य तितक्या व्यक्तींना कृत्रिम अवयव देण्यासाठी प्रयत्न करणं आवश्यक होतं. पण त्याबरोबरच त्यांना त्यांच्या कामात मदत होईल अशी छोटी छोटी साधनं तयार करून देता येतील का याची चाचपणी आम्ही केली. त्यातली अगदी छोटी पण कुष्ठरुग्णांच्या दृष्टीने महत्त्वाची वस्तू म्हणजे चपला. कुष्ठरुग्णांना खास एमसीआरच्या, म्हणजे मायक्रो सेल्युलर रबरच्या चपला घालाव्या लागतात. वेळीच उपचार न मिळाल्याने काही कुष्ठरुग्णांमध्ये विकृती तयार होते. ते बरे होतात, पण त्यांच्या हातापायांच्या त्वचेच्या संवेदना जवळपास नष्ट झालेल्या असतात. त्यामुळे त्यांना या अवयवांची जास्त काळजी घ्यावी लागते. विशेषतः जे लोक आगीजवळ काम करतात त्यांना. एकुणातही कुठेही चालताना पायात काटा घुसला, काच लागली तर त्यांना समजतही नाही. कोणी तरी लक्ष वेधून दाखवतं किंवा त्यांच्या डोळ्याला रक्त दिसतं, तेव्हाच पायाला जखम झाल्याचं त्यांना कळतं. साध्या चपला वापरूनही हे होत राहतं आणि जखमांना ड्रेसिंग करण्याचा सिलसिला सुरूच राहतो. त्यामुळे या चपला वापरणं गरजेचं असतं. हे रबर चेन्नई किंवा कलकत्त्याहून मागवावं लागे. बराच पाठपुरावा करून मी ते रबर आमच्याकडे मागवलं आणि मग तशा चपला तयार करण्याचं काम सुरू झालं. कुष्ठरुग्णांसाठी तो मोठाच दिलासा होता. पुढे रुग्णांच्या गरजा लक्षात घेऊन आम्ही त्यात सुधारणा करत गेलो आणि जास्त आरामदायी चपला तयार करू लागलो. कुष्ठरुग्णांना काम करताना सोईचं जावं यासाठी आम्ही काही छोटी उपकरणं आणि साधनंही तयार केली. ड्रेसिंग करताना रुग्णांना पाय ठेवण्यासाठी छोटे स्टँड असोत किंवा त्यांना वाकड्या बोटांनीही सहजपणे पकडता येतील असे कप असं काही तरी नवं शोधण्याची धडपड सतत सुरू असायची.

आनंदवनाची रचना वेगळी होती. इथल्या गरजाही वेगळ्या होत्या. त्यामुळे डॉक्टरकीचा उपयोग फक्त स्टेथोस्कोप लावून तपासण्यासाठी आणि औषधं लिहून देण्यासाठी करणं मला मान्य नव्हतं. वैद्यकीय शास्त्र, वैद्यकीय पेशा आणि रुग्णसेवा या तिन्ही गोष्टींची जगात फारकत झाली आहे असं मला वाटायचं. त्यामुळेच या तिन्ही गोष्टी आनंदवनात एकत्र आणता येतील का, हा विचार माझ्या मनात सतत घोळत असायचा. त्यासाठी बाहेरच्या जगातल्या संशोधनाचा अभ्यास करत राहणं, इथल्या सोई-सुविधांची योग्य व्यवस्था लावणं आणि दवाखान्याचं काम वाढलं तरी त्यातून रुग्णांबद्दलची माया वजा होणार नाही याची काळजी घेणं, असं तिहेरी काम मला करायचं होतं. त्यातूनच आरोग्यसेवेत पलीकडच्या वाटा दिसू लागल्या.

१९७६ मध्ये माझं लग्न झालं आणि डॉ. भारती आनंदवनात दाखल झाली. मला एक खंदा डॉक्टर मिळाला. भारती बालरोगतज्ज्ञ होती. त्यामुळे आनंदवनातल्या मुलांच्या आरोग्याची जबाबदारी आता तिच्याकडे सोपवता येणार होती. आनंदवनात अंधांसाठीची शाळा सुरू झाली होती. त्या मुलांची संख्या वाढत होती. त्याचबरोबर कुष्ठमुक्त जोडप्यांना मूल होऊ देण्याचाही निर्णय घेतला गेला होता. त्यामुळे मुलांची संख्या वाढणार होती. शिवाय आनंदवनाच्या आसपासच्या गावांमध्ये आरोग्यसेवेचा आनंदीआनंदच होता. एक पूर्णवेळ बालरोगतज्ज्ञ आनंदवनात दाखल झाल्यावर तिथल्या मुलांचीही सोय झाली.

त्यामुळे भारतीने मुलांचा आणि इतर छोट्या-मोठ्या आजारांचा विभाग सांभाळायचा आणि मी कुष्ठरुग्णांचा, अशी आमच्या कामाची विभागणी होती. भारतीने आधी वर्ध्याच्या गांधी मेमोरियल लेप्रसी फाउंडेशनमध्ये कुष्ठरुग्णांच्या उपचारांसाठी दीड महिन्याचं प्रशिक्षण घेतलं होतं आणि त्यामुळे काही काळ ती माझ्यासोबत कुष्ठरुग्णांवर उपचारही करत होती. पण भारतीने कामाला सुरुवात केल्यावर हळूहळू कुष्ठरुग्णांशिवायचा स्वतंत्र दवाखाना आकाराला येत गेला. त्याची व्यवस्था पूर्णपणे तिनेच लावली आणि कुष्ठमुक्त आणि अपंगांमधून आपले सहकारी तयार केले. कामाचा विस्तार वाढवला आणि नंतर तिच्या दवाखान्याचं रूपांतर 'आनंदवन जनरल हॉस्पिटल'मध्ये झालं. आज तिथेच अनेक मेडिकल आणि सर्जिकल कॅम्प्स होतात.



डॉ.भारती यांच्या रूपाने
आनंदवनाला खंदा डॉक्टर मिळाला.

दुसरं म्हणजे भारतीने आनंदवनाला योगासनांची ओळख करून दिली. निसर्गोपचार वगैरे पर्यायी उपचार पद्धतींचाही तिने वापर केला. भारतीने हॉस्पिटलची जबाबदारी तर सांभाळलीच, पण त्यापलीकडेही ती आनंदवनातल्या सर्व कार्यकर्त्यांची काळजी वाहणारी 'वहिनी' झाली. बाबांच्या कामात ताईची जी भूमिका होती ती पुढे भारतीने निभावली. आनंदवनाच्या अडीच हजारांच्या कुटुंबाकडे तिचं बारीक लक्ष असतं. कोणाचं स्वतःच्या तब्येतीकडे दुर्लक्ष होतंय असं वाटलं तर त्याचा चार्ज स्वतःकडे घ्यायला ती मागे-पुढे बघणार नाही. आनंदवनातले सारे कार्यकर्ते आणि त्यांची कुटुंबं म्हणजे जणू तिचाच परिवार आहे. तिचं व्यक्तिमत्त्व अतिशय शांत, सौम्य आणि आध्यात्मिक वृत्तीचं आहे. त्यामुळेच आमच्या फळीतल्या तसेच नंतरच्या तरुण कार्यकर्त्यांनाही भारतीचा मोठा आधार वाटतो.

त्याच काळात मला आनंदवनातल्या आरोग्यसेवेपलीकडच्या अनेक समस्या खुणावत होत्या. शिवाय बाबा बराच काळ आनंदवनाबाहेरच राहत असल्याने माझ्यावरील जबाबदाऱ्यांचा भार वाढतच होता. विशेषतः लेप्रसी हॉस्पिटलची जबाबदारी

सांभाळण्यासाठी आणखी एका डॉक्टरची गरज होती. तो दिवस येण्यासाठी मला जवळपास दहा-बारा वर्षं वाट पाहावी लागली. माझा भार हलका केला तो डॉ. विजय पोळांनी. डॉ. पोळ बाबांच्या बहिणीचे चिरंजीव. माझे आतेभाऊ. ते बराच काळ तत्कालीन मध्य प्रदेशमधल्या रायपूर या शहरात राहिले होते. तिथे त्यांची प्रॅक्टिस होती. १९८४ साली ते आनंदवनात दाखल झाले. ते इथे आले ते काम करण्याच्या ओढीने, केवळ नातेवाईक म्हणून नव्हे. खरं तर लहानपणापासून त्यांची अन् बाबांची तशी भेटही नव्हती. त्यामुळे ते आनंदवनात आले तेव्हा बाबांनी त्यांना ओळखलंच नाही. इथे काम करायचं ठरल्यावर लगेचच त्यांनी वर्ध्याला कुष्ठरोगाचं प्रशिक्षण घेतलं आणि लेप्रसी हॉस्पिटलची जबाबदारी त्यांनी स्वतःच्या अंगावर घेतली. त्यानंतरच्या काळात हॉस्पिटलमध्ये माझी भूमिका व्हॅल्यू अॅडिशनपुरती राहिली. नेमक्या शब्दांत सांगायचं, तर डॉ. पोळ आनंदवनात आले नसते तर पुढे नाना क्षेत्रांमध्ये डोकं घालून मी जे काम केलं ते करूच शकलो नसतो.

डॉ. पोळांनी लेप्रसी हॉस्पिटलची जबाबदारी इतक्या समर्थपणे उचलली की जणू सुरुवातीपासून तेच हे काम बघत आले आहेत असं वाटावं. मुख्य म्हणजे बाबांच्या, माझ्या आणि डॉ. पोळांच्या कुष्ठरुग्णांकडे बघण्याच्या दृष्टिकोनांत कमालीचं साधर्म्य होतं. आम्हा तिघांचीही पद्धत वेगवेगळी होती; पण डॉ. पोळांच्या मनात प्रत्येक रुग्णाबद्दल तितकीच आत्मीयता आहे, हे मला लगेचच जाणवलं आणि मी निर्धास्त झालो. आजही सकाळी आठ वाजता ते हॉस्पिटलच्या राऊंडला जातात तेव्हा त्यांचा आणि कुष्ठरुग्णांचा संवाद बघण्यासारखा असतो. एखादा रुग्ण आज काही न बोलता शांत बसला आहे हे लक्षात येताच ते त्याच्या जवळ जाऊन बसतील. एखाद्या रुग्णाला थंडी वाजते आहे हे ओळखून खिडकी नीट बंद करतील. मायेने त्यांच्याशी बोलतील. त्यामुळे हॉस्पिटलमधले सगळे रुग्ण त्यांच्या येण्याची वाट बघत असतात. दिवसभरातही त्यांची हॉस्पिटलमध्ये एकदोनदा चक्कर असतेच. आनंदवनात व्यवस्था लावण्याच्या दृष्टीने शिस्त आहे पण त्यात कोरडेपणा नाही. डॉ. पोळांमध्येही हे दोन्ही गुण अगदी पुरेपूर आहेत. ते डॉक्टर असले तरी हॉस्पिटलमध्ये भेटायला जाताना ते त्या रुग्णाचे नातेवाईक म्हणूनच जातात.



डॉ.विकास यांच्यानंतर डॉ.विजय पोळ यांनी कुष्ठरुग्णांच्या दवाखान्याची जबाबदारी सांभाळली.

बाबांनी कुष्ठरुग्णांचा कधीच ‘रुग्ण’ म्हणून उल्लेख केला नाही. ते नेहमी म्हणायचे, की आनंदवनात कुष्ठरुग्ण राहत नाहीत तर शेतकरी, सुतार, चर्मकार राहतात. आपल्याला कुष्ठरोग झालाय हे कुष्ठरुग्णांनी विसरून जावं अशी त्यांची इच्छा होती. मी तर लहानपणापासून त्याच वातावरणात वाढलो होतो. नवा कुष्ठरुग्ण आला की ताप आल्याच्या गोळ्या सहजपणे त्याला चालू व्हायच्या आणि त्याचा रोग बरा झाल्यावर कोणताही गाजावाजा न करता औषधं थांबवायची. आम्हाला सगळ्यांनाच करण्यासाठी एवढी ढिगाने कामं होती की या गोष्टींमध्ये वाया घालवण्यासाठी हातात वेळच नसायचा, हेही त्यामागचं कारण होतंच. पण नव्या व्यक्तीला त्याचं फार आश्चर्य वाटायचं. एक उदाहरण सांगतो. साधारण १९७४ च्या सुमारास सुधाकर कडू हा तरुण आमच्याकडे दाखल झाला. तो आधी शिवाजीराव पटवर्धनांच्या तपोवन कुष्ठधामात होता. पण त्याला पुढे शिकण्याची व काम करण्याची इच्छा होती त्यामुळे तो आनंदवनात आला. तेव्हा त्याच्यावर औषधोपचार सुरू होते. कालांतराने तो बरा झाला. एके दिवशी माझा सहकारी त्याला म्हणाला, “विकासभाऊंनी तुला औषधं द्यायची नाहीत म्हणून सांगितलंय.” सुधाकरला काही कळेना की त्याची औषधं अचानक का बंद केली. तो माझ्याकडे आला आणि औषधांबद्दल विचारू लागला. मी त्याला म्हटलं, “ सुधाकर, तू आता पूर्ण बरा झालायस. तुला कधी कुष्ठरोग झाला होता हेही विसरून जा. कामाला लाग.” आमची पद्धत ही अशी होती.

त्यामानाने उशिरा आनंदवनात दाखल झालेल्या डॉ. पोळांनीही हाच दृष्टिकोन अगदी सहजपणे अंगी बाणवला. विशेष म्हणजे त्यांचं सगळं काम बिनबोभाट चालतं. त्यांचा स्वभाव अगदी मृदू आणि अबोल. निरलसपणे ते कुष्ठरुग्णांच्या सेवेत मग्न असतात. अर्थात अशी कामं फक्त ध्येयनिष्ठेने होत नसतात. डॉ. पोळांनीही ध्येयनिष्ठेला शिस्तीची अन् नव्या कल्पनांची जोड दिली आहे. त्यांनी आणि भारतीने हॉस्पिटलमध्ये काम करणारी स्वतःची फौज तयार केली आहे. लालबाबू यादव, विठ्ठल कुंटेवाड, वामन ठाकरे, शंकर लांडे, रवी चौधरी... अशी किती तरी नावं. त्यांच्याबरोबरीनेच अनेक महिलाही नर्स म्हणून तयार झाल्या. त्यात सावित्री लुतडे, लतिका कोल्हे, छाया चौधरी, उषा गायकवाड, बाली करेवार, निर्मला यादव, श्यामला देवगडे अशा कार्यकर्त्यांचा समावेश होता. ही सगळी फौज म्हणजे बरे झालेले कुष्ठरुग्ण. तुम्ही हॉस्पिटलमध्ये चक्कर टाकाल तर ही मंडळी एखाद्या पंचतारांकित हॉस्पिटलच्या तोंडात मारेल अशी स्वच्छता आणि शिस्त जपतात. या सगळ्या महिला कार्यकर्त्या तर कायम इतक्या टापटिपीत राहायच्या की पु.ल. देशपांडे कौतुकाने त्यांना ‘दवाईसुंदरी’ म्हणायचे! कुष्ठरुग्णांचं हॉस्पिटल म्हटल्यावर तुमच्या डोळ्यांसमोर जे काही चित्र असेल त्याच्या संपूर्ण विपरीत चित्र तुम्हाला इथे दिसेल. इथे ना अस्वच्छता आहे ना हॉस्पिटलमध्ये येणारे आजारी वास. हे सगळं डॉ.पोळांचं आणि त्यांच्या सहकाऱ्यांचं श्रेय.

आमचं हॉस्पिटल दिसतंही टवटवीत. बाबा जसे शिस्तीचे भोक्ते होते तसेच सौंदर्याचेही. त्यामुळेच संपूर्ण आनंदवनात तुम्हाला फुलांचे ताटवे दिसतील. अगदी हॉस्पिटलमध्येही. आनंदवनातल्या अनेक भिंतींना, कट्ट्यांना आम्ही तुटक्या टाइल्सचे

तुकडे लावले आहेत. त्यामुळे परिसर रंगीबेरंगी दिसतो आणि मुख्य म्हणजे भिंतींपेक्षा टाइल्स स्वच्छ करायला सोप्या पडतात. धुतल्या की झालं! हॉस्पिटलही तसंच आहे. त्यामुळे हे कुष्ठरोग्यांचं हॉस्पिटल आहे हे अनेकांना सांगूनही खरं वाटत नाही. या कट्ट्यांचीही एक कहाणी आहे. कामं संपली की सर्वांना गप्पा मारायला एकत्र बसता यावं, हा असे कट्टे उभे करण्यामागचा उद्देश होता. प्रकाश नेहमी म्हणायचा, “भिंतींना कान असतात पण कट्ट्यांना कान नसतात!” हे वाक्य म्हणजे आनंदवनातल्या मोकळ्याढाकळ्या संस्कृतीचं द्योतकच वाटतं मला. कट्ट्यांचा दुसराही एक उपयोग होता. त्या वेळी अनेक कुष्ठरुग्णांच्या पायांना जखमा झालेल्या असत. चालून चालून त्या चिघळत. कट्ट्यावर बसले की त्यांचे पाय अधांतरी राहत आणि त्यांना थोडा आराम मिळे.

पुन्हा थोडं विषयांतर झालं, पण आनंदवन म्हणजे काय हे समजून घ्यायचं तर असं होणारच. डॉ. पोळ आनंदवनात आले आणि साधारण याच काळात भारतामध्ये कुष्ठरोगाच्या उपचारांसाठी मल्टिड्रग थेरपी लागू झाली. आम्हीही सुरुवातीला आनंदवनातल्या चार रुग्णांवर या औषधांची चाचणी करून पाहिली. त्याचे निकाल चांगले आल्यावर मग त्याचा वापर सुरू झाला. या काळात आणखी एक महत्त्वाचा बदल घडून आला. १९८६ पर्यंत आम्ही रुग्णांचं दोनच प्रकारे वर्गीकरण करत होतो. त्यानंतर आम्ही ही वर्गीकरण पद्धत अधिक सखोल केली. जागतिक आरोग्य संघटनेच्या निकषानुसार सहा प्रकारे वर्गीकरण सुरू झालं. कुष्ठरुग्णांची तपासणी आणि उपचार अधिक काटेकोरपणे होऊ लागले.

कुष्ठरुग्णांचं बरं होण्याचं प्रमाण वाढलं, पण त्यांचं पुन्हा समाजात परत जाण्याचं प्रमाण मात्र वाढू शकलं नाही. अगदी सुरुवातीच्या काळात आनंदवनात आलेले अनेक रुग्ण हळूहळू थकत गेले. त्यांच्याकडून कामं होईनात. आणि त्यांना परत कुटुंबाकडे जाणं तर शक्यच नव्हतं. मग त्यांच्यासाठी आम्ही आनंदवनात ‘स्नेहसावली’ हे हक्काचं ठिकाण तयार केलं. ‘हेल्पेज इंडिया’ या संस्थेच्या मदतीने उभा राहिलेला हा आशिया खंडातला अशा प्रकारचा पहिला प्रकल्प. जवळपास रुग्णशय्येला खिळून असणाऱ्या कुष्ठरुग्णांची काळजी घेणारं, त्यांच्यावर औषधोपचार करणारं हे ठिकाण म्हणजे माणुसकीचा जगावेगळा नमुना आहे. स्नेहसावलीच्या चार इमारती म्हणजे मोठाल्या खोल्या आणि मध्ये छोटं अंगण असलेले बैठे वाडेच आहेत म्हणा ना. यात काही खोल्या महिलांच्या आहेत तर काही पुरुषांच्या.




गात्रं थकलेल्या अनेक कुष्ठरुग्णांना 'स्नेहसावली'ने हक्काचं घर दिलं आहे.

यातल्या प्रत्येकाची कहाणी वेगळी आहे. कुष्ठरोग झाल्याने कुटुंबाने घराबाहेर काढलेली अन् आयुष्याच्या वेगवेगळया टप्प्यांत आनंदवनात येऊन दाखल झालेली ही अनेक मंडळी. सगळी महाराष्ट्राच्याच नव्हे, तर देशाच्या कानाकोपऱ्यातून आलेली. कोणी तर देशाबाहेरून, नेपाळमधूनही दाखल झालेलं. कोणाचा पाय कुष्ठरोगामुळे कापावा लागलेला, तर कोणाचे डोळे गेलेले, तर कोणी आणखी कोणत्या दुर्धर आजाराने अंथरुणाला खिळलेलं. जवळपास साऱ्यांची गात्रं थकलेली. आनंदवनात आली नसती तर ही माणसंही बाबांना भेटलेल्या तुळशीरामसारखी रस्त्याच्या कडेला मरून पडली असती आणि 'बेवारस' अशी नोंद होऊन त्यांची विल्हेवाट लावली गेली असती. पण इथे आनंदवनात मात्र त्यांच्या चेहऱ्यावर तुम्हाला समाधान दिसेल. कशाचं आहे हे समाधान? मला विचाराल, तर आपले हातपाय चालत होते तेव्हा आपण काम करू शकलो आणि आनंदाने-आत्मसन्मानाने जगू शकलो याचं समाधान असतं त्यांच्या चेहऱ्यावर.

आनंदवनातले इतर धट्टेकट्टे कुष्ठरुग्ण या थकल्या-भागल्या जिवांची काळजी घेतात. त्यांचं औषधपाणी करण्यापासून ते हाताने खाऊ-पिऊ घालण्यापर्यंत सगळं. आनंदवन बघायला आलेली माणसं या विभागात जाऊन आली की आम्हाला प्रश्न विचारतात, "यांच्या खर्चाचं काय? त्यांचा खर्च सरकार देतं की त्यांचे नातेवाईक?" खरं तर हा खर्च पूर्णपणे आनंदवनच करतं. आणि गमतीची गोष्ट म्हणजे हा खर्च करावा की नाही, असा प्रश्न आमच्यापैकी कोणाच्याही मनात कधीच उत्पन्न झाला नाही. या कुष्ठरुग्णांनी आपलं आयुष्य आनंदवनाच्या उभारणीत घातलं. जमेल तोवर त्यांच्या आयुष्यातला प्रत्येक क्षण ते कामच करत होते. त्यामुळे त्यांच्या उतारवयात त्यांची काळजी घेणं हे आनंदवनाचं कर्तव्यच आहे, अशी आमची भावना आहे. बाबा म्हणायचे, "हे लोक म्हणजे 'ओल्ड वॉर हॉर्सेस' आहेत. दे हॅव लॉस्ट द बॅटल, बट वन द वॉर अगेन्स्ट लेप्रसी." असे जवळपास चारशे ओल्ड वॉरहॉर्सेस स्नेहसावलीत राहताहेत. एवढंच काय, कुष्ठरोग नसलेला एखादा अनाथ माणूस आनंदवनाच्या दाराशी आला तर त्यालाही स्नेहसावलीत सामावून घेतलं जातं. तशीही काही मंडळी आज स्नेहसावलीत हक्काने राहताहेत. बाबा आणि ताई रोज पहाटे उठून न चुकता स्नेहसावलीतल्या सोबत्यांना भेटायला जायचे. त्यांची विचारपूस करून, त्यांच्याशी गप्पा मारून मगच बाबांचा दिवस सुरू होत असे. आज ताई आणि

बाबा नसले, तरी डॉ. पोळ, सुधाकर कडू अशी अनेक ज्येष्ठ मंडळी या रुग्णांशी गप्पागोष्टी करायला जातात.



थकल्याभागल्या कार्यकर्त्यांची विचारपूस करण्यासाठी बाबा रोज पहाटे न चुकता 'स्नेहसावली'त जात.

याला जोडूनच आणखी एका विभागाची गोष्ट सांगायला हवी. त्याचं नाव 'गोकुळ'. 'गोकुळ'चा आरोग्यसेवेशी थेट संबंध नाही. पण स्नेहसावलीने जसा म्हातार्‍या-कोतार्‍यांना आधाराचा हात दिलाय, तसाच 'गोकुळ'ने अनाथ मुला-मुलींना. गोकुळची सुरुवात तशी आनंदवनाच्या बरोबरीनेच झाली असं म्हणायला हरकत नाही. १९५४ च्या आसपासची गोष्ट असेल. वरोरा रेल्वे स्टेशनवर कुणी तरी एक तान्ही मुलगी टाकून गेलं होतं. स्टेशनवरच्या कर्मचार्‍यांनी सायकलच्या कॅरियरवरून ते मूल आनंदवनात आणलं. तेव्हाची आनंदवनातली पैशापाण्याची परिस्थिती पाहता हे मूल म्हणजे दुष्काळात तेरावा महिना! पण बाबा-ताई दोघांनाही तसं वाटलं नाही. त्यांनी त्या मुलीला ठेवून घेतलं. पुढे काही दिवसांनी आणखी एक नवजात मुलगी कुणी तरी जवळच्या जंगलात टाकून दिल्याचं बाबा-ताईंना कळलं. त्याही मुलीला ते आनंदवनात घेऊन आले. हातापायांच्या काड्या झालेल्या या मुलीचं नाव ठेवलं 'माया'. ताईने मायाची खूप सेवा केली; पण अखेर पाच-सहा महिन्यांनी तिचा मृत्यू झाला. या दोन्ही घटनांनी बाबा आणि ताईला समाजातल्या एका कठोर वास्तवाची जाणीव झाली. अशा टाकून दिलेल्या मुला-मुलींचं पुढे काय होईल, या विचाराने ते अस्वस्थ झाले आणि गोकुळची सुरुवात झाली.

पुढे गोकुळची माहिती कळू लागली तसतशी आनंदवनाच्या दारात तान्ही मुलं सोडून जाण्याचं प्रमाण वाढत गेलं. आम्हीही त्यांना प्रेमाने सांभाळलं. ताई या सगळ्या गोकुळाची आई होती. तिथे दाखल झालेल्या प्रत्येक मुलाला न्हाऊ-माखू घालण्यापासून ते त्याचं पथ्य सांभाळण्यापर्यंत सगळं ती करायची. पुढे आनंदवनात कुष्ठमुक्तांची लग्नं होऊ लागल्यावर अनेक जोडप्यांनी गोकुळातली मुलं दत्तक घेतली. मायेने मोठी केली. सुधाकर-सुमन कडू यांनी नीरजला आपलं मानलं. मधुसूदन धारव आणि त्यांच्या पत्नीने धरतीला.

अशी मुलं कुणाकुणाच्या घरची झाली. जी दत्तक गेली नाहीत तीही आनंदवन परिवाराचा भाग म्हणून वाढली. आमच्या कार्यकर्त्यांनी त्यांच्या मनात पोरकेपणाची भावना तयार होऊ दिली नाही हे विशेष. बाबा आणि ताई कुठेही असले तरी त्यांचं गोकुळाकडे लक्ष असायचं. नर्मदा बचाव आंदोलनासाठी मध्य प्रदेशात कसरावदला मुक्काम असताना तिथून ते दोघंही गोकुळातल्या बालगोपाळांना नियमित पत्रं लिहायचे. आज या गोकुळातली जवळपास सगळी मुलं एक चांगलं आयुष्य जगताहेत. या मुलांना आता पोरंबाळं झाली आहेत.

आजही गोकुळात मुलं आहेत. आनंदवन आजही त्यांच्याकडे तितक्याच प्रेमाने लक्ष पुरवतं आहे. गेली कित्येक वर्षं गोकुळ परिवाराची देखभाल करण्याचं काम माधव कवीश्वर आणि त्यांच्या पत्नी नीला अतिशय मायेने करताहेत. कवीश्वर मूळचे बेळगावचे. ते १९९० मध्ये आनंदवनात आले. अतिशय कष्टाळू असल्याने आनंदवनाच्या कामात ते पूर्णपणे समरस झाले. पदवीधर असल्याने त्यांनी प्रामुख्याने मराठी-इंग्रजी पत्रव्यवहाराचा भार सांभाळला. ते योगाचार्य अय्यंगारांचे शिष्य. त्यामुळे आनंदवनात त्यांनी योगाचं शिक्षण द्यायलाही सुरुवात केली.


आनंदवनाचा गोकुळ परिवार

तर पुन्हा मुद्द्यावर येऊ.

कुष्ठरुग्णांवरच्या उपचारांबरोबरच आरोग्यातलं आणखी एक महत्त्वाचं पाऊल टाकलं गेलं ते मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरांच्या रूपाने. १९९८ मध्ये मुंबईच्या झुबेदाबाई अकबरअली झव्हेरी ट्रस्टतर्फे आनंदवनात मोतीबिंदू आणि इतर ऑपरेशन्ससाठीचं शिबिर घेता येईल, असा प्रस्ताव आला. त्यासाठी जे. जे. हॉस्पिटलचे डॉ. तात्याराव लहाने, डॉ. रागिणी पारेख आणि त्यांचे सहकारी शस्त्रक्रियेसाठी आनंदवनात येतील, असं पक्कं झालं. आमच्यासाठी हा एक सुखद धक्काच होता. पण त्याच वेळेस याचीही जाणीव झाली, की डॉ. लहाने यांच्यासारखा निष्णात सर्जन इथे ऑपरेशन्स करणार म्हणजे त्यांना व्यवस्थाही चोख पाहिजे. त्यातून डोळ्याचं ऑपरेशन म्हणजे अतिशय नाजूक प्रकरण. मग डॉ. पोळ आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी हे आव्हान स्वीकारलं. मदतीला मी होतोच. आम्ही आमच्या आनंदवन जनरल हॉस्पिटलमध्ये अक्षरशः दोन दिवसांमध्ये अद्ययावत ऑपरेशन थिएटर उभं केलं. बरीचशी सामग्री आमच्या फॅब्रिकेशन युनिटनेच तयार केली. चादरी-बेडशीट्स

आणि बँडेजचीही निर्मिती आनंदवनातच होत होती. अगदी असेंबल्ड एसीसह सगळं आनंदवनात तयार झालेलं. त्यामुळे तसं बघायला गेलं तर जवळपास संपूर्ण थिएटर आम्ही आमच्या बळावर उभं केलं. ते थिएटर बघून डॉ. लहाने एवढे खूष झाले की बस!

मोतीबिंदू शस्त्रक्रियांसाठी दरवर्षी आनंदवनात येणारे डॉ.तात्याराव लहाने आणि डॉ. रागिणी पारेख आता आनंदवन परिवाराचाच भाग झाले आहेत.



त्या वर्षी डॉ. लहाने यांच्या टीमचा हा कॅम्प अतिशय यशस्वी झाला. त्यानंतर दरवर्षी एकदा ऑपरेशन्ससाठी, नंतर आठवड्याभराने तपासणी करून चष्म्यांचं वाटप करण्यासाठी आणि नंतर फॉलोअपसाठी असे तीन वेळा डॉ. लहाने डॉक्टरांच्या टीमसोबत आनंदवनात मुक्काम ठोकतात आणि आनंदवनात मिसळून जातात. त्यांचं हे मिसळणं इतकं सहज आणि स्वाभाविक असतं की ते आनंदवनाशी तादात्म्य पावलेले आहेत हे जाणवतं. गेल्या पंधरा वर्षांमध्ये डॉ. लहाने यांच्या नेतृत्त्वाखाली आनंदवनात तब्बल अठरा हजारांहून अधिक मोतीबिंदूची ऑपरेशन्स झाली आहेत. त्यांच्या या कॅम्प्ससाठी अवघ्या मध्य भारतातून गोरगरीब रुग्ण आनंदवनात येतात. बाबा या कॅम्प्सना ‘लहानुबाबाची जत्रा’ म्हणायचे! ऑपरेशन्स तर मोफत होतातच, शिवाय अत्याधुनिक तंत्राने केल्यामुळे इतर ठिकाणांपेक्षा लवकर, म्हणजे आठवड्याभरातच रुग्ण कामाला लागतात आणि त्यांचा रोजगार कमी बुडतो.



डॉ.लहाने यांच्या कॅम्पचा उपयोग मध्य भारतातल्या अनेक ग्रामीण रुग्णांना होतो. बाबा या कॅम्पला ‘लहानुबाबाची जत्रा’ असं म्हणायचे.

आमच्यासमोरचं आणखी एक मोठं आव्हान होतं ते कुष्ठरुग्णांची विकृती दूर

करण्यासाठीच्या ऑपरेशन्सचं. सुरुवातीच्या काळात आमच्याकडे ही ऑपरेशन्स होणं शक्य नव्हतं. त्यामुळे शक्य असेल तेव्हा रुग्णांना आम्ही ऑपरेशनसाठी बाहेर पाठवायचो. पण अडचण अशी होती की अशा ऑपरेशन्सचा खर्च बराच जास्त व्हायचा. त्यामुळे अशा सर्जरी करणारा डॉक्टर आनंदवनात येऊ शकला तर इथल्या अनेक रुग्णांना त्याचा फायदा होऊ शकेल असं आम्हाला वाटत होतं. डॉ. लहाने यांच्या शिबिराच्या अनुभवामुळे आमच्या एक लक्षात आलं, की आपल्याला वरोरा, चंद्रपूर, नागपूरमधून डॉक्टरांचं म्हणावं तसं सहकार्य मिळत नसलं, तरी पुणे-मुंबईकडच्या डॉक्टरांना मात्र इथल्या कामाचं महत्त्व कळतंय आणि ते आपल्याला मदत करायलाही तयार आहेत.

हा समज पक्का करणारा अनुभव पुढच्याच वर्षी आला. मूळ नागपूरच्या आणि नंतर इंग्लंडमध्ये स्थायिक झालेल्या डॉ. अश्विन पावडे यांच्याशी माझी ओळख झाली. त्यांनी आनंदवनाचं आणि बाबांचं नाव ऐकलेलं होतं. ते स्वतः बालहृदयरोगतज्ज्ञ होते, तर त्यांच्या पत्नी डॉ. व्हिव्हियन या प्लास्टिक आणि रिकन्स्ट्रक्टिव्ह सर्जन होत्या. त्या दोघांशीही माझी बरीच पत्रापत्री झाली. इथल्या रुग्णांच्या परिस्थितीचं वर्णन आणि फोटो पाहिल्यावर त्यांनी आनंदवनात सर्जरी कॅम्प घेण्याचं मान्य केलं. पण हे दोघंही इंग्लंडमध्ये अद्ययावत हॉस्पिटलांमध्ये काम करणारे. आनंदवनासारख्या ठिकाणी सर्जरी कॅम्प घ्यायचा, तर तिथे ऑपरेशन्ससाठीची व्यवस्था कशी असेल याबाबत ते साशंक होते. पण आम्ही त्यांना शब्द दिला, “तुम्ही आमचं ऑपरेशन थिएटर बघा. तुम्हाला फाइव्ह स्टार ट्रीटमेंट मिळणार नाही, पण आमची व्यवस्था चोख आणि स्वच्छ असेल याची खात्री बाळगा.”

डिसेंबर १९९९मध्ये डॉ. पावडे आणि डॉ. व्हिव्हियन यांची टीम आनंदवनात येऊन थडकली. त्यांच्यासोबत आंतरराष्ट्रीय कीर्तीचे प्लास्टिक सर्जन डॉ. डोनाल्ड सॅमूट हेही होते. या साऱ्यांनाही आमची व्यवस्था इतकी आवडली, की यापेक्षा काहीही वेगळं नको, अशी पावती त्यांनी पहिल्याच वर्षी देऊन टाकली. या डॉक्टर मंडळींनी पहिल्या वर्षी साठजणांवर ऑपरेशन्स केली. त्यात अर्थातच मोठ्या प्रमाणावर कुष्ठरुग्ण होते. पण त्याचबरोबर आनंदवनातल्या इतरही अनेक रुग्णांना या शिबिराचा फायदा झाला. पहिल्या वर्षीच्या शिबिरात भाजून त्वचा एकत्र झालेले रुग्ण होते तसेच ओठ फाटलेली काही लहान मुलंही होती. पहिल्या वर्षीच्या यशस्वी कॅम्पनंतर आम्ही पुढच्या वर्षीच्याही तारखा पक्क्या केल्या आणि आसपासच्या गावांतूनही गरजू पेशंट मंडळींना गोळा करायला सुरुवात केली. ज्या ऑपरेशन्ससाठी नागपूर किंवा मुंबईत जाऊन पंचवीस हजार ते लाख-दोन लाख रुपये खर्च करावे लागले असते (आणि त्यामुळे ती कधीच झाली नसती) अशी ऑपरेशन्स इथे पूर्णपणे मोफत होऊ लागली. परिणामी, या शिबिरांना वाढता प्रतिसाद मिळू लागला. त्यामुळे हे सत्र पुढे सुरूच राहिलं. डॉ. पावडे यांची टीम दरवर्षी न चुकता आनंदवनात येते आणि वेगवेगळी सत्तर-ऐंशी ऑपरेशन्स यशस्वीरीत्या पार पाडून इंग्लंडला परतते.



रिकन्स्ट्रक्टिव्ह शस्त्रक्रिया करण्यासाठी दरवर्षी इंग्लंडहून आनंदवनात येणारं सर्जन दाम्पत्य डॉ. अश्विन पावडे आणि डॉ. व्हिव्हियन.

डॉ. पोळ आणि माझ्यासाठी हा एक महत्त्वाचा टप्पा होता. बाबांच्या स्वप्नपूर्तीच्या दिशेने उचललेलं एक पाऊल. कुष्ठरुग्णांना आनंदाने, आत्मसन्मानाने जगता यावं यासाठी बाबांची सगळी धडपड होती. रिकन्स्ट्रक्टिव्ह सर्जरी हे त्या दृष्टीने वरदानच होतं. या सर्जरीमुळे विकृती बऱ्याच अंशी कमी होण्यास मदत होऊ लागली आणि रुग्ण पुन्हा आपापल्या कुटुंबांमध्ये परतण्याचं प्रमाण हळूहळू वाढू लागलं.

अशा रीतीने आनंदवनातलं आरोग्याचं काम कुष्ठसेवेच्या पलीकडे विस्तारलं गेलं. काळाच्या बरोबर, किंवा खरं तर काळाच्या पुढे चालणं हे आमचं वैशिष्ट्य आहे. डॉ. पावडे यांच्या रिकन्स्ट्रक्टिव्ह सर्जरी आणि डॉ. लहाने यांच्या मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरांबरोबरच दरवर्षी पुण्याच्या 'नेत्रसेवा प्रतिष्ठान'तर्फे डॉ. मधुसुदन झंवर आणि त्यांची टीम तिरळेपणा घालवण्यासाठीची ऑपरेशन्स करते. याशिवाय हायड्रोसिल, हर्निया, फॅमिली प्लॅनिंग यासारख्या ऑपरेशन्ससाठी रोटरी आणि लायन्स क्लब्जच्या मदतीने आनंदवनात कॅम्प घेतला जातो. यातले काही सर्जन्स सोमनाथ आणि हेमलकसा इथेही स्वतंत्रपणे कॅम्प्स घेतात. रिकन्स्ट्रक्टिव्ह सर्जरीसाठी आम्ही सोमनाथ आणि हेमलकशाहून रुग्णांना आनंदवनात घेऊन येतो. आता गेली चौदा-पंधरा वर्षं सर्जिकल कॅम्प्सचं हे चक्र अविरत सुरू आहे.

अलीकडच्या काळात डॉ. भारतीच्या पुढाकाराने उचललं गेलेलं आणखी एक महत्त्वाचं पाऊल म्हणजे 'नवचैतन्य कृत्रिम अवयवनिर्मिती केंद्र'. कुष्ठरुग्णांमध्ये आणि एकुणातही अपंगत्वाचं प्रमाण मोठं आहे. आजवर कृत्रिम अवयव बसवणं हे ग्रामीण भागातल्या गरिबांच्या दृष्टीने आवाक्याबाहेरची गोष्ट होती. किंवा असे कृत्रिम अवयव असू शकतात आणि त्यांच्यामुळे आपलं आयुष्य आहे त्यापेक्षा खूपच सुकर होऊ शकतं याची कल्पनाच त्या बिचाऱ्यांना नसते. आमच्या विदर्भामध्ये तर कृत्रिम अवयवनिर्मिती केंद्रं फार कमी. त्यामुळे ज्यांना माहिती आहे आणि परवडतं ती मंडळी पुण्या-मुंबईला जाऊन कृत्रिम हात-पाय बसवून येतात. पण त्यांची संख्या किती असते, तर अगदी हाताच्या बोटांवर मोजण्याइतकी. बाकीचे सर्वजण आहे त्या परिस्थितीशी तडजोड करून

जवळपास संपलेलं आयुष्य जगत राहतात. अशा लोकांना आनंदवनाने कृत्रिम अवयव उपलब्ध करून द्यायला हवेत, असं भारतीचं म्हणणं होतं.



असं केंद्र आनंदवनात उभं राहावं या दृष्टीने आम्ही प्रयत्न सुरू केले. यात आम्हाला मोठी मदत केली ती डॉ. पावडे यांच्यासोबत येणाऱ्या नर्सेस आणि फिजिओथेरपिस्ट्सनी. आनंदवनातलं काम पाहिल्यावर या चमूने आम्हाला कृत्रिम अवयवनिर्मिती केंद्र उभारण्यात मदत करायची, असं मनावर घेतलं. त्यासाठी त्यांनी लंडनमध्ये 'वॉकॅथॉन' आयोजित करून ५२ लाख रुपये जमा केले. त्या निधीतून नागपूरमधील ओटोबॉक कंपनीच्या केंद्राशी संलग्न असं नवचैतन्य केंद्र आनंदवनात उभं राहिलं. त्या काळातला ग्रामीण भागातला हा पहिला प्रकल्प होता. या केंद्रात कृत्रिम अवयव तयार करण्याची मशिनरी आहे. नागपूरमधून त्यांचे प्रशिक्षित तंत्रज्ञ दर पंधरवड्याला आनंदवनात येतात आणि त्या वेळी अपंग व्यक्तींची तपासणी करून, त्यांची मापं घेऊन कृत्रिम अवयव तयार केले जातात. हे केंद्र सरकारने मान्यता दिलेलं आहे, त्यामुळे सरकारी कर्मचाऱ्यांना इथे मोफत अवयव मिळू शकतात. आनंदवनातल्या कुष्ठरुग्ण आणि अपंगांसाठीच्या कृत्रिम अवयवांचा बराचसा खर्च आनंदवन करतंच, पण त्याबरोबरच बाहेरून येणाऱ्या गरीब अन् गरजू अपंगांनाही आनंदवनाने आजवर अवयवांसाठी मोठ्या प्रमाणावर मदत केली आहे.



डॉ.भारती यांच्या पुढाकाराने सुरू झालेलं नवचैतन्य कृत्रिम अवयव निर्मिती केंद्र.
कृत्रिम पाय बसवल्याने आयुष्याला उभारी मिळालेल्या सोमनाथ प्रकल्पावरच्या सीताबाई.

असं एक केंद्र आमच्याकडे सुरू झालं आहे हे लोकांना कळावं आणि गरजूंनी त्याचा लाभ घ्यावा यासाठी आम्ही बरीच धडपड करतो. खरं तर हे सगळे उद्योग खर्च वाढवणारे आहेत. वर्षांच्या शेवटी जमा-खर्चाची तोंडमिळवणी करताना नाकी नऊ येतात; पण वंचितांच्या जगण्यात सुधारणा करून त्यांना त्यांच्या पायावर उभं करणं, हाच आनंदवनाचा आत्मा असल्यामुळे आम्हाला त्याखेरीज वेगळं काही करता येईल असं वाटत नाही. या केंद्रात कृत्रिम हात-पाय बसवलेल्यांचे उजळलेले चेहरे पाहिले की काम करण्याची उमेद आणखी वाढते.

आमच्या सीताबाईंचंच उदाहरण घ्या. त्या कुष्ठरुग्ण. त्यामुळे पायाला अल्सर झालेला. त्यात पाय गुडघ्यापासून खाली कापावा लागला. आधीच कुष्ठरोग, त्यात अपंगत्व आलं. त्यामुळे सीताबाईंना प्रचंड नैराश्य आलं होतं. दोन-तीन वर्षं त्या खचलेल्या अवस्थेतच जगत होत्या. पण 'नवचैतन्य'मध्ये त्यांना कृत्रिम पाय मिळाला आणि त्यांचं जगणं बदलून गेलं. सुरुवातीला नव्या अवयवाशी जुळवून घेणं त्यांना अवघड गेलं, पण लवकरच त्या स्वतःच्या पायांवर उभ्या राहिल्या. त्यांचा गेलेला आत्मविश्वास परत आला. आता सोमनाथच्या प्रकल्पात इतर बायकांच्या बरोबरीने त्या काम करताहेत.

'स्वरानंदवन' हा आनंदवनातल्या अंध-अपंग-कर्णबधिर-कुष्ठरुग्णांनी चालवलेला वाद्यवृंद. त्याबद्दल मी नंतर सविस्तर सांगेनच. गुड्डू बोटलावार हा तरुण या वाद्यवृंदातला स्टार. आनंदवनात येण्यापूर्वी २००१ मध्ये एका अपघातात त्याचे दोन्ही पाय गेले. त्यानंतर दोन-तीन वर्षं तो अंथरुणाला खिळून होता. त्याला कुणी तरी 'स्वरानंदवन'बद्दल सांगितलं आणि तो आमच्या ताफ्यात दाखल झाला. सुरेख गाऊ लागला. पाच-सहा वर्षं कृत्रिम अवयवांखेरीज तो 'स्वरानंदवन'मध्ये काम करत होता. पण 'नवचैतन्य' सुरू झाल्यानंतर त्याला हायटेक कृत्रिम पाय बसवण्यात आले आणि त्याचं

व्यक्तिमत्त्वच बदलून गेलं. काय जोश असतो त्याच्या गाण्यात! अशा अनेकांच्या आयुष्यात 'नवचैतन्य'चं किती मोल आहे हे शब्दांमध्ये सांगता येणार नाही. त्यामुळेच आनंदवनाच्या आरोग्यसेवेतला एक महत्त्वाचा टप्पा म्हणून आम्ही या केंद्राकडे बघतो.

-तर असा हा सगळा आनंदवनातल्या आरोग्यसेवेचा पसारा. कुष्ठरोगाच्या पल्याड विस्तारलेला. आता या कामात आनंदवनातली पुढची पिढीही सक्रिय झाली आहे. नवे प्रयोग करते आहे. असे छोटे छोटे प्रयोग आनंदवनात सतत सुरू असतात. त्यातूनच प्रश्न सुटतात असं आम्हा सगळ्यांना वाटतं.

आनंदवनाच्या आरोग्यसेवेचं वेगळेपण काय, तर बाबांनी आणि आम्ही कार्यकर्त्यांनी 'आनंदवन म्हणजे कुष्ठरुग्णांची सेवा' एवढ्याच व्याख्येत समाधान मानलं नाही. आनंदवनात कुष्ठरुग्णांवर तर उपचार झालेच, पण कुष्ठमुक्तांनी निरोगी बनून इतरांचीही सेवा करावी, हा मंत्र इथे जपला गेला. कुष्ठमुक्त बाबांच्या स्वप्नात सामील झाल्यानेच आज आनंदवनात कुष्ठमुक्तीचं काम जोमाने चालू आहे. दुसरीकडे, आनंदवनातील कार्यकर्ते आणि आनंदवनावर प्रेम करणारी बाहेरची मंडळी यांच्यामुळे आरोग्यसेवेचा परीघ असा चौफेर विस्तारला आहे.


•

हिरव्या निर्मितीचा ध्यास

आज आनंदवनात नजर जाईल तिथे हिरवाई आहे, पाणी आहे, मुबलकता आहे. तेच सोमनाथचंही. एकट्या आनंदवनात बारा तलाव आहेत. सोमनाथमध्ये तब्बल सत्तावीस! आनंदवन आणि सोमनाथमध्ये आज काय पिकत नाही विचारा! जिथे वर्षातून एकदा पीक निघणं अवघड होतं तिथे आता तीन-तीन पीकं होतात. साठवलेल्या पाण्यावर भातशेती होते, ऊस होतो, बागायती फळं होतात. सरकारचं राखीव जंगल काय दाट असेल असं अभयारण्य आमच्या आनंदवनात आहे. तेही जैववैविध्याने पुरेपूर. ज्याला मल्टिटायर सिल्व्हिपाश्चर सिस्टीम म्हणतात तसं. स्थानिक आणि स्थलांतरित असे सगळे मोजले तर या परिसरात आज दीड-दोनशे प्रकारचे पक्षी दिसतात.

पण १९७५पर्यंत आनंदवनातलं चित्र असं नव्हतं. बाबांनी आणि त्यांच्या जनरल्सनी या खडकाळ जमिनीवर अपार कष्ट घेतले होते. पण, ही जमीनच अशी होती की फक्त माणसाच्या श्रमांवर मुबलक पाणी खेळवणं आणि जमीन भिजवणं केवळ अशक्य होतं. तरीही ते आव्हान पेलण्याचा बाबांनी पुरेपूर प्रयत्न केला होता.

कुष्ठरोगामुळे हातापायांना व्यंगत्व आलेल्या माणसांनी विहिरी खोदण्यासारखी कामं कशी काय केली असतील?



आनंदवनाला स्वतःच्या पायावर उभं करायचं असेल तर त्यासाठी पहिली गरज होती पाण्याची. त्यासाठी विहीर खणणं हा एकमेव मार्ग होता. बाबांनी पहिली विहीर खणायला घेतली तेव्हा आसपासच्या गावकऱ्यांपैकी मदतीला कोणी पुढे आलं नाही, पण सल्ले द्यायला आणि वेड्यात काढायला मात्र सगळे हजर होते. या असल्या दगडाळ प्रदेशात पाणी सापडणं शक्य नाही, असं म्हणत त्यांनी बाबांची यथेच्छ चेष्टा केली; पण बाबा मागे हटले नाहीत. मे महिन्याच्या रणरणत्या उन्हात ते काम करत राहिले. सतत चाळीस-पंचेचाळीस दिवस काम केल्यावर सोळा फुटांवर त्यांना पहिल्यांदा पाण्याची चिन्हं दिसली. उन्हाळ्याच्या त्या प्रचंड तडाख्यात खड्ड्यामधल्या ओलाव्याच्या वासाने

माशा अन् फुलपाखरं तिकडे घोंघावू लागली. दुसऱ्या दिवशी त्या खड्ड्यात पाण्याचं एक छोटं डबकं तयार झालं आणि त्यात एक बेडूक बागडताना दिसला. याचा अर्थ खाली नक्कीच पाणी होतं. आणखी तीन दिवस खणल्यावर विहिरीला पाणी लागलं. त्या वेळी बाबांना आणि त्या सहा कुष्ठरुग्णांना किती आनंद झाला असेल याची मी कल्पना करू शकतो. त्या दिवसांबद्दल बाबा फारसे बोलायचे नाहीत. मागे वळून पाहण्याची त्यांना सवय नव्हती. पण एकदा ते म्हणाले होते, "त्या पाण्याकडे बघत आम्ही पूर्ण दिवस तिथे बसून होतो. आता आम्हाला भविष्याबद्दल आशा करायला वाव होता."

एकदा पाणी लागल्यानंतर १९५४ नंतर धडाधड विहिरी खोदल्या जाऊ लागल्या. शेतीसाठी जमीन नांगरली जाऊ लागली. शक्य ती सगळी पिकं घेतली जाऊ लागली. बाबांना शेती करण्याचा अनुभव नव्हता, पण पिंडाने ते विज्ञाननिष्ठ होते. समजून घेतली तर आपल्याला प्रत्येक गोष्ट समजू शकते, असं त्याचं म्हणणं असायचं. शिवाय आनंदवनातले बहुतेक कुष्ठरोगी हे शेतकरी होते. त्यामुळे त्यांच्या मार्गदर्शनाखाली बाबांनी शेतीला सुरुवात केली. आनंदवनासारख्या आडबाजूला राहूनही बाबांचं बाहेरच्या जगातल्या घडामोडींकडे लक्ष असायचं. शेतीमधले जगभरातले नवे प्रयोग ते अभ्यासायचे, नव्या तंत्रज्ञानाची माहिती घ्यायचे. कुठून माहिती मिळवायचे, कसा पत्रव्यवहार करायचे त्यांचं त्यांनाच माहिती! पण एक नक्की, की नव्याचा स्वीकार करायला ते कायम तयार असायचे.

मला आठवतं, १९५६-५७च्या सुमारास बाबांनी आनंदवनात स्प्रिंकलर्स बसवले. मध्य भारतात तेव्हा कोठेच स्प्रिंकलर्स नव्हते. तेव्हा तो प्रकार आम्हा मुलांनाच काय, मोठ्यांनाही अद्‌भुत वाटला होता. एवढंच काय, शेतीसंपन्न पश्चिम महाराष्ट्राचं प्रतिनिधित्व करणारे महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनीही आनंदवनातच पहिल्यांदा स्प्रिंकलर्स पाहिले. यावरून बाबांच्या पुढारलेपणाची कल्पना यावी. तसंच ट्रॅक्टरचं. मध्य भारतातला पहिला ट्रॅक्टर आनंदवनात आला. विहिरीतून पाणी वर चढवण्यासाठी बाबांनी आनंदवनात डिझेल इंजिन वापरलं. शेतीत नवे प्रयोग करण्यासाठीही ते प्रयत्नशील होते. त्यामुळे लवकरच आनंदवनात शेती बहरू लागली. १९६० साली आचार्य अत्रे आनंदवनात आले होते. परतल्यावर त्यांनी 'मराठा'मध्ये लिहिलं होतं, 'एखाद्या शेतकी कॉलेजात शेतीविषयक जे प्रयोग कोणी करत नाही ते आज आनंदवनात महर्षी आमटे गुरुजी कुष्ठरुग्णांकडून करून घेत आहेत. कोथिंबिरीपासून ते उसापर्यंत सर्व अन्नधान्यं इथे तयार होतात. आनंदवनातलं दूध, भाज्या नि धान्य बाहेर विक्रीला पाठवण्यात येतं आणि त्याला सर्वत्र फार मागणी आहे.'

१९६५ च्या दरम्यान आनंदवनातल्या शेतीतून मिळालेलं उत्पन्न होतं सुमारे ३८ हजार रुपये. त्या काळातली आनंदवनातली शेती प्रामुख्याने कोरडवाहू होती. फक्त पावसाच्या पाण्यावर होणारी शेती. त्यामुळे कापूस, ज्वारी, बाजरी, मका एवढीच पिकं त्या काळी व्हायची. भाजीपालाही व्हायचा, पण त्याचं प्रमाण अगदीच कमी होतं. विहिरी होत्या, पण त्यांचं पाणी मुख्यतः पिण्यासाठीच लागायचं.

पाण्याची चणचण आमच्या पाचवीला पुजलेली होती. आम्ही लहानपणापासून ती अनुभवत आलो होतो. जसजसा विचार करण्याच्या वयात आलो, तसं 'पाणी नसेल तर पुढे काय' या प्रश्नाने मला घेरायला सुरुवात केली. आनंदवनातली माणसं वाढत होती. कुष्ठरुग्णांबरोबर अंध-अपंग आणि पोराबाळांनी घरातून बाहेर काढलेली वृद्ध माणसं हक्काने आनंदवनात निवासाला यायची. त्यामुळे पिण्याच्या आणि वापराच्या पाण्याची गरज वाढत होती. शिवाय खर्चही वाढत चालला होता. उत्पन्न मात्र त्या प्रमाणात वाढत नव्हतं. त्यामुळे आपल्याकडे असणाऱ्या जमिनीचा जास्तीत वापर केला पाहिजे, शेती वाढवली पाहिजे, हे जाणवत होतं. पण शेतीसाठी पाणी हवं. ते कुठून आणायचं? पैशाचं सोंग आणता येत नाही म्हणतात. पाण्याचंही तसंच. शहरात पाणी संपलं तर टँकर बोलावतात, की सुटतो प्रश्न. आम्हाला आनंदवनात तसंही काही करणं शक्य नव्हतं. पाणी नव्हतं आणि पैसा तर नव्हताच; आणि दोन्हीही गरजेचं होतं. मग करायचं काय? लहान मुलांकडे जसा खेळायला, टप्पे टाकत बसायला एखादा बॉल सतत हाताशी असतो, तसा हा प्रश्न सतत माझ्या डोक्याशी असायचा. एकीकडे रोजचं जगणं सुरू असायचं आणि दुसरीकडे पाण्याचं काय करायचं हा विचारही.

डॉक्टरकी पूर्ण करून आम्ही आनंदवनात परत आलो तेव्हा मी या प्रश्नाचा पाठपुरावा करायचं ठरवलं. बाबा तेव्हा सोमनाथला असायचे. शिवाय हेमलकशाचा नवा लोकबिरादरी प्रकल्प मार्गी लावण्यासाठी त्यांचं तिकडे जाणं-येणं सुरू असायचं. त्यामुळे आनंदवनात मी स्वतंत्रपणे काम करू लागलो होतो. त्या वेळी पहिल्यांदाच मी आनंदवनाचं भविष्य माझ्या नजरेने पाहत होतो. त्यामुळे भविष्यातल्या समस्याही समोर दिसू लागल्या होत्या.

बाबांचं काम बघतच आम्ही मोठे झालो होतो. त्यांच्या प्रत्येक कामामध्ये आमचा सहभाग असायचा. त्यामुळे बाबांनी पाण्यासाठी आजवर केलेले प्रयत्न माहिती होते. त्याबद्दल त्यांची मतं काय आहेत तेही माहिती होतं. त्यांनी त्यांचे मार्ग आजमावून झाले होते. पण आता त्यापुढे जाण्याची गरज आहे असं मला वाटत होतं. मी हातपाय हलवायला सुरुवात केली. तेव्हा आजच्यासारखं इंटरनेट वगैरे काही नव्हतं. वाचायचं ते फक्त पुस्तकांमधूनच. मग जगभरातलं वाचायला सुरुवात केली. देशात, देशाबाहेर पाणी साठवण्यासाठी कोणी काय प्रयोग केले आहेत त्याचा अभ्यास सुरू केला. शिवाय के. आर. दात्यांसारखे पाण्याच्या क्षेत्रात काम केलेले दिग्गज लोकही महाराष्ट्रात होते. त्यांच्याशीही संवाद साधायला सुरुवात केली.

पाणी हवं असेल तर पावसाचं पाणी साठवणं आणि जमिनीतलं पाणी वर ओढून काढणं एवढे दोनच पर्याय होते. ते दोन्हीही आजमावून बघायचं मी ठरवलं. आजवर आमच्या पाण्याचा मुख्य स्रोत होता विहिरी; पण ते पाणी आम्हाला कसंबसं पिण्यासाठी पुरत होतं. बाबा नेहमी म्हणायचे, 'आमच्या विहिरींमध्ये जेवढं पाणी आहे त्यापेक्षा जास्त पाणी आमच्या डोळ्यांमध्ये आहे.'

खरं तर आमच्या भागात पाऊस कमी नव्हता. पण अडचण अशी होती, की पावसाचं

पाणी साठवण्याचे पर्याय आमच्याकडे उपलब्ध नव्हते. शिवाय आनंदवनाची भूरचनाही तशी वैशिष्ट्यपूर्ण आहे. आनंदवनाची जमीन थोडीशी चढावर असल्यासारखी आहे आणि या जमिनीच्या दोन्ही बाजूंनी उतार आहे. त्या मुळे इथे पाणी साठून राहत नाही. शिवाय आमच्या जागेवर किंवा जवळपासही एखादी नदी-नाला नाही. त्यामुळे बांध घालून पाणी अडवण्याचीही सोय नाही. त्यामुळे मी पाणी साठवण्यासाठी तलाव खोदण्याचं ठरवलं. ही गोष्ट असेल १९७८-७९ची. त्या वेळी आनंदवनात कोणतंही मोठं मशिन असं नव्हतं. त्यामुळे श्रमशक्तीने तलाव खोदण्याला पर्याय नव्हता. पण बाबांना आणि त्यांच्या सहकाऱ्यांना मी काय करतोय याबाबत शंका वाटत होती. त्यांचंही चूक नव्हतं म्हणा. एक तर मी पडलो डॉक्टर. त्यामुळे पाणी व्यवस्थापनाच्या भानगडीत मी का पडतो आहे ते कुणाला कळत नव्हतं. शिवाय तलाव खणणं हे बरंच वेळखाऊ आणि कष्टाचं काम होतं. आमच्याकडे कामं भरपूर आणि पैसा कमी, अशी कायमच परिस्थिती असल्याने वांझोट्या कामांमध्ये वेळ वाया घालवायचा नाही, असं बाबांचं तत्त्व.

पण मी माझ्या निर्णयावर ठाम राहिलो. माझ्या सहकाऱ्यांना घेऊन मी तलाव खोदण्याचं काम सुरू केलं. पहाटे पाच वाजल्यापासून आम्ही कामाला सुरुवात करायचो. तिथेच नाश्ता, तिथेच जेवण. अखेर तलाव खोदून पूर्ण झाला. त्यानंतरच्या पावसाळ्यात जेव्हा तो पाण्याने तुडुंब भरला तेव्हा मात्र सर्वांना त्याचं महत्त्व कळून चुकलं. विहिरीपेक्षा किती तरी जास्त पाणी या तलावात साठलं होतं. या पाण्यावर पावसाळ्यानंतर एक पीक घेता आलं.

पावसावरचं अवलंबित्व संपणं ही आमच्या दृष्टीने मोठीच गोष्ट होती. पण आनंदवनातली जमीन एवढी प्रचंड होती की एका तलावाने कोणताही कायापालट होणं शक्य नव्हतं. त्यामुळे आम्ही एकामागून एक तलाव खोदू लागलो. त्या वेळी आम्हाला पाण्याशिवाय दुसरा ध्यासच नव्हता म्हणा ना. अर्थात फक्त श्रमदानातून खोदलेल्या तलावांनाही मर्यादा होती. माणसांनी खोदलेले तलाव असे कितीसे खोल असणार आणि त्यात कितीसं पाणी साठणार? पावसाळा संपल्यानंतरही पाणी वापरता यायला हवं असेल तर तलाव खोल केले पाहिजेत, नव्या विहिरी खणल्या पाहिजेत, बोअरवेल्स खणले पाहिजेत, हे मला जाणवत होतं. पण त्यासाठी फक्त श्रमशक्ती उपयोगाची नव्हती. आता गरज होती ती मशिनरीची!

यात दोन अडथळे होते. आनंदवन हा मुळात खडकाळ भाग. तिथल्या भूगर्भात फारसं पाणी नाही यावर बाबा आणि त्यांच्या जुन्या सहकाऱ्यांचा अगदी ठाम विश्वास होता. कारण अनेक भूगर्भतज्ज्ञांनीच तसा हवाला दिला होता. त्यामुळे त्याची चाचपणी करण्यासाठी पैसा खर्च करणं म्हणजे जणू पाप होतं. शिवाय मोठाल्या मशिन्सचा वापरही जुन्या मंडळींना अनाठायी वाटत होता. त्यांचा मशिन्सपेक्षा श्रमशक्तीवर जास्त विश्वास होता. आनंदवनातले सुरुवातीचे सगळे प्रकल्प बाबा आणि कुष्ठरुग्णांनी अक्षरशः स्वतःच्या हातांनी उभे केले होते. नव्या गोष्टींना बाबांची ना नव्हती, पण आनंदवनात श्रमशक्ती मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असताना काय करायची आहेत यंत्रं, असा त्यांचा सवाल होता. त्यामुळे माझ्या म्हणण्यामागे कोणी ज्येष्ठ कार्यकर्ता उभा राहील अशी शक्यता नव्हती.

बाबा बऱ्याचदा आनंदवनात नसायचे पण ताई असायची. आणि तिची माझ्यावर करडी नजरही असायची. कारण सरळ होतं. मी काही ना काही उटपटांग गोष्टी करायचो. आमच्याकडे प्रयोग करण्याला कुणाची ना नव्हती. बाबांनी जन्मभर तेच तर केलं होतं. पण माझे प्रयोग अंगाशी येणारे असायचे. उदाहरणार्थ, मी गाडीचा डायनॅमो उघडून बसायचो. तो पुन्हा लावता आला नाही की बोंबाबोंब व्हायची. कारण आनंदवनात तेव्हा तेवढीच एक गाडी असायची. ती बंद पडली की झाली पंचाईत! त्यामुळे माझ्या प्रयोगांवर सर्वजण लक्ष ठेवून असत आणि वेळप्रसंगी विरोधही करत.


पण प्रयोगांखेरीज प्रयत्नांना यश येणं शक्य नव्हतं. त्यामुळे मी प्रयोग करत राहिलो. पाण्याबद्दल विचार करत असताना आपले प्रयत्न जास्तीत जास्त फुलप्रूफ असावेत यासाठी मी स्वतःच आनंदवनाच्या भूगर्भाचा अभ्यास करायला सुरुवात केली. पाणी कुठे लागू शकेल याची चाचपणी करू लागलो. तज्ज्ञांची मदत घेतली. पुस्तकं, माणसं पालथी घातली. मग हळूहळू लक्षात येऊ लागलं की आनंदवनातली सगळी जमीन एकसारखी नाही. इथल्या जमिनीमध्ये तीन वेगवेगळे भूप्रकार आहेत. त्यातला एक अग्निजन्य खडक म्हणजे बेसॉल्ट आहे, दुसऱ्या भागामध्ये बेसॉल्टच्या दोन थरांमध्ये समुद्री अवशेष आहेत, तर तिसऱ्या भागात फक्त सँडस्टोन, म्हणजे वालुकाश्म दगड आहे. आनंदवनाच्या आयताकृती जमिनीवर एका बाजूला वस्ती आहे. तिथली जमीन ही अशी वालुकाश्म आहे. त्यात पाणी लागण्याची शक्यता जवळपास नव्हती. पण जेव्हा मी दुसऱ्या टोकाच्या जमिनीवरची माती गोळा करून त्याच्या सँपलची चाचणी करून घेतली, तेव्हा लक्षात आलं की इथल्या जमिनीत पाणी असण्याची शक्यता बरीच आहे. आजवर आनंदवनाची सगळी जमीन या दृष्टीने कोणी तपासलेली नव्हती. भूगर्भतज्ज्ञांनी मत दिलेलं होतं ते केवळ नकाशा बघून. त्यामुळे त्यांना या जमिनीतल्या विविधतेची माहिती असण्याचं कारण नव्हतं. पण मातीच्या सँपलची चाचणी केल्यामुळे ही माहिती कळली आणि तेवढ्या भरवशावर मी आनंदवनाच्या उत्तर दिशेच्या टोकाला पाण्याची चाचपणी करण्याचं ठरवलं.

खोदकाम करायचं तर बोअर मशिन हवं. तसल्या मशिन्सची किंमत तेव्हाही लाखांमध्येच होती. ते विकत काय, भाड्याने घेण्याची परवानगीही मला कुणी दिली नसती. त्यामुळे मशिन कोणाकडून तरी मिळवणं भाग होतं, आणि त्याचबरोबर मशिन चालवायला माणूसही. मी जोमाने मशिनसाठी प्रयत्न सुरू केले. दहा ठिकाणी प्रयत्न केले की एखाद्या ठिकाणी दरवाजे थोडे किलकिले व्हायचे, पण माझी मागणी ऐकली की ते लगेच बंदही व्हायचे. एका सामाजिक संस्थेला बोअर खोदण्याचं मशिन कशाला हवं, हे कुणालाच समजू शकत नव्हतं.

शेवटी १९८४ च्या आसपास सौराष्ट्रातून एक कॅलिक्स ड्रिलिंग मशिन मिळालं. कॅलिक्स ड्रिलिंग म्हणजे काय, तर जमिनीच्या आतल्या स्तरांची चाचपणी करण्यासाठी जे एक्स्प्लोरेटरी ड्रिल वापरतात ते. या मशिनने बोअरवेल खणत नाहीत. पण आमचा नाइलाज होता. म्हटलं, हे तर हे. वापरून तर बघू. मशिन मिळाल्यावर ते चालवणारा माणूस मिळतो का याची शोधाशोध सुरू केली. तो न मिळाल्याने वर्षभर मशिन तसंच

पडून राहिलं. शेवटी वरोरा गावातल्या शंकर बंडेवारांनी त्यांचा एक नातलग आणला. अशोक बोलगुंडेवार. अशोक तिशीचा होता. त्याचं किराणा दुकान होतं. पण त्याने पूर्वी ड्रिलिंग मशिनवर काम केलेलं होतं. मशिन चालवण्याची माहिती त्याला होती आणि काम शिकण्याची तयारीही. मुख्य म्हणजे कुष्ठरोग्यांसोबत कसं काय काम करायचं, असा प्रश्न त्याला पडला नाही. जसा टीबी असतो तसा कुष्ठरोग, असं म्हणून त्याने इथली माणसं स्वीकारली. पहिल्याच भेटीत तो आनंदवनात काम करण्यास तयार झाला आणि आल्या दिवसापासून माझ्या स्वप्नांमध्ये सामील झाला.

डॉक्टर असूनही मी भलत्याच गोष्टींमध्ये रस घेत फिरतो, अशी माझी आनंदवनात ख्याती होती. माझ्याबरोबर माझ्या सहकाऱ्यांचीही चेष्टा व्हायची. त्यात अशोकच्या रूपाने आणखी एकाची भर पडली. कुणी आम्हाला वेडे म्हणो किंवा आणखी काही, अशोक नसता तर आनंदवनात आज पाण्याची जी क्रांती झाली आहे ती झालीच नसती. माझी सगळी वेडी स्वप्नं अशोकने आणि त्याच्या टीमने प्रत्यक्षात आणली. त्यांच्या कामात माझा सहभाग फक्त एक टक्का!





कॅलिक्स ड्रिलिंगने बोअर खोदणं म्हणजे बिरबलाच्या खिचडीसारखं काम होतं. अशोक बोलगुंडेवार यांनी ते चिकाटीने यशस्वी करून दाखवलं.

मशिन आणि माणूस दोन्ही मिळाल्यावर आम्ही झपाट्याने कामाला सुरुवात केली. आनंदवनाच्या दुसऱ्या टोकाला 'मुक्तिसदन'च्या जवळ आम्ही पहिली बोअर खणू लागलो. इथे पाणी लागण्याची शक्यता आहे असं मला वाटत होतं. अर्थात त्यासाठी बरीच चिकाटी लागणार होती. कारण बोअर मशिनने बोअर खणायला पाच-सहा तास पुरत असले तरी कॅलिक्स ड्रिलिंगने बोअर खणणं म्हणजे बिरबलाच्या खिचडीसारखंच होतं! सुरुवातीला चार इंच, मग आठ इंच, असं करत करत हे ड्रिलिंग करावं लागायचं. त्याला कदाचित दोन-तीन महिनेही लागले असते. पण आम्ही काम सुरू केलं आणि काही दिवसांनी एक घटना घडली. ड्रिलिंगचं काम चालू असताना एके दिवशी मशिन आतच ठेवून आम्ही जेवायला गेलो, आणि जेवून परत आलो तो मोटार पाण्यात बुडालेली दिसली. सगळ्यांना वाटलं, कुठून तरी वरच्या बाजूने वाहून आलेलं पाणी असणार हे. आमच्या प्रयत्नांबद्दल साशंक असणाऱ्यांनी चेष्टाही केली; पण आम्ही काम सुरू ठेवलं. 'नौ दिन चले अढाई कोस'

म्हणतात, तसं गोगलगाईच्या वेगाने काम सुरू होतं. अखेरीस पाणी लागलं, पण त्यात तीन महिने गेलेच.

बोअर खणायला डिझेल लागायचं. तीन-तीन महिने मशिन चालवायचं म्हणजे त्यासाठी डिझेल किती लागत असेल विचार करा. त्यामुळे माझे हे प्रयत्न म्हणजे पैसे वाया घालवण्याचे धंदे आहेत, असं इतरांना वाटणं साहजिक होतं. त्या वेळी आमच्या दृष्टीने एकेक पैसा मोलाचा होता. पण या खर्चाचा भविष्यात आनंदवनाला उपयोग होईल, हे मला कळत होतं. किंबहुना, हे काम केलं नाही तर आपण तग धरू शकणार नाही याची जाणीव मला झाली होती. शिवाय आजचा विरोध उद्या मावळेल याची खात्री मनात कुठे तरी वाटत होती. त्यामुळे विरोधाने खचून न जाता मी काम करत राहिलो. 'यू हॅव टु इंच फॉरवर्ड' असं म्हणतात. आम्हीही अक्षरशः इंच इंच लढवत या बोअरवेल्स खणल्या.

तेव्हा वसंत साठे केंद्रीय खाणमंत्री होते. ते आमच्या विदर्भातले. त्यांनी आमच्या भगीरथ प्रयत्नांना मदत करावी यासाठी माझा त्यांच्याशी बराच पत्रव्यवहार चालू होता. अखेरीस त्यांनी 'मिनरल एक्स्प्लोरेशन कॉर्पोरेशन ऑफ इंडिया'कडून एक जुनं कोअर ड्रिलिंग मशिन आम्हाला अगदी कमी किमतीत मिळवून दिलं. हे मशिन आम्ही कशासाठी मागतोय हे कळल्यावर तिथल्या अधिकाऱ्यांनी आम्हाला वेड्यातच काढलं. ते म्हणाले, "या मशिनने बोअर खणता येत नसतं. कुठे वेड्यासारखे प्रयत्न करता?" पण आम्ही त्यांच्याकडे दुर्लक्ष केलं. त्यांना म्हणालो, "तुम्ही द्या तर खरं. आम्ही बघतो मशिनचं काय करायचं ते." त्यांचं म्हणणं खरं होतं. हेसुद्धा बोअरचं मशिन नव्हतंच; पण आम्हाला जे मिळेल ते मशिन चालवून बघण्याशिवाय पर्याय नव्हता. आणि आमची माणसंही अशी तरबेज की काय बोलावं! अशोकने या मशिनने आठ इंच व्यासाची बोअर खणली. पुढे तेच अधिकारी एकदा आनंदवनात आले. त्यांना आम्ही ही बोअर दाखवली, तर ते चाटच पडले. त्यांनी खुल्या मनाने अशोकची पाठ थोपटली. त्यानंतरच्या तीन-चार वर्षांमध्ये या दोन मशिन्सच्या मदतीने अशोक आणि त्याच्या टीमने चौदा ट्यूबवेल्स खोदल्या, नऊ हँडपंप्स तयार केले.

खरं तर एका किलोमीटरच्या परिसरात एकच बोअरवेल काढावी, जेणेकरून जमिनीखालच्या एकाच स्रोताचा मोठ्या प्रमाणावर उपसा होऊ नये, असा संकेत आहे. आम्ही मात्र आनंदवनात अनेक बोअरवेल्स खोदल्या; पण तसं करण्याआधी मी बोअरवेल डेव्हलपमेंटचं शास्त्र शिकलो. बोअर कुठे घ्यायची, कुठे खोल करायची, कोणत्या भागात खाली कोळसा आहे, कुठे जमिनीखालून वाहणारा प्रवाह आहे याचा अभ्यास करत गेलो. त्यामुळे आनंदवनाचा जमिनीवरचा नकाशा जसा आम्हाला तोंडपाठ आहे तसाच जमिनीखालचाही. अर्थात यात काही विशेष आहे असं नाही. तुम्ही एकदा एखाद्या विषयात डोकं घातलंत की मग तो विषय हळूहळू तुमच्यासमोर त्यातल्या सगळ्या खाचाखोचा उलगडून दाखवतोच. आमचंही तसंच झालं.

त्या काळात अशोक, मी आणि आमची टीम अक्षरशः रानातच ठाण मांडून असायचो. तिथेच काम, तिथेच चर्चा, तिथेच जेवण आणि तिथेच झोप. काम अफाट होतं.

बोअरला लागलेलं पाणी वाया जाऊ नये यासाठी काय करावं लागतं, इथपासून ते पाणी रीचार्ज करण्यासाठी काय करावं लागतं, इथपर्यंत सर्व शिकत गेलो. कोणीही कामाचा माणूस भेटला की मी त्याला लगेच पकडायचो आणि माझे प्रश्न विचारायचो. असं केलं तर काय होईल, तसं केलं तर काय होईल याची चर्चा करायचो. त्यातून चुका करत करत आम्ही बऱ्याच गोष्टी शिकलो.

... तर अशा प्रकारे आम्हाला आनंदवनाच्या एका भागात का होईना, पाणी आहे याचा शोध लागला. केवढा दिलासा देणारा शोध होता हा! मग हे पाणी ओढून वर काढण्यासाठी विहिरी आणि बोअरवेल्स खोदण्याचं काम सुरू झालं. पण तेवढं करून भागणार नव्हतं. हे पाणी आनंदवनातल्या वस्तीपर्यंत आणायचं होतं आणि शेतीला पुरवायचं होतं. त्यामुळे पाणी वर काढण्यासाठी पंप्स हवे होते. पाइपलाइन्स टाकण्याचं आव्हान अजून पुढेच होतं. या सगळ्या कामांसाठी पैसे लागणार होते. बाबांकडे आधीच पैशांची चणचण; त्यामुळे त्यांच्याकडे पैसे मागण्यात अर्थ नव्हता. मग मीच वेगवेगळ्या ठिकाणी पत्रव्यवहार करायला सुरुवात केली. पाइपलाइन्ससाठी प्रस्ताव तयार करायचा, सरकारी किंवा आणखी कोणत्या तरी संस्थेला तो पाठवायचा, देणगीदारांना या योजनेचं महत्त्व समजावून सांगायचं, वगैरे वगैरे. थोडक्यात, आणखी एक नवं काम मागे लावून घेतलं होतं मी. शंभरजणांना पत्रं पाठवली की कुठे तरी एकाचा होकार यायचा, असे ते दिवस होते.

पण पाणी लागल्यामुळे आमची हिंमत वाढली होती. अशोक आणि मी नव्या योजनांच्या मागे लागलो. नव्या विहिरी आणि बोअरवेल्स खणण्याबरोबरच जुन्या विहिरींमधला गाळ उपसणं, त्या विहिरी खोल करणं, पूर्वीचे तलाव खोल करणं हा कामाचा पुढचा टप्पा होता. त्यासाठी आणखी वेगळी मशिन्स लागणार होती. या वेळी आम्ही पहिल्यांदाच ज्या कामासाठी जे मशिन लागणार होतं ते मागवलं. मथुरा क्रेन! तेव्हा लातूरमधली ही क्रेन खूपच प्रसिद्ध होती. खास विहिरीतला गाळ काढण्यासाठीची क्रेन. आमच्याकडे तेव्हा एकूण बारा विहिरी होत्या. त्यातल्या काही विहिरी गाळामुळे जवळपास बुजून गेल्या होत्या. पण 'मथुरा' आमच्या हाती आल्यानंतर या विहिरींमधला गाळ काढण्याचं काम अशोकने हातात घेतलं.

मग एके दिवशी अशोक म्हणाला, "या क्रेनच्या मदतीने आपण नवी विहीरही खोदून बघू या." मी काय, तयारच होतो. विहिरीसाठी करावं लागणारं ब्लास्टिंगही आम्ही इथे केलं. कोणत्याही तज्ज्ञांच्या मदतीशिवाय! त्यामुळे आम्हाला मोठ्यांची बोलणी खावी लागायची. पण तेव्हा अशोक, मी आणि आमचे सगळेच कार्यकर्ते झपाटलेल्या अवस्थेत होतो. पाण्याशिवाय दुसरं काही सुचतच नव्हतं. पाणी नसेल तर आनंदवनात दुसरं कोणतंही काम उभं करण्याला अर्थ नव्हता. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत पाणी साठवलं पाहिजे, एवढंच आम्हाला समजत होतं.

या झपाटलेपणाला काही प्रमाणात माझा 'अहंकार'ही कारणीभूत होता. 'पाणी नाही म्हणजे काय? पाणी हवंच! विज्ञान-तंत्रज्ञानाची मदत घेऊन आपण पाण्याचा प्रश्न

सोडवू शकत नसू तर मग या विज्ञानाला काय अर्थ आहे?' असं मला वाटायचं. मला याचाही विश्‍वास होता की तंत्रज्ञानाच्या मदतीने मी हे करू शकतो. पण मला कौतुक वाटतं ते माझ्या कार्यकर्त्यांचं. त्यातल्या कित्येकांचं साधं प्राथमिक शिक्षणही झालेलं नव्हतं, नवे प्रयोग, नवं संशोधन म्हणजे काय ते त्यांना माहिती नव्हतं. पण नवं काही करून बघायला ते कायम तयार असायचे. एवढंच काय, आपल्याला एखाद्या गोष्टीची गरज आहे म्हटल्यावर ती मिळवण्यासाठी नाना खटपटी-लटपटी करण्यात ही मंडळी माझ्या एक पाऊल पुढे असत. ही अशी माणसं बरोबर होती म्हणूनच ही काम होऊ शकली, हे काय सांगायला हवं?

या सगळ्या कामांवर कडी झाली ती तलाव खोदायला एक्सकॅव्हेटर आणला तेव्हा. बाबा तेव्हा नर्मदा बचाव आंदोलनात उतरले होते. कसरावदला त्यांचा मुक्काम होता. ताईही त्यांच्याबरोबर होती. तरीही त्या दोघांचं आनंदवनातल्या कामांकडे बारीक लक्ष असायचं. विहिरी आणि बोअरवेल्स खोदण्याच्या आमच्या कामाबाबतही बाबा साशंक होते. पण बाबांनी केलेलं काम स्वतःच्या खांद्यावर पेलायचं तर त्यांच्याप्रमाणेच काळाची गरज ओळखून काम करणं भाग होतं. आणि तेव्हाची गरज होती माणूस आणि यंत्रांचा समतोल साधून काम करण्याची. त्यावर ठाम विश्‍वास असल्यानेच मी तलावांच्या खोलीकरणासाठी एक्सकॅव्हेटर मिळवण्याचा निर्णय घेतला. एक्सकॅव्हेटरची गरज फक्त आनंदवनाला नव्हती. सोमनाथमध्येही काही तलाव खोल करावे लागणार होते, काही नव्याने खोदावे लागणार होते. काही ठिकाणी बांध घालून पाणी अडवणं गरजेचं होतं.

'वेस्टर्न कोलफील्ड लिमिटेड' या सरकारी कंपनीकडून आम्ही हा एक्सकॅव्हेटर पैदा केला. तो आल्यावर कामाचा झपाटा चांगलाच वाढला. सुरुवातीला आम्ही 'आनंदसागर तलावा'ला हात घातला. हा तलाव श्रमदानानेच खणलेला होता. त्याचा पसारा बराच मोठा होता, पण माणसांनी खणल्यामुळे खोली फारशी नव्हती. खोली वाढवली की त्यात जास्त पाणी साठलं असतं, शिवाय त्यात माशांची पैदास करता आली असती. आनंदवनातल्या रहिवाशांना त्यातून उत्पन्नाचं आणखी एक साधन मिळालं असतं. त्यामुळे आम्ही नेटाने काम करू लागलो. हे खोदकाम सुरू असताना अनेकदा थोडा वेळ विश्रांतीसाठी थांबून आम्ही सारे गप्पागोष्टी करायचो आणि सोबतीला मुरमुऱ्यांचा चिवडा वगैरे खायचो. थोडी हुशारी आली की पुन्हा कामाला लागायचो. त्यावरही खूप टीका व्हायची. हे लोक काम कमी करतात आणि चिवडा जास्त खातात, असं आनंदवनातले बुजुर्ग कार्यकर्ते म्हणायचे. मजा म्हणजे नंतर या तलावाला 'चिवडा बोडी' असंच नाव पडलं.



चिवडा खात खात खोल केलेला
तलाव-चिवडा बोडी.

एक्सकॅव्हेटर चालवायचा म्हणजे डिझेल भरपूर खर्च व्हायचं. मला आठवतं, तेव्हा नर्मदा किनारी मुक्काम असलेल्या बाबांना आनंदवनातले लोक सांगायचे, “बाबा, इथे पाणी मिळणं तर लांबच. पाण्यापेक्षा डिझेल मात्र जास्त वाया चाललंय.” ही तक्रारवजा चेष्टा कोणी मुद्दाम करायचं असं नाही, पण तेव्हा ही कामं त्यांना अशक्य कोटीतलीच वाटायची. एकदा अशोक बाबांना भेटायला कसरावदला गेला, तर ते त्याला म्हणाले, “तू आणि विकास मिळून वीस लाखांचं डिझेल प्यायला म्हणे!” त्यावर अशोक काय बोलणार? पण मी मात्र जमेल तसा त्यांना या कामाचं महत्त्व पटवून देत राहायचो.

सुरुवातीला नागपूरहून आलेला एक ऑपरेटर एक्सकॅव्हेटरवर काम करत होता, पण हे मशिन शिकून घेण्यासाठी मी सतत अशोकच्या मागे लागलेलो असायचो. त्याचीही तशी इच्छा होतीच. त्याच्याकडे तेव्हा स्टोन क्रशर मशिनचं काम होतं. तरीही तो एक्सकॅव्हेटरवर लक्ष ठेवून असायचा. ऑपरेटरसोबत एखाद्या हेल्परप्रमाणे मशिन पुसणं, ऑइल घालणं अशी पडेल ती कामं तो करायचा. ऑपरेटर मशिन कसं चालवतो त्याचं बारकाईने निरीक्षण करत राहायचा. एकदा हा ऑपरेटर होळीसाठी गावी गेला. तेवढ्या एका दिवसात अशोकने एक्सकॅव्हेटरचा ताबा घेतला आणि दिवसभरात हे एवढं काम करून ठेवलं! दुसऱ्या दिवशी तो ऑपरेटर येऊन पाहतो तो चकित. तो अशोकला म्हणाला, “आता तुम्हाला माझी गरज नाही.” आणि खरोखरच दुसऱ्या दिवसापासून अशोकने त्या मशिनचा ताबा घेतला.

हे मशिन आमचं नव्हतं. ते फक्त चालवायला आणलेलं होतं. पण, स्वतःचं मशिन असेल तर आम्हाला वेळेचा प्रश्न उरणार नव्हता. शिवाय हे मशिन सोमनाथलाही नेता येऊ शकलं असतं. पण एक्सकॅव्हेटर मशिन विकत घेणं ही पैशांच्या दृष्टीने आमच्या आवाक्याबाहेरची गोष्ट होती. त्यामुळे मी देणगीदारांशी बोलायला सुरुवात केली. पण सामाजिक संस्थेला एक्सकॅव्हेटरची देणगी देणं ही कुणालाच पचणारी गोष्ट नव्हती. ती मिळवण्यासाठी आम्ही किती धडपड केली ते आमचं आम्हाला माहिती!

त्या वेळी ‘टेल्को’ने जपानच्या ‘हिताची’ कंपनीसोबत नवा एक्सकॅव्हेटर लाँच केला होता. त्याच वेळी ‘टाटा ट्रस्ट’मधले एक बडे अधिकारी रुसी लाला यांच्यासोबत माझी देणगीसंदर्भात मीटिंग होती. त्यांनी आनंदवनाबद्दलची सगळी माहिती ऐकून घेतली आणि

ते मला म्हणाले, “पोरा, तुला काय हवंय सांग.” मी म्हटलं, “मला तुमचा नवीन एक्सकॅव्हेटर हवा आहे.” ही मागणी ऐकून लाला गारदच झाले. आनंदवनाला एक्सकॅव्हेटर कशाला पाहिजे याचा त्यांना उलगडा होईना. ते म्हणाले, “तुला याचा काय उपयोग?” मी म्हटलं, “हा एक्सकॅव्हेटर स्वयंपाक सोडून सगळं काही करू शकतो!” मग मी त्यांना आनंदवन म्हणजे एक नांदतं गाव आहे, तिथे शेती आहे, पाण्याचे प्रश्न आहेत, वगैरे समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. माणूस भला होता. त्याने नियम वाकवून आम्हाला टाटा-हिताचीचा एक छोटा एक्सकॅव्हेटर दिला. काय आनंद झाला तेव्हा आम्हाला!

हे मशिन आनंदवनात येणं हा एक मैलाचा दगड ठरला. तेव्हापासून चित्र बदलायला सुरुवात झाली. त्यापूर्वी आनंदवनात सहा-सात तलाव होते. ते आम्ही एकेक करून खोल करत गेलो. नवे खोल तलाव खणले. त्या खोलीमुळे पाण्याच्या साठवणुकीत इतकी वाढ झाली, की आनंदवनात पडणाऱ्या पावसाच्या पाण्यापैकी सत्तर टक्के पाणी अडवण्यात आम्हाला यश आलं. या तलावांमुळे वॉटर रीचार्जची सोय झाली. वॉटर रीचार्ज कशासाठी? कारण आम्ही बोअरवेल्समधून चिक्कार पाणी बाहेर काढून वापरत होतो. त्यामुळे साध्या नियमाने तुम्ही जेवढं पाणी वापराल तेवढं आत टाकलंत तरच जमिनीखालची पाण्याची पातळी कायम राहते. नाही तर आता पाणी मिळतं, नंतर खडखडाट होतो. ही वॉटर मॅनेजमेंट सिस्टीम आहे. ती पाळली तर पाण्याचं चक्र सुरळीत चालू राहतं. आनंदवनात आम्ही हे चक्र व्यवस्थित सांभाळलं आहे. तलावांमध्ये पावसाचं पाणी साठतं, ते पाणी आसपासच्या जमिनीत मुरतं आणि तेच पाणी पुन्हा आम्हाला बोअरवेल्स आणि विहिरींमधून बाहेर काढता येतं. हे चक्र आता गेली तीसेक वर्षं अव्याहत चालू आहे.

अगदी पहिल्या दिवसापासूनच आनंदवनात शेतीची सुरुवात झालेली होती, हे मी तुम्हाला सांगितलं आहेच. पण प्रयत्नांनी मुबलक पाणी मिळू लागल्यावर आम्ही आनंदवनात नांगरून झालेल्या जमिनींवर पावसाळ्यानंतरही पिकं घ्यायला सुरुवात केली. आजवर पडीक असलेली जमीनही नांगरटीखाली आणायला सुरुवात केली. त्यातून बाबांचं आत्मनिर्भरतेचं स्वप्न पूर्ण व्हायला मदतच झाली.

‘शेती हे निर्मितीचं सगळ्यात सुंदर रूप आहे’, असं बाबा म्हणायचे. आपलं अन्न आपण तयार करणं यासारखी दुसरी आनंदाची गोष्ट नाही. विशेषतः ज्या कुष्ठरुग्णांना समाजाने अव्हेरलं त्यांनी कुणाच्याही मदतीची अपेक्षा न करता स्वतः शेती पिकवणं म्हणजे काय होतं हे त्या वेळेच्या रुग्णांना भेटलं की समजायचं. एका ओसाड माळरानाचं रूपांतर आपण वाऱ्यावर डोलणाऱ्या हिरव्यागार शेतांमध्ये केलं आहे आणि स्वतः पिकवलेलं अन्न खाऊन आपण समाधानाने जगतो आहोत, या भावनेने कुष्ठरुग्णांना जगण्याची उमेद दिली होती, आव्हानं पेलण्याची शक्ती दिली होती. बाबा म्हणायचे, ‘वेदनेचा पहाड कोरता कोरता या कुष्ठरुग्णांना आढळून आले की आपण सुखाचे कैवल्यलेणे कोरीत होतो.’

या संदर्भात अगदी सुरुवातीच्या काळातली एक घटना मला आठवते. तेव्हा


ऑस्ट्रेलियातल्या 'फुड फॉर पीस' या संघटनेचं बाबांना एक पत्र आलं. या संघटनेने आनंदवनासाठी गहू पाठवण्याची तयारी दाखवली होती; पण उत्तरादाखल बाबांनी लिहिलं, 'तुमचा गहू जितके दिवस पुरेल तितकेच दिवस आनंदवनात शांतता टिकेल. गहू संपला की शांतताही संपुष्टात येईल. त्यामुळे कृपा करून गहू पाठवण्याऐवजी गव्हाचं अमाप पीक काढण्याचं विज्ञान आणि तंत्र आम्हाला शिकवा. त्यातून चिरशांती निर्माण होईल.' कुणाकडून काही मदत घेताना बाबांनी नेहमी हा दृष्टिकोन ठेवला. कारण त्यांचा सर्व भर आत्मनिर्भरतेवर होता. शेती हे बाबांच्या दृष्टीने स्वयंपूर्णतेचं अन् आत्मसन्मानाचं प्रतीक होतं. शेती हे त्यांचं अध्यात्मच होतं जणू.

आनंदवनातल्या कुष्ठरुग्णांमधली बरीचशी माणसं शेतकरीच होती. त्यामुळे शेती कोणाला शिकवावी लागली नाही. सुरुवातीच्या काळात गहू आणि ज्वारी एवढीच पिकं आनंदवनात निघायची. पण जसजशी जमीन नांगरटीखाली येत गेली तसतशी नवनवी पीकं घेतली जाऊ लागली. ज्वारीबरोबर तांदूळ, बाजरी, मका, कापूस घेतला जाऊ लागला. जवळपास सगळी कडधान्यं पिकू लागली. सोयाबीन, भुईमुग, सूर्यफूल, तीळ, जवस, करडई, मोहरी अशा तेलबियांचं उत्पन्न निघू लागलं. तेव्हा आनंदवनासाठी लागणारं सगळं तेल आम्हाला या बियांमधूनच मिळायचं. तेव्हा आनंदवनात तेलाची घाणीही होती. त्या काळात केवळ क्वांटिटीकडे नव्हे तर क्वालिटीकडेही बाबांचं लक्ष होतं. आमच्या शेतात पिकलेला कोबी, मुळा, भोपळा या भाज्या रसरशीत आणि अक्षरशः अवाढव्य असायच्या. एकदा तुकडोजी महाराज आनंदवनात आले होते, तेव्हा बाबा त्यांना म्हणाले, "तुमच्या मांडीपेक्षा आमचा मुळा जाड आहे!' सर्वोत्तमतेचं जणू वेडच होतं त्यांना. शेतीतलं हे असं भरघोस उत्पादन हे त्यांच्यादृष्टीने पुरुषार्थाचं, पराक्रमाचं प्रतीक होतं. आणि हा दर्जा केवळ स्वयंघोषित नव्हता. त्याकाळी आमच्या कुष्ठरुग्ण शेतकऱ्यांसोबत बाबा सरकारच्या कृषी प्रदर्शनांमध्ये भाजीपाला-धान्य-जनावरं असं सगळं पाठवायचे. मला आठवतं, तेव्हा या प्रदर्शनांमध्ये पहिले तिन्ही क्रमांक आनंदवनाच्याच उत्पादनांचेच असायचे. त्यामुळे नंतर बाबांनी स्पर्धेत भाग न घेता केवळ प्रदर्शनांसाठी माल पाठवायला सुरुवात केली.

भाजीपाला आणि फळझाडंही आधीपासूनच होती, पण पाणी वाढल्यावर त्यांचं प्रमाण वाढलं. आलं, हळद, लसूण वगैरे नगदी पिकंही आम्ही घेऊ लागलो. त्याबरोबर फळभाज्यांचंही उत्पन्न वाढलं. आता आनंदवनात कांदा, वांगी, कोबी, भेंडी अशा अनेक प्रकारच्या फळभाज्या आणि जवळपास सगळ्या पालेभाज्या होतात. जवळपास तीस एकर जमिनीवर तीन हजार फळझाडांची लागवड आहे. त्यातही किती प्रकार! संत्री, मोसंबी, चिकू, फणस, पेरू, बोरं आणि आंबाही आहे. अक्षरशः नाव घ्याल ते फळ!

त्याचबरोबर पाण्यामुळे ऊस, केळी अशी नगदी पिकंही घेता येऊ लागली. खरं तर आनंदवनाच्या परिसरात केळी होत नाहीत. पण आमचा पंडितराव नावाचा एक कुष्ठरुग्ण जळगावचा केळीवाला शेतकरी होता. पाणी मुबलक झाल्यावर तो म्हणाला, "आपण केळी लावून बघू. मग काय, केळयांचीही लागवड सुरू झाली. अशी त्या भागात न पिकणारी पिकंही आमच्या लोकांनी उत्साहाने लावली आणि स्वतःच्या मेहनतीने हे प्रयोग यशस्वी

करून दाखवले.



शेतीची जबाबदारी सांभाळणारे नारायण हक्के. साधनाताई त्यांना आनंदवनाचे ‘कृषिमंत्री’ म्हणायच्या.

हे प्रयोग करण्यात आमचा नारायण आघाडीवर. इतर सारे त्याला ‘नारायणराव’ म्हणत असले तरी माझ्यासाठी तो नारायणच आहे. सोमनाथचा प्रकल्प उभा करण्यासाठी बाबा आनंदवनाबाहेर पडले, त्याआधीपासूनच नारायणने शेतीत लक्ष घालायला सुरुवात केली होती. त्याला सुरुवातीपासून शेतीत रस होता. १९६४ पासून पुढे दहा एक वर्षं त्याने आनंदवनातली शेती एकहाती सांभाळली. ताई त्याला ‘आनंदवनाचा कृषिमंत्री’च म्हणायची. माझं पाण्याचं काम आणि त्याचं शेतीविकासाचं काम हातात हात घालूनच सुरू होतं. पाणी आलं तसं जास्तीत जास्त जमीन नांगरून ओलिताखाली आणण्याचा सपाटा आम्ही लावला. त्यामुळे शेतीचा आवाका प्रचंड वाढला. दोनशे एकर हा आकडा ऐकून तुम्हाला कदाचित शेतीचा पसारा कळणार नाही, पण आनंदवनात आलात की तुमच्या लक्षात येईल की आपली नजर जाते तिथपर्यंत शेतीच शेती आहे.

हा सगळा व्याप नारायण सांभाळतो. त्यासाठी त्याने उभी केलेली यंत्रणा बघण्याजोगी आहे. सोईच्या दृष्टीने त्याने या प्रचंड शेतीचे आठ भाग पाडलेले आहेत. प्रत्येक विभागावर एक मॅनेजर असतो. हा मॅनेजर म्हणजे बऱ्या झालेल्या कुष्ठरुग्णांपैकीच एक. प्रत्येक विभागातल्या मॅनेजरच्या क्षमतेनुसार त्याच्याकडे किती आणि कोणती शेती सोपवायची ते ठरतं. बियाणं किती लागेल, माणसं किती लागतील, बाहेरची माणसं मजुरीसाठी बोलावावी लागतील का, अवजारं आणि बैलजोड्या किती लागतील, अशा सगळ्या कामांचा अंदाज घेऊन आखणी केली जाते. मॅनेजर आणि त्याच्या हाताखाली काम करणारी माणसं यांची नारायणशी घट्ट नाळ जोडलेली असते. प्रत्येक विभागातली माणसं त्यांच्या त्यांच्या वर्षभराच्या कामाचं प्लॅनिंग करतात आणि मग एकत्रच बियाणांची वगैरे खरेदी होते. नारायण नेहमीच कुठे कोणतं बियाणं चांगलं मिळेल याच्या शोधात असतो. उसासाठी तो वर्धा जिल्ह्यातल्या सिंदी गावात जाऊन ऊस निवडून येईल, तर धानाच्या बियाणासाठी आणखी कोणत्या वेगळ्या गावात जाईल... मुख्य म्हणजे ही सगळी दुतर्फा प्रक्रिया आहे. शेतीत काय करावं नि काय नाही हे जसं नारायण आणि आम्ही शेतकऱ्यांना सांगतो, तसंच त्यांच्याकडूनही अनेक सूचना येतात. त्यांचा विचार करून त्याही अमलात आणल्या जातात.

शेतीला काटेकोर नियोजन लागतं आणि ते पाळावंही लागतं. तसंच शेतीत ऐन वेळी उद्भवणारे प्रश्नही बरेच असतात. आमची माणसं त्यावर आपापल्या परीने डोकं लढवतात आणि मार्ग काढतात. ही माणसं शेतीत इतकी तयार झाली आहेत, की बाहेरच्या

अनेक गावांमधून खास शेती पाहण्यासाठी माणसं येतात आणि या कुष्ठरुग्णांकडून मार्गदर्शन घेऊन जातात. आज आनंदवनाचं हे जे हिरवगार रूप दिसतं आहे ते गेल्या साठ वर्षांमध्ये शेतीत राबलेल्या अशा हजारो कुष्ठमुक्तांमुळेच!



पालेभाज्या आणि फळभाज्यांची लागवड करण्यासाठी उभारलेलं 'आनंदवन मेड' पॉलीहाऊस.

आनंदवनात शेतीची सुरुवात झाली तेव्हापासूनच आमची शेती आधुनिक आहे, असं म्हणता येईल. चांगल्या अर्थाने आधुनिक. रासायनिक खतांचा वापर कमीत कमी व्हायला हवा, असा बाबांचा आग्रह असायचा. आजही आम्ही ते तत्त्व पाळतो. जमिनीचा कस चांगला राहण्यासाठी पीकबदल केला जातो आणि आंतरपिकं घेतली जातात. पश्चिम महाराष्ट्रात आपल्याला जागोजागी पॉलीहाऊसेस दिसतात. आमच्याकडे विदर्भात हा प्रकार जवळपास नाहीच. पण आपल्या शेतीलाही पॉलीहाऊसचे फायदे मिळायला हवेत अशी माझी इच्छा होती. अर्थात इथे परदेशी फुलांचं उत्पादन घेऊन उपयोग नव्हता, कारण त्याला इथे मार्केटच नाही. पण फळभाज्यांची रोपं, विशेषतः पालेभाज्या तयार करण्यासाठी या पॉलीहाऊसचा उपयोग होऊ शकतो, असं मला वाटत होतं. मग नारायणला सोबतीला घेऊन मी 'आनंदवन मेड' पॉलीहाऊस उभं केलं. हे पॉलीहाऊस नेहमीसारखंच आहे, पण ते उभं करण्यासाठी लागणाऱ्या जवळपास सगळ्या वस्तू इथे आनंदवनातच तयार झाल्या आहेत. बाहेरच्या वातावरणात रोपं तयार व्हायला महिना लागत असेल, तर पॉलीहाऊसमध्ये पंधरा दिवसांत रोपं तयार झाली. असे अनेक प्रयोग आम्ही शेतात केले. अजूनही करतो आहोत.



कुष्ठरुग्णांच्या अपंग हातांनी
आनंदवनात भरघोस शेती पिकवली.

अर्थात हे यश काही पहिल्याच दिवशी मिळालेलं नाही. आनंदवनातल्या इतर प्रत्येक विभागाप्रमाणे इथेही हजारो कुष्ठरुग्ण अन् इतर कार्यकर्त्यांचा घाम सांडला आहे. बाहेरच्या अनेक कृषितज्ज्ञांनीही त्यात आम्हाला मदत केली आहे. विशेषतः माझ्या मावशीचे यजमान डॉ. मनमोहन सदाफळ यांच्यासारख्या तज्ज्ञांशी माझी, नारायणची सतत चर्चा होत असे. शिवाय कुठल्या मासिकात, पुस्तकात शेतीविषयक एखादा चांगला लेख वाचला की तो नारायणकडे वाचायला पाठवायचा हे माझं ठरलेलं असे. अनेकदा नारायणला कुठून तरी शेतीतल्या वेगळ्या प्रयोगांची माहिती मिळे. मग तो एक दोन उत्साही कार्यकर्त्यांना घेऊन तिथे जाऊन येई, नव्या गोष्टी समजून घेई. आपल्या परिस्थितीनुसार त्यात बदल करून आनंदवनात प्रयोग होत. कधी आमच्या शेतकी कॉलेजमधल्या प्राध्यापकांचं मार्गदर्शन मिळे. प्रत्येक टप्प्यावर नव्या सुधारणा करत आमची शेती प्रगत होत गेली आहे.


तसं तर शेतीबद्दल सांगण्यासारखं खूप आहे, पण एक-दोनच उदाहरणं सांगतो. पूर्वी आमच्याकडे बियाणे महामंडळाकडून बियाणं विकत घ्यायलाही पैसे नसायचे. पण नंतर आम्ही इतकं दर्जेदार आणि शुद्ध बीज तयार करू लागलो की बियाणं महामंडळच आमच्याकडून ते बियाणं विकत घेऊ लागलं. दुसरं उदाहरण म्हणजे पूर्वी कुष्ठरोगाच्या भीतीपोटी आनंदवनातला माल विकला जात नसे. पण आता आनंदवनाचा माल जास्त किंमत मोजून विकत घ्यायला लोक तयार असतात. पंचक्रोशीतलेच नव्हे तर महाराष्ट्रभरातल्या शेतकऱ्यांचे गट शेती आणि पाणी व्यवस्थापनाचं तंत्र समजून घेण्यासाठी आनंदवनाला भेट देतात. गेल्या काही वर्षांमध्ये शेतीत इतकी वाढ झाली आहे की आमच्या लोकांबरोबरच आसपासच्या गावातल्यांनाही इथे रोजगार मिळतो आहे.

आनंदवनात १९५१ मध्ये शेतीला जोडून डेअरीची सुरुवात झाली. त्या वेळी तोळामासा असलेली ताईची प्रकृती सुधारावी या हेतूने विनोबांनी बाबांना गाय घेण्यासाठी पैसे दिले होते. त्यातून बाबांनी एक लंगडी गाय विकत आणली होती. नर्मदा तिचं नाव. ताई-बाबांचं या नर्मदेवर अतिशय प्रेम होतं. तिची सेवा करणाऱ्या ताई-बाबांकडे पाहून विनोबांनी त्या दोघांना कौतुकाने ‘नंद-यशोदा’ अशीच उपाधी दिली

होती. या पहिल्या गाईचं दूध आनंदवनवासीयांसाठीच होतं. पण पुढे गाई-म्हशी वाढवायच्या आणि दूध बाहेरच्या गावांमध्येही विकायचं अशी बाबांची इच्छा होती. त्यातून पैसा तर मिळाला असताच, पण बाहेरच्या जगाशी आनंदवनाचा संबंधही तयार झाला असता. त्यामुळे त्यानंतर दोन वर्षांमध्ये बाबांनी स्थानीय गोसेवा समितीकडून काही गाई घेतल्या अन् पंजाब, हरियाणातल्या चांगल्या दुभत्या गाईही मागवल्या.

पण गाई आणल्या की झाली दूध विकायला सुरुवात, एवढं हे सोपं प्रकरण नव्हतं. सुरुवातीला कुष्ठमुक्त झालेल्या काही रुग्णांनी गाईचं दूध काढलं आणि वरोरा गावातल्या काही गवळयांमार्फत विकायला सुरुवात केली. चार-आठ दिवस दूध विकलं गेलं. एवढंच नव्हे, तर गिऱ्हाइकांनी दुधाची तारीफही केली. पण नेमकी तिथेच माशी शिंकली. इतकं चांगलं दूध कुठून येतं हे लोक विचारू लागले. जेव्हा हे दूध आनंदवनातून येतंय हे कळलं तेव्हा त्यांना धर्मसंकट आल्यासारखं वाटलं. कुष्ठरोग्यांच्या वस्तीतलं, हाताची बोटं झडलेल्या रुग्णांनी काढलेलं दूध आम्ही आमच्या पोराबाळांना कसं देणार, असं ही गिऱ्हाइकं म्हणू लागली. दूधविक्री ठप्प झाली. पण दूध आनंदवनाला पुरून उरायचं. मग त्याचं करायचं काय? बिगर कुष्ठरोग्याने गाई दोहणं हाच एकमेव पर्याय होता. शेवटी ताईने ही जबाबदारी स्वतः स्वीकारली. काम फारच कठीण होतं. सात-आठ गाईंचं दूध काढेपर्यंत तिचे हात सुजून यायचे. हातांवर फोड टरारून यायचे. पण सगळा त्रास सहन करत ती ते काम करत राहिली. मग थोड्या दिवसांनी तिलाही सवय झाली. कुष्ठरुग्ण नव्हे, तर बाबा आमट्यांची बायको दूध काढते याची खातरजमा करून घ्यायला वरोऱ्यातले लोक आनंदवनात आले. त्यांची खात्री पटल्यावर पुन्हा दूध विकलं जाऊ लागलं. पुढे आनंदवनाचा पसारा वाढत गेल्यावर आम्हालाच हे दूध पुरेनासं झालं तेव्हा विक्रीसाठी बाहेर दूध पाठवणं कमी झालं. पण तेव्हाही नारायणने डेअरी उत्तम राखली होती आणि त्या डेअरीतील जनावरांना प्रदर्शनांमध्ये बक्षिसंही मिळाली होती.

मी आनंदवनात सक्रिय झालो तेव्हापासून माझ्या मनात डेअरी वाढवण्याचा विचार होता. फक्त गाई-म्हशी वाढवून डेअरीचं उत्पादन वाढणार नाही, हे मला ठाऊक होतं. शेवटी जनावर दूध देणार ते त्याला मिळणाऱ्या चाऱ्याच्या जोरावर. त्यामुळे चांगला चारा तयार झाल्याशिवाय जनावरं वाढवण्यात अर्थ नव्हता. चांगला चारा हवा असेल तर मुबलक पाणी हवं. असं सगळं एकमेकांत जोडलं गेलेलं होतं. आनंदवनात काहीही काम करायचं म्हटलं, सुधारणा करायची म्हटली की घोडं पाण्याशी येऊन अडायचं. कारण वॉटरबँक हा सगळयाचा मूलभूत आधार. फॉडरबँक, म्हणजे मुबलक चारा तयार होणार तो या वॉटरबँकमधल्या बॅलन्सच्या जोरावरच. त्यामुळेच पाण्याचा प्रश्न सुटेपर्यंत डेअरीचं काम हातात घेणं शक्य नव्हतं. पुढे आनंदवनात पाणी खेळू लागल्यावरही इतर कामांमध्ये वेळ जात राहिला. पण मी माझ्या सहकाऱ्यांशी बोलताना कित्येकदा म्हणायचो, की आपलं डेअरीचं स्वप्न अजूनही अपूर्णच आहे.



आनंदवनाचे 'सीरीयल आंत्रप्रेन्युअर' गजानन वसू यांनी आनंदवनातली डेअरी भरभराटीला आणली.

आमचा धडाडीचा कार्यकर्ता गजानन वसू २००९ साली झरी-जामणी तालुक्यातल्या आमच्या प्रकल्पावरून पुन्हा आनंदवनात आला. तेव्हा त्यानेच डेअरीचा विषय काढला. मी त्याला म्हटलं, "डेअरी वाढवायची असेल तर जनावरं घेण्याआधी चाऱ्यावर पुष्कळ काम करावं लागेल. करतोस का बोल!" तो तयार झाला. खरं तर त्याला डेअरीची काहीच पार्श्वभूमी नव्हती. मला म्हणायचा, "तुमचे वॉटरबँक, फॉडरबँक हे शब्द माझ्या डोक्यावरून जातात. पण काय करायचं हे तुम्ही समजावून सांगा, मी काम करायला तयार आहे." गजानन वसू हाही कुष्ठमुक्त रुग्णच. तो आमच्या आनंदवनातला 'सीरियल आंत्रप्रेन्युअर'. आनंदवनात दाखल झाला तेव्हापासून एकामागोमाग एक नवीन प्रकल्प त्याने उभे केले आहेत. आमच्या कार्यकर्त्यांच्या फळीतला तो सगळ्यात धडपड्या आणि डॅशिंग माणूस आहे. आम्ही सगळे मजेने म्हणतो, की 'गजाननला रॉकेट लाँच करायला सांगितलं तरी तो नाही म्हणणार नाही. अंगावर घेईल आणि करून दाखवेल.' त्याचं शिक्षण फक्त सातवी. त्यातून नाना रोगांनी शरीर पोखरलेलं. त्या पार्श्वभूमीवर त्याने केलेली कामं म्हणजे लोकांना चमत्कारच वाटतो. त्यामुळेच मी त्याला 'गजानन महाराज' म्हणतो. अर्थात या गजानन महाराजांच्या चमत्कारामागे प्रचंड परिश्रम आणि झोकून देणं आहे.

गजाननने २००९ मध्ये डेअरीचं काम हाती घेतलं. माझे या क्षेत्रातले गुरू होते वर्गिस कुरियन. अर्थात, मी त्यांना गुरू मानतो हे त्या माणसाला माहितीही नव्हतं. आम्ही कधीही भेटलेलो नाही, पण डेअरी डेव्हलपमेंटबद्दलचं त्यांचं म्हणणं मी काळजीपूर्वक वाचलं होतं. त्यांचं म्हणणं होतं, 'गाई-म्हशींपुढे बारा महिने, चोवीस तास हाय प्रोटीन चारा हवा, तरच तुम्ही त्यांच्याकडून भरपूर आणि चांगल्या दुधाची अपेक्षा करू शकता.' त्यामुळे चारा हा विषय मी जवळपास कोळून प्यायलो होतो. झाशी इथे चाऱ्यावर काम

करणारी एक सरकारी संस्था आहे, ‘इंडियन ग्रासलँड अँड फॉडर रिसर्च इन्स्टिट्यूट’. या संस्थेने हाय प्रोटीन चाऱ्याबद्दल बरंच संशोधन केलं आहे. वेगवेगळ्या प्रकारच्या हवामानांत जगणाऱ्या विविध चाऱ्यांच्या जाती या संस्थेने विकसित केलेल्या आहेत. तिथल्या संशोधनांबद्दल मी बरंच वाचलं होतं. त्यातून मग माझं माझं चाऱ्याबद्दलचं एक मॉडेल मी तयार केलं. तसं बघायला गेलं तर आपल्याकडे शेतांच्या बांधावर, मोकळ्या माळरानांवर वारेमाप तण वाढलेले असतात. ते काही केल्या संपत नाहीत. मी ठरवलं, की हे तण चांगल्या चाऱ्यांनी रिप्लेस करायचे. या प्रकाराला ‘रीड द वीड विथ बेटर फॉडर’ असंच म्हटलं जातं.


डेअरीतल्या जनावरांची निगराणी अशी होते की हा गोठा नसून जनावरांचं ब्यूटी पार्लर आहे की काय, असा प्रश्न पडावा.

चाऱ्याचे असंख्य प्रकार आहेत. त्यातले काही प्रकार वॉटर लव्हिंग असतात, काही वॉटर टॉलरंट असतात, काही वॉटर रेझिस्टंट असतात, तर काही शेड लव्हिंग. अशा असंख्य जाती. आपल्याकडच्या जागेच्या प्रकारानुसार त्या लावायच्या. यात सात टक्क्यांपासून सत्तावीस टक्क्यांपर्यंत प्रोटीन असलेल्या जाती आहेत. हे सगळं मी गजाननला समजावून सांगितलं आणि म्हटलं, “लाग आता कामाला.”

आमच्याकडच्या शेतकी कॉलेजमध्ये तेव्हा चाऱ्याच्या प्रकारांबद्दल पुरेशी माहिती नव्हती. त्यामुळे चाऱ्याच्या जाती शोधण्यासाठी गजानन आधी अकोल्याच्या पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात जाऊन आला. पण तिथेही या चाऱ्याचं बियाणं उपलब्ध नव्हतं. तिथल्या अधिकाऱ्यांनीच मग त्याला नगरच्या राहुरी कृषी विद्यापीठात पाठवलं. तिथून चाऱ्याचं बियाणं घेऊन तो आला. दोन-तीन महिने आम्ही हा चारा लावण्याचं काम करत होतो. हळूहळू चारा वाढू लागला. तळ्यांच्या काठी, शेतांच्या कडेला, अभयारण्यात सगळीकडे चाराच चारा. एकदा हा प्रयोग यशस्वी झाल्यावर मग आम्ही जनावरं वाढवण्याचा निर्णय घेतला.

त्या वेळी आमच्याकडे अगदीच थोडी जनावरं होती. त्यातलीही काही भाकड होती. त्यामुळे तेव्हाचं डेअरीचं रोजचं उत्पादन होतं फक्त पस्तीस लिटर. आनंदवनाची लोकसंख्या होती अडीच हजार आणि दुधाची गरज होती दीडशे लिटर. म्हणजे आमच्या गरजेएवढंही दूध तेव्हा आम्ही तयार करू शकत नव्हतो. त्यामुळे आमचं पहिलं टार्गेट होतं दीडशे लिटरचं. गजाननने बऱ्याच चौकशा करून गाई-म्हशी कुठून विकत घ्यायच्या याची

चाचपणी केली. दुभती जनावरं कशी ओळखायची याची आम्हा दोघांनाही फारशी माहिती नव्हती. त्यातल्या त्यात कोणत्या जाती चांगल्या आणि कोणत्या जाती आपल्या हवामानात टिकू शकतात याचा माझा थोडाफार अभ्यास होता. पण वरोऱ्यातल्या लोकांशी बोलून बोलून आणि जनावरांच्या बाजारात जाऊन जाऊन गजानन हे सारं शिकला. त्याने पहिल्या टप्प्यात दहा-बारा जनावरं खरेदी केली.

जनावरं घेतल्यावर पुढचा टप्पा होता तो त्यांची काळजी घेण्याचा. गोठ्याची जागा चांगली हवी, गाई-म्हशींच्या आरोग्याकडे लक्ष द्यायला हवं, गोठ्यात स्वच्छता सांभाळायला हवी, अशा नाना भानगडी असतात. आमच्याकडे गोठा होताच. तो जुना असला तरी त्याच्या भिंती पक्क्या होत्या. गजाननने त्या इमारतीची डागडुजी करून घेतली. व्हेंटिलेटर्स बसवून हवा खेळती केली. स्वच्छतेसाठी वेगळी माणसं नेमली. एक वेळ धंदा थोडा कमी झाला तरी चालेल पण स्वच्छता पुरेपूर असली पाहिजे, हे आमचं आनंदवनातलं मुख्य तत्त्व. गजाननने गोठ्यातही हेच तत्त्व अवलंबलं. जनावरांसाठी डॉक्टर आणला. हाय प्रोटीन चारा तर होताच. मग काय, दूध वाढू लागलं. शिवाय दुधात पाणी मिसळण्याची बातच आमच्याकडे नाही. ही गोष्ट इतकी काटेकोरपणे सांभाळली जाते की दूध काढायला घेतलेली बादली विसळलेलं पाणीही दुधात टाकलं जात नाही. या सगळ्या श्रमांचं फळ लवकरच दिसू लागलं. काही महिन्यांमध्येच आमच्याकडे दोनशे लिटर दूध निघू लागलं. आनंदवनाची गरज भागली आणि पन्नास लिटर दूध शिल्लक राहू लागलं.


पूर्वी जिथे गिऱ्हाईक फिरकत नसे, तिथे आज दूध विकत घेण्यासाठी रांगा लागलेल्या असतात.

गजाननच्या डोक्यात कल्पना आली, की आपण डेअरीची जाहिरात करू. त्याने चक्क लोकल केबलवर जाहिरात दिली. पॅम्प्लेट्स छापून (अर्थात आमच्याच छापखान्यात!) पेपरमधून वाटली. वरोरा गावात पोस्टर्स लावली. त्याचा परिणाम झाला. थोडी थोडी गिऱ्हाइकं येऊ लागली. पण दुसरीकडे दुधाचं उत्पादन वाढतच चाललं होतं. दिवसाला जवळपास पाचशे लिटर दूध तयार होऊ लागलं होतं. एवढ्या दुधाचं करायचं काय? गजानन म्हणाला, "आपण दुधाचे पदार्थ तयार करून बघू.' वरोऱ्यातल्या काही कारागिरांना त्याने असे पदार्थ शिकवण्याची विनंती केली; पण त्यांनी साफ नकार दिला. मग आमच्याच रसोड्यातल्या लोकांना घेऊन त्याने खवा तयार केला, पनीर तयार केलं. तूप, लोणी, दही, पेढे सगळंच करून बघितलं. दर्जाशी तडजोड न केल्यामुळे प्रत्येक पदार्थ

बेहतरीन झाला. गजाननच्या शब्दांत सांगायचं, तर ‘नंबर वन!’ लोणी कढवल्यावर खाली जी बेरी राहते ती हाय प्रोटीन असते, असं आमचं एकदा बोलणं झालं. मग काय, गजाननने त्या बेरीच्याही वड्या बनवल्या. त्याला नाव दिलं, ‘टेस्ट ऑफ बेरी, बेस्ट ऑफ बेरी आणि वेस्ट ऑफ बेरी’. त्याचा हा आयटम तर वरोऱ्यात तुफान प्रसिद्ध झाला. डेअरीच्या काउंटरवर हे पदार्थ घेण्यासाठी रांग लागायची. या पदार्थांमुळे डेअरीकडे लोकांचं लक्ष गेलं. पण लवकरच दुधाची मागणी भराभर वाढत गेली आणि त्यामुळे हे पदार्थ करण्याचं प्रमाण कमी होत गेलं आणि नंतर थांबलंच.

पहिल्या वर्षी, म्हणजे २००९ मध्ये डेअरीचा टर्नओव्हर होता ३२ लाख रुपये. त्याच्या पुढच्या वर्षी तो ८५ लाखांवर पोहोचला. त्यानंतर गजानन मला म्हणाला, “भाऊ, आपल्या डेअरीने एक कोटीची उलाढाल करायला हवी, असं माझं स्वप्न आहे.” त्याचं हे वाक्य ऐकून मला अक्षरशः भरून आलं. साधा सातवी शिकलेला, कुष्ठरोग झाल्यामुळे घराबाहेर पडावं लागलेला हा माणूस. ‘आनंदवनात आलो नसतो तर रस्त्यावर भीक मागत फिरावं लागलं असतं’, असं तो किती तरी वेळा म्हणायचा. आज तोच कुष्ठमुक्त एक कोटीची उलाढाल करण्याचं स्वप्न बघत होता. मी त्याला म्हटलं, “तू आपल्या मॅनेजिंग कमिटीसमोर तुझं म्हणणं मांड.” त्याने आत्मविश्वासाने आमच्या मीटिंगमध्ये डेअरीचा आजवरचा प्रवास सांगितला. पुढची योजना समजावून दिली. त्याला आणखी जनावरं घेण्यासाठी पैसे देण्याचं ठरलं. आणि खरोखरच २०१२-१३ या आर्थिक वर्षात डेअरीचा टर्नओव्हर एक कोटी १५ लाखांवर पोहोचला.

आज आमच्या डेअरीचं दूध साठ रुपये लिटर भावाने विकलं जातं. मला वाटतं, शहरातही हा भाव लोकांना जास्त वाटेल. पण इथे आम्हाला गिऱ्हाइकांकडून उलट्या प्रतिक्रिया येतात. लोक म्हणतात, “आम्ही हे दूध साठ रुपयांनी घेतो, पण प्रत्यक्षात ते तीस रुपयांनाच पडतं. कारण महिन्याभरात त्याचं दोन किलो तूप तयार होतं.”

या सगळ्यामागे गजानन आणि त्याच्या सहकाऱ्यांचे कष्ट अन् लगन आहे. या डेअरीसाठी त्यांनी काय केलं नाही विचारा. मी डेअरी डेव्हलपमेंटबद्दलच्या अनेक गोष्टी वाचायचो आणि त्यातलं काहीबाही गजाननला सांगायचो. तो ते तर करून बघायचाच, पण स्वतःच्या मनानेही त्याने डेअरीत अनेक प्रयोग केले. आमच्या डेअरीत रोज पहाटे आणि दुपारी शास्त्रीय संगीत लावलेलं असतं. त्यामुळे गाई-म्हशी आनंदी व ताणरहित राहतात आणि त्यामुळे जास्त दूध देतात यावर गजाननचा ठाम विश्वास आहे.

डेअरी इतकी स्वच्छ आहे की कुठेही तुम्हाला घाण वास येणार नाही. रोगराईला थारा नाही. गजाननने प्रत्येक गाई-म्हशीला टोकन नंबर दिलेला आहे. त्यामुळे कोणत्या गाईने आज किती चारा खाल्ला, किती दूध दिलं हे त्याला बरोबर कळतं. मुख्य म्हणजे रोज पहाटे चार वाजता तो गोठ्यात राऊंड मारतो आणि प्रत्येक जनावरापाशी उभा राहून त्याची विचारपूस करतो. त्याचं म्हणणं असं, की ‘ताप आला की आपला चेहरा कोमेजतो तसंच या मुक्या जनावरांचंही असतं. त्यांच्यापाशी दोन घडी थांबलं की आपल्याला लगेच कळून चुकतं, कुणाची तब्येत बरोबर आहे आणि कुणाची नाही.’ त्यामुळे कुणाचीही प्रकृती

जरा नरम असली तरी गजाननला ते ताबडतोब कळतं. त्यामुळे आजार वाढत नाहीत. त्यांना गरजेनुसार कॅल्शियम, मिनरल्स, व्हिटॅमिन्स देत राहणं; व्हॅक्सिनेशनचं वेळापत्रक पाळणं हे सारं काही काटेकोर. शिवाय गाई-म्हशींना तो असं काही तुकतुकीत ठेवतो, की हा गोठा आहे की गाई-म्हशींचं ब्यूटी पार्लर, असा प्रश्न पडावा! गेल्या काही दिवसांपासून जास्त दूध देणाऱ्या गाई-म्हशी तयार करण्याचं वेड त्याला लागलं आहे. त्याने तयार केलेली गाय सध्या २० लिटर, म्हणजे इतर गाईंच्या जवळपास दुप्पट दूध देते आहे.


गोठ्यातल्या स्वच्छतेसाठी गजाननने एक भारी आयडिया शोधून काढली आहे. जनावरांना अंगावरच्या गोचिडांचा खूप त्रास होतो. माळरानावर गाई-म्हशी चरत असल्या की गोचिड-किडे खाण्यासाठी त्यांच्या पाठीवर बसलेले बगळे आपण पाहतो. त्यातूनच गजाननला कल्पना सुचली, की गोठ्यात काही कोंबड्या पाळाव्यात. त्या जनावरांच्या अंगावरचे किडे तर खातीलच, पण हा परिसरही स्वच्छ ठेवतील. झालंही तसंच. गोठ्यातली जनावरं आणि कोंबड्यांचं एक सुंदर सहजीवनच त्यातून आकाराला आलं. गोठा तर स्वच्छ झालाच पण अंड्यांचं उत्पादनही मिळालं!

गजाननचं पर्चेसिंगमधलं एक इनोव्हेशनही सांगण्यासारखं आहे. खरं तर कोणत्याही उद्योगात प्रत्यक्ष उत्पादनामधली माणसं वेगळी असतात आणि सेल्स-मार्केटिंगची माणसं वेगळी. पण आमच्या इथे तसं काही नाही. डेअरीचं कामही गजाननच बघतो, मार्केटिंगही तोच करतो आणि पर्चेसिंगही तोच. डेअरीच्या धंद्यात सगळयात मोठी जोखीम असते ती म्हणजे खरोखर दुभती गाय किंवा म्हैस मिळवण्याची. व्यापारी आपल्याला एखाद्या गाईचं कौतुक करून सांगतो, की ती दहा अन् पंधरा लिटर दूध देते; पण गाईच्या गळयातली दोरी त्याच्या हातातून आपल्या हातात आली की तो माणूस आपल्याला पुन्हा ओळखही दाखवत नाही. मग घरी आल्यावर तुम्ही बघता, की पन्नास हजार देऊन विकत घेतलेली गाय फक्त दोन-चार लिटरच दूध देत असते. हा डेअरीसाठी मोठा घाटा असतो. पण त्यावर उपाय काय?

गजाननने यावर एक जालीम उपाय शोधला. तो व्यापाऱ्यांना म्हणतो, 'मी तुम्हाला तुम्ही सांगितलेल्या किमतीपेक्षा हजार-दोन हजार रुपये जास्त देतो, पण आपण या खरेदी-विक्रीचा इसार करू या. तुम्ही सांगितल्याएवढं दूध दिलं नाही तर मी गाय परत देणार." आता असा प्रकार आणखी कुठे चालत नाही. गजाननने हे व्यापाऱ्यांच्या गळी कसं उतरवलं तेही माहिती नाही. पण खरोखरच असे करार झाले आणि त्यानुसार १५-२० वेळा तरी गजाननने व्यापाऱ्यांना गाई-म्हशी परत दिल्या. आमच्या आसपासच्या बाजारात गजानन हा स्टार खरेदीदार आहे. परिसरातले व्यापारी जनावरं विकताना आधी त्याला विचारतात. करार करून चांगली जनावरं विकतात. त्यामुळे या धंद्यातली जोखीम खूपच कमी झाली आहे. आज आमच्या डेअरीत बच्चे कंपनीसह जवळपास साडेतीनशे जनावरं आहेत. आणि तीही कशी, तर ही म्हैस आहे का हत्ती, असं लोकांनी विचारावं इतकी धष्टपुष्ट!

कुष्ठरुग्णांनी असं काही काम केल्याचं तर लांबच, महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातल्या

आणखी कुठल्या डेअरीने असं यश मिळवल्याचंही मी ऐकलेलं नाही. आपल्याकडे मोठमोठ्या डेअऱ्या आहेत, पण त्यातल्या बऱ्याचशा यशस्वी डेअऱ्या या भांडवल आणि तंत्रज्ञानप्रधान आहेत. आमची डेअरी सुरू झाल्यानंतर गजानन या सगळया डेअऱ्यांमध्ये फिरून आला. भिलवडीची चितळयांची डेअरी, गोवर्धन, डायनॅमिक्स वगैरे. पण सगळीकडे मोठमोठाली मशिन्स आणि माणसं कमी. अशा डेअऱ्यांमध्ये हजार गाईंचं दूध काढायला फक्त दोन माणसं असतात. त्यामुळे त्यातून रोजगारनिर्मिती जवळपास होत नाही. शिवाय या मशिनरीच्या वापरामुळे जनावरांचं आयुष्यही कमी होण्याची शक्यता असते ते वेगळंच. आम्हाला हे मॉडेल नको होतं. आम्ही डेअरीचा धंदा कशासाठी करत होतो? आनंदवनाची दुधाची गरज भागावी आणि दूध उरलं तर ते विकून संस्थेला चार पैसे मिळावेत हा उद्देश होताच. पण ती काही आमची अत्यावश्यक गरज नव्हती. आमच्या गावाकडच्या शब्दांत सांगायचं, तर डेअरी काढावी म्हणून आमच्या पायात कुणी मांजरी सोडल्या नव्हत्या. पण ग्रामीण भागातलं वास्तव बदलायचं तर शेतीसोबत डेअरीसारख्या जोडधंद्यांची गरज अधोरेखित करावी आणि हा धंदा कसा करावा याबद्दलचं एक मॉडेल शेतकऱ्यांसमोर ठेवावं, अशी आमची इच्छा होती. त्यामुळे आमची डेअरी रोजगारप्रधान आणि ग्रामीण टेक्नॉलॉजी वापरणारी असणं गरजेचं होतं. मशिनरीचा आसरा न घेताही डेअरी यशस्वी होऊ शकते, हे आम्हाला दाखवून द्यायचं होतं. गजाननने ते तीन वर्षांमध्ये करून दाखवलं. शिवाय जनावरं पाळणं हा बहुउद्देशीय धंदा आहे. शेतकऱ्याला शेतीसाठी जनावरं लागतातच. त्यामुळे गाई-म्हशी डेअरीला आणि बैल शेतीला, असं चक्र सुरू राहतं. आमच्याकडे तर अगदी सुरुवातीपासून नैसर्गिक रेतनकेंद्र होतं. आजही बाहेरचे शेतकरी आमच्याकडे जनावरांचं रेतन करून घेण्यासाठी येतात. त्याशिवाय गोठ्यामुळे बायोगॅसला शेण मिळतं ते वेगळंच. डेअरी किंवा जनावरांचं पालन महत्त्वाचं आहे ते त्यामुळेच.




बायोगॅस प्लांट बांधल्यामुळे आनंदवनातलं मलमूत्रही वाया जात नाही.

पहिल्या तीन वर्षांतच आमच्या डेअरीची लोकप्रियता इतकी वाढली की शेतकरी आपल्या पायाने हा चमत्कार बघण्यासाठी येऊ लागले, हा प्रयोग समजून घेऊ लागले. मुख्य म्हणजे तिथे त्यांना भेटला गजानन. त्याच्याकडे बघून शेतकऱ्यांना असं वाटलं, की हा माणूस करू शकतो तर आम्ही का नाही? डेअरीचं तंत्रज्ञान लोकांपर्यंत पोहोचवणं हा जिव्हाळयाचा विषय असल्याने गेल्या तीन-चार वर्षांमध्ये गजाननने कित्येक शेतकऱ्यांना

चाऱ्याच्या प्रकारांपासून ते गाई-म्हशींच्या जाती, त्यांची काळजी कशी घ्यायची इथपर्यंतची सगळी माहिती पुरवली आहे. एवढंच नव्हे, तर किती तरी शेतकऱ्यांना त्याने डेअऱ्या सेटही करून दिल्या आहेत. विशेषतः आत्महत्याग्रस्त भागातल्या शेतकऱ्यांपर्यंत डेअरीची माहिती पोहोचावी यासाठी तो धडपडत असतो. त्यामुळेच आज आमची डेअरी संपूर्ण नागपूर रिजनमधली कौतुकाची गोष्ट झाली आहे. गजाननच्या हाताखाली आमचा आणखी एक कार्यकर्ता आता डेअरीच्या कामात तरबेज होतो आहे. हेमलकशाच्या प्रकल्पावर कार्यरत असणारी माझी बहीण रेणुका आणि तिच्याशी लग्न करून आमचा मेव्हणा झालेला कार्यकर्ता विलास मनोहर या दोघांचा मुलगा अजिंक्य आज गजाननचा उजवा हात झाला आहे. डेअरीचा कॅशियर म्हणून तो काम करतो. पण जनावरांच्या खरेदीपासून ते त्यांच्या व्हॅक्सिनेशनपर्यंत सगळया कामांमध्ये त्याची गजाननला मदत होते.

या डेअरीचा दुसरा एक फायदा म्हणजे आमच्या मेगा किचनसाठीच्या बायोगॅस प्लांटमध्ये डेअरीतून रोज साडेपाच ते सहा टन शेण जातं. त्याला किचन वेस्ट आणि बायो वेस्टचीही जोड मिळते. त्यातून जवळपास पंधरा एल.पी.जी. सिलिंडर्सएवढा गॅस तयार होतो. आनंदवनातली कोणतीही गोष्ट वाया जाता कामा नये, हे आमचं पहिलं उद्दिष्ट आहे. त्यामुळे गाई-म्हशी असोत किंवा माणसं, सर्वांच्या मल-मूत्राचा वापर आम्ही करून घेतलेला आहे. ती गोष्टही इंटरेस्टिंग आहे. मानवी मलमूत्राचा वापर करण्याच्या कल्पनेला आमच्या कार्यकर्त्यांनी नाव दिलं आहे 'शी व्हिटॅमिन'!


आनंदवनातल्या कुष्ठमुक्तांनी बांधलेल्या बायोगॅस प्लांटमध्ये जवळपास पंधरा एलपीजी सिलेंडर इतका गॅस दररोज तयार होतो.

या कहाणीची सुरुवात झाली ती बायोगॅस प्लांटपासून. आनंदवनातली लोकसंख्या वाढली तसं किचन वेस्ट वाढलं, मैलापाणी वाढलं. त्यामुळे याचा उपयोग करून घेण्यासाठी आम्ही बायोगॅस प्लांट टाकायचा ठरवलं. पहिला प्लांट आम्ही १९७८ च्या दरम्यान उभारला. तोही आमचा आम्हीच. हा प्लांट उभा करण्याचा पहिला खर्च बराच जास्त होता. पण बाहेरून गॅस विकत घेण्याचा खर्च बघता काही काळातच बायोगॅस प्लांट हा खर्च भरून काढतात, असं आमच्या लक्षात आलं. हळूहळू आनंदवनात सात बायोगॅस

प्लांट उभे राहिले. उभे राहिले म्हणजे आम्हीच उभे केले. बाहेरच्या बायोगॅस प्लांटचा अभ्यास करून मी आमच्या प्लांटसाठी एक डिझाइन तयार केलं. आमच्या लोकांनीच ते बांधून काढलं. यात एकदा एक मोठा अपघातही झाला. बायोगॅसच्या प्लांटसाठी सेंटरिंग घालण्याचं काम सुरू असताना कोलॅप्सिबल सेंटरिंग पडलं आणि आमची तीन माणसं त्याखाली गाडली गेली. तिघंही जबर जखमी झाले पण सुदैवाने बचावले.

बायोगॅस प्लांट तयार झाले आणि मग त्यासाठी आम्ही आनंदवनात अतिशय फुलप्रूफ अशी ड्रेनेज लाइन तयार केली. त्यासाठी मी वेगळ्या पद्धतीच्या संडासांचंही डिझाइन तयार केलं. हे संडास आपल्या नेहमीच्या संडासांपेक्षा जास्त उतार असलेले असतात. त्यामुळे इथे नेहमीपेक्षा पाणी कमी लागतं. त्यामुळे पाण्याची बचत तर होतेच, शिवाय बायोगॅसमध्ये जितकं कमी पाणी जाईल तितकं चांगलं असतं. अशा संडासांमध्ये पाणी किंवा मैला साचून राहत नसल्यामुळे डास तयार होत नाहीत, हा त्याचा आणखी एक फायदा. असे २४ संडास आम्ही बायोगॅसला जोडले होते. वर्ध्यातले अॅप्रोप्रिएट टेक्नॉलॉजीतले तज्ज्ञ देवेंद्रभाई गुप्ता त्या वेळी आम्हाला मार्गदर्शन करण्यासाठी आनंदवनात आले होते.

बायोगॅसनंतर ड्रेनेजच्या पाण्याचा आणखी एक उपयोग लक्षात आला. डेअरीसाठी आम्ही मोठ्या प्रमाणावर चारा लावला होता. त्या चाऱ्याला जर हे पाणी मिळालं तर त्याचा खतासारखा उपयोग होईल, असं आम्हाला वाटलं. मग गजानन आणि त्याच्या टीमने ड्रेनेजच्या काही पाइपलाइन्स या चाऱ्याकडे वळवल्या, तर काही एका तलावाकडे. ड्रेनेजच्या या पाण्याने चारा उत्पादन तर वाढलंच, शिवाय मासे उत्पादनही वाढलं. ज्या तलावात मानवी मैलापाणी सोडलं त्या तलावात मासे आधीपासूनच होते; परंतु मानवी 'शी व्हिटॅमिन' मिळाल्याने माशांची वाढ उत्तमरीतीने होऊ लागली. तलावात येणारं पाणी मासे स्वच्छ करत असल्याने पाणीही साफ झालं आणि मासेही चांगले वाढले. तुम्हाला आश्चर्य वाटेल, पण इथे एकेका तलावातून दरवर्षी शेकडो क्विंटल मासे पकडले जातात. हे मासे बाहेर विकले जातात. आम्ही आनंदवनातल्या रहिवाशांसाठी या तलावाचा लिलाव करतो. त्या लिलावातून तलावातल्या माशांचा ताबा कोणाकडे हे ठरतं. मग ती व्यक्ती हे मासे पकडून त्यांच्या विक्रीचं काम करते. यातून आमच्या कुष्ठरुग्णांनाच उत्पन्नाचं नवं साधन मिळालं. मुख्य म्हणजे सांडपाण्याचा एकही कण वाया न जाता त्यातून पर्यावरणपूरक असं काम उभं झालं.

आपल्याकडे दिवसात एकूण चोवीस तास असतात. त्यातले आठ तास तुम्हाला तुमच्या वैयक्तिक गरजांसाठी लागतात. खाण-पिणं-झोपणं-कुटुंब वगैरे. आणखी आठ तास तुमच्या सामाजिक संबंधांसाठी-कामांसाठी खर्च होतात. पण त्यातून उरलेल्या आठ तासांचं तुम्ही काय करता यावर तुमचं आयुष्य कसं आहे हे ठरतं.

चोवीस तासांचं वेळापत्रक माझ्यासाठी काही वेगळं नव्हतं. मग एवढं प्रचंड काम कसं उभं राहिलं? सांगतो. माझ्यासमोर आनंदवनाचं मैदान होतं आणि तिथले प्रश्न होते. ते कसे सोडवायचे याचा विचार करू लागल्यावर एकेक प्रश्न उलगडत गेला, उत्तरं

सापडत गेली. काहींची लवकर सापडली, काहींची उत्तरं सापडायला वेळ लागला. कधी यश मिळालं, कधी अपयश मिळालं. पण आम्ही धडका मारत राहिलो. या सगळ्या धडपडीत माझ्याबरोबर किती तरी कार्यकर्ते होते. मी स्वप्नं पाहिली, त्यांच्याशी शेअर केली आणि त्यांनी ती उचलून धरली, आपली मानली. कारण आम्ही सगळे मिळून आम्हा सगळ्यांसाठी, आनंदवनासाठीच विचार करत होतो. त्यातूनच बाबांनी पाहिलेलं प्रतिसृष्टीचं स्वप्न साकार करण्यासाठी आम्ही एकेक पाऊल पुढे टाकू शकलो.

यात आणखीही एक हेतू होताच. हा हेतू बाबांच्या प्रत्येक कामामध्ये लपलेला होता. आपल्याकडे प्रत्येक गावखेड्यात शेतीपाण्याचे जे अनंत प्रश्न आहेत ते सोडवण्याचा प्रयत्न आपण करून पाहायला हवा, असं आनंदवन मानत आलेलं आहे. त्यामुळे आम्ही हे प्रयोग करत गेलो. आम्ही केलेल्या या प्रयोगांवर कोणाचा कॉपीराइट नाही. कोणीही यावं आणि हे काम बघून जावं. जेवढं आम्हाला कळलंय तेवढं सगळं सांगायला आम्ही सगळे कार्यकर्ते सदैव तयार आहोत.

●

'शी व्हिटॅमिन'मुळे तलावातलं माशांचं उत्पादन वाढलं.




उद्योगातून आत्मसन्मान

आनंदवनाची उभारणी झाली ती श्रमांच्या आधारावर. कोणी तरी आनंदवन उभं करून दिलं आणि मग तिथे बाबा आणि कुष्ठरोगी राहायला आले असं झालेलं नाही. आनंदवनाच्या उभारणीत कुष्ठरुग्णांनाच सामील करून घेतलं गेलं आणि त्यातून हे नांदतं गाव उभं राहिलं. असं करण्यामागे बाबांची विशिष्ट भूमिका होती. 'दान माणसाला नादान बनवतं. कुष्ठरुग्णांना दान देऊ नका, संधी द्या,' असं त्यांचं म्हणणं होतं. या भूमिकेमुळेच आनंदवनाच्या अगदी सुरुवातीच्या काळापासून बाबांनी कुष्ठरुग्णांना उपक्रमशील बनवलं. पण बाबा कुष्ठरुग्णांना राबवून घेतात, अशी पुष्कळ टीका झाली. प्रख्यात कुष्ठरोगतज्ज्ञ डॉ. पॉल ब्रँड यांनीही बाबांवर या आशयाचे ताशेरे ओढले होते. पण बाबा त्यांच्या भूमिकेपासून ढळले नाहीत. त्याचं फळ आज आनंदवनाच्या रूपाने आपल्या समोर आहे. नंतर डॉ. ब्रँड यांनीही आपली चूक कबूल केली.

बाबांनी आनंदवनात सर्वांत पहिला उद्योग उभा केला तो शेतीचा. शेतीने आनंदवनाची अन्नाची गरज भागवली, कुष्ठरुग्णांना स्वयंपूर्ण बनवलं आणि पैसेही मिळवून दिले. त्यानंतर बाबांनी उद्योगांचाही पाया घातला. कुष्ठरुग्णांनी स्वतःच्या पायावर उभं राहावं आणि शक्य तितक्यांनी पुन्हा समाजात जाऊन काम सुरू करावं, अशी बाबांची मनापासून इच्छा होती. कुष्ठरुग्णांच्या पुनर्वसनाच्या दृष्टीने बाबांचं नियोजन पक्कं होतं.

उद्योग सुरू करण्यामागे आणखीही काही कारणं होती. सुरुवातीच्या काळातले कुष्ठरुग्ण केवळ शरीराने जिवंत पण मनाने पूर्ण खचून गेलेले असत. स्वतःच्या कुटुंबाने घराबाहेर काढल्याच्या धक्क्यातून ही मंडळी सावरलेली नसत. त्यातच कुष्ठरोगामुळे झालेल्या जखमांमुळे होणाऱ्या अत्यंतिक वेदना, नसांचं दुखणं त्यांना असह्य होत असे. माणसं अक्षरशः गुरासारखी ओरडत. निराशेच्या गर्तेत ओढली जात. त्यावर केवळ औषध हा उपाय नाही याची जाणीव बाबांना लवकरच झाली. या लोकांचं मन गुंतून राहील असा काही तरी उपाय शोधून काढला नाही तर ही माणसं वेडी होतील, आत्महत्या करतील हे त्यांना दिसत होतं. सुरुवातीच्या काळात तशा घटनाही घडल्या. काही रुग्णांनी विहिरीत उडी मारून आत्महत्या केल्या. त्यामुळेच कुष्ठरुग्णांना कोणत्या तरी कामात गुंतवून ठेवलं पाहिजे, असं बाबांचं ठाम मत बनलं होतं.



आनंदवनातला पहिला उद्योग-चरखा

'आनंदवन एमआयडीसी'ची सुरुवात झाली ती चरख्यापासून. बाबांवर महात्मा गांधी आणि आचार्य विनोबा भावे यांचा प्रभाव होता. त्यामुळे उद्योगांची सुरुवात चरख्याने होणं स्वाभाविक होतं. सुरुवातीला आनंदवनात १०-१५ अंबर चरखे होते. नंतर वाढवत वाढवत बाबांनी चरख्यांची संख्या शंभर-दीडशेवर नेली. इथे बाबांचं वेगळेपण सांगावंसं वाटतं. त्यांनी चरख्यांकडे पाहिलं ते एक उद्योग म्हणूनच. ते स्वतः खादी वापरायचे, पण आनंदवनातल्या कुष्ठरुग्णांना त्यांनी खादी घालण्याची सक्ती कधीही केली नाही. कोणी कसं राहावं, कोणते कपडे घालावेत, कोणते घालू नयेत यावर आनंदवनात कधीच बंधनं नव्हती. 'कोणत्याही व्यक्तीवर आपण सांस्कृतिक अतिक्रमण करता कामा नये', असं त्यांचं म्हणणं होतं. उलट, कुष्ठरुग्णांनी रंगीबेरंगी कपडे घातले, त्यांच्या बायकांनी गजरे घातले, नेलपॉलिश लावलं की बाबांना कोण आनंद व्हायचा! तो म्हणायचे, "बघा हे कुष्ठरोगी आयुष्य कसं भरभरून अन् आनंदाने जगताहेत!"

तर सांगत असं होतो, की त्यांनी चरखे बसवले होते ते कुष्ठरुग्णांच्या हाताला काम आणि खिशाला पैसे मिळावेत म्हणून. सुरुवातीला गांधीजींच्या सेवाग्राम आश्रमातून पेळू यायचे आणि त्याचं सूत कातून ते सेवाग्राममध्ये पाठवलं जायचं. नंतर आमच्याकडे कापूस पिकू लागल्यावर इथेच पीक काढून त्याचं सूत कातायला सुरुवात झाली. मला आठवतं, आनंदवनात शेवटचं सूत कातलं गेलं तेव्हा तब्बल तीन लाख ३३ हजार ३३३ गुंड्या आम्ही सेवाग्रामला पाठवल्या होत्या. तेव्हा आनंदवनात १०० अंबर चरखे होते. सूत जोडताना थुंकी लावावी लागत असे. त्यामुळे त्या वेळी कोणी तरी खुसपट काढलं, "कुष्ठरोग्यांनी तयार केलेल्या सुतामुळे रोग पसरू शकतो. त्यामुळे तुम्ही हे सूत स्टरलाइज करून पाठवा." गांधीजींच्या तालमीत तयार झालेल्या कार्यकर्त्याचे कुष्ठरुग्णांबद्दलचे असे उद्गार ऐकून बाबांना धक्का बसला. ते म्हणाले, 'मी इथे कुष्ठरोग कमी करायला बसलोय की पसरवायला?" त्यांनी उद्वेगाने सगळया अंबर चरख्यांची होळीच करून टाकली. ते काम बंद पडलं. ही गोष्ट असेल १९६४-६५ची. अर्थात तोपर्यंत इतरही अनेक उद्योगांनी आनंदवनात बाळसं धरलेलं असल्याने कुष्ठरुग्णांच्या हाताला काम मिळत राहिलं.

१९५४ मध्ये सर्व्हिस सिव्हिल इंटरनॅशनल (एस.सी.आय) या संस्थेच्या ५०


स्वयंसेवकांचं पथक आनंदवनात आलं होतं. त्यांच्यामुळे आनंदवनात पक्क्या बांधकामाला सुरुवात झाली. या बांधकामासाठी लागणाऱ्या विटा इथेच तयार करायच्या असं बाबांनी ठरवलं. बाबांनी कुष्ठरुग्णांना सोबतीला घेऊन विटा पाडायला सुरुवात केली. पहिल्या टप्प्यातल्या इमारती कौलारू होत्या. खाली विटांचं बांधकाम आणि वर लाकडी सांगाडा. तो उभा करण्यासाठी आमच्याकडे सुतारकाम सुरू झालं. पुढे लाकडाच्या इतर उपयोगी वस्तू करण्यासाठी ते वाढत गेलं. एकुणात, सुरुवातीच्या काळात आनंदवनातले उद्योग जशी गरज पडेल तसे वाढत गेले.

आनंदवनात खऱ्या अर्थाने उद्योगधंद्याला सुरुवात झाली ती १९६० साली. त्याचं झालं असं, की भारताचे स्वित्झर्लंडमधील राजदूत एम. के. वेल्लोदी आणि त्यांच्या पत्नी आनंदवनाशी निगडीत होत्या. त्यांना सिस्टर लीलांमुळे आनंदवनाच्या कामाची माहिती होती. १९५७-५८ चा सुमार असेल. एकदा स्वित्झर्लंडच्या राजधानीत, बर्नमध्ये फेरफटका मारत असताना या दोघांना ‘स्विस एड अॅब्रॉड’ या संस्थेची पाटी दिसली. संस्थेत जाऊन चौकशी केल्यावर त्यांना कळलं, की ही संस्था जगभरातल्या चांगल्या कामांना निधी पुरवते आणि त्यांना भारतातल्या संस्थांनाही मदत करण्याची इच्छा आहे. वेल्लोदी दांपत्याने त्यांना उत्साहाने आनंदवनाबद्दल माहिती दिली आणि या संस्थेने चक्क आनंदवनाला ३० हजार स्विस फ्रँक्सची मदत देण्याचं नक्की केलं. आनंदवनाला परदेशातून मिळालेली ही पहिली आर्थिक मदत.

कुष्ठरुग्णांच्या पुनर्वसनासाठी उद्योदधंदे सुरू करण्याकरता ही रक्कम वापरायची हे पक्कं होतं. आपण जे उत्पादन सुरू करू ते उपयोगी हवं आणि सहजगत्या विकलं जाणारंही हवं, यावर बाबा ठाम होते. आनंदवनाच्या आसपासच्या गावांमध्ये विकता येतील अशा कोणत्या वस्तू असू शकतात, याचा विचार त्यांच्या डोक्यात सतत सुरू असे. टिन कॅन हा असाच एक उद्योग होता. टिनच्या पत्र्यापासून चाळण्या, गाळणी, डबे, दिवे, चिमण्या अशा जीवनावश्यक वस्तू तयार केल्या तर त्यांना ग्रामीण बाजारपेठ नक्की उपलब्ध होईल, याची बाबांना खात्री होती. त्या काळी सगळयाच गावांमध्ये उंदराचा सुळसुळाट असे. हे उंदीर टिनच्या डब्यांखेरीज कशालाही दाद देत नसत. त्यामुळे सगळीकडे टिनच्याच वस्तू वापरल्या जात. ‘स्विस एड अॅब्रॉड’च्या अधिकाऱ्यांनाही ही योजना पसंत पडली आणि हा उद्योग उभा करण्यावर शिक्कामोर्तब झालं. या उद्योगासाठी आवश्यक ती मशिनरी आणली गेली. त्यानंतर टिन कॅन प्रोजेक्टचं औपचारिक उद्घाटन करण्यासाठी स्वित्झर्लंडचे भारतातले राजदूत जॅक्स अल्बर्ट कुता आनंदवनात आले होते.

तीस हजार रुपयांची यंत्रसामग्री आणि सहा हजार रुपयांचा कच्चा माल एवढ्यावर हा उद्योग सुरू झाला. लवकरच आनंदवनात तयार झालेले डबे, चाळण्या वगैरे वस्तू आसपासच्या आठवडी बाजारांमध्ये लोकप्रिय होऊ लागल्या. पहिल्या वर्षातच या कारखान्याने तब्बल पाऊण लाखाचा माल विकला याचं अनेकांना आश्चर्य वाटलं; पण बाबांना मात्र या यशाची खात्री होती. तसं त्यांचं नियोजनच होतं. केवळ कुष्ठरुग्णांच्या पुनर्वसनासाठी निरुपयोगी वस्तू तयार करण्याला त्यांचा पूर्ण विरोध होता. परिसरातल्या मागणीचा अभ्यास करून त्यांनी या धंद्याचा पाया रोवला. आवश्यक तेवढं भांडवल,

आवश्यक तितकीच यंत्रसामुग्री आणि तुलनेने जास्त श्रम, हे त्यांचं सुरुवातीच्या काळातलं गणित होतं. केवळ आनंदवनासाठीच नव्हे, तर भारतासारख्या श्रमबहुल देशातला रोजगाराचा प्रश्न याच पद्धतीने सोडवता येऊ शकतो, असं ते म्हणत.



टिन कॅन प्रकल्पाचं उद्घाटन स्विस अँबेसिडर कुता यांनी केलं. त्यावेळी टिनच्या डब्यांची वैशिष्ट्यपूर्ण सजावट केली होती.

टिन कॅनचा हा उद्योग आनंदवनातल्या मेटल फॅब्रिकेशनच्या उद्योगाचा पाया ठरला. कालांतराने प्लास्टिक वस्तूंचा सुळसुळाट झाल्यामुळे टिनच्या वस्तूंची मागणी घटली, पण तोपर्यंत फॅब्रिकेशनमध्ये अनेक वस्तूंचं उत्पादन सुरू झालं होतं. या कामाची सुरुवात केली गिरिधर राऊतने. गिरिधर १९५८ साली आनंदवनात आला. त्याच्या वडिलांनाही कुष्ठरोग झालेला होता. त्याच्याही अंगावर चट्टे दिसू लागल्यावर त्याने शाळा सोडली आणि तो आनंदवनात दाखल झाला. त्याचं गाव वर्ध्याजवळचं हिंगणघाट. बाबांच्या कामाबद्दल त्या गावात माहिती होती. इथे आल्यावर सुरुवातीला त्याने शेतीतली, दवाखान्यातली कामं केली. १९६०मध्ये टिन कॅन प्रकल्प आल्यावर त्याची जबाबदारी बाबांनी गिरिधरच्या खांद्यावर टाकली. खरं तर तो आधी वर्कशॉपमध्ये वगैरे काम शिकलेला नव्हता. पण कामं उभी करायची तर आहे त्या कार्यकर्त्यांमधले होनहार तरुण उचलायचे, ही बाबांची पद्धत. त्यानुसार त्यांनी गिरिधरला वर्कशॉपमध्ये काम करायला सांगितलं; आणि त्यानेही ते काम समर्थपणे पेललं, पुढे वाढवलं. बाबा त्याचा उल्लेख अभिमानाने 'आमचा इंजिनियर' असा करायचे.

टिन कॅननंतर लगेचच बाबांनी प्रिंटिंग प्रेसला सुरुवात केली. मला आठवतं, त्या वेळी बाबांनी त्या काळाच्या मानाने बरंच जास्त, म्हणजे ५० हजार रुपयांचं भांडवल टाकून प्रिंटिंग प्रेससाठी लागणारी मशिन्स विकत घेतली होती. त्या वेळी वरोऱ्याच्या आसपास प्रिंटिंग प्रेस फारसे नव्हते. त्यामुळे याही उद्योगाचा उपयोग आसपासच्या गावांमधून कामं

मिळायला होऊ शकतो असा बाबांचा होरा होता. मुख्य म्हणजे या उद्योगात उत्पादन आणि विक्रीचा फारसा प्रश्न नव्हता. लोकांची छपाईची कामं करून देणं हे इथलं मुख्य काम होतं. शिवाय संस्थेचा पसारा वाढत असल्याने संस्थेसाठीची छपाईची कामं इथेच होऊ शकणार होती. दिवाकर मोहनी हे प्रिंटिंग प्रेसमधले पहिले कार्यकर्ते. त्यांनी पहिल्याच बॅचमध्ये जवळपास २२ कुष्ठरुग्णांना प्रिंटिंग प्रेसचं प्रशिक्षण दिलं. गंगारेड्डी तोट्टावार हा आमचा कुष्ठमुक्त कार्यकर्ता या फळीतलाच. पुढे त्यानेच प्रिंटिंग प्रेसची जबाबदारी अंगावर घेतली, आणि त्यानंतर २००८पर्यंत तोच ती समर्थपणे सांभाळत होता. सुरुवातीला साने गुरुजींच्या विचारांनी प्रेरित असलेलं ‘आंतरभारती’हे मासिक आमच्या छापखान्यातच छापलं जायचं. प्रा. रमेश गुप्ता हे त्या मासिकाचे संपादक होते. पुढे रमेश गुप्तांच्या मदतीनेच बाबांनी त्यांचे विचार आणि वाक्यं शब्दबद्ध केली. बाबा इंग्रजीत सांगायचे आणि गुप्ता त्याचं मराठीत भाषांतर करायचे, असं ते काम चालायचं.





सुरुवातीच्या काळातला प्रिंटिंग प्रेस. या प्रेसची जबाबदारी गंगारेड्डी तोट्टावार यांनी सांभाळली.

पुढे वरोरा आणि आसपासच्या गावांमध्येही प्रिंटिंग प्रेसची बातमी पोहोचली आणि मग बाहेरूनही छपाईसाठी कामं येऊ लागली. त्यानंतर आम्ही सरकारी कार्यालयं, सरकारी शाळा-कॉलेजांसाठीही छपाई करू लागलो. सरकारने पुरवलेला कागद वापरून त्यांना स्वस्तातल्या वह्या तयार करून देण्याचं कामही आमच्या प्रेसने बरीच वर्षं केलं. त्या वह्यांना प्रचंड मागणी असायची. कारण आमच्याकडे दर्जाशी तडजोड करणं कुणाला माहितीच नव्हतं. इतर ठिकाणांपेक्षा आमची छपाई चांगली असायची आणि मुख्य म्हणजे ताई-बाबांच्या काटकसरी शिस्तीत सगळे तयार झाले असल्यामुळे आमच्याकडे सरकारने पुरवलेल्या कागदामध्ये सरकारने सांगितलेल्या-पेक्षा जास्तच वह्या बसायच्या!

आनंदवन ही जगाशी नातं तुटलेली वसाहत असता कामा नये असा बाबांचा आग्रह होता. या उद्योगधंद्यांमुळे तोही हेतू साध्य झाला. मुख्य म्हणजे केवळ दर्जामुळे आमच्या विविध वस्तूंना मागणी वाढत होती, हे फारच सुखद होतं. नंतरच्या काळात पुण्या-मुंबईतल्या ग्राहकांनी आनंदवनाला मदत म्हणून आमची उत्पादनं उचलून धरली. तिथेही दर्जाची खात्री हा महत्त्वाचा मुद्दा होताच. पण आनंदवनातल्या कुष्ठरुग्णांनी केवळ दर्जाच्या जोरावर आसपासच्या गावांमध्ये अनेक प्रकारच्या बाजारपेठा काबीज केल्या अन् आपली क्षमता सिद्ध केली. आनंदवन ही कुष्ठरोग्यांची वसाहत नाही, तर ते रोगमुक्तांनी

चालवलेलं उत्पादन केंद्र आहे याची बाहेरच्या जगाला जाणीव होऊ लागली.


दुसरं असं, की कुष्ठरुग्णांनी आपण इतर कोणत्याही धडधाकट माणसांपेक्षा कमी नाही हे या उद्योगांमधून सिद्ध केलं. टिन कॅन म्हटलं तर टिन कॅन, प्रिंटिंग प्रेस म्हटलं तर प्रिंटिंग प्रेस, विटा पाडायच्या ठरलं तर विटांचं काम, सगळं काही कुष्ठरुग्णांनी शिकून घेतलं. त्या काळात, म्हणजे १९५८ च्या सुमारास आम्ही मधुमक्षिकापालनही करून बघितलं. पुढे प्रकाशने या व्यवसायाची जबाबदारी सांभाळली. संधी मिळाली तर आम्ही वाट्टेल ते करून दाखवू शकतो, हा संदेशच जणू कुष्ठरुग्णांनी बाहेरच्या जगाला दिला. तो फक्त कुष्ठरुग्णांच्या पुनर्वसनापुरताच होता का? मला तसं वाटत नाही. बाबा तर म्हणायचेच, "जर हे कुष्ठरुग्ण एखादं काम करू शकत असतील, तर कोणीही करू शकतं." भारतातल्या बेरोजगारीच्या प्रश्नाला कुष्ठरुग्णांनी दिलेलं हे चोख उत्तर होतं. समाजातील इतर गरजूंना आनंदवनातल्या या मॉडेलचा उपयोग व्हावा, अशी बाबांची मनोमन इच्छा होती.

तो योग लवकरच आला. काऊंट ऑर्थर तार्नोवस्की याच्या रूपाने. तार्नोवस्की हा मूळचा पोलंडचा, पण इंग्लंडमध्ये स्थायिक झालेला. लहानपणी पोलिओ झाल्यामुळे तो दोन्ही पायांनी अपंग होता. त्याला फिरावं लागायचं ते व्हीलचेअरचा आधार घेऊनच. पण त्याची पर्वा न करता हा माणूस 'रीडर्स डायजेस्ट' या मासिकातर्फे आशियातल्या अपंगांच्या कामाची पाहणी करत फिरत होता. या परिसरातून जात असताना दूध-भाज्या कुठे विकत मिळतील हे शोधता शोधता तो आनंदवनात येऊन पोहोचला. मला आठवतं, तेव्हा टोळधाड आली म्हणून बाबा शेतांकडे गेले होते. मीच त्याला सामोरा गेलो. ही संस्था आहे कळल्यावर त्याने इथे मुक्काम करायचं ठरवलं. ते साल होतं १९६४.

बाबांनी त्याला आनंदवन फिरून दाखवलं. कुष्ठरुग्णांची वसाहत म्हणजे एक रोगट, अंधारं आणि लाचार प्रकरण असणार, असं काही तरी त्याच्या डोळ्यांसमोर होतं; पण त्याला समोर दिसत होतं कुष्ठरुग्णांनी उभारलेलं एक नांदतं, हसतंखेळतं गाव. शेती, भाजीपाला, डेअरी, उद्योगधंदे हे सगळं कुष्ठरुग्णांनी घडवलं आहे यावर त्याचा विश्वास बसत नव्हता. शिवाय हे कुष्ठरुग्ण बाबांच्या मदतीने आत्मविश्वासाने त्याच्याशी बोलत होते, त्याच्या प्रश्नांची उत्तरं देत होते. हे सगळं बघून तो केवळ थक्क झाला. बाबांना म्हणाला, "अपंगांसाठी कोण काय काम करतंय बघत मी आशियात सगळीकडे फिरलो पण असं काम मला कुठेच आढळलं नाही. तुमचं मॉडेल वेगळं आहे. काम करून आत्मसन्मानाने जगण्याची संधी तुम्ही कुष्ठरुग्णांना दिली आहे. तुम्ही माझ्यासारख्या अपंगांसाठीही काही तरी केलं पाहिजे."

बाबांनाही अपंगांचे प्रश्न जाणवत होतेच. केवळ अपंगत्वामुळे माणूसपणाला पारखी झालेली अनेक माणसं त्यांनीही पाहिली होती. पण बाबा किती गोष्टी करू शकतील याला मर्यादा होत्या. बाबांनी ही बाब ऑर्थरजवळ बोलून दाखवली. पण आर्थरने आग्रह धरला. त्याच्या पुस्तकाच्या रॉयल्टीतून मिळणारे पैसे त्याने बाबांना देण्याची तयारी दाखवली. मग दोघांच्या भरपूर चर्चा झाल्या आणि अपंगांसाठी व्यावसायिक

प्रशिक्षण देणारं एक निवासी केंद्र आनंदवनात सुरू करायचं असं ठरलं. 'कुष्ठरुग्ण असोत किंवा अपंग, समाजाने आपला पूर्वग्रह बाजूला ठेवून त्यांना संधी दिली पाहिजे, दान नव्हे', असं बाबांचं म्हणणं होतं. त्यामुळे या नव्या केंद्राचं नाव 'संधिनिकेतन' ठेवायचं ठरलं. कुष्ठरुग्णांसाठी बाबा जे करत होते त्याचंच हे एक एक्स्टेन्शन होतं असं म्हणता येईल. त्यासाठी संस्थेच्या घटनेमध्ये बदल केला गेला. हा विस्तार व्हायला निमित्त ठरला ऑर्थर तार्नोवस्की.



आनंदवनातील अपंगांसाठीच्या कामाची सुरुवात ज्याच्या पुढाकाराने झाली तो काऊंट ऑर्थर तार्नोवस्की.

पुढे १९६७ मध्ये आशियातल्या भटकंतीवरचं 'अनबीटन ट्रॅक' हे ऑर्थरचं पुस्तक प्रसिद्ध झालं. त्यात आनंदवनावर दोन प्रकरणं होती. कबूल केल्याप्रमाणे ऑर्थरने त्याला मिळालेल्या रॉयल्टीचे दीड लाख रुपये बाबांच्या स्वाधीन केले आणि त्यातून संधिनिकेतनची इमारत उभी राहिली. पुढे आनंदवनातले उद्योग संधिनिकेतनशी जोडले गेले आणि तिथे ग्रामीण भागातल्या अपंगांना प्रशिक्षण मिळण्याची सोय तयार झाली.

अर्थात इमारत उभी राहिली आणि लगोलग अपंगांचा ओढा तिकडे वळला असं झालं नाही. या केंद्राबद्दल त्यांना माहिती कुठून होणार, हा प्रश्न होताच. मग हरी बढे आणि सदाशिव ताजने या दोघा कार्यकर्त्यांना मी बहुविध अपंगत्व असलेल्या व्यक्तींचा सर्व्हे करायला पाठवलं. हरी कुष्ठरुग्ण होता, तर सदाशिव अपंग. सदाशिवला लहानपणी पोलिओ झालेला. त्यामुळे अपंगांशी हे दोघं थेट जोडले जाऊ शकत होते. या दोघांची जोडी वरोरा तालुक्यातल्या तेहतीस गावांमध्ये फिरली. गावात किती कुष्ठरुग्ण आहेत, किती अपंग आहेत, कोणत्या प्रकारचं अपंगत्व आहे, हे लोक काम काय करतात, असा भरभक्कम सर्व्हे या दोघांनी केला. त्यांनी बैलगाडीतून हा भाग अक्षरशः पिंजून काढला. ते सकाळी सकाळी जेवणाचा डबा घेऊन बाहेर पडायचे ते एकदम रात्रीच आनंदवनात परत यायचे. या सर्व्हेमुळे अपंगांची माहिती तर गोळा झालीच, शिवाय संधिनिकेतनची

कल्पनाही या गावांमध्ये पसरली.

पण तरीही पहिल्या दोन वर्षांचा काळ परीक्षा बघणारा होता. इमारत बांधून तयार होती, पण अजून काम धडपणे सुरू झालं नव्हतं. त्यामुळे कधी कधी ही इमारत आम्ही धान्याचा साठा करायलाही वापरायचो. त्यावर ऑर्थर वैतागायचा. ऑर्थर मनाने चांगला माणूस, पण आपलं स्वप्न कधी एकदा पूर्ण होतं हे बघण्यासाठी तो उतावीळ झाला होता. तो आम्हाला म्हणायचा, “मी दिलेले पैसे तुम्ही वाया घालवताय.”

पण हळूहळू हरी आणि सदाशिवच्या सर्व्हेचा उपयोग होऊ लागला. एखाद- दुसरा अपंग माणूस पत्ता शोधत शोधत आमच्याकडे येऊ लागला. त्याने सांगितल्यावर आसपासच्या गावांतली आणखी चार मंडळी इकडे वाट वाकडी करू लागली. संधिनिकेतनला हळूहळू आकार येत गेला. आता आमच्यासमोर आव्हान होतं ते अपंगांना प्रशिक्षण देण्यासाठी इतरही उद्योग सुरू करण्याचं. मुख्य म्हणजे ज्यांची समाजात गरज असेल अशा प्रशिक्षणांवर भर देणं आवश्यक होतं. जसजसे आनंदवनात नवे उद्योग सुरू झाले तसतसं त्यांचं प्रशिक्षणही इथे मिळू लागलं. बाबांच्या स्वप्नाप्रमाणे कुष्ठरुग्णच इथले ट्रेनर बनले. या कुष्ठरुग्णांनी नव्या पिढीमध्ये ‘श्रम ही है श्रीराम हमारा’चा मंत्र रुजवला. कालांतराने या प्रशिक्षण केंद्राला सरकारी मान्यता आणि अनुदानही मिळालं.



कुष्ठरुग्णांना ट्रेनर अन् अपंगांना कार्यक्षम बनवणारं संधिनिकेतन.

सध्या आम्हाला या केंद्रात ८५ प्रशिक्षणार्थींसाठी अनुदान मिळतं; पण अगदी सुरुवातीपासूनच आम्ही त्या संख्येवर समाधान मानलं नाही. इथे कायमच शंभरच्या आसपास प्रशिक्षणार्थी प्रशिक्षण घेत असतात. त्यातल्या जास्तीच्या मुलांचा खर्च अर्थातच आम्ही करतो. शिवाय फक्त व्यवसाय प्रशिक्षण देऊन आम्ही थांबत नाही, तर त्यातल्या ज्यांना ज्यांना शिक्षण पूर्ण करण्यात रस असेल त्यांना दहावी- बारावीच्या परीक्षेला बसवणं हेही आमचे कार्यकर्ते स्वतःचं कामच मानतात.

संधिनिकेतनचा पाया तयार करण्याचं काम आमच्या सदाशिव ताजनेने केलं. तोच

संधिनिकेतनचा पहिला प्रशिक्षणार्थी बनला, आणि पुढे १९९५ मध्ये तो या केंद्राचा अधीक्षकही झाला. खरं तर ताजनेबद्दल तुम्हाला थोडं सविस्तरच सांगायला हवं. ताजने हा आनंदवनाजवळच्याच राळेगावमधला. दोन वर्षांचा असताना त्याला पोलिओ झाला. दोन्ही पाय लुळे झाले. त्याच्यावर घरगुती, गावच्या वैद्याचे उपचार केले गेले, पण उपयोग झाला नाही. घरची गरिबी. तब्बल ११ जणांचं कुटुंब. त्यामुळे एका मुलाच्या आजाराकडे किती काळ लक्ष देणार? शेवटी उपचार थांबवले. पण ताजनेच्या मनात जिद्द होती. आपल्याला पाय नाहीत याचं त्याने कधी वाईट वाटून घेतलं नाही. तो लवकरच हातांवर चालायला शिकला. तेव्हा खेड्यांमध्ये कुठल्या आल्या आहेत व्हीलचेअर्स? ताजने गावात सगळीकडे हातानेच फिरायचा. शाळेत जायचा. एवढंच नव्हे, तर विटी-दांडू खेळायचा, सपासप पोहायचा. चौथीत असताना तो शिकण्यासाठी वरोऱ्याला मामाकडे आला. मामाच्या घरापासून शाळा एक किलोमीटर होती. तेवढं अंतर तो हाताने चालत जायचा. तिथे तो चिकाटीने दहावी झाला. त्या वेळी त्याच्या वर्गात आनंदवनातली काही अंध मुलं होती. त्यांच्यामुळे त्याला आनंदवनाबद्दल कळलं. त्या मित्रांसोबत तो आनंदवनात आला आणि इथलाच झाला. बाबांनी आनंद निकेतन कॉलेजमध्ये त्याचं नाव टाकलं. त्याला संधिनिकेतनमध्ये राहायला जागा करून दिली. सुरुवातीच्या काळात इथले सगळे उद्योग तो शिकला. प्रेसमध्ये काम करायचा, सतरंजी करायला बसायचा. मग काही वर्षांनी संधिनिकेतनची जबाबदारीच त्याने सांभाळली. अगदी समर्थपणे. ताजने म्हणजे आनंदवनाच्या चिरसंघर्षी वृत्तीचा ब्रँड अँबेसडरच! पाय नाहीत म्हणून तो कधी मागे राहिला नाही की पाय नसण्याचा त्याने कधी न्यूनगंड बाळगला नाही. आनंदवनाचं काम बाहेर पोहोचवण्यासाठी तो इतरांपेक्षा दुप्पट उत्साहाने बाहेर फिरायचा. आमच्याकडे तीन चाकी सायकल तयार झाल्यावर तर काय, त्याच्या स्वप्नांना पंखच मिळाले. आनंदवनातल्या उत्पादनांची प्रदर्शनं असोत किंवा आमचा स्वरानंदवन वाद्यवृंद, सगळीकडे ताजने तुम्हाला मुख्य दिग्दर्शकाच्या भूमिकेत दिसेल.



संधिनेकतनचे
पहिले प्रशिक्षणार्थी
आणि पुढे आनंदवनातले
खंदे कार्यकर्ते बनलेले
सदाशिव ताजने.

ताजने संधिनिकेतनमधून निवृत्त झाल्यानंतर आता रवींद्र नलगिंटवार हा तरुण कार्यकर्ता इथलं सगळं काम बघतो. इथे शिकवल्या जाणाऱ्या व्यवसायांमध्ये काळानुरूप बदल होत गेला आहे. सध्या वायरमन, वेल्डिंग, शिवणकाम, विणकाम याबरोबरच काही

नवे ट्रेड्सही आम्ही गेल्या काही वर्षांमध्ये सुरू केले आहेत. त्यात हाऊसकीपिंग, मेडिकल असिस्टन्स, केअर गिव्हर, फॅशन डिझायनिंग अशा आधुनिक व्यवसायांचा समावेश केला आहे. आता आम्ही आणखी एक नवा उपक्रम इथे सुरू केला आहे, तो म्हणजे जॉब फेअर. म्हणजे इंजिनियरिंग कॉलेजमध्ये ज्याप्रमाणे कॅम्पस इंटरव्ह्यू होतात, त्याप्रमाणे संधिनिकेतनच्या विद्यार्थ्यांची नोकरीसाठी निवड केली जाईल. हे सगळं डोकं नव्या पिढीचं.

सध्या आम्ही भर देतो आहोत तो कर्णबधिरांना कोणकोणतं प्रशिक्षण देता येईल यावर. आपल्याकडे अंधांच्या गरजांचा बराच अभ्यास झाला आहे. त्यांच्यासाठीच्या शिक्षणाची घडी व्यवस्थित बसली आहे. तसंच अपंगांचंही. अपंग माणूस बोलू शकतो, स्वतःचे प्रश्न मांडू शकतो, उत्तरं शोधू शकतो. पण सगळयात मोठा प्रश्न येतो तो कर्णबधिर मुला-मुलींचा. त्यामुळे त्यांच्यासाठी वेगळे व्यवसाय शोधण्याचं काम सध्या आमच्याकडे सुरू आहे. त्याचं एक उदाहरण सांगतो. मध्यंतरी आमच्याकडे 'एल अँड टी पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट'च्या मदतीने बांधकाम कौशल्य प्रशिक्षण केंद्र सुरू झालं. हा विभाग म्हणजे 'युवाग्राम' या बेरोजगार तरुणांच्या प्रशिक्षण केंद्राचं पुढचं पाऊल आहे असं म्हणायला हरकत नाही. आम्ही असा विचार केला, की या केंद्रात एक बॅच फक्त कर्णबधिर विद्यार्थ्यांची काढावी. म्हणजे बांधकामाचं शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेतलेली ही मुलं पुढे आनंदवनातच दुरुस्ती-देखभालीचं आणि नव्या बांधकामात मदतीचंही काम करतील. एल अँड टी केंद्रातल्या प्रशिक्षकांनाही ही कल्पना आवडली, आणि ती यशस्वीही झाली.


'एल अँड टी पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट'च्या मदतीने सुरू असलेलं बांधकाम कौशल्य प्रशिक्षण केंद्र

संधिनिकेतनची गोष्ट सांगता सांगता मी बराच पुढे आलो. पुन्हा एकदा मागे जाऊन टप्प्याटप्प्याने उद्योगधंद्यांची वाढ कशी झाली ते सांगतो.

चरख्यानंतरचा टप्पा होता हँडलूम्सचा. आनंदवनात हँडलूम्स आले ते साधारण साठीच्या दशकातच. त्या वेळी कुष्ठरुग्णांमध्ये विणकर समाजातले काही लोक होते. त्यांनी

हा व्यवसाय सुरू करण्याची तयारी दाखवली. आनंदवनातल्या रहिवाशांची कापडाची गरज भागवणंही गरजेचं होतंच. आनंदवनाची लोकसंख्या वाढत गेली तसतशी हँडलूम्सची संख्याही वाढत गेली. पुढे पॉवरलूम्स आले, पण तरीही हँडलूम्सवर विणलेल्या कापडाचं महत्त्व कायम राहिलं. शिवाय सरकारी पातळीवर हँडलूम्सना संरक्षण द्यायचं म्हणून पॉवरलूम्सवर एवढ्या अटी आणि निर्बंध लादलेले होते की काही प्रकार केवळ हँडलूम्सवरच विणले जायचे. आजही चित्र तेच आहे. उदाहरणार्थ, पॉवरलूम्सवर उभा रंगीत धागा टाकायला परवानगी नाही. ते काम करायचं असेल तर हँडलूम्सवरच करावं लागतं. त्यामुळे आजही आनंदवनात वीस-बावीस हँडलूम्स आहेत.

१९७४-७५ मध्ये मी उद्योगधंदे वाढवण्याच्या मागे लागलो तेव्हा मी सरळ आमच्या कार्यकर्त्यांची मीटिंग बोलावली. म्हटलं, “आपल्याला आनंदवनात उद्योग वाढवायचे आहेत. त्यासाठी काय करता येईल याचा सगळे मिळून विचार करूयात.” बरीच चर्चा झाली. कोणी कोणी काय काय सुचवलं. आपल्याला जे कौशल्य येतं ते इथे करून बघण्याची तयारी दाखवली. सगळयांच्या अंगात उत्साह संचारला. आमचा सुधाकर कडू आनंदवनात येण्याआधी डॉ. शिवाजीराव पटवर्धनांच्या ‘तपोवन’ या कुष्ठधामात होता. तिथे साऱ्या विद्यार्थ्यांना कोणता तरी एक उद्योग शिकावा लागायचा. अगदी कच्चा माल घेण्यापासून ते वस्तू पूर्ण होईपर्यंत सगळं त्यांना स्वतः करून बघावं लागायचं. सुधाकर तिथे सतरंजी करायला शिकला होता. तो म्हणाला, “भाऊ, मला सतरंजी करता येते. मी करू का ती इथे?” मी म्हटलं, “जरूर!” सतरंजी ही उपयोगी वस्तू होती. आनंदवनासाठी आणि नंतर बाहेर विकण्यासाठीही.


मी सुधाकरला म्हटलं, “तुला सतरंजी करायला काय काय लागतं ते बघ. बाबांकडून अॅडव्हान्स घे आणि नागपुरातून सामान घेऊन ये.” आता बाबांकडून पैसे मिळणं हे एक महाकठीण काम होतं. बाबांना उधळपट्टी अजिबात चालायची नाही आणि पै-पैचा हिशोब लागायचा. सुरुवातीच्या काळात बाबा-ताईंनी इतक्या कमी पैशांत दिवस काढले होते की आमची कामं म्हणजे त्यांना उधळपट्टीच वाटायची. बाबांशी सामना करायला सुधाकरबरोबर मीही होतोच. मी बाबांना नव्या उद्योगाची कल्पना दिली. बाबा तयार झाले. फक्त करड्या नजरेने सुधाकरकडे बघत म्हणाले, “सुधाकर, पैसे घेऊन जातोयस, पण सतरंजी होणार ना? मी येणार पहिली सतरंजी बघायला.”

सुधाकर नागपूरला जाऊन सामान घेऊन आला. पण सूत विणण्याच्या कांड्या आणि सूत ओढण्याचे पंजे त्याला तिथे मिळाले नाहीत. शिवाय रंगीत सूतही मिळत नव्हतं. मग आम्ही ठरवलं की कांड्या, पंजे वगैरे आपण इथेच तयार करायच्या. मी त्याला म्हटलं, “दाखव मला तुझी कांडी कशी असते.” त्याने लगेच कागदावर एक चित्र काढून मला समजावून सांगितलं. मग मी रात्रभर जागून लाकडाच्या कांड्या तयार केल्या. रंग आणले. आमच्याकडे रंगाचं काम येणारे काही कुष्ठरुग्ण होते. त्यांनी सूत रंगवण्याची जबाबदारी घेतली. रंग कसा तयार करायचा, तो किती गरम असताना त्यात सूत सोडायचं, ते कसं वाळवायचं याचे बरेच प्रयोग झाले. आणि एके दिवशी सगळया जय्यत तयारीनिशी

सुधाकर सतरंजी विणायला बसला. त्याच्यासोबत हे काम शिकण्यासाठी आणखी चार-पाच जण.

पहिली सतरंजी बनवताना बराच वेळ गेला, चुका झाल्या, पण अखेर एक छोटी सतरंजी तयार झाली. ती बघायला बाबा सकाळीच स्वतः सायकल चालवत हजर. काम फत्ते झालंय म्हटल्यावर बाबांनी सुधाकरला मनापासून शाबासकी दिली. मग ते काम जोरात सुरू झालं. सुधाकरने त्या काळात अक्षरशः मान-पाठ एक करून काम केलं. दिवसा तो अंधशाळेत काम करायचा, तर संध्याकाळी सतरंजी विभागात. सतरंजीचे वेगवेगळे प्रकार-आकार आजमावून होईपर्यंत आणि पाच-दहाजणांना त्याचं नीट प्रशिक्षण मिळेपर्यंत त्यानेच या विभागाची जबाबदारी सांभाळली.

या काळात आम्ही सतरंजीमध्येही खूप प्रयोग केले. आश्रमशाळा-अंगणवाडीत लहान मुलांना जेवायला बसण्यासाठी लागणाऱ्या लांब पट्ट्या, एकेका माणसाला बसण्यासाठीची आसनं, कार्पेटसारख्या दिसणाऱ्या रंगीबेरंगी दऱ्या आणि वेगवेगळ्या मापांच्या सतरंज्या. कारागिरांचा हात बसत गेला तसे सतरंज्यांचे आकारही वाढत गेले. या सतरंज्या बाहेर विक्रीसाठी जाऊ लागल्यावर ऑर्डरींचं प्रमाण वाढत गेलं. आनंदवनातली सतरंजी म्हणजे किमान दहा वर्षांची गॅरंटी, अशी जाहिरात आमच्या ग्राहकांनीच केली. त्यामुळे आजही सतरंजी हे आनंदवनातल्या विक्रीकेंद्रातलं 'मोस्ट पॉप्युलर' उत्पादन आहे.



.. आणि सतरंजी उद्योग उभा राहिला.
या उद्योगाचा पाया घालणारे सुधाकर कडू.



आता सतरंजी विभागात ऑर्डरींप्रमाणे कितीही मोठ्या सतरंज्या करून मिळतात. त्यामुळे आनंदवन एमआयडीसीतला एक मोठाच्या मोठा हॉल फक्त सतरंजी विभागासाठी आहे. गंमत म्हणजे आमच्याकडचं हे एकच काम असं आहे जे सुरू झाल्यापासून त्याच्या तंत्रज्ञानात काहीच फरक पडलेला नाही. इतर ठिकाणी आम्ही काळानुसार काही ना काही सुधारणा करत गेलो आहोत. तसा प्रयत्न इथेही केला; पण यंत्राचा वापर करून तयार झालेल्या सतरंज्या विसविशीत झाल्या. त्यामुळे तो प्रयत्न सोडून आम्ही पुन्हा हातानेच सतरंज्या विणू लागलो. पण हातावरचं काम असलं तरी आमचा सतरंजी विभाग येऊन

बघाल तर चाट पडाल. तब्बल चाळीस फूट लांबीचे ताणे लावून मोठमोठाल्या सतरंज्या विणण्याचं काम चाललेलं तुम्हाला दिसेल.

उत्पादन वाढवायचं तर हँडलूम्सच्या पुढे एक पाऊल टाकून पॉवरलूम्सही बसले पाहिजेत, अशी बाबांची इच्छा होती. त्या वेळी पॉवरलूम्स घ्यायचे म्हणजे सरकारची मान्यता आणि लायसन्स, म्हणजे 'टेक्समार्क' लागायचं. त्यानुसार आम्ही अर्ज करून मान्यता मिळवलेली होती, पण अजून लायसन्स आमच्या हातात येत नव्हतं. तीनेक वर्षं अशीच गेली असतील.

एकदा १९८३ च्या मित्रमेळाव्याला दिलीप हेर्लेकर हा मुंबईचा टेक्स्टाइल इंजिनियर आनंदवनात आला. मित्रमेळावा झाल्यावर तो दोन दिवस इथे थांबला होता. तो फिनले मिलमध्ये काम करत होता. त्याच्या क्षेत्रातला उद्योग म्हणून मी त्याला हँडलूम विभाग दाखवला आणि पॉवरलूम्सचं भिजत घोंगडंही त्याच्या कानावर घातलं. मी त्याला म्हटलं, "तू रस घेतलास तरच काही तरी होऊ शकेल." त्यानेही उत्साह दाखवला. म्हणाला, "बघतो काय करता येतं ते.' तो मुंबईला गेला आणि झपाटून कामालाच लागला. त्याने मिलमधल्या त्याच्या सहकाऱ्यांसमोर हा विषय काढला. त्यांच्याशी बोलताना त्याला कळलं, की त्यांच्या मिलमधून बाहेर पडून सरकारी नोकरीत दाखल झालेले इंदुशेखर राव नावाचे अधिकारी नेमके टेक्स्टाइल कमिशनरच्या ऑफिसमध्ये चांगल्या पदावर काम करत आहेत. त्याच्या सहकाऱ्यांचं म्हणणं पडलं की त्यांना भेटून किमान त्यांचा सल्ला तरी घ्यावा. मग दिलीप एका ज्येष्ठ सहकाऱ्यांबरोबर त्यांना भेटायला गेला. योगायोग असा, की हे गेले होते रावांकडे सल्ला घ्यायला, पण तिथे गेल्यावर कळलं की आमचं लायसन्स सँक्शन करण्याचे अधिकार त्यांच्याकडेच होते. त्यांच्याशी बोलल्यावर उलगडा झाला, की नागपूरमधल्या अधिकाऱ्यांच्या गलथानपणामुळे ते काम मागे पडलं आहे. हे काम लगेच मार्गी लावण्याचं आश्वासन राव यांनी दिलीपला दिलं, आणि त्यानुसार अक्षरशः तीन आठवड्यांत लायसन्सचं पत्र आमच्या हातात पडलं. पुढे नागपूरमधून त्याची प्रत्यक्षात अॅलॉटमेंट व्हायला तीन महिने गेले ते वेगळं. पण दिलीपच्या पुढाकारामुळे एक महत्त्वाचं काम मार्गी लागलं.

पण तेवढं काम करून दिलीप थांबला नाही. पॉवरलूम्स विकत घेऊन ते आनंदवनात बसवून देण्याची जबाबदारीही त्यानेच घेतली. त्याचा एक किस्सा सांगण्यासारखा आहे. बाबा आणि दिलीप असं दोघांचंही वेगळेपण त्यातून कळतं. लायसन्स मिळालं तेव्हा बाबा त्यांच्या एका ऑपरेशनसाठी मुंबईत होते. दिलीप तिकडे जाऊन बाबांना भेटला. पॉवरलूम्स बसवण्यासाठी पुढे कसं करायचं याबाबत त्यांच्याशी चर्चा करायची, असं त्याच्या डोक्यात होतं. पण बाबा म्हणजे महाबिलंदर. त्यांनी दिलीपच्या हातात कोरा चेक ठेवला आणि ते म्हणाले, "जे काही करायचं ते तू ठरव. माझा तुझ्यावर विश्वास आहे." दिलीपची आनंदवनाशी ओळख होऊन अजून सहा महिनेही झाले नव्हते. बाबा तर त्याला फक्त दुसऱ्यांदाच भेटत होते. पण माणसं ओळखण्याची आणि त्यांच्यावर विश्वास टाकून त्यांना कामात सामील करून घेण्याची बाबांची हातोटी कमालीची होती.

दिलीपनेही बाबांच्या या विश्वासाला दाद दिली. खरं तर तो पॉवरलूम्स बसवून देण्यासाठी आम्हाला फक्त मदत करणार होता. पण बाबांच्या या एका छोट्या कृतीमुळे पुढे दीडेक वर्षाने तो मुंबईतली नोकरी सोडून चक्क आनंदवनात दाखल झाला. पुढे दहा वर्षं आनंदवनाच्या एमआयडीसीचा सगळा भार त्याने उचलला. संस्थेच्या इतर कामातही त्याचा सहभाग असायचा. बाबा-ताई किंवा मी आनंदवनात नसलो तर निर्णयांची जबाबदारी असायची ती दिलीपवरच. इतक्या सचोटीने आणि निरलसपणे काम करणारा दुसरा कार्यकर्ता माझ्या पाहण्यात नाही. पुढे कौटुंबिक जबाबदाऱ्यांमुळे त्याला मुंबईला परत जावं लागलं. पण त्यानंतरही त्याचं आनंदवनाशी असलेलं नातं तितकंच घट्ट राहिलं. आज तो ‘महारोगी सेवा समिती’चा विश्वस्त आहे.

दिलीप माझ्यासारखाच; इंजिनीअरिंगचं डोकं असलेला आणि प्रयोग करण्यास उत्सुक. त्यामुळे १९८५ नंतर आम्ही उद्योगधंद्यांमध्ये अनेक नव्या कल्पना राबवायला सुरुवात केली. आनंदवनाला एक खंदा कार्यकर्ता मिळाला. मी नेहमी म्हणायचो, आनंदवन मित्रमेळाव्यातून दरवर्षी एक मित्र मिळाला तरी खूप झालं. तसा हा ८३ साली मिळालेला कार्यकर्ता.

तर सांगत काय होतो, की बाबांकडून कोरा चेक मिळाल्यावर दिलीपने २० हजारांना सेकंडहँड पण चांगल्या दर्जाचे चार पॉवरलूम्स विकत घेतले. तो आनंदवनात पहिल्यांदा आला त्यानंतर सहा महिन्यांच्या आत हे लूम्स आनंदवनात बसलेले होते. हे लूम्स वापरण्याचं प्रशिक्षण देण्यासाठी दिलीप त्याच्या मिलमधूनच एक फोरमन आणि एक फिटर घेऊन आला. त्यांनी लूम्स सुरू केले आणि कुष्ठरुग्णांना प्रशिक्षण द्यायला सुरुवात केली. मला या सगळ्याच माणसांचं फार कौतुक वाटलं. हे फोरमन-फिटर स्वतःची हक्काची रजा काढून आनंदवनात राहिले. त्या काळी कुष्ठरुग्णांच्या संस्थेत येऊन त्यांना प्रशिक्षण देणं ही वाटतं तितकी सोपी गोष्ट नव्हती. फिनले मिलमधल्या दिलीपच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनीही हे काम करण्यासाठी त्याला पूर्ण पाठिंबा दिला. त्याचे बॉस एक पारसी बाबा होते. ते दिलीपला म्हणायचे, “तू अच्छे काम के लिए जा रहा है। हम तुम्हारे साथ हैं।” अशा सगळ्यांचे हातभार लागल्यामुळेच १९८३ च्या ऑगस्टमध्ये आनंदवनात पॉवरलूम्स धडधडू लागल्या. या लूम्समुळे आमचं उत्पादन कित्येक पटींनी वाढलं. जिथे दिवसाला प्रत्येक माणूस १५-२० मीटर कापड काढायचा तिथे आता प्रत्येक लूमवर आठ तासात १०० मीटर कापड तयार होऊ लागलं.



मोठ्या खटपटीने आनंदवनात
पॉवरलूम्स आणणारे कार्यकर्ते दिलीप हेर्लेकर

पॉवरलूम्समुळे आनंदवनाची कापडाची गरज तर भागलीच, पण कापड बाहेर विक्रीसाठीही जाऊ लागलं. इथेही आम्ही दर्जाशी तडजोड करण्याचा प्रश्न नव्हता. त्यामुळे थोड्याच काळात बाहेरच्या संस्थांकडूनही आम्हाला कापडाची मागणी येऊ लागली. पुढच्याच वर्षी साबळे वाघिरे अँड कंपनीने आम्हाला त्यांच्याकडची चार नवी पॉवरलूम्स दिली. त्याच्या पुढच्या वर्षी आणखी दहा सेकंडहँड पॉवरलूम्स विकत घेतली. त्यानंतर कामाचा आवाका खूप वाढला. एखाद्या व्यावसायिक कंपनीप्रमाणे आम्ही बाहेर माल पुरवू लागलो. अगदी 'एल अँड टी'सारख्या मल्टिनॅशनल कंपन्यांसाठीही आम्ही कापड पुरवलं.



'आनंदवन एमआयडीसी'त
महत्त्वाचा वाटा असणारा पॉवरलूम्सचा विभाग.

त्याचं असं झालं, की 'एल अँड टी' कंपनीतले एक अधिकारी अनेकदा त्यांच्या चंद्रपूरजवळच्या फॅक्टरीत जाताना आनंदवनात थांबत असत. पण या गृहस्थांनी कधीच आनंदवन फिरून पाहिलं नव्हतं. एकदा कोणत्या तरी कार्यक्रमासाठी त्यांनी बाबांना पाहुणे म्हणून बोलावलं. त्या कार्यक्रमात बाबांनी तिथे जमलेल्या सर्वांना आनंदवनात येऊन तिथले उद्योग पाहण्याचं आमंत्रण दिलं. काही दिवसांनी तिथल्या अधिकाऱ्यांच्या बायकांचा एक मोठा ग्रुप आनंदवनात आला. त्यांच्याबरोबर एक-दोघे पुरुष अधिकारीही होते. त्यातला एक नेमका पर्चेस अधिकारी होता. आनंदवनातले उद्योगधंदे पाहून तो चाटच पडला. म्हणाला, "आम्हाला लागणाऱ्या केवढ्या गोष्टी तुमच्याकडे तयार होतायत! विशेषतः कापड. त्याचं कोटेशन पाठवा. आपण लगेचच ऑर्डर देऊन टाकू." त्याप्रमाणे आमच्याकडून कोटेशन गेल्यावर त्यांची मोठी ऑर्डर आम्हाला मिळाली. ती

आजतागायत चालू आहे.

समाजातली कुष्ठरुग्णांबद्दलची अढी आणि गैरसमज दूर करण्याचं काम जेवढं उद्योगधंद्यांनी केलं असेल तितकं क्वचितच दुसऱ्या कोणत्या उपक्रमामुळे झालं असेल.

टिन कॅन प्रोजेक्टच्या सोबतीने आनंदवनात मेटल फॅब्रिकेशनला सुरुवात झाली. सुरुवातीला या वर्कशॉपचा उपयोग आनंदवनाची गरज भागवण्यासाठीच होत होता. पूर्वी फॅब्रिकेशन होत नसताना हॉस्पिटलमधल्या पलंग, टेबलं, कपाटं सगळं लाकडाचंच असायचं. कुष्ठरुग्णांच्या घरांमध्येही लाकडाचंच फर्निचर असे. कौलारू घरांचे सांगाडेही लाकडीच होते. अगदी हॉस्पिटलमध्ये सलाइनचे स्टँडही लाकडी असत. फक्त सलाइन अडकवण्याचा हुक लोखंडी असे. पण नंतर लाकूड महाग होत गेलं आणि काही वेळा ते प्रचंड जड असल्याने गैरसोईचं ठरू लागलं. मग आम्ही लोखंडी वस्तूंकडे वळलो.


सुरुवात झाली ती पलंग तयार करण्यापासून. टिन कॅनचा प्रकल्प सांभाळणारा गिरिधर असो किंवा त्याच्या हाताखालची इतर मंडळी, कोणीही फॅब्रिकेशनचं काम शिकलेलं नव्हतं. पण गिरिधर पहिल्यांदा तयार होणाऱ्या कोणत्याही वस्तूचं स्केच काढून बघायचा. बाबांना दाखवायचा. त्यात बाबांच्या आणि वर्कशॉपमध्ये काम करणाऱ्या इतरांच्या सूचनांची भर पडायची आणि मग काम सुरू व्हायचं. पुढे मी कामात लक्ष घालू लागल्यावर तर काय, वर्कशॉप म्हणजे माझ्यासाठी प्रयोगशाळाच! त्यामुळे गिरिधरच्या प्रयोगांमध्ये मीही सामील झालो. कळत दोघांनाही नव्हतं. त्यामुळे काही घोटाळेही आम्ही केले. पहिल्यांदा वेल्डिंग मशीन आलं तेव्हा ते वापरताना काळा चष्मा लावायचा असतो याची कुणाला माहिती होती? तसे चष्मे तरी तेव्हा होते की नाही कोण जाणे! त्यामुळे आम्ही दोघांनी उघड्या डोळ्यांनी वेल्डिंग केलं. त्याचे परिणाम आम्ही अजूनही भोगतोय.

पण ते दिवस मजेचे होते. रोज नव्या कल्पना सुचायच्या. बाहेर कुठे गेलो की काही तरी नवी वस्तू दिसायची. तशी आपल्याकडे करायला जमेल का हे बघायचं. पलंग, कपाटं, डेस्क यांचं उत्पादन आम्ही एवढं वाढवलं की बाहेरच्या अनेक संस्था, सरकारी कार्यालयांमधून आम्ही ऑर्डर घेऊ लागलो. कधी कधी तर अगदी थोड्या कालावधीत मोठ्या ऑर्डरींचं काम यायचं. तेव्हा गिरिधर त्याच्या वर्कशॉपमधल्या सगळ्यांना विश्वासात घेऊन ऑर्डर घ्यायची की नाही याचा निर्णय घ्यायचा. एकदा ठरलं की मग सगळे असे काही कामाला जुंपून घ्यायचे, की बाहेरच्या कारखान्यात अशक्य वाटतील अशा ऑर्डरी इथे सहजी पूर्ण व्हायच्या. त्याही वर्कशॉपमधला प्रत्येक माणूस कोणत्या ना कोणत्या प्रकारचं व्यंग बाळगत असूनही.

हे चित्र अजूनही कायम आहे. आज वर्कशॉपची जबाबदारी प्रशांत देशमुख हा तरुण कार्यकर्ता तितक्याच उत्साहाने सांभाळतो आहे. अगदी परवाची गोष्ट. आदिवासी विकास महामंडळाकडून आम्हाला कपाट, पलंग, टेबल वगैरे वस्तूंची एक मोठी ऑर्डर आली. जवळपास ३५ लाखांची. तीन महिन्यांत ते काम पूर्ण करून हवं होतं. वर्कशॉपमधल्या लोकांनी हे चॅलेंज स्वीकारलं आणि अगदी वेळेत ते पूर्णही केलं.

गिरिधरच्या हाताखाली माणसं तयार होऊ लागल्यावर आम्ही काही नवी उत्पादनंही सुरू केली. त्यातलं एक उदाहरण म्हणजे एअर कूलर्स. आमच्या विदर्भात उन्हाळा प्रचंड. त्यामुळे अगदी गावागावांमध्ये कूलर्सची मागणी असते. शिवाय अशा कूलर्सच्या दुरुस्तीचंही काम मोठं असतं. आनंदवन जनरल वर्कशॉपमधले आमचे कामगार, (खरं तर त्यांना कारागीरच म्हणायला हवं.) दुरुस्त्यांमध्ये माहीर होते. कारण आनंदवनाचंच खटलं एवढं होतं की तिथे सदान्कदा कसल्या ना कसल्या दुरुस्त्यांची गरज लागायचीच. कधी तरी बाहेरच्या गावातून एअर कूलर्सच्या दुरुस्तीचं काम आलं. तेव्हा तो कुलर उघडून पाहिल्यावर लक्षात आलं की असे कुलर्स आपणही तयार करू शकतो. आतला पंप बाजारातून आणला की झालं. मी गिरिधरला ही कल्पना बोलून दाखवली. तोही एका पायावर तयार झाला. आणि खरोखरच आम्ही एखाद्या मॅन्युफॅक्चरिंग कंपनीच्या तोडीस तोड कूलर्स तयार केले. एअर कूलर्सच्या यशानंतर आम्ही आणखीही काही प्रयोग केले. त्यातला पहिला म्हणजे एअरकंडिशनर तयार करण्याचा. किर्लोस्कर कोपलँड कंपनीचा कॉंप्रेसर, दिल्लीची बॉडी, मुंबईहून रेडिएटर, असं सगळं गोळा करून प्रयोगाला लागलो. वेळ गेला, पण एसी तयार झाला. हा आमचा 'आनंदवन मेड' एसी आजही कार्यरत आहे. तसाच नंतर प्रयोग झाला तो डीप फ्रीजरचा. हेमलकशात प्रकाशला प्राण्यांसाठीचं मटण ठेवण्यासाठी डीप फ्रीज लागायचा. मग तेही करून पाहिलं.





मेटल फॅब्रिकेशनचा उद्योग उभा करणारे गिरिधर राऊत

आनंदवनाजवळ असणाऱ्या व्होल्टास कंपनीसाठी थर्मोस्टॅट असेंब्लिंगचं कामही आमच्याकडे बरीच वर्षं सुरू होतं. केवळ २० लोकांचं युनिट होतं हे. पण त्यातून आम्हाला वर्षाला लाखभर रुपये मिळायचे.

माझ्याकडे मेटल फॅब्रिकेशनमधले प्रयोग शिकवणारी निरनिराळी पुस्तकं होती. ती वाचून मी वर्कशॉपमध्ये उतरायचो. सोबतीला गिरिधरसारखी उत्साही मंडळी असायचीच. आमच्याकडे हे एक वेगळंच स्पिरिट आहे. माणसं उत्साहाने ओसंडत असतात. काही नवं करायचं म्हटलं की त्यांच्या अंगात वीरश्री संचारते. सगळे बाह्या सरसावून कामाला लागतात. रात्र-रात्र माणसं वर्कशॉपमध्ये काम करताना दिसतात. बाबांना या उत्साहाचं जबरदस्त कौतुक होतं. असा एखादा नवा प्रयोग करायचा झाला की ते आमच्या पुढे असत. रात्रीतून दोनदोनदा चक्कर मारत. माणसांना मनापासून आणि आनंदाने काम करताना बघण्याएवढा आनंद कशातही नाही, असं ते नेहमी म्हणत. सुदैवाने हा आनंद

आम्हा सगळ्यांना भरभरून मिळाला.

अशा प्रयोगांमुळे आनंदवनात किती नवनव्या वस्तू तयार झाल्या असतील याची मोजदादच नाही. त्यातल्या ज्या वस्तू उपयोगी पडल्या, किफायतशीर ठरल्या त्यांचं उत्पादन पुढे सुरू राहिलं, बाकीचं बंद झालं.

या वर्कशॉपमध्ये तयार होणारी प्रत्येक वस्तू आम्हाला निखळ आनंद देऊन गेली. पण त्यातही सगळ्यात वरचा नंबर लागतो तो अपंगांसाठीच्या तीन चाकी सायकलींचा. अपंगांसाठी पूर्वी प्रामुख्याने व्हीलचेअरच वापरली जायची. पण व्हीलचेअरला कुणी तरी ढकलावं लागतं. याचा अर्थ आणखी एका माणसावर अवलंबून राहणं आलं. त्या काळी अपंगांसाठी तीन चाकी सायकलीही होत्याच, पण त्यात अनेक त्रुटी होत्या. सर्वच प्रकारच्या अपंगांना त्या चालवता येत नसत. आम्हाला त्या त्रुटी जास्तच जाणवत. कारण कुष्ठरुग्णांचं अपंगत्व इतरांपेक्षा वेगळं असे. हाता-पायाची बोटं झडल्यामुळे त्यांना ग्रिप मिळवायला, ब्रेक दाबायला अवघड जात असे. अनेकदा कुष्ठरोगामुळे पायाचं एलिफंट फूट अँप्युटेशन करावं लागल्यामुळे पायाचा आकार भला मोठा अन् वेडावाकडा झालेला असे. शिवाय ग्रामीण भागातल्या छोट्या अन् उंच-सखल गल्ल्यांमधून पूर्वीची अवाढव्य तीनचाकी सायकल शिरणं अवघड होतं. तसंच ती बरीच महाग असायची हे वेगळंच.

आमच्याकडे फॅब्रिकेशनचं काम जोरात सुरू झाल्यावर मी एकदा अशीच एक बाजारात मिळणारी तीन चाकी सायकल उचलून वर्कशॉपमध्ये आणून टाकली. गिरिधरला म्हटलं, “ही अशी सायकल आपण करू शकणार नाही का?” गिरिधरचं उत्तर काय असेल? तो म्हणाला, “अशी कशाला? आपण याच्यापेक्षा चांगली सायकल करू ना.” मी म्हटलं, “क्या बात है!”

या सायकलीमध्ये मला जे काही प्रॉब्लेम्स जाणवत होते ते मी गिरिधरला सांगितले. त्यानेही त्या सायकलीचा नीट अभ्यास केला. आणि थोड्याच दिवसांत मला एका नव्या सायकलीचं स्केच आणून दाखवलं. ते माझ्या अपेक्षेच्या बऱ्यापैकी जवळ जाणारं होतं. त्यात काही दुरुस्त्या सुचवल्यानंतर गिरिधर आणि त्याचे साथी लागले कामाला. फॅब्रिकेशन हा त्यांच्या डाव्या हाताचा मळ होता. दोन दिवसांत रात्र-रात्र जागून त्यांनी नवी सायकल तयार केली. त्या दोन दिवसांतला बराचसा वेळ मीही वर्कशॉपमध्येच असायचो. सायकल तयार झाल्यावर आनंदवनातला आमचा कार्यकर्ता करीम याला ती सायकल चालवायला दिली. खरं तर त्याच्यासाठीच मी ही सायकल डिझाइन केली होती असं म्हटलं तरी चालेल. त्याला काय अडचणी येतात ते पाहिलं. आणखीही एक-दोघा अपंगांना ती दाखवून त्यांचं मत विचारलं. आम्हीही डोकं लावलं. ज्या गोष्टी जाणवल्या त्या लक्षात घेऊन त्या डिझाइनमध्ये आणखी थोडे बदल केले आणि झाली की आमची इनोव्हेटिव्ह तीन चाकी सायकल तयार! आम्हाला हवी तशी, अपंग-कुष्ठरुग्णांना स्वयंपूर्ण बनवणारी सायकल.

ही सायकल बनवण्याचा पहिला उद्देश होता आनंदवनातल्या गरजूंना त्यांच्या पायांवर उभं करणं. त्यांना कधीही कोठेही जाण्यासाठी, आवारात फिरण्यासाठी

कोणाचीही मदत लागता कामा नये, एवढीच आमची इच्छा होती. त्यामुळे सुरुवातीला सायकलींचं उत्पादन होत होतं ते फक्त आनंदवनातल्या लोकांसाठीच. सुरुवातीच्या काळातलं ते दृश्य अजूनही माझ्या डोळ्यांसमोर आहे. अपंग आणि काही कुष्ठरुग्ण या सायकलवरून आनंदवनाचा फेरफटका मारायला निघायचे तेव्हा त्यांची आत्मविश्वासपूर्ण सवारी बघून इतरांच्या डोळ्यांत आनंदाने पाणी उभं राही. आनंद दोन गोष्टींचा असायचा. आपले हे मित्र आता इतर कोणापेक्षाही कमी नाहीत याचा, आणि आपल्याच संस्थेमध्ये त्यांच्यासाठी अशी सायकल तयार होऊ शकली याचाही! आजही अशा तीन चाकी सायकली तयार करणारं महाराष्ट्रातलं आमचं एकमेव केंद्र आहे.


आनंदवनात डिझाइन केलेल्या तीनचाकी सायकलींचा मास्टर – बंडू येनगंटीवार.

थोड्याच दिवसांत आमच्या वर्कशॉपमधल्या कार्यकर्त्यांनी तीन चाकी सायकलींमध्ये इतकी मास्टरी मिळवली, की याचं उत्पादन वाढवता येऊ शकतं हे आमच्या लक्षात आलं. तसंही आनंदवनाला भेट देण्यासाठी येणाऱ्या पाहुण्यांनी या सायकली बघितल्यानंतर त्याची बातमी बाहेरच्या जगात नेली होतीच. शिवाय आमची ही सायकलस्वार मंडळी आनंदवनाच्या बाहेर वरोऱ्यात किंवा जवळच्या आणखी एखाद्या गावातही या सायकलवरून सहज जाऊन येत. त्यामुळे आसपासच्या खेड्यांमधूनही सायकलीला मागणी येऊ लागली.

मग पुन्हा एकदा वर्कशॉपमधल्या कारागिरांची बैठक जमली आणि बाहेर विकण्यासाठी सायकली तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्या वेळी आमचा बंडू येनगंटिवर ही सायकल तयार करण्यात असा काही तयार झाला होता की बास! तो एकटाच सायकलींचा अख्खा विभाग सांभाळत असे. आज वर्षाला १००० सायकली तयार करण्याची आमची क्षमता आहे ती एकट्या बंडूच्या जिवावर. सगळ्यात समाधानाची बाब म्हणजे राज्याच्या सामाजिक न्याय विभागाने आमच्याकडून सायकली घ्यायला सुरुवात केली आहे. त्यासाठी महारोगी सेवा समिती आणि आणखी दोन-तीन संस्थांची नावं असलेला जीआरच त्यांनी काढला. त्यामुळे सरकारी खरेदी असूनही तिथे टेंडर भरण्याची गरज पडत नाही. अजूनही दरवर्षी सामाजिक न्याय विभाग, काही आमदार-खासदार

आमच्याकडून सायकली खरेदी करतात.

राज्याच्या कानाकोपऱ्यातल्या गरजूंपर्यंत आपण बनवलेल्या या सायकली पोहोचतात, या विचाराने मला, गिरिधरला आणि बंडूसारख्या आमच्या कार्यकर्त्यांना अपार आनंद होतो.


आनंदवन हे जसं उत्पादन केंद्र आहे तसंच सेवा देणारं केंद्रही. त्याचीही सुरुवात स्वतःच्या गरजा भागवण्यातूनच झाली म्हणा ना. दोन उदाहरणं सांगतो. आनंदवनात पहिली गाडी आली तेव्हा दुरुस्तीसाठी ती कुठे बाहेर देणं शक्य नव्हतं. आमच्याकडची ड्रायव्हर मंडळीच ती गाडी उघडून दुरुस्त्या करायची. आनंदवनातली ड्रायव्हर मंडळी हेही एक अफलातून प्रकरण आहे. सुरुवातीच्या काळात बाबा स्वतःच बेफाम ड्रायव्हिंग करायचे. पण नंतर कुष्ठमुक्त कार्यकर्त्यांमधूनच ड्रायव्हर्स तयार होत गेले. या ड्रायव्हर्ससोबत बाबांचा नागपूर, सोमनाथ, हेमलकसा या ठिकाणी सतत प्रवास सुरू असायचा. भास्कर भोईर, महादेव कोंद, इनायतखाँ पठाण हे बाबांचे खंदे ड्रायव्हर. त्या तिघांनी सोमनाथ-हेमलकसा या खेपा किती वेळा केल्या असतील याची काही मोजदादच नाही. पण त्याहीपलीकडे कन्याकुमारी ते काश्मीर आणि आसाम ते गुजरात या दोन भारत जोडो यात्रा, बाबांचे सहा पंजाब दौरे, बाबा-ताई नर्मदा मुक्कामी असताना तिथे ये-जा करणं, असा लाखो किलोमीटरचा प्रवास या तिघांनी केला. तोही पूर्ण सुरक्षितपणे. भास्कर तर ड्रायव्हिंग करण्याबरोबरच बाबांचा खासगी सचिव, हिशोब तपासनीस, आनंदवनातली खरेदी, अशाही जबाबदाऱ्या सांभाळत असे. त्यातला पठाण हा गाड्यांच्या दुरुस्त्यांमध्येही तरबेज होता. आमच्या गाड्यांची दुरुस्ती तो स्वतःच करायचा. त्याच्याकडूनही मी गाडीदुरुस्तीतल्या काही गोष्टी शिकलो. हळूहळू माझ्यासोबत आणखीही काही तरुण माणसं हे काम करू लागली. प्रभाकर समुद्रे आणि दिवंगत श्रीकांत गद्रे हे दोघंही माझे वाहनदुरुस्तीतले प्रमुख सहाय्यक म्हणून कितीतरी वर्षं काम करत होते. इथपर्यंत ठीक होतं. पण लवकरच बाहेरच्या गाड्याही आमच्याकडे दुरुस्तीला येऊ लागल्या, याला काय म्हणावं? कोणतंही काम हातात घेतलं की ते शिकून त्यात तरबेज होऊनच थांबायचं याचा संसर्ग जणू आनंदवनाच्या हवेतच असावा!

केवळ गाड्यांचंच नव्हे, तर इलेक्ट्रिकल-इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या देखभालीचं कामही अगदी सुरुवातीपासून आनंदवनातल्या कार्यकर्त्यांनी केलं आहे. इलेक्ट्रिक फिटिंगपासून ते दुरुस्त्यांपर्यंत सगळं काही. याचं कोणीही अधिकृत प्रशिक्षण वगैरे घेतलेलं नाही. सगळेजण 'हँडस ऑन' पद्धतीनेच शिकलेले आहेत. मला आठवतं, एकदा आनंदवनाच्या बाहेरच्या बाजूला रस्त्यावर एमएसईबीची एक मुख्य जिवंत वायर तुटून लोंबकळत होती. कोणाचा चुकून स्पर्श झाला तर मोठा अपघात होईल अशी भीती होती. पण आमच्या पुंडलिक बहाद्दुरेने प्रसंगावधान राखून मुख्य करंट बंद केला आणि अनर्थ टळला. त्यानंतर थोड्याच वेळात एमएसईबीचे इंजिनियर आले. मेन स्विच बंद केलेला बघून त्यांनी 'हे कोणी केलं' याची चौकशी केली. पुंडलिकचं नाव कळल्यावर त्यांनी त्याला भेटून शाबासकी दिली. 'एमएसईबीच्या कामगारांनाही जी गोष्ट वेळीच सुचेल असं नाही

ती या साध्या बेअरफूट इलेक्ट्रिकल इंजिनियरने करून दाखवली' असं म्हणून त्यांनी खूप कौतुक केलं. मग आनंदवनात फेरफटका मारताना या अडीच हजार लोकवस्तीच्या गावाची इलेक्ट्रिकची कामं आतल्या आतच होतात आणि आजवर एकही मोठा अपघात न होता हे गाव नांदतं आहे, हे जेव्हा त्यांना कळलं तेव्हा तर त्यांना वाटलेलं आश्चर्य लपत नव्हतं.

आजही इलेक्ट्रिकल फिटिंग-प्लंबिंग-मोटार रिवाइंडिंग अशी सगळी कामं आमची टीम करते. डॉ. पोळांचा भाचा अतुल मांडवगणे याच्या हाताखाली या विभागात चाळीस लोक काम करतात, आणि अर्थातच आनंदवनातले ते 'मोस्ट वाँटेड' लोक आहेत.

आनंदवनात कुष्ठरुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढू लागली तेव्हापासून, म्हणजे साधारण सत्तरच्या दशकात एक उद्योग इथे सुरू झाला होता. तो म्हणजे या कुष्ठरुग्णांसाठी खास रबरापासून तयार होणाऱ्या चपला बनवण्याचा. 'मायक्रो सेल्युलर रबरा'पासून बनणाऱ्या खिळेविरहीत चपला. सुरुवातीला आमच्या गरजेपुरत्या चपला बनत होत्या. हळूहळू चपला तयार करणारी इतकी माणसं तयार झाली, की आपण अशा चपला विक्रीसाठीही ठेवू शकतो हे लक्षात आलं. तोपर्यंत डायबेटिसच्या रुग्णांनाही अशा चपलांची गरज असते हे कळू लागलं होतं. सर्वसामान्यांनाही या चपलेचे अनेक फायदे होते. त्यामुळे साधारण १९७४ च्या सुमारास आम्ही विक्रीसाठी चपला तयार करण्याचं काम सुरू केलं. या विभागात एक सोनबा मोहकर नावाचा कारागीर होता. अतिशय हट्टी, पण उत्तम कारागीर. तो कोल्हापुरी पद्धतीच्या चपला उत्तम बनवायचा. आम्ही त्याच्यासाठी एक वेगळी खोली राखून ठेवली, आणि त्यानेही आयुष्यभर खूप चांगलं काम केलं. इतरही अनेक चांगले कारागीर या विभागात होते. नत्थू सोनेकार हा त्यातलाच. फिनलंडमधल्या एका दिग्दर्शकाने नत्थूवर एक सुंदर डॉक्युमेंट्री बनवली आहे.


आनंदवनातले चर्मकलाकार
– नत्थू सोनेकार.

चपलांची बाहेर विक्री सुरू झाली तसा डिझाइन आणि फिनिशिंगचा भाग

महत्त्वाचा बनला. मग मीही त्यात लक्ष घालू लागलो. नागपूर किंवा पुणे-मुंबईला गेलो की मी हमखास चपलांच्या दुकानात चक्कर टाकून यायचो. काही खूपच वेगळं दिसलं तर विकतही घ्यायचो. पण ते दरवेळी परवडायचं नाही. त्यामुळे बऱ्याचदा डिझाइन लक्षात ठेवून रात्री झोपण्यापूर्वी त्याचं स्केच काढून ठेवायचं आणि आनंदवनात परतल्यावर ते कारागिरांना दाखवायचं, असा मार्ग मी अवलंबला. आनंदवनातले बाकीचे कार्यकर्तेही असेच नव्या गोष्टींवर लक्ष ठेवून असायचे. शिवाय आनंदवनात सतत पाहुण्यांची ये-जा सुरू असायची. त्यांच्या चपलांकडेही आमचं लक्ष असायचं. त्यामुळे दर्जा हे आमचं वैशिष्ट्य होतंच; सोबत डिझाइन्समध्येही आम्ही कमी पडलो नाही. त्यामुळे आजही आमच्या चपला आणि सँडल्सना इतकी मागणी असते की, ती पुरवता पुरवता नाकी नऊ येतात. कित्येक मंडळी आनंदवनातल्या चपलांशिवाय दुसरं काही वापरायला तयार नसतात. ही आमच्या कारागिरांच्या कामाला दिलेली पावतीच आहे. यात सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे चप्पलनिर्मितीत गुंतलेल्या मंडळींपैकी एखादा माणूस पूर्वापार हे काम करणारा असेलही, पण बाकी सगळे कार्यकर्ते हे काम आपणहून शिकले आणि त्यात तरबेज झाले. म्हणूनच मला वाटतं, की आनंदवनाने जातिपातींचं आणि त्यातून आलेल्या व्यवसायांच्या सक्तीचं कुंपण मोडून काढण्याचंही काम केलं आहे. अन्यथा, इतर जातीतला माणूस कुठे हा व्यवसाय इतक्या आनंदाने अन् अभिमानाने करत असेल? पण आमच्या इथे आजही तुम्ही चर्मकला विभागात चक्कर माराल, तर एखाद्या गायकाने रियाज करावा तितक्या तन्मयतेने माणसं काम करताना दिसतील.


लेदर उत्पादनांमध्ये
विविध प्रयोग करणारे मणिराम लंजे.

या विभागात दाखल झालेल्या मणिराम लंजे नावाच्या अस्थिव्यंग व्यक्तीमुळे या व्यवसायाला जोडूनच लेदरच्या वस्तू तयार करण्याचं काम सुरू झालं. बाबांकडे बिर्लांनी भेट दिलेली लेदरची एक देखणी फोल्डिंग बॅग होती. एकदा बाबांनी ती मणिरामला दाखवली. तो ती सोबत घेऊन गेला आणि १२ तासांत त्याने त्याच पद्धतीची पण जास्त चांगली टिकाऊ बॅग तयार करून बाबांना आणून दाखवली. मग तो एक स्वतंत्र विभागच तयार झाला. लेदरच्या पर्सेस, पिशव्या, पाठीवर लावण्याच्या सॅक्स, दफ्तरं अशा बऱ्याच वस्तू इथे हळूहळू तयार होऊ लागल्या. लेदरनंतर रेक्झिन आलं. त्याच्या वस्तू अधिक स्वस्त. त्यामुळे ग्रामीण भागात त्याला मागणी जास्त. शिवाय या वस्तू पावसाळ्यात वापरता येणाऱ्या. त्यामुळे त्याचंही उत्पादन झपाट्याने वाढलं. लंजेला शिवणातल्या

कसबाबरोबरच सौंदर्यदृष्टीही होती. त्यामुळे बाहेरच्या वस्तू बघून तशी डिझाइन्स तयार करण्याचा त्याचा प्रयत्न असायचा. कधी कधी आपल्या मनानेही तो एखादी वेगळीच पिशवी तयार करायचा. अर्थात पर्स-दप्तरं किंवा पिशव्यांमध्ये बाहेरच्या बाजारपेठेत इतकं वैविध्य आहे की त्यात टिकून राहणं अवघडच. पण तरीही आनंदवनामधल्या विक्रीकेंद्रांमध्ये या वस्तूंना चांगला उठाव असतो.



शिलाईविभाग आणि बराच मोठा काळ या विभागाची जबाबदारी सांभाळणाऱ्या सुमन कडू.



शिलाईकाम हा आनंदवनातल्या स्त्री-पुरुषांना रोजगार देणारा व्यवसाय. याही व्यवसायाला सुरुवात झाली ती गरजेतूनच. आनंदवनात राहणाऱ्यांच्या कपड्यांच्या गरजा भागवण्यासाठी कापड विणलं जात होतं. त्यामुळे त्या जोडीलाच शिवणकामही सुरू झालं. माणसं वाढत गेली तसा शिवणकामाचा व्याप वाढत गेला. १९७१मध्ये आम्ही जवळपास १४ शिलाई मशिन्स घेऊन या कामाचा व्याप वाढवला. सुरुवातीच्या काळात राम टेलर आणि सुधाकर कडूची बायको सुमनने इथे काम सुरू केलं. या दोघांनी असंख्य महिलांना शिलाईचं प्रशिक्षण देऊन तयार केलं. इथे आनंदवनातले कपडे शिवले जातात तसंच प्रशिक्षणाचंही मोठं काम चालतं. विशेषतः अपंग, कर्णबधिरांसाठी हा एक चांगला उद्योग ठरला आहे.

आनंदवनातल्या सगळ्या गरजा आतल्या आतच भागवता आल्या पाहिजेत, असा ध्यास आम्हाला सुरुवातीपासून लागलेला आहे. शिवाय एकदा निर्मिती सुरू झाली म्हटल्यावर काय करू आणि काय नको असं आम्हाला होऊन जातं. याच उत्साहात १९९० च्या सुमारास आम्ही पोह्याचं मशिन आणलं. आमच्या अशोक बोलगुंडेवारसोबत एक्सकॅव्हेटरच्या कामाला झाडीपट्टी भागातला एक माणूस होता. त्याचं नाव जनार्दन राऊत. झाडीपट्टीत पोह्याचं उत्पादन खूप. त्यामुळे त्याने पूर्वी पोहा मशिनवर काम केलेलं होतं. त्याच्या मदतीने आम्ही पोह्यांचं उत्पादन सुरू केलं. त्याच्यासोबत काम करणारी सर्व मंडळी एक्सकॅव्हेटर चालवणारीच होती. ‘एक्सकॅव्हेटर चालवणाऱ्या मंडळींना पोहे तयार करायला कसं जमणार’ असा प्रश्न अन्य कुणाच्या डोक्यात येऊ शकतो, पण आमच्याबाबत असं घडलं नाही.

तसंच बेकरीचंही. बेकरी करून बघावी असं माझ्या मनात फार वर्षांपासून होतं. ते खरं तर बाबांचं स्वप्न. त्यांना ब्रेड मनापासून आवडायचा. पण 'आपल्याकडे ब्रेड तयार झाला तरच मी खाईन', असा त्यांचा निर्धार. कधी कधी वाटतं, बाबांच्या या हट्टामुळेही आमच्याकडे अनेक कामं उभी राहिली. जोपर्यंत आपल्याकडे प्रिंटिंग सुरू होत नाही तोपर्यंत संस्थेला लेटरहेड नको, अशी त्यांची भूमिका होती. प्रेस सुरू झाल्यावरच त्यांनी लेटरहेड वापरायला सुरुवात केली. आपल्याकडे सगळं काही तयार करणं शक्य आहे यावर त्यांचा पुरेपूर विश्वास होता. ते म्हणायचे, "कल्पवृक्षाखाली मी कामधेनू घेऊन बसलो आहे."

त्यामुळे बेकरी करायला हवी असं आम्हाला नेहमी वाटायचं. ते स्वप्न पूर्ण झालं १९९० च्याच सुमारास. ते कामही अशोक आणि त्याच्या टीमनेच उभं केलं. त्यासाठी अशोक नागपूरला जाऊन बेकरीसाठी लागणारी सामग्री घेऊन आला. सुरुवातीला या बेकरीमध्ये आम्ही फक्त ब्रेड आणि टोस्ट तयार करायचो. बेकरी सुरू झाली तेव्हा ते नर्मदा बचाव आंदोलनासाठी तिकडे मध्य प्रदेशात कसरावदला राहत होते. तेव्हा आम्ही सगळेजण बाबांना भेटायला जाताना ब्रेड-टोस्ट घेऊन जात असू. आनंदवनात तयार झालेला ब्रेड खाताना बाबांचा चेहरा आनंदाने फुलून गेलेला असे. आम्ही तयार केलेला ब्रेड जास्त करून आनंदवनात येणाऱ्या पाहुण्यांसाठीच वापरला जायचा. पु.ल. तर या ब्रेडवर बेहद्द खूष होते. 'आनंदवनासारखा ब्रेड मी आजवर कुठेही खाल्लेला नाही', असं ते नेहमी म्हणायचे. पण आमच्या लोकांना मात्र ब्रेडची चव अजिबात आवडायची नाही. त्यांच्या दृष्टीने ते अगदीच नाइलाजाने खाण्याचं अन्न होतं. त्यामुळे आमच्या बेकरीतल्या मालाला पुरेसा उठाव नव्हता. त्यावर उपाय म्हणून आम्ही वरोऱ्यामध्ये ब्रेड आणि टोस्ट विकत होतो. पण ते फार दिवस चाललं नाही. कारण बाहेरच्या बेकऱ्यांमध्ये स्वस्त माल तयार होत होता आणि रंगबिंग वापरून जास्त आकर्षक केक वगैरेही. शेवटी बेकरी बंद करून टाकली.

आणखी एक प्रयोग आम्ही अलीकडच्या काळात केला. आमच्याकडे मक्याचं उत्पन्न खूप. त्यामुळे त्यापासून पॉपकॉर्न तयार करून बघावेत असं एकदा आम्हाला वाटलं. हे वाटलं कसं हीदेखील एक गंमतच. एकदा आमच्या अभयारण्यात तळ्याकाठी आम्ही सगळे कार्यकर्ते गप्पा मारत बसलो होतो. अभयारण्याची जागा आधी किती उजाड होती यावर बोलणं चाललं होतं. आता पशुपक्षी तर आहेतच, शिवाय वरोऱ्यातून लोक अभयारण्यात पिकनिकसाठी येतात. तरुण पोरंपोरी एकान्ताच्या शोधात इथे भटकतात. आता फक्त पॉपकार्न्स वगैरे मिळाले की झालं, असं कुणी तरी म्हणालं. मी म्हटलं, "त्यात काय अवघड आहे? आणा मशिन आणि करा पॉपकॉर्न!" सुधाकरने ते खरोखरच मनावर घेतलं. शेख हबीब नावाचा आमचा एक कार्यकर्ता त्या कामाला लागला. आणि खरोखरच आमच्याकडे पॉपकॉर्न्स तयार होऊ लागले. ते अजूनही चालू आहे.

१९७५-८० च्या दरम्यान आनंदवन एमआयडीसीतले सगळे उद्योग पूर्ण जोमाने

धडधडू लागले तेव्हा माझ्या मनात एक वेगळा विचार आला.

मला कलांची विलक्षण आवड. अंगात कला किती आहे माहिती नाही, पण कलेचा आस्वाद घेणं तरी मला नक्की जमतं. त्यामुळे कोणात चांगली सौंदर्यदृष्टी दिसली की तो माणूस मला आपला वाटतो. चित्रं काढून बघ, सुलेखन कर, विविध दगडगोटे जमा कर, असल्या छंदांमध्ये मी रमतो. आनंदवनाच्या एकूण व्यक्तिमत्त्वातही साधेपणाबरोबरच एक सौंदर्यदृष्टी असावी, असा माझा प्रयत्न कायम असतो. हीदेखील बाबांचीच देणगी असावी. बाबा रवींद्रनाथ टागोरांचे भक्त होते. उपयुक्ततेबरोबरच सौंदर्यवादावरही त्यांचा विश्वास होता. त्यामुळेच म्हटलं ना, की कुष्ठरुग्णांनी चांगले फुलाफुलांचे कपडे घातले, बायकांनी गजरे माळले, बोटं झडलेल्या हातावर मेंदी लावली की त्यांना अतिशय आनंद व्हायचा. पु. ल. तर नेहमी म्हणायचे, आनंदवनात कोबी आणि निशिगंध एकत्र नांदताहेत!

माझंही तसंच होतं. त्यामुळे एकीकडे कामांचा धबडगा सुरू असताना मी माझ्यातला कलाकारही जपायचो. बाबांचा पत्रसंपर्क खूपच दांडगा होता. देशभरातून अन् परदेशांतूनही त्यांना पत्रं यायची, दिवाळी-नववर्षाची ग्रीटिंग्ज यायची. ती मी जपून ठेवायचो. विशेषतः हाताने तयार केलेली ग्रीटिंग कार्ड्स मला खूप आवडायची. एकमेकांशी संवाद साधण्याचा, आपली आपुलकी व्यक्त करण्याचा तो एक चांगला मार्ग आहे असं मला वाटायचं. एकदा माझ्या मनात आलं, आनंदवनाने जोडलेल्या मित्रपरिवाराला आपण ग्रीटिंग कार्डच्या माध्यमातून शुभेच्छा का पाठवू नयेत? अशी कार्डं आपल्याला नक्कीच तयार करता येतील असा विश्वास वाटत होता. शिवाय ही कार्ड्स विकली जाऊ शकतात, असाही एक होरा होताच.

मला वाटतं, ते साल असावं १९८४. तोपर्यंत मला हे काम करू शकेल असं कोणी माणूस सापडत नव्हतं. गरजेची कामंच इतकी असायची की या ग्रीटिंग कार्डसाठी कुणी कशाला वेळ काढावा? त्या वेळी आमच्याकडे वर्कशॉपजवळ एक बगीचा होता. तिथे रमेश अम्रू नावाचा तरुण वॉचमन म्हणून काम करायचा. तो बगीचा नंतर उरला नाही, त्यामुळे रमेश तसा मोकळाच होता. एके दिवशी मी त्याला बोलावलं आणि त्याच्या हातात माझ्याकडची जमा केलेली ग्रीटिंग्ज ठेवली. त्याला म्हटलं, “आपण अशी काही ग्रीटिंग्ज करू शकतो का बघ.” खरं तर रमेशने अशा गोष्टींमध्ये कधी रस दाखवला नव्हता. शिवाय त्याची बोटंही कुष्ठरोगामुळे वाकडी झालेली होती. मग तरीही मी त्याच्याकडे हे काम का सोपवलं? त्याचं एकमेव कारण म्हणजे तो तेव्हा रिकामा होता. शिवाय माणसाला शिकता येणार नाही अशी कोणतीही गोष्ट नाही, असं माझं म्हणणं आहे. अगदी कलादेखील. मनापासून रस घेतला, मेहनत केली तर सगळं शिकता येतं. आपल्या अपंगत्वावर मात करत रमेशने हे सिद्ध करून दाखवलं.

रमेशनेच नव्हे, तर आनंदवनातल्या सगळयाच कार्यकर्त्यांनी. अगदी बाबांनीही. बाबांना तरी कुठे इंजेक्शन देता येत होतं, कुठे शेती करता येत होती, कुठे विहीर खणता येत होती? पण ते शिकले. आनंदवनाच्या उभारणीच्या काळात कोणत्याच गरजा भागवण्यासाठी बाहेरून कुशल कामगार येणं शक्य नव्हतं. त्यामुळे घरबांधणीपासून ते

शिवणकामापर्यंत सगळ्या गोष्टी कुष्ठरुग्णांनी शिकून घेतल्या. त्यामुळेच आनंदवनात आमचं म्हणणं असतं, ‘जॅक ऑफ ऑल ट्रेड्स अँड मास्टर ऑफ सम.’ त्यामुळेच इथे प्रत्येक माणसाने चार-दोन, चार-दोन गोष्टी करून बघितलेल्या, त्यात प्रावीण्य मिळवलेलं दिसतं. आसपास सगळं हेच वातावरण. त्यामुळे हस्तकला-चित्रकलेशी काहीएक संबंध नसताना रमेशही ग्रीटिंग्जचं काम करू लागला.


रमेश अम्रू यांच्या नेतृत्वाखाली चाळीस जणांचा विभाग दरवर्षी एक लाख ग्रीटिंग्जची निर्मिती करतो.

सुरुवातीला आमच्या संग्रहातील ग्रीटिंग्जच्या डिझाइन्सची नक्कल करण्याचं काम सुरू झालं. नंतर मी रमेशला नवी डिझाइन्स सुचवू लागलो. तो करत गेला. कधी त्याला जमायचं, कधी नाही जमायचं. तो खट्टू व्हायचा. मी त्याला समजावायचो, “येईल तुला. करत रहा.” हळूहळू ते जमू लागलं. शक्यतो फार चित्रकला वगैरे नसलेलं डिझाइन आम्ही करायचो. छोट्याशा आकारावर काही चिकटकाम वगैरे करण्याची पद्धत आम्ही स्वीकारली. जन्मजात कौशल्यापेक्षा सौंदर्यदृष्टी विकसित करण्यावर मी भर दिला. प्रत्येक माणसात सौंदर्यदृष्टी असतेच. रमेशमध्येही ती होती. मी फक्त ती विकसित केली एवढंच. नंतर त्याला माझीही गरज उरली नाही. पुढे त्याच्याबरोबर आणखी दोन माणसं तयार झाली आणि मग दोनाचे चार होत आता ग्रीटिंग्जच्या विभागात चाळीसेक माणसं काम करतात. दरवर्षी आम्ही लाखभर ग्रीटिंग्जची विक्री करतो म्हणजे बघा!

ग्रीटिंग्ज सुरू करण्याआधीपासूनच माझ्या डोक्यात यात वेस्ट मटेरियलचा उपयोग करावा असं होतं. आनंदवनाचा पसारा मोठा, त्यामुळे तिथे वेस्ट मटेरियल भरपूर तयार व्हायचं. अगदी कागदापासून ते धान्यातल्या फोलपटापर्यंत. मी एक कल्पना लढवली. ग्रीटिंग्जचं काम सुरू झाल्यावर मी आनंदवनातल्या सगळ्या विभागांतल्या लोकांना त्यांच्याकडचा कचरा आम्हाला द्यायला सांगितलं. मी आणि रमेश त्या कचऱ्यात डोकं घालून बसायचो. केळीच्या साली, धान्यांची चिपाडं, कापडाच्या चिंध्या, मॅगझिनची रंगीत कव्हर्स असं बरंच काही त्यात असायचं. कधी आपल्याला पाहिजे त्या आकारांमध्ये या गोष्टी कापून घ्यायचो, तर कधी एखाद्या टाकाऊ वस्तूमधून नवा आकार-नवं ग्रीटिंग सुचायचं. या प्रकारामुळे आमची ग्रीटिंग्ज वेगळी उठून दिसू लागली. त्याचा एक ‘यूएसपी’ तयार झाला.

आनंदवनाचे देणगीदार, मित्रमेळाव्याशी जोडलेले लोक, हितचिंतक, आमच्या इतर वस्तू खरेदी करणारे लोक अशा अनेकांना आम्ही ही ग्रीटिंग्ज पाठवायचो. शिवाय आनंदवनाच्या विक्रीकेंद्रामध्ये काही ग्रीटिंग्ज विकायलाही ठेवायचो. त्यामुळे हळूहळू या ग्रीटिंग्जना मागणी येऊ लागली. विशेषतः दिवाळी आणि नववर्षाच्या आधी कंपन्यांकडून ग्रीटिंग्जच्या ऑर्डरी यायला लागल्या. मग माणसं वाढवली आणि मोठ्या प्रमाणावर काम सुरू झालं. मुंबईत 'ग्राहक पेठे'च्या वार्षिक प्रदर्शनात आनंदनवात तयार झालेल्या सगळया वस्तूंचा स्टॉल लागायचा. अजूनही लागतो. तिथे या ग्रीटिंग्जवर लोकांच्या अक्षरशः उड्या पडल्या.

एकदा आमच्या मित्रांपैकी कुणी तरी मला माहिती दिली, की आनंदवनातली ग्रीटिंग्ज बाहेर दुप्पट किमतीला विकली जाताहेत. त्या वेळी आम्ही ग्रीटिंगच्या आत एक पांढरा कागद चिकटवून त्यात आनंदवनाचं नाव वगैरे लिहीत असू. कोणी तरी हा कागद फाडून टाकून बाहेरचं ग्रीटिंग स्वतःच्या नावाने विकण्याची शक्कल लढवली होती. ज्याअर्थी ग्रीटिंग दामदुपटीने विकण्याचा प्रयत्न होतोय त्याअर्थी आपला ब्रँड तयार झाला आहे हे स्पष्ट होतं. तेव्हा मी ठरवलं की ग्रीटिंगवरच आनंदवन ब्रँडचं नाव असलं पाहिजे. असं नाव छापायचं तर त्यासाठी स्क्रीन प्रिंटिंगचीच गरज होती. मग मी रमेशलाच नागपूरला स्क्रीन प्रिंटिंग शिकायला पाठवलं. ही गोष्ट असेल ९० सालची. आश्चर्य म्हणजे त्या वेळीसुद्धा रमेशला नागपूरमधल्या त्या छापखान्यात अस्पृश्यतेची वागणूक मिळाली. तिथला काम शिकवणारा मुख्य माणूस चांगला होता, पण त्याच्या हाताखालची माणसं रमेशला कुठल्याही यंत्राला हातच लावू देईनात. रमेशचा वैतागून फोन आला. मी त्याला म्हटलं, "तुला जेवढं जमतंय तेवढं शीक. पुस्तकं घेऊन ये, मशिन घेऊन ये. आपण करू." मग तो पुस्तकं घेऊन आल्यावर आम्ही स्क्रीन प्रिंटिंगशी चार हात करायला लागलो. मुख्य काम रमेशचंच. मी आपला त्याचा मदतनीस. दोन महिने त्याला खूप त्रास झाला. चुका व्हायच्या. पण मग हळूहळू जम बसला. आता वरोऱ्यातले लोक त्याच्याकडे स्क्रीन प्रिंटिंगची कामं घेऊन येतात.

ग्रीटिंग कार्ड्समधल्या एका स्वतंत्र विभागाबद्दल तुम्हाला सांगितलंच पाहिजे. हा विभाग आहे फक्त एका तरुणीने चालवलेला. तिचं नाव शकुंतला. शकुंतला वर्ध्यातल्या एका छोट्या गावात अगदी गरीब कुटुंबात जन्माला आलेली. दोन वर्षांची असतानाच तिला कंजनायटल सेरेब्रल पाल्सी हा आजार झाला आणि त्यात तिचे हात-पाय लुळे पडले. चेहऱ्यावरच्या स्नायूंवरचं नियंत्रण गेलं. तिच्या आई-वडिलांनी जेवढे शक्य तेवढे उपचार केले, पण त्याला यश आलं नाही. त्यामुळे आईच्या आणि बहिणींच्या मदतीने शकुंतला एका कोपऱ्यात जगत राहिली. ती १५ वर्षांची झाल्यावर तिला तिच्या वडिलांनी एक छोटं दुकान उघडून दिलं. आणि काय आश्चर्य, ती दुकान चांगलं चालवू लागली! हातांऐवजी पायांनी ती दुकानातल्या वस्तू बांधून देऊ लागली. हळूहळू तिच्यात आत्मविश्वास निर्माण होऊ लागला.

त्या दरम्यान तिला कुणाकडून तरी आनंदवनाबद्दल कळलं. ती आनंदवनात येऊन दाखल झाली आणि कसं कोणास ठाऊक, तिला ग्रीटिंग्जच्या विभागात पाठवलं गेलं. तीही

अशी बहाद्दर, की ती लवकरच दोन्ही पायांचा वापर करून ग्रीटिंग्ज करायला शिकली. अगदी सुईत दोरा ओवण्यापासून सगळं ती पायाने करू लागली. ग्रीटिंग्ज विभागातून डिझाइन्स तयार करून आली की पायांनी सराईतपणे त्या रेषांवर दोरा ओवून शकुंतला ग्रीटिंग्ज तयार करते. तिची जिद्द आणि चिकाटी केवळ अद्‌भूत आहे. अव्याहतपणे एखादा यज्ञ करावा तसं दिवसभर तिचं हे काम सुरू असतं. आणि कधीही बघाल तर तिच्या चेहऱ्यावर कायम हसू असतं. एकाग्रपणे आपलं काम करणाऱ्या शकुंतलाला बघूनच आम्हा सर्वांना उमेद मिळते. कधी मन उदास झालं की आम्ही तिच्याशी गप्पा मारत बसतो आणि नवी ऊर्जा घेऊन परततो.



पायाने ग्रीटिंग्ज तयार करणारी अन् अदम्य उत्साहाचं प्रतीक असणारी शकुंतला


ग्रीटिंग कार्डमधली आणखी एक गंमत सांगण्यासारखी आहे. त्याची सविस्तर गोष्ट प्लास्टिकच्या पुनर्वापरासाठी आम्ही केलेल्या प्रयोगांमध्ये येईलच. पण आनंदवनाची ग्रीटिंग्ज लोकांना इतकी का आवडतात त्याचं एक कारण अशा प्रयोगांमध्येही आहे. गेल्या काही वर्षांमध्ये आपल्याकडे प्लास्टिकचा कचरा अतोनात वाढला आहे. त्याची विल्हेवाट कशी लावायची हा सगळयांच्याच दृष्टीने एक गंभीर प्रश्न आहे. आमच्याकडे ग्रामीण भागात याचा त्रास होतो तो गुटख्याच्या पुड्यांच्या रूपाने. रस्त्यावर, नदीनाल्यात, कचराकुंड्यांमध्ये सगळीकडे या गुटख्याच्या पुड्यांचा हैदोस आहे. आम्ही त्या पुड्या गोळा केल्या आणि त्यांचे कपटे कापून त्यातून निरनिराळी डिझाइन्स तयार केली. हा प्रकार लोकांना खूपच आवडला. त्यानंतर आणखी एक कल्पना मला सुचली. आमच्याकडे सलाइनच्या बाटल्या, एक्स-रे फिल्म्स भरपूर जमा व्हायच्या. हे सगळं बायोमेडिकल वेस्ट मानलं जातं. आणि त्याची विल्हेवाट लावण्याचे काही नियम आहेत. पण बहुतेक वेळा हे सगळं एकत्र करून जाळलं जातं. परिणामी, प्रदूषणात भर पडते. त्यामुळे या वस्तूंचा काही वापर करता येईल का, असा मी विचार करत होतो. रमेशशी बोलून बघितलं तर त्याने सुचवलं, एक्स-रे फिल्म्सवर स्क्रीन प्रिंटिंग करून बघू. कल्पना झकासच होती. 'ट्रायल अँड एरर' करत ते झालंही. मग त्यातून आम्ही कॅलेंडर तयार केलं. एक्सरे फिल्म्स कापून त्यांचा ग्रीटिंगमध्ये वापर करू लागलो. पण अशा टाकाऊ वस्तू फक्त ग्रीटिंग कार्डांमध्येच वापरणं शक्य नव्हतं. मग या वस्तूंमधून नव्या कलात्मक वस्तू तयार करण्यास सुरुवात झाली,

आणि त्यातून एक नवा विभागच जन्माला आला. ग्रीटिंगजच्या विभागात काम करणारा शेख गणी खान याने ती जबाबदारी सांभाळली. तिथेही सुरुवातीला मी डिझाइन्स सुचवण्याचं काम करायचो. प्रत्यक्ष करून बघण्याचीही मदत करायचो. पण नंतर गणीने स्वतंत्रपणे कामाला सुरुवात केली. आज गणीचा विभाग बघाल तर ती अलिबाबाची गुहाच वाटेल. आनंदवनातल्या सगळया टाकाऊ वस्तूंना तिथे सौंदर्य प्राप्त झालेलं आहे.



कचऱ्यातून कला साकारणारे
शेख गणी खान

कौशल्य आणि कला यांचा अजोड मिलाफ असणारा आणखी एक विभाग आमच्याकडे आहे; तो म्हणजे काष्ठशिल्पांचा. त्याचा समावेश उद्योगात करता येणार नाही. कारण ही काष्ठशिल्पं आम्ही विकत नाही. ती विकण्याची परवानगीही नाही. पण लाकडावरच्या कोरीवकामाचे एकाहून एक सुंदर नमुने तुम्हाला बघायला मिळतील. मला स्वतःला लाकडातले विविध नैसर्गिक आकार शोधण्याचा छंद आहे. आमच्या परिसरात सापडणारे लाकडाचे ओंडके मी गोळा करून ठेवत असे. सुरुवातीला आमच्याकडे बांधकामात मोठ्या प्रमाणावर लाकूड वापरलं जायचं. चंद्रमणी महाराणा नावाचे मिस्त्री होते, ते सगळं लाकूडकाम करायचे. त्यांचा उजवा हात कोपराच्याही वरून तुटलेला होता. पण ते स्वतः केलेला लाकडाचा हात लावून अथक कामं करायचे. उपयोगी वस्तूंबरोबर शोभेच्या कलाकुसरीच्या वस्तू करण्याकडेही त्यांचा कल होता. मीही त्यांच्याकडे ओढला गेलो. मी त्यांना नवी डिझाइन्स आणि कल्पना वगैरे सुचवायचो. पुढे गोविंदा खोडपे नावाचा कुष्ठमुक्त रुग्ण चंद्रमणी मिस्त्रींच्या हाताखाली तयार झाला. तोपर्यंत लाकडातल्या गरजेच्या वस्तूंचं उत्पादन बरंच कमी झालं होतं. मग गोविंदाने कलाकुसरीच्या वस्तूंवर जास्त भर दिला. तो गेली अनेक वर्षं हे काम करतो आहे. खरं तर इथे येण्यापूर्वी त्याचा आणि लाकडाचा काहीच संबंध नव्हता, पण मिस्त्रींकडे तो सगळं शिकला. आता तर तो स्वतः अनेक नवे नवे प्रयोग करतो. नऊ प्रकारच्या लाकडांपासून त्याने तयार केलेली छोटी गणेशमूर्ती आनंदवनात येणाऱ्या प्रत्येकाचं लक्ष वेधून घेते. त्याने तयार केलेला हा खजिना अवाक करणारा आहे. त्यात मोठाल्या ओंडक्यांचे नैसर्गिक आकार तसेच ठेवून तयार केलेली स्टुलं, टेबलं किंवा लॅम्प्स आहेत, मोठाल्या समया आहेत आणि त्याचबरोबर अगदी छोट्या आकारात केलेलं बारीक कोरीवकामही आहे. काचेच्या बाटलीच्या आत ठेवलेल्या असंख्य सुबक लाकडी कलाकृती या दालनात आम्ही प्रदर्शनासाठी ठेवल्या आहेत. त्यातली बरीचशी शिल्पं आनंदवनाच्याच परिसरातल्या लाकडामधून साकारली आहेत. ते सारं प्रत्यक्ष येऊनच बघायला हवं.



एका हाताने अधू झाल्यानंतर स्वतःच लाकडाचा हात तयार करून काम करणारे मिस्त्री चंद्रमणी महाराणा.

हे दोन्ही-तिन्ही विभाग माझ्या फार जिव्हाळयाचे आहेत. कोणी म्हणेल, हे ग्रीटिंग्ज तयार करणं वगैरे छोट्या मुलांचं काम. पण खरं पाहता या ग्रीटिंग्जनी आनंदवनासाठी खूप मोठी कामगिरी पार पाडली आहे. एक तर या ग्रीटिंग्जमुळे आनंदवन बाहरेच्या जगात पोहोचायला खूप मोठी मदत झाली आहे. ब्रँड अँबेसडर्ससारखंच काम केलं त्यांनी. आनंदवनाची निर्मितीची, सौंदर्यदृष्टीची, कलात्मकतेची बाजू या ग्रीटिंग्जनी समाजासमोर आणली आणि त्यातून माणसं वेगवेगळया प्रकारे जोडली गेली. कोणी आनंदवनाला देणगी दिली, कोणी मित्रमेळाव्यात येऊ लागले, कोणी इतर उत्पादनांच्या खरेदीत हातभार लावला, तर कोणी प्रत्यक्ष काम करण्यासाठीही आले. शिवाय या ग्रीटिंग्जच्या विक्रीतून पैसा उभा राहिला ते वेगळंच.

खरं तर फक्त ग्रीटिंग्जच नव्हेत, तर 'आनंदवन एमआयडीसी'तल्या सर्व उद्योगधंद्यांनी ही दुहेरी कामगिरी पार पाडली आहे. मागे कधी तरी आम्ही आनंदवनात तयार होणाऱ्या उत्पादनांची यादी केली तर ती १४० झाली. केवढं, काय काय तयार होऊ लागलं इथे! मुख्य म्हणजे या उद्योगांनी इथल्या प्रत्येक माणसाला काम करून आत्मसन्मानाने अन् आनंदाने जगता येऊ शकतं, असा आत्मविश्वास दिला. आजही जेव्हा एखादा कुष्ठरुग्ण किंवा अपंग संपूर्ण हरलेल्या-पिचलेल्या अवस्थेत आनंदवनात येऊन ठेपतो तेव्हा त्याला औषधांबरोबरच आनंदवन एमआयडीसीचा फेरफटका मारण्याचं प्रिस्क्रिप्शनही लिहून दिलं जातं. डॉ. पोळ किंवा सुधाकर कडू त्याला स्वतः फिरून हा परिसर दाखवतात. त्याचा आश्चर्यकारक परिणाम त्याच्यावर होतो.

चंद्रमणींच्या हाताखाली
‘काष्ठकलाकार’ म्हणून
तयार झालेले गोविंदा खोडपे.



कसलं ना कसलं अपंगत्व असलेली माणसं एवढं दणदणीत काम करताना पाहून कोणता जिवंत माणूस पुन्हा उत्साहाने भारला जाणार नाही?

●

कुष्ठमुक्तांचे हात वंचितांच्या मदतीला

आनंदवनाच्या उभारणीमध्ये बाहेरच्या अनेक व्यक्ती आणि संस्थांचे हात लागले आहेत. कोणत्याही सामाजिक संस्थेच्या वाटचालीत अशा मदतीचा मोठा वाटा असतो, हे साहजिकही आहे. पण आनंदवनाचं वेगळेपण असं, की ही मदत स्वीकारून इथले कुष्ठरुग्ण स्वतःच्या विकासात अन् आनंदात मश्गुल राहिले नाहीत. त्यांनी स्वतःबरोबरच इतर वंचित-गरजूंनाही मदतीचा हात दिला. आनंदवन हे समृद्धीचं बेट होऊ नये, असंबाबांचं जे ठाम मत होतं त्याला धरूनच ही वाटचाल झाली.

याची सुरुवात झाली ती १९६०च्या दशकात. कुष्ठरुग्णांचं पुनर्वसन हे डोंगराएवढं ध्येय समोर ठेवून काम करताना खरं तर शिक्षण हा प्राधान्याचा विषय असण्याचं कारण नव्हतं. पण तेच बाबांचं वैशिष्ट्य होतं. एखादी योजना ठरवली आणि तेवढीच प्रत्यक्षात आणली, असं त्यांच्या कामाचं स्वरूप नव्हतं. बाबा प्रत्यक्षात आणत होते तो त्यांना पटलेला जीवनविचार. त्यामुळे जगण्याची कोणतीच बाजू त्यांच्याकडून दुर्लक्षित राहणं शक्य नव्हतं. शिक्षण हा बाबांच्या जिव्हाळ्याचा विषय होता. त्यांची शिक्षणाची व्याख्या चाकोरीपेक्षा वेगळी होती. 'शिक्षण म्हणजे माणसाच्या अभिव्यक्तीला वाट करून देणारी प्रक्रिया आहे', असं ते म्हणायचे. शिक्षणाचं प्रमाण वाढल्याशिवाय आपला ग्रामीण भाग सुधारणार नाही हे त्यांना कळत होतं.

वरोरा गावात प्राथमिक-माध्यमिक शाळा होत्या पण कॉलेज नव्हतं. कॉलेजसाठी मुलांना नागपूर किंवा चंद्रपूरला जावं लागायचं. सगळ्यांनाच ते परवडायचं नाही. त्यामुळे या भागात कॉलेज सुरू व्हायला हवं, असं बाबांना कळकळीने वाटायचं. बाबांची एक गंमत होती. कोणतीही गोष्ट डोक्यात आली, की ती आणखी कोणी तरी करेल असं म्हणत हातावर हात ठेवून बसणं त्यांना पटायचं नाही. जे आपल्याला करावंसं वाटतं ते आपणच केलं पाहिजे, असं त्यांचं म्हणणं असायचं. त्यामुळे त्यांच्या मनाने घेतलं की 'महारोगी सेवा समिती'तर्फे कॉलेज सुरू करायचं. खरं तर त्यांना मेडिकल कॉलेजच काढायचं होतं. वरोऱ्यातल्या मुलांना अप्राप्य असणारं डॉक्टरकीचं शिक्षण मिळेल आणि आनंदवनाला हक्काचे डॉक्टर, असा दुहेरी हेतू होता त्यात. पण गांधीजींच्या सहकारी डॉ. सुशीला नायर यांनी सेवाग्रामला मेडिकल कॉलेज सुरू केलं आणि त्याच टप्प्यात असल्यामुळे बाबांना कॉलेजसाठी परवानगी नाकारली गेली. मग बाबांनी आर्ट्स, सायन्स आणि कॉमर्स कॉलेजला हात घातला.

बाबांनी ठरवलं आणि कॉलेज सुरू केलं! म्हटलं तर दोन वाक्यांची साधी गोष्ट. पण आता मागे वळून बघताना लक्षात येतं की ते एवढं सोपं नव्हतं. एक तर त्या काळात आनंदवन आपल्या पायावर उभं राहण्यासाठी धडपडत होतं. त्यात आणखी लष्कराच्या भाकऱ्या कशाला भाजायच्या, असा प्रश्न कोणालाही पडला असता. 'महारोगी सेवा समिती'च्या उद्दिष्टांमध्ये कॉलेज शिक्षण कसं काय आलं, असंही कोणी विचारू शकलं असतं. तसे प्रश्न बाबांना विचारले गेलेही. पण बाबांच्या विचारांची झेप अशी होती की त्यात अशा छोट्या शंकांना जागा नसायची. बाबांचं म्हणणं होतं, की 'हे कॉलेज म्हणजे

कुष्ठरुग्णांनी बाहेरच्या समाजाला दिलेली देणगी असेल. या माध्यमातून समाजाचं ऋण फेडण्याची संधी आपल्याला मिळणार आहे.'

खरं तर हेही अजबच! ज्या समाजाने कुष्ठरुग्णांना कायम अव्हेरलं होतं, त्यांना माणूस म्हणून जगण्याची संधी देणंही नाकारलं होतं, त्या समाजाचं ऋण फेडायचं? बाबांनी हे कुष्ठरुग्णांना कसं पटवून दिलं असेल कुणास ठाऊक! पण क्षमाशीलतेचं मोल खूप मोठं असतं याची बाबांना कल्पना होती. समाजाने कुष्ठरुग्णांना स्वीकारलं नसलं तरीही या रुग्णांना सामाजिक बांधिलकीची जाण आहे, हे दाखवून दिल्यावर हा दुरावा कमी होईल याची त्यांना खात्री होती. बाहेरच्या समाजातली मुलं कुष्ठरोग्यांनी बांधलेल्या कॉलेजात शिकू लागतील, इथल्या रहिवाशांशी त्यांचा संवाद होऊ लागेल तेव्हा खऱ्या अर्थाने बदल सुरू होतील, असा त्यांचा विश्वास होता. सगळ्याच कुष्ठरुग्णांना बाबांचं हे लॉजिक समजलं असेल असं नाही, पण त्यांचा बाबांवर विश्वास होता. त्यामुळे त्यांच्या हाकेला ओ देऊन सारं आनंदवन कॉलेज सुरू करण्याच्या तयारीला लागलं. कॉलेजचं नाव ठरलं, आनंद निकेतन आर्ट्स, सायन्स व कॉमर्स कॉलेज.

ही गोष्ट आहे १९६२-६३ ची. बाबा मोठी स्वप्नं बघायचे आणि त्यासाठी तयारीही तितक्याच जोमाने करायचे. त्यामुळे बाबांनी एकीकडे कॉलेजच्या परवानगीसाठी अर्ज पाठवला आणि दुसरीकडे इमारत बांधण्याची तयारी सुरू केली. वरोरा-चिमूर रस्त्याला लागून असलेल्या आनंदवनाच्या जागेत हे कॉलेज बांधण्याचं ठरलं. कॉलेजची इमारत कुष्ठरुग्णांनी अक्षरशः आपल्या हातांनी बांधायला घेतली. कॉलेजला परवानगी देण्यापूर्वी तपासणी करण्यासाठी विद्यापीठाकडून समिती आली तेव्हा अर्धी-अधिक इमारत बांधून झाली होती. एवढंच नव्हे, तर कॉलेजसाठी बाजूला काढलेल्या बँकेच्या डिपॉझिट्सचा गठ्ठा बाबांनी या समितीसमोर ठेवला. त्यामुळे त्यांना 'नाही' म्हणण्याचं कारणच उरलं नाही. कारण अन्य ठिकाणी कॉलेज सुरू झालं तरी ना जागेवर इमारत उभी असायची, ना प्रयोगशाळा, ना ऑफिस. पण बाबांचं नियोजन भलतंच काटेकोर होतं.

परवानगी मिळाल्यावर स्टाफ निवडणं हे मोठं काम होतं. बाबांनी शिक्षणक्षेत्रातल्या ओळखींमधून प्रत्येक विषयातले त्या भागातले उत्तम प्राध्यापक शोधायला सुरुवात केली. बाबांचा अशिक्षित 'चीफ इंजिनियर' भाऊ नागेलवार याचा एक नातेवाईक खामगावच्या कॉलेजात प्राध्यापक होता. भाऊने त्याला इकडे बोलावलं. तो आपल्या कॉलेजातल्या प्राचार्यांनाही सोबत घेऊन आला. त्यांचं नाव गोपीनाथ रॉय. ते आमच्या कॉलेजचे पहिले प्राचार्य बनले. नंतर गणितासाठी वसंत देव नावाचे एक प्राध्यापक कॉलेजमध्ये रुजू झाले. या सगळ्यांशी बाबांची सतत चर्चा चालायची. आपल्या कॉलेजमध्ये उत्तमातले उत्तम प्राध्यापक आणण्यासाठी त्यांची धडपड सुरू होती. त्यातला एक किस्सा आठवतो. गणिताच्या देव सरांनी बाबांना कॉमर्ससाठी वर्ध्याच्या प्रकाश शेंडे या तरुण प्राध्यापकाचं नाव सुचवलं. खरं तर शेंडे त्यांच्या कॉलेजमध्ये चांगल्या पदावर अन् कायमस्वरूपी नोकरीत होते. पण देवांच्या आग्रहावरून ते बाबांना भेटायला आले. बाबांकडे माणसं पारखण्याचा स्वतःचा असा एक खास स्कॅनर होता. त्यातून स्कॅन झाल्यावर बाबा शेंड्यांना म्हणाले, "मला तू आमच्या कॉलेजमध्ये हवास!" शेंड्यांनी बाबांना 'आपण तिकडे

कन्फर्म आहोत' वगैरे सांगण्याचा प्रयत्न केला. बाबांनी त्यांना विचारलं, "तुला किती पगार हवाय सांग." नकार देण्याचा दुसरा मार्ग म्हणून शेंडे म्हणाले, "मला दहा इन्क्रिमेंट्स लागतील." म्हणजे पुढच्या दहा पगारवाढींइतका पगार सुरुवातीलाच. पण बाबा महावस्ताद. ते म्हणाले, "तुला अकरा इन्क्रिमेंट्स दिली. आत्ताच्या आत्ता तुझ्या कॉलेजला फोन कर आणि तिथली नोकरी सोडल्याचं कळव."



कुष्ठरुग्णांनी समाजाचं ऋण फेडण्यासाठी बांधलेलं आनंद निकेतन कॉलेज.

बाबांचं एकूण प्रकरण हे असं होतं. त्या त्या विषयातली उत्तम माणसं उत्तम पगार देऊन त्यांनी कॉलेजमध्ये आणली. पहिल्या दिवसापासून त्यांना कन्फर्म केलं. सगळ्या सोई देऊ केल्या. व्यवहाराला तर ते चोख होतेच; पण त्यांनी प्राध्यापकांची मनं जिंकली ती वेगळ्याच कारणाने. कॉलेजच्या मुलाखतीसाठी आलेल्या प्राध्यापकांची राहण्या-खाण्याची सगळी सोय बाबांनी केलेली असायची. मुलाखतीच्या आधी हा माणूस कुठून आला, त्याचं जेवणं झालंय की नाही याची विचारपूस व्हायची, आग्रहाने जेवायला वाढलं जायचं आणि मग पुढे मुलाखत घेतली जायची. मुलाखत झाल्यावर त्याला परतण्यासाठी गाडी आहे की नाही याची चौकशी करून बाबांनी त्यांच्या राहण्याचीही सोय केलेली असायची. पुढे प्राध्यापकांच्या निवडी झाल्यावर त्यांच्या राहण्यासाठीची क्वार्टर्सही बाबांनी बांधून तयार ठेवली होती. जी मंडळी सडेफटिंग होती त्यांच्यासाठी आनंदवनात मेसची सोय केलेली होती. एवढंच नव्हे, तर पहिल्या काही दिवसांतच बाबांनी या सगळ्या मंडळींची वरोरा गावातल्या प्रतिष्ठित व्यक्तींशी ओळख करून दिली. 'हे प्राध्यापक आपल्या मुलांना शिकवायला इथे आले आहेत. त्यांना लागेल ती मदत करा', असा प्रेमाचा आदेशच त्यांनी वरोरेकरांना दिला. नव्या माणसांना इथे रुजायला अडचण येऊ नये यासाठी जे काही आवश्यक असेल ते सगळं त्यांनी केलं.

आणखी एक आठवतं. त्या वेळी मुलींचं कॉलेजमध्ये येण्याचं प्रमाण कमी होतं. त्यामुळे वरोऱ्याहून आनंदवनापर्यंत मुली कशा येणार, असा प्रश्न निर्माण झाला असता. पण बाबांनी त्याचाही आधीच विचार करून ठेवला होता. त्या वेळी वरोऱ्यात एक मोटर सर्व्हिस होती. बाबांनी त्याच्या मालकाला कॉलेजचं महत्त्व असं काही समजून सांगितलं, की त्यानेही बाबांच्या आवाहनाला दाद देऊन मुलींसाठी सकाळी वरोरा ते कॉलेज आणि दुपारी कॉलेज ते वरोरा अशा दोन वेळांना विनामूल्य बससेवा सुरू केली. व्यवहार आणि

आपुलकी यांचं असं मिश्रण आणखी कुठे सापडेल का याबद्दल मला शंकाच आहे.

या सर्व वातावरणामुळे सुरुवातीच्या काळात दाखल झालेले प्राध्यापक केवळ आनंद निकेतन कॉलेजचे नोकरदार न राहता ते आनंदवनाशी कायमचे जोडले गेले. आनंदवनाच्या उपक्रमांमध्ये या लोकांनी सहभागी व्हावं अशी सक्ती बाबांनी कधीही केली नाही, तरीही सारेजण उत्साहाने प्रत्येक कार्यक्रमात सामील होत असत.

आपलं कॉलेज प्रत्येक क्षेत्रात उत्तम असलं पाहिजे यासाठीही बाबांनी पहिल्या दोन वर्षांमध्ये खूप कष्ट घेतले. कॉलेजमध्ये एनसीसी सुरू केली. त्यांच्या अधिकाऱ्यांसाठी क्वार्टर्स उभ्या केल्या. प्रयोगशाळा सुसज्ज केली. विद्यापीठांतर्गत घेतल्या जाणाऱ्या निरनिराळया क्रीडास्पर्धा आपल्या कॉलेजमध्ये भराव्यात यासाठी पहिल्या वर्षापासून प्रयत्न केले. त्यामुळे कॉलेजमधल्या प्राध्यापकांनाही रोज काही तरी नवं करून बघण्याची, उत्तम काम करण्याची प्रेरणा मिळाली. आमचे शेंडे सर अनेकदा म्हणतात, की 'केवळ नोकरी करण्याच्या उद्देशाने इथे आलेल्या माझ्यासारख्या अनेकांना बाबांमुळे आयुष्याचं मिशन सापडलं.' त्याचा परिणाम असा झाला की कॉलेजमधलं वातावरण कायम उत्साही राहिलं. कॉलेजच्या पहिल्याच वर्षी विद्यापीठाच्या मेरिट लिस्टमध्ये आमची सहा मुलं होती. ही परंपरा आजही सुरू आहे. आमच्या कॉलेजचे कित्येक विद्यार्थी आज जगात सगळीकडे मोठमोठ्या पदांवर काम करताहेत. गेल्या पन्नास वर्षांमध्ये या कॉलेजमधून हजारो विद्यार्थी शिकून बाहेर पडले आणि स्वतःच्या पायावर उभे राहिले. प्रकाश, मी आणि आमची मुलं-कार्यकर्ते सगळे याच कॉलेजचे विद्यार्थी. एवढंच नव्हे, तर माझी भाची, म्हणजे आमच्या रेणुका आणि विलासची मुलगी मोक्षदा आज याच कॉलेजमध्ये मराठीची प्राध्यापिका आहे.

बाबांच्या कल्पनेप्रमाणे समाजाचं आनंदवनाशी नातं दृढ करण्याचं काम या कॉलेजने आणि त्यातल्या विद्यार्थ्यांनी केलं. आनंदवनाकडे फिरकणंही जिथे दुःसह मानलं जायचं, तिथे आमचा मुलगा आनंदवनाच्या कॉलेजमध्ये शिकतो, असं लोक अभिमानाने सांगू लागले. आपणही समाजाला काही देऊ शकतो, ही भावना या कॉलेजमुळेच कुष्ठरुग्णांमध्ये रुजली. त्याचं मोल काय होतं हे जाणून घ्यायचं असेल तर या विषयावर बोलताना आमच्या शिलेदारांचे डोळे कसे चमकतात ते बघा! पण याची एक दुसरी बाजूही आहे. कुष्ठरुग्णांनी सुरू केलेलं कॉलेज, पण तिथे सुरुवातीच्या काळात आम्हाला कुष्ठरोग्यांना प्रवेश देता येत नव्हता.

दुसऱ्याच वर्षी कॉलेजमध्ये अॅग्रिकल्चर विंगही सुरू झाली आणि बाबांचं आणखी एक स्वप्न पूर्ण झालं. बाबांनी सुरुवातीला आनंद निकेतन कॉलेजमध्येच शेतकी विभाग सुरू केला होता. पण पुढे अकोल्याला डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ सुरू झाल्यावर या नव्या विद्यापीठाच्या अखत्यारीत स्वतंत्र कॉलेज सुरू होण्याचा मार्ग खुला झाला. त्यानंतर बाबांनी विद्यापीठाशी संपर्क साधून त्यांच्या मदतीने शेतकी कॉलेजसाठी चांगले प्राचार्य आणि प्राध्यापक मिळवले. या कॉलेजमध्येही अगदी पहिल्याच बॅचच्या मुलांनी विद्यापीठात पहिला-दुसरा नंबर पटकावला. आनंदवनाची शेती ही या कॉलेजसाठीची

खुली प्रयोगशाळाच होती. शेतकी कॉलेजचे प्राचार्य-प्राध्यापक आणि आमचा ‘कृषिमंत्री’ नारायण यांचा एकमेकांशी कायम संवाद सुरू असायचा. अजूनही आहे.

एकदा कामाची घडी लावून दिल्यावर बाबांनी या दोन्ही कॉलेजांच्या कामकाजात कधीच हस्तक्षेप केला नाही. कॉलेज सुरू झाल्यानंतर तीनेक वर्षांमध्ये सोमनाथ सुरू झालं. त्यानंतर हेमलकसा. मग भारत जोडो, नर्मदा आंदोलन अशा कोणत्या ना कोणत्या कारणाने बाबा आनंदवनाच्या बाहेरच होते. त्यामुळे कॉलेजचं सगळं काम ताई बघायची. मी तिला मदत करायचो. मग पुढे साधारणपणे १९७४ नंतर मी कॉलेजच्या कामात जास्त लक्ष घालायला सुरुवात केली. अर्थात कॉलेजचा स्टाफ इतका समर्थ होता, की त्यांच्या कल्पना आणि उपक्रमांना पाठबळ पुरवणं एवढंच माझं मुख्य काम होतं. ते मी करत गेलो एवढंच.

१९६६ मध्ये बाबांनी आणखी एक वेगळं पाऊल उचललं. महारोगी सेवा समितीतर्फे आनंदवनात अंधशाळा सुरू झाली. कुष्ठरुग्णांच्या पलीकडेही समाजातल्या अनेक उपेक्षित घटकांना मदतीची आणि संधीची गरज आहे याची जाणीव बाबांना होती. अंध, अपंग अन् कर्णबधिरांसाठी काम केलं पाहिजे यासाठी त्यांचा जीव सतत तुटायचा. पण शाळा प्रत्यक्षात सुरू व्हायला एक वेगळीच घटना निमित्त ठरली.

घनश्याम गायधने नावाचे एक अंध संगीत शिक्षक अंधांसाठी कुठे कोणतं काम चालतं, कुठे शाळा सुरू करता येतील का, हे बघण्यासाठी विदर्भात फिरत होते. एकदा ट्रेनमधून प्रवास करत असताना वरोऱ्याच्या अलीकडे त्यांना आणि त्यांच्या सहकाऱ्यांना मारहाण झाली. त्यामुळे ही मंडळी वरोरा स्टेशनवर उतरली. तिथे स्टेशन मास्तरांनी त्यांचं औषधपाणी केलं, त्यांची विचारपूस केली. त्यांच्या प्रवासाचं कारण लक्षात आल्यावर स्टेशनमास्तर म्हणाले, “तुम्ही आनंदवनात बाबा आमट्यांना का भेटत नाही? ते तुम्हाला नक्की मदत करू शकतील.” स्टेशनमास्तरांनी गायधन्यांना आमच्याकडे आणून पोहोचवलं. आनंदवनातलं काम समजून घेतल्यावर गायधन्यांनी बाबांना आनंदवनात अंधशाळा काढण्याची विनंती केली. बाबांच्याही डोक्यात ते होतंच. ते म्हणाले, “जरूर काढू. त्यासाठी काय काय करावं लागतं ते सांगा.” मग बाबा, गायधने आणि त्यांचे सहकारी यांनी बरीच धडपड करून शाळेसाठी परवानगी मिळवली आणि कामाला सुरुवात झाली. तेव्हा अख्ख्या मध्य भारतात ग्रामीण भागामध्ये फक्त अंधांसाठीची निवासी शाळा नव्हती. आमची पहिलीच शाळा!

सुरुवातीला शाळेची सगळीच जबाबदारी गायधन्यांकडे होती, पण नंतर मुकुंद वैशंपायन यांना बाबांनी अंधशाळेचं मुख्याध्यापक नेमलं. मुकुंदराव हेही कुष्ठमुक्त कार्यकर्ते. आनंदवनातल्या असंख्य कुष्ठरुग्णांप्रमाणेच त्यांचीही एक कहाणी आहे. ते मुंबईतल्या सुखवस्तू घरातले; पण कुष्ठरोग झालेला. त्यामुळे त्यांच्या आई-वडिलांच्या मृत्यूनंतर भावंडांनी त्यांचा सांभाळ करायला नकार दिला आणि ते अक्षरशः रस्त्यावर आले. कुठे जावं, काय करावं कळत नसताना त्यांनी स्वतःला बेगर्स अॅक्ट अंतर्गत अटक करवून घेतली आणि ते वडाळयाच्या एका हॉस्पिटलमध्ये कुष्ठरुग्णांसाठीच्या आयसोलेशन


वॉर्डमध्ये येऊन दाखल झाले. तो एक प्रकारचा तुरुंगच होता. तब्बल चौदा वर्षं ते तिथे राहिले. एकदा चिवडा गुंडाळलेल्या कागदावर त्यांनी आनंदवनाबद्दलची माहिती वाचली. लगोलग त्यांनी बाबांना 'आपल्याला आश्रय द्यावा' अशी विनंती करणारं पत्र लिहिलं. बाबांनी त्यांना उत्तर पाठवलं, "आमच्याकडे 'आश्रय' हा शब्द नाही. पण आनंदवन तुमचंच आहे. कधीही या आणि कामाला सुरुवात करा.' समाजापासून पूर्ण तुटलेल्या अवस्थेत अस्तित्वहीन जिणं जगणारा माणूसच या उत्तराचं महत्त्व जाणू शकेल.

मुकुंदराव आनंदवनात आले आणि इथेच नलिनी फुलझेले यांच्याशी त्यांचं लग्न झालं. हे दोघंही लग्नासाठी तयार नव्हते. मी ताईच्या मदतीने त्यांना भरीला पाडलं आणि ते लग्न लागलं. पुढे अंधशाळेची जबाबदारी स्वीकारल्यानंतर या दोघांनी अंधशाळेतल्या मुला-मुलींना पोटच्या पोरांप्रमाणे वाढवलं-शिकवलं. 'अंधांसाठीचा एक उपक्रम' असं मर्यादित रूप या शाळेला कधीच नव्हतं. बाबांनी तिथे दाखल झालेल्या शिक्षक-विद्यार्थी सर्वांमध्येच त्यांच्या विचारांची लागवड केली. त्यांनी अंध मुलांना इतर सर्वसामान्य मुलांसारखीच वागणूक दिली. बाबा त्यांना झाडावर चढायला शिकवायचे, त्यांचे नाना प्रकारचे खेळ घ्यायचे. इतर कोणत्याही सर्वसामान्य मुलांप्रमाणेच ही मुलं वाढली पाहिजेत, त्यासाठी त्यांना सगळ्या संधी मिळाल्या पाहिजेत, असा त्यांचा आग्रह असायचा. एवढंच नव्हे, तर बाबा या मुलांना रविवारी श्रमदानासाठी, झाडं लावण्यासाठी प्रोत्साहन द्यायचे. आनंदवनातल्या सगळ्या उपक्रमांमध्ये या मुलांचा सहभाग असायचा. त्या दिवसांमध्ये आमच्याकडे पुलं आणि त्यांच्या पत्नी सुनीताबाईंचं आमच्याकडे कायम जाणं-येणं असे. तेही या मुलांमध्ये रमत. त्यांच्या आसपास असण्याची या मुलांना एवढी सवय झाली होती, की आमच्याकडचा ज्ञानेश्वर नावाचा एक चुणचुणीत पोरगा पुलंच्या समोरच त्यांची नक्कल करून दाखवायचा. बाबांनी या मुलांमध्ये आपण अंध आहोत याचा कोणताही गंड निर्माण होऊ दिला नव्हता.


अंध शाळेतल्या मुलांसोबत रमलेले बाबा.

बाबांचं ते वैशिष्ट्यच होतं. अपंग व्यक्तीच्या वेगळ्या गरजांचा त्यांनी पूर्ण विचार

केलेला असायचा. पण त्यांचं वागणं असं असायचं की त्या व्यक्तीला स्वतःच्या अपंगत्वाची जाणीवही होऊ नये. त्यामुळेच ही मुलं इथे आत्मविश्वासाने वाढली. नाना प्रकारची कामं शिकली. त्या वेळी शाळेला अनुदान नव्हतं आणि आनंदवनातही पैशांची कायम चणचण असायची. पण तरीही शाळेत कोणतं साहित्य किंवा उपकरणं हवी आहेत याकडे बाबांचं लक्ष असायचं. अंधशाळेतली मुलं दहावीला येईपर्यंत आनंदवनात 'संधिनिकेतन' सुरू झालेलं होतं. त्यामुळे व्यावसायिक प्रशिक्षणाची अनेक दारं त्यांच्यासाठी खुली झाली. पुढे सुधाकर कडू मुकुंदरावांच्या मदतीला आला आणि त्यांच्या तालमीत तयार झाला. मुकुंदरावांनंतर पुढे अनेक वर्षं त्याने अंध आणि नंतर कर्णबधिरांच्या शाळेचीही जबाबदारी पार पाडली.


मुकुंद वैशंपायन यांच्यानंतर अंधशाळेची जबाबदारी पेलणारे सुधाकर कडू.

अंधशाळा निवासी असल्याने चंद्रपूरबरोबरच नागपूर, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, गडचिरोली अशा आसपासच्या अनेक जिल्ह्यांमधून आमच्याकडे मुलं-मुली यायचे. त्या सर्व मुलांना आणि त्यांच्या पालकांनाही आनंदवनाच्या परिवारात सामील करून घेण्याचं काम ताई-बाबा आणि मुकुंदराव-नलिनीताईंनी केलं. मला आठवतं, एकदा सरकारने निवासी शाळांमध्ये अंध मुलांकडून शंभर रुपये फी घेता येईल, अशा आशयाचं सर्क्युलर काढलं होतं. बाबांनी त्याकडे लक्षही दिलं नाही. पालकांकडून पैसे घेण्याचा विचारही बाबांच्या मनाला स्पर्शला नाही. उलट, कानाकोपऱ्यातून गाड्या बदलत, तंगडतोड करत पालक मुलांना इथे घेऊन येत, तेव्हा बाबा फक्त मुलांचीच नव्हे तर पालकांचीही आवर्जून चौकशी करत. त्यातल्या अनेकांना इथपर्यंत येण्यासाठीही पैसे उधार घ्यावे लागले आहेत याची बाबांना कल्पना असायची. त्यामुळे या मंडळींच्या राहण्याखाण्याची सोय करून, त्यांना आश्वस्त करूनच बाबा त्यांना परत पाठवायचे.

पालकांना मिळणाऱ्या या आपुलकीच्या वागणुकीमुळे ही मंडळी आपापल्या गावी जाऊन आमच्या शाळेबद्दल भरभरून सांगायची. त्यातून हळूहळू इथे प्रवेश घेणाऱ्या मुला-मुलींचा आकडा वाढत गेला. या शाळेतून शिकून अनेक मुलं-मुली आपल्या पायावर उभी राहिली. कोणी अंधशाळेतच शिक्षक झाले, तर कोणी इतर व्यवसायांत बस्तान बसवलं, नाव कमावलं. आमच्या शाळेतला एक मुलगा आज दिल्लीत वकिलीची प्रॅक्टिस करतो. एक मुलगी सुरतला नॉर्मल शाळेत संगीत शिकवते. अशी कित्येक उदाहरणं.

आज आमच्या अंधशाळेत सरासरी शंभर मुलं-मुली शिकताहेत. गेल्या दहा-पंधरा


वर्षांमध्ये अंधांसाठीच्या उपकरणांत अनेक बदल होत गेलेले आहेत. नवं तंत्रज्ञान आलं आहे. ऑडिओ सीडींमुळे त्यांचं शिक्षण सोपं झालं आहे. आपली शाळा अद्ययावत असावी यासाठी आमची धडपड आजही सुरू आहेच. विशेष म्हणजे आमच्या शाळेचा विद्यार्थी असलेला आणि पदवीधर झालेला सेवकराम बांगडकर आज शाळेचा मुख्याध्यापक आहे.

अंधशाळेबद्दल सांगताना आणखी एका कार्यकर्त्याबद्दल सांगणं आवश्यक आहे. त्याचं नाव नरेंद्र देवघरे. नरेंद्र आज कर्णबधिर मुलांच्या वसतिगृहाचा वॉर्डन म्हणून काम करतो. पण त्याच्या कामाची सुरुवात अंधशाळेपासूनच झाली. नरेंद्रचा जन्म गरीब मजूर कुटुंबातला. नागपूरजवळच त्याचं गाव होतं. अगदी कोवळ्या वयापासूनच तो मजुरीला जुंपला गेला. अवघ्या १९ व्या वर्षी त्याचं आयुष्य उलटंपालटं करणारा अपघात झाला. थ्रेशर मशिनमध्ये सापडल्याने त्याचा उजवा हात कोपरापासून खाली कापावा लागला. त्यानंतर काही महिन्यांतच नरेंद्र संधिनिकेतनमध्ये दाखल झाला. सुरुवातीला त्याने प्रिंटिंग प्रेसमध्ये कंपोजिंगचं प्रशिक्षण घेतलं; पण त्यानंतर पुन्हा घरी जाण्याऐवजी तो आनंदवनातच थांबला. त्याला आम्ही अंध विद्यालयात मुलांची काळजी घेण्याचं काम दिलं. तो या कामात इतका समरसून गेला की लवकरच त्याला कायमस्वरूपी सरकारी नोकरीत दाखल करून घेतलं गेलं. ती जबाबदारी तर त्याने उत्तमरीत्या निभावलीच; पण आज आनंदवनाचा खंदा कार्यकर्ता म्हणून तो काम करतो आहे. विशेषतः जमीन व्यवहार, चॅरिटी कमिशनरकडील किचकट कामं यात त्याचं 'स्पेशलायजेशन' आहे. त्याला आम्ही 'ऑफिसर ऑन स्पेशल ड्यूटी' म्हणतो! त्याच्याकडे एखादं काम सोपवलं तर भले आकाशपाताळ एक होवो, तो ते काम पूर्ण करणारच, अशी त्याची ख्याती आहे.

अंधांची शाळा सुरू झाल्यानंतर सतरा वर्षांनी कर्णबधिरांसाठी शाळा सुरू झाली. त्या शाळेच्या जन्माची गोष्ट तशी गमतीशीर आहे. अंधशाळा सुरू झाल्यानंतर या शाळेच्या तपासणीसाठी आमच्याकडे पाठक-तायडे-जोशी नावाचं त्रिकूट यायचं. हे तिघंही अधिकारी अतिशय भले होते. आमच्याकडे शाळेतल्या सोई, मुलांची राहण्याची-जेवणाची व्यवस्था सगळं काही चोख होतं. शिवाय प्रत्येक मूल हे आनंदवनाचंच मूल, अशी इथली रीत. त्यामुळे या अधिकाऱ्यांचा आमच्या शाळेवर जीव होता. त्यांचं बाबांसोबत चांगलं नातं तयार झालं होतं. एकदा ते बाबांना म्हणाले, "तुम्ही अंधशाळा इतकी चांगली चालवता! आता तुम्ही कर्णबधिरांसाठीही शाळा काढायला हवी. तुम्ही फक्त अर्ज करा. आम्ही तुम्हाला लगेच परवानगी मिळवून देतो." शाळा काढायला पाहिजे, हे पटवून देण्यासाठी ते बाबांना काय म्हणाले असतील? त्यांचं म्हणणं होतं, 'आनंदवनाच्या नावात पाच अक्षरं आहेत. इथे आपण कुष्ठरुग्ण, अंध, अपंगांसाठी काम करतो. म्हणजे तीन प्रकार झाले. आता कर्णबधिर आणि मतिमंदांसाठीही काम सुरू केलं की पाच आकडा गाठला जाईल!'

गंमत बाजूला ठेवू, पण अशी शाळा काढण्यासाठी बाबा तयारच होते. लगेचच १९८३ मध्ये कर्णबधिरांसाठीची शाळा सुरू झाली. ही शाळा सुरू करायची म्हटल्यावर पैशांचा प्रश्न होता. आनंदवनाची युरोपात राहणारी मैत्रीण अंजू मराठे-व्हॅन वेर्श या

मैत्रिणीकडून मला ‘नेदरलँड कमिटी फॉर किंडर पोस्टल्स’ या संस्थेबद्दल माहिती कळली. ही संस्था नेदरलँडमधल्या मुलांकडून निधी गोळा करून तो जगभरातल्या गरजू मुलांपर्यंत पोहोचवायचं काम करते. आनंदवनाचं एकूण काम, अंधशाळा आणि कर्णबधिर शाळेची गरज याबद्दल मी त्यांना एक सविस्तर पत्र लिहिलं. त्यानंतर बरीच पत्रापत्री झाल्यावर त्यांनी सुरुवातीला एक लाख रुपयांचा निधी देण्याचं मान्य केलं. त्यांनी दिलेल्या निधीतून शाळेची इमारत उभी राहिली. खरं तर कोणत्याही कामाला एकदाच निधी द्यायचा, असं या संस्थेचं तत्त्व होतं. पण मी त्यांना शाळेचा अन् आनंदवनातल्या इतरही कामांचा अहवाल सातत्याने कळवत होतो. कदाचित त्यातून आमच्या कामाचं वेगळेपण त्यांना जाणवलं असावं. त्यांनी नियमाला अपवाद करत आधी अडीच लाख आणि नंतर पुन्हा पाच लाखांची मदत केली. त्यातूनच कर्णबधिरांसाठीच्या शिक्षणासाठी लागणारी साधनसामग्री आणि इमारती उभ्या राहिल्या.



आनंदवनातली कर्णबधिर मुला-मुलींची शाळा अद्ययावत साधनसामग्रीने सुसज्ज आहे.



आज आमचा कुष्ठमुक्त कार्यकर्ता सोपान हंगे या शाळेचा मुख्याध्यापक म्हणून काम बघतो आहे. कर्णबधिरांच्या शिक्षणपद्धतीत अन् साधनसामग्रीत होणारे नवे बदल समजून घेऊन त्या दृष्टीने आमची शाळा अद्ययावत करण्याचं आमचं काम आजही सुरू आहे. आज कर्णबधिरांच्या निवासी शाळेतही शंभराहून जास्त विद्यार्थी शिक्षण घेताहेत.

आनंदवन सुरू झालं, कुष्ठरुग्णांची संख्या वाढू लागली तेव्हा हे सगळं कसं चालणार याची काळजी बाबांच्या मित्रांना-हितचिंतकांना वाटायची. पण कामाची कास धरल्यामुळे

बाबांनी आणि त्यांच्या शिलेदारांनी हे शक्य करून दाखवलं. कुष्ठमुक्तांनी स्वतःला तर दुःखदैन्यातून वर काढलंच, पण समाजालाही मदतीचा हात दिला. कुष्ठरुग्णांनी सुरुवातीच्या काळात उभ्या केलेल्या उद्योगांमधूनच पुढे संधिनिकेतनचं प्रशिक्षण केंद्र उभं राहिलं. या केंद्रात कुष्ठमुक्तांनीच हजारो अंध-अपंग आणि कर्णबधिर मुला-मुलींना वेगवेगळया उद्योग-सेवांचं प्रशिक्षण दिलं. ही पोरं समाजात परत जाऊन आत्मसन्मानाने आयुष्य जगू शकली. त्यामुळेच बाबांच्या दृष्टीने कुष्ठसेवेइतकंच कुष्ठरुग्णांनी समाजासाठी सुरू केलेल्या या कामांचं महत्त्व होतं.

अर्थात या कामातले आणखी महत्त्वाचे अध्याय अजून पुढेच लिहिले जाणार होते.


सोमनाथ

आनंदवनात नव्या शिक्षण उपक्रमांची धामधूम सुरू असतानाच १९६७ मध्ये आणखी एका नव्या प्रयोगासाठी बाबांना चंद्रपूर जिल्ह्यात मूल गावाजवळ जागा मिळाली. या गावाजवळ एक जुनं सोमनाथाचं मंदिर होतं. त्यावरून या प्रकल्पाला ‘सोमनाथ’ असं नाव पडलं. हा महत्त्वाकांक्षी प्रयोग होता वर्कर्स युनिव्हर्सिटी, म्हणजेच ‘श्रमिक कार्यकर्ता विद्यापीठ’ सुरू करण्याचा.

बाबा कुष्ठरुग्णांसोबत काम करत असले तरी त्यांना देशाच्या भवितव्याचीही चिंता असायची. मानसिक महारोगाने पछाडलेला आपला देश जगात भीक मागत दाही दिशांना हिंडतो आहे याचं त्यांना कमालीचं दुःख होतं. त्यामुळे आनंदवनाच्या अनुभवांची शिदोरी घेऊन देशाच्या प्रश्नांवर उत्तरं शोधण्याचा प्रयोग केला पाहिजे, असं त्यांच्या मनात होतं. काय होता हा प्रयोग? आधुनिक तंत्रविज्ञानाच्या साह्याने भारतीय कृषिप्रधान समाजव्यवस्थेला परिपूर्ण कृषी-औद्योगिक व्यवस्थेचं रूप देण्याचा. आपल्या देशाची नव्याने घडण करणारे श्रमिक कार्यकर्ते त्यांना घडवायचे होते. चिंतन आणि अनुभव या आधाराने त्यांचं असं मत झालं होतं, की आपल्याकडच्या शिक्षणव्यवस्थेत अपंग बुद्धिजीवी आणि आंधळे श्रमजीवी तयार होताहेत. विद्यापीठातून बाहेर पडणारा पदवीधर हा नुसताच योजक, म्हणजे प्लॅनर असतो. त्याचं डोकं तयार झालेलं असतं पण हात अकार्यक्षम असतात. तंत्रशाळांमधून बाहेर पडणाऱ्या कारागिरांचे हात कुशल असतात, पण आपण करतो आहोत त्या कामामागच्या हेतूशी-योजनेशी त्यांचा संबंध नसतो. त्यामुळे दोघांच्याही कामात हृदय ओतलं जात नाही. हे वास्तव जोपर्यंत बदलत नाही तोपर्यंत आपल्या देशाचं भवितव्य बदलणं अवघड आहे याची बाबांना खात्री होती.

बुद्धी आणि श्रम यांचा मेळ घालण्याचं काम ते आनंदवनात करत होतेच. पण त्यांच्या मते अशा प्रयोगांची खरी गरज होती ती ग्रामीण भागात. त्यासाठी वर्कर्स युनिव्हर्सिटीचं स्वप्न त्यांनी पाहिलं होतं. या विद्यापीठात मिळणाऱ्या ज्ञानाचा उपयोग तरुणांनी जमिनीवरच्या समस्या सोडवण्यासाठी करावा असं त्यांना वाटत होतं. त्यासाठी त्यांनी पद्धत निवडली अर्निंग थ्रू लर्निंग. उदाहरणार्थ, या प्रकल्पात डेअरी आणि संबंधित प्रक्रिया उद्योग असतील. तिथे प्रत्यक्ष व्यवसायही चालेल आणि त्या व्यवसायाच्या प्रशिक्षणाचं कामही; जेणेकरून विद्यार्थ्यांना व्यवसायाचं व्यावहारिक ज्ञान मिळेल आणि

दुसरीकडे मिळणाऱ्या उत्पन्नातून प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी आणि डेअरी डेव्हलपमेंट शिकणारे विद्यार्थी यांचा खर्च भरून निघेल. ही कल्पना त्या वेळी अनेकांना अव्यवहार्य वाटली. खरं तर ही कल्पना बाबांनी आनंदवनात प्रत्यक्षात आणून दाखवलेली होती. त्यामुळे बाबांच्या दृष्टीने आता फक्त तिला एका विद्यापीठीय स्ट्रक्चर देण्याची गरज होती. त्यासाठी शेती, प्रक्रिया उद्योग आणि त्याला संलग्न शैक्षणिक संस्थांची साखळी तयार होऊ शकेल अशी ओलिताखालची किमान दोन-तीन हजार एकर सलग जमीन हवी होती.



शून्यातून सोमनाथचा प्रकल्प उभारणारे कार्यकर्ते शंकरदादा जुमडे आणि त्यांच्या पत्नी सिंधूताई.

या प्रयोगासाठी ताडोबाच्या जंगलाला खेटून असलेली १९२४ एकर सरकारी जमीन 'महारोगी सेवा समिती'ला मिळाली. बाबांच्या मनात या जागेच्या आसपासच्या शेतकऱ्यांना आणि तिथल्या बेरोजगार तरुणांना सोबतीला घेऊन काम करायचं होतं. पण झालं भलतंच. शेतकऱ्यांना वाटलं, या प्रकल्पामुळे आपल्या उपजीविकेचं साधन असलेलं जंगल आता संपणार. त्यामुळे त्यांनी बाबांच्या प्रकल्पाला विरोध केला. लोकांच्या मनात कुष्ठरोगाबद्दल कमालीची भीती आणि घृणा होतीच; त्यामुळे विरोधाला आणखी धार आली. आश्चर्य म्हणजे काही सर्वोदयी नेत्यांचा या शेतकऱ्यांना पाठिंबा होता. शेतकरी तर अज्ञानी होते, पण या नेत्यांनीही बाबांच्या प्रकल्पाचं महत्त्व आणि त्याचा या शेतकऱ्यांना होणारा फायदा यांचा विचार केला नाही. हा घोळ बरेच दिवस सुरू राहिला. रोज नवी मागणी, नवा आरोप, असं सुरू होतं. अतिशय तणावाचे दिवस होते ते. बाबांनी जंगलातच मुक्काम ठोकलेला होता. काही वेळा तर त्यांच्यावर हल्ला करण्याचेही प्रयत्न झाले. प्रकरण चिघळलं.

शेवटी विनोबा भाव्यांनी त्यात मध्यस्थी केली, आणि त्यांच्या विनंतीला मान देऊन बाबांनी आंदोलकांच्या सगळ्या मागण्या मान्य केल्या. सोमनाथच्या ईशान्येला असलेली ५५३ एकर जमीन बाबांनी शेतकऱ्यांना कसण्यासाठी दिली. समितीच्या जागेवर असलेल्या उमरी नाल्याचं पाणी शेतकऱ्यांना देण्याचं ठरलं. तरीही वाद संपेना, तेव्हा आणखी १५२ एकर जमीन २६ कुटुंबांना कसण्यासाठी दिली गेली. अखेर वाद मिटला.

बाबांच्या वाट्याला १२१९ एकर जमीन उरली; पण बाबांच्या स्वप्नातल्या वर्कर्स युनिव्हर्सिटीचा आवाका इतका मोठा होता की त्यासाठी उरलेली ही जागा पुरी पडणं शक्य नव्हतं. खरं सांगायचं, तर त्या वेळच्या कटू अनुभवामुळे बाबांचं वर्कर्स युनिव्हर्सिटीवरून मन उडालं. फक्त त्या स्वप्नाचा एक भाग म्हणून त्यांनी तिथे 'श्रमसंस्कार छावणी' सुरू केली.

पुढे सोमनाथचा प्रकल्प ज्या रीतीने कृषिविकासाची पंढरी बनला, ते पाहता हा संघर्ष झाला नसता तर सोमनाथचंच नव्हे, तर महाराष्ट्राचंही चित्र आणखी वेगळं असू शकलं असतं. आम्हा कार्यकर्त्यांच्या मनात ती सल अजूनही आहे. पण ते असो.

जागेचा वाद मिटल्यावर बाबांनी आनंदवनातल्या त्यांच्या खंद्या कार्यकर्त्यांना घेऊन सोमनाथला मुक्काम ठोकला. त्यात आघाडीवर होते शंकरदादा जुमडे. शंकरदादा हेही कुष्ठमुक्त. ते आणि त्यांच्या पत्नी सिंधूताई यांनी सोमनाथ प्रकल्पाची जबाबदारी स्वीकारली. आनंदवनातून काही कुष्ठरुग्ण सोमनाथमध्ये दाखल झाले. आनंदवनाप्रमाणेच इथेही झुडुपी जंगल साफ करून घरं आणि शेतीसाठी जागा तयार करण्याचं काम सुरू झालं. शेती होऊ लागली. घरं बांधली जाऊ लागली. आनंदवनाप्रमाणेच कुष्ठरुग्णांनी इथेही कम्युन्स उभी केली. काम मोठं होतं. कारण जमीन आनंदवनापेक्षा किती तरी जास्त होती. शिवाय इथे जंगली प्राण्यांचा राबता असणारं घनदाट जंगल होतं. त्यामुळे संध्याकाळ झाली की तिथे प्राण्यांचे आवाज येऊ लागायचे. ही जागा माणसांत आणण्यासाठी निधडी छाती लागणार होती. इथे बाबा कसले मागे राहताहेत? बाबांनी प्रकल्पाच्या ताडोबा जंगलाकडच्या टोकालाच मुक्काम ठोकला. एक खाट हेच त्यांचं त्या काळातलं घर. खाट टाकली की आसपासची जमीन साफसूफ करायला सुरुवात करायची. थोड्या दिवसांनी खाट उचलून दुसऱ्या निर्जन जागी नेऊन टाकायची. असं करत करत बाबांनी आणि त्यांच्या साथीदारांनी राहण्यासाठी आणि शेतीसाठी जागा मोकळी केली. शंकरदादांनी आणि त्या वेळच्या इतर कार्यकर्त्यांनी या जमिनीवर अक्षरशः स्वतःच्या घामाचा सडा घातला. त्याचं फळ लवकरच दिसू लागलं. पाहता पाहता शेती बहरू लागली. एक सांगायला हवं. बाबा सोमनाथमध्ये मुक्काम ठोकून होते तेव्हा आनंदवनाचं नेतृत्व होतं ते ताईकडे.

पहिल्याच वर्षी मे महिन्याच्या रणरणत्या उन्हात बाबांनी सोमनाथला पहिली श्रमसंस्कार छावणी भरवली. बाबांच्या मते हा श्रमांचा उत्सव होता. श्रमांचं मोल बाबांच्या फार पूर्वीच लक्षात आलं होतं. त्यांनी केलेल्या श्रमाश्रम प्रयोगाबद्दल मी तुम्हाला आधी सांगितलंच आहे. त्या वेळी बाबांच्या प्रयोगाचं वर्णन करताना आसाराम वर्मा यांनी 'श्रमरस' हा शब्द वापरला होता. पुढे साने गुरुजींनी वापरलेला 'श्रमसंस्कार' हा शब्द बाबांना अतिशय भावला. साने गुरुजींचा विचार बाबांनी श्रमसंस्कार छावणीच्या रूपाने प्रत्यक्षात आणला.



सोमनाथच्या श्रमसंस्कार छावणीमध्ये
देशभरातली तरुण मंडळी श्रमांचा संस्कार करून घेतात.


या छावणीत महाराष्ट्राच्याच नव्हे, तर भारताच्या कानाकोपऱ्यातून तरुण वर्ग सहभागी झाला होता. मीही त्यात होतोच. आम्ही सर्वांनी जंगल साफ करणं, घरं बांधण, तलाव खोदणं, विहिरी खणणं, लहान बंधारे बांधणे अशी अनेक कामं केली. अर्थात हे शिबिर म्हणजे फक्त श्रमदान नव्हतं. तरुण पिढीला श्रमांचं महत्त्व कळावं, त्यांचे हात नवनिर्मितीमध्ये गुंतावेत आणि तळागाळातल्या व्यावहारिक समस्यांचं भान येऊन त्या सोडवण्यासाठी त्यांनी कटिबद्ध व्हावं, अशी या शिबिरामागची बाबांची भूमिका होती. त्याची आखणी बाबांनी अतिशय विचारपूर्वक केली होती. या सगळ्या नियोजनात त्यांच्या सोबतीला होते दामूभय्या वेले. पहाटे फटफटल्यापासून उन्हाचे चटके लागेपर्यंत चार-पाच तास भरपूर मेहनतीची कामं व्हायची. मग जेवण. त्यानंतर विविध विषयांवर चर्चा, भाषणं, वाद-विवाद झडायचे. राज्यातून अनेक विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते, प्राध्यापक मुलांशी संवाद साधण्यासाठी यायचे. भरपूर विचारमंथन चालायचं. आणि त्यानंतर रात्री करमणुकीचे कार्यक्रम. मे महिन्यात पंधरा दिवस हे शिबिर चालायचं. खरं तर बाबांचा पंचांग वगैरे बघण्यावर बिलकूल विश्वास नव्हता. पण श्रमसंस्कार छावणीच्या तारखा मात्र ते पंचांग बघूनच ठरवायचे. कशासाठी, तर पौर्णिमा कधी आहे ते बघण्यासाठी. पौर्णिमेच्या रात्री उघड्या माळरानावर तरुण मंडळी नव्या विचारांची देवाण-घेवाण करत, उद्याची स्वप्नं बघत जागताहेत, ही त्यांच्या दृष्टीने आनंदाची परमावधी होती.

पहिल्याच श्रमसंस्कार छावणीला तरुणांनी मनापासून प्रतिसाद दिला. शिबिर संपल्यावर अनेकांनी बाबांसोबत सोमनाथमध्ये किंवा अन्य कोणत्या तरी प्रकल्पात काम करण्याची तयारी दाखवली. काहीजणांनी परत जाऊन आपापली कामं सुरू केली. त्यामुळे पुढच्या वर्षीपासून आणखी उत्साहाने शिबिर भरलं. आणि मग श्रमसंस्कार छावणीच्या तारखा जणू महाराष्ट्रातल्या तरुण, सळसळत्या रक्ताला पाठच होऊन गेल्या. मला तर वाटतं, या छावण्यांनी इतिहास घडवला. या छावणीत समविचारी, काही तरी काम करायला उत्सुक तरुण भेटायचे. चर्चा व्हायच्या, वाद-विवाद झडायचे. आपल्याला आयुष्यात काय करायचं आहे याचा शोध घेण्यास मुलं प्रवृत्त व्हायची. बाबांचं बोलणं इतकं जोशपूर्ण आणि नवी आव्हानं दाखवणारं असायचं, की कधी एकदा कामाला सुरुवात करतो, अशा उत्साहाने मुलं फुरफुरायची. आपापल्या ठिकाणी जाऊन कामाला हात

घालायची. नव्या मुलांना प्रेरित करायची. या छावणीतून बाहेर पडलेल्या कित्येकांनी पुढे महाराष्ट्रात स्वतंत्रपणे कामं सुरू केली. काहींनी रचनात्मक कामाची कास धरली, काही संघर्षाच्या वाटेने गेले, काहींनी संस्था सुरू केल्या, वाढवल्या. कुमार सप्तर्षी, अनिल अवचट, डॉ. सोमनाथ रोडे, कुमार शिराळकर, नागेश हटकर, जगदीश गोडबोले, मोहन हिराबाई हिरालाल, डॉ. आनंद नाडकर्णी, डॉ. अशोक बेलखोडे, अतुल शर्मा, डॉ. रवींद्र कोल्हे, डॉ. सतीश गोगुलवार, डॉ. गिरीश कुलकर्णी अशी किती तरी नावं सांगता येतील. सध्या सोमनाथच्या प्रकल्पावर काम करणारा अरुण कदम, हेमलकशात काम करणारा दादा पांचाळ, हेमलकशाच्या वाटेवर असणाऱ्या नागेपल्ली प्रकल्पाची धुरा वाहणारा जगन मचकले हे सगळे कार्यकर्ते या छावणीतूनच तयार झालेले. श्रमसंस्कार छावणीतून कार्यकर्ते तर तयार होत होतेच, पण पुढे बाबांनी काढलेली 'भारत जोडो यात्रा' असेल किंवा आज केंद्र सरकारच्या युवा खात्यातर्फे राबवली जाणारी एनएसएस म्हणजे राष्ट्रीय सेवा योजना, अशा अनेक कल्पनांचा उगम याच शिबिरातल्या चर्चांमध्ये आहे.

बाबा असताना या छावणीचं रूप वेगळंच होतं. त्यांचं नुसतं अस्तित्वच मुलांना भारून टाकत असे. पुढे त्यांचा बाहेरचा प्रवास वाढला आणि या छावणीची जबाबदारी मी अंगावर घेतली. त्यानंतर अर्थातच त्याचं स्वरूप थोडंफार बदलत गेलं, पण त्यातला जोश आणि निर्मितीचा संस्कार अजूनही कायम आहे.

मी कामाला सुरुवात केली तेव्हा सोमनाथला शेती होत होती पण उत्पन्न म्हणावं तसं नव्हतं. आनंदवनाची लोकसंख्या वाढत चालली होती. त्यात हेमलकसा, अशोकवन असे सगळे प्रकल्प मिळून धान्याची गरज इतकी वाढली होती की आनंदवनातली शेती आम्हाला पुरी पडत नव्हती. त्यामुळे आनंदवनात पाण्याचं काम झाल्यावर मी सोमनाथकडे लक्ष वळवलं. १९७७-७८ ची गोष्ट असेल ही. तेव्हा बाबांचा मुक्काम आनंदवन-सोमनाथ-हेमलकसा असा फिरता असायचा. त्यामुळे सोमनाथमधील प्रत्यक्ष कामाची जबाबदारी माझ्यावर होती. तिथे शेती वाढवायची असेल तर आधी पाण्याची कायमस्वरूपी सोय करायला हवी होती. तोपर्यंत सोमनाथच्या १२१९ एकरांपैकी तीनेकशे एकर नांगरटीखाली आणलेली होती. ती वाढवणं आता निकडीचं झालं होतं.


पाणी असेल तर सोमनाथ असेल,
याची जाणीव पहिल्यापासून होती.

सोमनाथच्या जमिनीची एक बाजू ताडोबाच्या जंगलाच्या दिशेने साधारण चढावर आहे, तर दुसऱ्या बाजूपर्यंत जमीन उताराची आहे. त्यामुळे वाटेत बांध टाकून या उताराचा उपयोग करून घेणं शक्य होतं. फक्त त्यासाठी थोडा अभ्यास करावा लागणार होता. त्यासाठी मी सोमनाथला फेऱ्या वाढवल्या. तिकडे शंकरदादा, हरी बढे आणि अरुण कदम अशा सगळ्या कार्यकर्त्यांसोबत चर्चा सुरू केल्या. सोमनाथचा परिसर पिंजून काढला. त्याचा नकाशा तोंडपाठ केला आणि कामाला सुरुवात केली.


कृषिविकासाचं सोमनाथ मॉडेल.

आमच्या जागेतून वाहणाऱ्या नाल्यांना ठिकठिकाणी बांध घातले अन् पावसाचं पाणी जवळपास १७-१८ ठिकाणी अडेल अशी सोय केली. श्रमदानातून बांधलेले एकूण १४ तलाव तिथे होते. पण तिथेही आनंदवनासारखाच प्रश्न होता. ते पुरेसे खोल नव्हते. त्यामुळे एक्सकॅव्हेटर लावून ते खोल केले. या तलावांची रचना मात्र आनंदवनापेक्षा वेगळी आहे. हे तलाव उतरत्या पातळ्यांवर एकाखाली एक बांधलेले आहेत. त्यामुळे एका तलावातून ओव्हरफ्लो झालेलं पाणी खालच्या तलावात येतं. त्यामुळे पाणी वाया जात नाही आणि सगळे तलाव भरलेले राहतात. उपलब्ध पाण्यातून बारमाही पाण्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठीच्या या उपाययोजना. या पद्धतीमुळे सोमनाथला वर्षभर पाण्याचा पुरवठा होतो.

आम्ही बांधलेले बंधारे आणि तलाव यांमध्ये योग्य प्रकारे पाणी अडवल्यामुळे केवळ प्रकल्पालाच नव्हे तर आसपासच्या गावांनाही मोठा फायदा झाला. या सर्व गावांमध्ये विहिरींना आणि ट्यूबवेल्सना पाणी वाढलं. त्यामुळे आसपासचे शेतकरीही आता दुबार पीक घेऊ लागले. त्यातून त्यांचं उत्पन्न वाढलं. सोमनाथमध्ये तर दरवर्षी तीन-तीन पीकं घेतली जातात. शेतीतही गेल्या २०-२५ वर्षांमध्ये आम्ही भरपूर प्रयोग केले आहेत. हरी आणि अरुण या दोघांनी मिळून तर शेती वाढवण्याचा ध्यासच घेतला आहे.

सुरुवातीला आमचे सदाफळ काका आनंदवन आणि सोमनाथ अशा दोन्ही ठिकाणी शेतीतल्या नव्या प्रयोगांसाठी मार्गदर्शन करायला यायचे. अरुण हा आमच्यातला अभ्यासू माणूस. त्याने महाराष्ट्रातल्या शेतीतल्या अनेक प्रयोगांना भेटी दिल्या आणि त्यांचा अभ्यास केला, देशात शेतीमध्ये नवं काय चालू आहे याबद्दल वाचन केलं. त्या सगळ्याचा परिणाम म्हणून आज सोमनाथ हे केवळ संख्येने नव्हे, तर दर्जा आणि नव्या प्रयोगांच्या

दृष्टीनेही महाराष्ट्रातलं आदर्श शेती करणारं गाव ठरलं आहे.

सोमनाथला मुक्काम असला की हरी, अरुण आणि मी असे तिघंजण अनेकदा रात्र-रात्र चर्चा करायचो. नवी बियाणं, नव्या पद्धती, नवी पिकं. बोलायला विषय भरपूर अन् वेळ कमी पडायचा. सोमनाथचा चप्पा चप्पा पालथा घालायचो. त्यातून कोणत्या भागात काय परिस्थिती आहे याचा अंदाज यायचा. दरवर्षी काही ना काही पडीक जमीन नांगराखाली आणायची अन् त्यावर नवे प्रयोग करायचे, असा आमचा कित्येक वर्षांपासूनचा शिरस्ता. त्यामुळे आज सोमनाथमध्ये तब्बल पाचशे एकर जमिनीवर शेती होते. आणि ती वाढवण्याचं काम अविरत चालू आहे.

सोमनाथमध्ये आज तांदूळ होतो, गहू होतो. तूर, कापूस, हरबरा, हळद आणि नाना प्रकारचा भाजीपाला आम्ही सोमनाथमध्ये पिकवतो. त्यातून सोमनाथची गरज तर भागतेच, पण हे धान्य विकून संस्थेच्या उत्पन्नातही भर पडते. पूर्वी सोमनाथमधूनच आनंदवन आणि हेमलकशाला धान्य पोहोचत असे. पण आता या दोन्ही ठिकाणी सरकारी ग्रँट असल्यामुळे धान्यखरेदी कोठून करायची याच्या काही अटी आम्हाला पाळाव्या लागतात. त्यामुळे सोमनाथचा माल प्रामुख्याने खुल्या बाजारात विकला जातो आणि त्यामुळे संस्थेचा मोठा खर्च भरून निघतो.

सोमनाथमध्ये चांगलं पीक येऊ लागल्यानंतर इथे एक मोठा अडथळा जाणवू लागला तो जंगली प्राण्यांचा. फळभाज्या-पालेभाज्या फस्त करण्यात हे प्राणी पटाईत होते. नीलगाई, चितळ आणि रानडुकरं बरंचसं धान्य खाऊन टाकायची. माकडांच्या झुंडी पिकांची नासधूस करायच्या. धान्याच्या मिषाने अस्वलंही शेतात शिरायची. त्यावर काही रामबाण उपाय शोधणं गरजेचं होतं. त्या दृष्टीने त्यासाठी दहा वर्षांपूर्वी आम्ही 'सिंजेंटा फाउंडेशन, इंडिया' या संस्थेसोबत जमिनीच्या एका छोट्या तुकड्यावर नवा प्रयोग करून बघितला. फळभाज्यांच्या शेतांभोवती आम्ही सौर कुंपण उभारलं. या सौर कुंपणामुळे प्राण्यांना छोटासा झटका बसतो, पण त्यामुळे त्यांना इजा होत नाही. फक्त या जागेपासून लांब राहायला, हवं एवढी नोंद त्यांचा मेंदू घेतो. हा प्रयोग यशस्वी झाला, आणि तेव्हापासून आमचं भाजीपाल्याचं उत्पन्नही चांगलंच वाढलं.

अर्थात सोमनाथचं यश हे निव्वळ आर्थिक प्रगतीत नाही. इथे गेल्या पंधरा-वीस वर्षांपासून शेतकऱ्यांच्या प्रशिक्षणासाठीही हरी आणि अरुण धडपडताहेत. इथली शेती बघून प्रशिक्षण घेण्यासाठी सोमनाथमध्ये दरवर्षी अनेक शेतकरी येतात. गेली कित्येक वर्षं आम्ही आनंद निकेतनच्या शेतकी कॉलेजमधल्या प्राध्यापक-विद्यार्थ्यांना आणि बाहेरच्या अनेक कृषितज्ज्ञांनाही सोमनाथला बोलावतो. त्यांची पंचक्रोशीतल्या शेतकऱ्यांची गाठ घालून देतो. या चर्चांचा फायदा शेतकरी आणि आम्ही असा दोघांनाही होतो.



शंकरदादांनंतर सोमनाथचा प्रकल्प समर्थपणे सांभाळणारे दोन भक्कम कार्यकर्ते– हरी बढे आणि अरुण कदम.

मनाला समाधान देणारं सोमनाथमधलं आणखी एक काम म्हणजे तरुण बेरोजगार मुलांसाठी चालवलं जाणारं 'युवाग्राम'. बाबांच्या वर्कर्स युनिव्हर्सिटीचाच तो एक छोटा भाग आहे म्हणा ना. १९९५ पासून आम्ही हा प्रयोग करतो आहोत. आसपासच्या गावांमधल्या दहावी-बारावी नापास झालेल्या मुलांना आम्ही सोमनाथला बोलावतो. त्यांच्या राहण्या-खाण्याची मोफत सोय करतो आणि त्यांना सोमनाथमधल्याच निरनिराळ्या कामांमध्ये सामावून घेतो. ही मुलं इथे शेती शिकतात, डेअरीत काम करतात. कोणी इलेक्ट्रिशियनचं काम शिकतो, तर कोणी फॅब्रिकेशनचं. शेतीच्या उपकरणांच्या दुरुस्ती-देखभालीचं कामही इथे मोठ्या प्रमाणावर चालतं. ते शिकून बाहेरच्या गावांमध्ये तसा व्यवसाय करणारी मुलंही अनेक आहेत.

सोमनाथमध्ये जवळपास चारशे कुष्ठमुक्त राहतात तसेच इतर काही कार्यकर्तेही. त्यांच्यासाठी सोमनाथमध्ये २० खाटांचं एक छोटं हॉस्पिटलही आम्ही उभं केलं आहे. या हॉस्पिटलमध्ये एक सुसज्ज ऑपरेशन थिएटर तयार करून ठेवलं आहे. दरवर्षी नागपूरच्या 'रोटरी क्लब'तर्फे इथे हर्निया आणि हायड्रोसिलची ऑपरेशन्स होतात. तेव्हा सोमनाथच्या आसपासच्या दहा-पंधरा गावांमधून रुग्ण इथे गोळा होतात. इतर वेळी सोमनाथच्या कुष्ठरुग्णांमधीलच एकजण इथे पॅरामेडिकल वर्कर म्हणून काम करतो. नेताजी रामटेके त्याचं नाव. तो माझा सोमनाथमधला उजवा हात आहे. त्याच्या मदतीला बाली करेवार ही प्रशिक्षित नर्सही काम करते.

हे सगळं उभारण्यात शंकरदादा आणि सिंधूताईंनंतर मोठा वाटा आहे तो हरी, त्याची बायको शोभा, अरुण आणि त्याची पत्नी उषा हिचा. त्यांना तयार केलं शंकरदादा आणि सिंधूताई यांनीच. माणसं जोखण्याचं अन् त्यांना घडवण्याचं कौशल्य त्यांच्याकडे पुरेपूर होतं. शंकरदादांना तर बाबा 'व्हाइस चॅन्सलर ऑफ वर्कर्स युनिव्हर्सिटी' म्हणायचे. हरी हा कुष्ठरुग्ण. तो मूळचा जळगावचा. १९७१ मध्ये तो आनंदवनात आला तेव्हा त्याचं शिक्षण पूर्ण व्हायचं होतं. फक्त अठरा वर्षांचा होता तो. आनंद निकेतन कॉलेजमध्ये शिक्षण घेत असतानाच तो माझ्याबरोबर आनंदवनात कामही करत असे. तेव्हा हरीने

ताजनेसोबत आनंदवनाच्या आसपासच्या गावांमध्ये फिरून अंध-अपंग आणि कुष्ठरुग्णांचा सर्व्हे केला होता, याचा उल्लेख आधी आलेला आहेच. शिक्षण संपल्यावर बाबांनी हरीला शंकरदादांच्या मदतीला सोमनाथला पाठवलं. पुढे १९७९ मध्ये त्याचं लग्न झालं. २००१ पर्यंत शंकरदादा सोमनाथला काम करत होते. पुढे त्यांना पार्किन्सन्स झाल्यावर हरीने सोमनाथचा चार्ज हातात घेतला.

अरुणची पार्श्वभूमी थोडी वेगळी. तो मूळचा धुळयाचा. सुखवस्तू शेतकरी कुटुंबातला. तो तिकडे राष्ट्र सेवा दलात काम करायचा. कॉलेजच्या टीमबरोबर तो १९७२, ७३ आणि ७४ अशी तीन वर्षं श्रमसंस्कार छावणीला येत होता. इथलं काम त्याला आवडलं. तिसऱ्या वर्षी तो बाबांना म्हणाला, “मला काम करायचं आहे, पण मी स्वतःची संस्था वगैरे काढून काम करू शकेन असं मला वाटत नाही. इथे संस्थेत माझी गरज असेल तर सांगा.” बाबांनी त्याला सोमनाथमध्ये हरीसोबत काम करायला सांगितलं. सुरुवातीला त्याच्या घरून बराच विरोध झाला. पहिली दोन वर्षं त्याचे आई-वडील हा परत येईल या आशेवर होते. पण नंतर ते दोघं आनंदवनात, सोमनाथला येऊन गेले. इथे काय काम चालतं ते त्यांनी पाहिलं आणि मग त्यांचा विरोध कमी झाला. त्यांनी अरुणला पाठिंबा दिला असं नव्हे, पण किमान विरोध केला नाही. त्यांची नाराजी स्वीकारून अरुण इथे काम करत राहिला.

सोमनाथच्या सुरुवातीच्या काळाबद्दल बोलतोय तर आणखी एका महत्त्वाच्या कार्यकर्त्याबद्दल सांगितलं पाहिजे. त्याचं नाव दिनकर सिर्सीकर. दिनकर १९७४ मध्ये कुष्ठरोगाच्या उपचारांसाठी सोमनाथमध्ये भरती झाला. पहिली दोन वर्षं तो शंकरदादांच्या मार्गदर्शनाखाली शेतीत, दवाखान्यात काम करत होता. पण लवकरच आमच्या लक्षात आलं, की दोन्ही हातांची सगळी बोटं वाकडी झाली असूनही दिनकरचं अक्षर अतिशय वळणदार आहे. त्याला लिखाणामध्ये, हिशोब ठेवण्यामध्ये गती होती. मग बाबांनी त्याच्याकडे सोमनाथ प्रकल्पाचा हिशोब ठेवण्याची जबाबदारी दिली. पुढे आनंदवनाचा व्याप वाढल्यावर १९८४ मध्ये तो आनंदवनात आला. तेव्हापासून आजतागायत तोच आनंदवनाचे दैनंदिन हिशोब, बँकिंग, संस्थेचं बजेट, कार्यकारिणीचे ठराव अशी सगळी कामं सांभाळतो आहे. आज आनंदवनाची एकूण उलाढाल १०० कोटींच्या वर आहे. एवढ्या मोठ्या संस्थेची आर्थिक बाजू दिनकर समर्थपणे पेलतो आहे.

या सगळ्या कार्यकर्त्यांचा विचार केला की वाटतं, मी तर इथे आनंदवनातच लहानाचा मोठा झालो. दुसरं जग मला माहितीच नव्हतं. पण अरुणसारख्या कार्यकर्त्यांचं तसं नव्हतं. महाराष्ट्राच्या दुसऱ्या टोकाला राहणारा हा तरुण माणूस. खानदेशातल्या लोकांसाठी चंद्रपूर म्हणजे काळ्या पाण्याची शिक्षाच. पण तो इथे अलगद रुजला. त्याने सर्वस्व झोकून कामं केली. नवी माणसं घडवली. तो काय किंवा हरी काय, पडतील त्या जबाबदाऱ्या पार पाडत उत्साहाने काम करताहेत. हरी हा सोमनाथचा कणा आहे. त्यामुळे त्याला तिथून फारसं बाहेर पडता येत नाही. अरुणने मात्र सगळीकडे माझ्या खांद्याला खांदा लावून काम केलं. किल्लारीत भूकंप पुनर्वसितांसाठी घरं बांधताना तो माझ्यासोबत होता. झरी जामणी तालुक्यातल्या आमच्या मूळगव्हाण प्रकल्पासाठीही तो

पहिल्या दिवसापासून झटत होता.

हरी, अरुण आणि दिनकरचा विषय निघाल्यामुळे थोडं विषयांतर झालं. पण या जिवाभावाच्या कार्यकर्त्यांबद्दल जेवढं बोलावं तेवढं कमी आहे. आनंदवन असो, सोमनाथ असो किंवा हेमलकसा, यांच्यासारख्या कार्यकर्त्यांच्या परिश्रमांतूनच हे प्रकल्प आकाराला आले आहेत.

इतक्या वर्षांच्या मेहनतीनंतर आज शेतीशिवाय सोमनाथमध्ये काय आहे? इथे आम्ही वनशेतीची लागवड केली आहे. त्यात निलगिरी, सुबाभूळ, अनेक मिश्र झाडं आहेत. हे काम एक-दोन वर्षांतही झालेलं नाही. आम्ही सर्वांनीच चिकाटीने केलेल्या कामाचं ते फळ आहे. चिकाटीची सुरुवात कुठे होते माहितीय? सोमनाथला मुक्काम असला की मी सकाळी उठून फिरायला जायचो. तेव्हा पायजम्याच्या खिशात वेगवेगळ्या बिया ठेवलेल्या असायच्या. जाता जाता त्या बिया टाकत जायचो. मग हळूहळू इतरांनाही ती सवय लागली. शिवाय श्रमसंस्कार छावणीतही ही वनशेती फुलण्यासाठी श्रमदान केलं जायचं. त्यामुळे आज सोमनाथच्या विस्तीर्ण परिसरात तुम्हाला हिरवाईच हिरवाई दिसेल. सोमनाथमधल्या आमच्या जमिनीचं एक टोक ताडोबा जंगलाच्या बफर झोनला लागून उंचावर आहे. तिथून पाहिलं तर तळी, नाले, शेतं अन् ही जंगलं यांनी व्यापलेला परिसर नजरेस पडतो आणि डोळे निवतात.

सोमनाथमध्ये एकूण सहा कम्युन्स आहेत. तिथे कोणत्याही ठिकाणी जा, स्वच्छ परिसर, घरातल्या सांडपाण्यावर पिकवलेली फळझाडं, एखाद-दुसरं फुलांचं झाड आणि घराच्या बाहेर एकमेकांशी हसत-खेळत गप्पा मारणारे तृप्त कुष्ठमुक्त हे चित्र तुम्हाला दिसेल. एक आदर्श खेडंच आहे ते. हे खेडं असंच्या असं बाहेरच्या जगात तयार होऊ शकत नाही हे खरं. पण किमान शेती, पाणी, बांधबंधिस्ती, डेअरी यातल्या मॉडेलचं अनुकरण नक्कीच होऊ शकतं. ते व्हावं यासाठी आमची सगळी धडपड आहे.

कुष्ठरुग्ण पोहोचले दुर्गम आदिवासींपर्यंत

१९७१ च्या दरम्यानची गोष्ट असेल. मी आणि प्रकाश नागपूरला मेडिकल कॉलेजमध्ये शिकत होतो. एका सुट्टीत आनंदवनात आलो तेव्हा बाबांनी आम्हाला सोबत घेऊन भामरागडला जाण्याचं ठरवलं.


बाबांचं भामरागड प्रेम त्यांच्या तरुणपणापासूनचं होतं. कॉलेजमध्ये असताना ते त्या भागात शिकारीसाठी भरपूर भटकले होते. त्या वेळी त्यांनी पाहिलेलं आदिवासींचं जगणं त्यांच्या मनात खोल रुतून बसलं होतं. पण आनंदवन मार्गी लागेपर्यंत ते थांबले होते. तो प्रकल्प स्थिरस्थावर झाल्यानंतर त्यांचं मन भामरागडकडे ओढ घेऊ लागलं. यदुनाथ थत्ते, दामोदर वेले, शिरुभाऊ लिमये यांच्यासारख्या मित्रांना घेऊन ते आधीही एकदा या भागात जाऊन आले होते. त्या वेळी कपडे घातलेली माणसं पाहून गावच्या गाव जंगलात पळून जात असे. तिथल्या आदिवासींना बाहेरच्या जगात सुरू असलेल्या विकासाबद्दल यत्किंचितही कल्पना नव्हती. ही परिस्थिती पाहून बाबांनी इथे काम सुरू करण्याचं

ठरवलं. त्यांच्या मनात माडिया जमातीसाठी सर्वंकष विकास प्रकल्प राबवायचा असं होतं. बाबांनी या जमातीच्या विकासासाठी 'इंडिग्रेटेड रूरल डेव्हलपमेंट प्रोग्रॅम' तयार केला होता.

बाबा आम्हाला घेऊन भामरागडला गेले तेव्हाचं दृश्य खरोखरच धक्कादायक होतं. सगळा जंगलांनी व्यापलेला भाग. माडिया आदिवासींचे विखुरलेले पाडे. रस्ते नाहीत, पाण्याच्या सोई नाहीत, डॉक्टर नाहीत की शाळा नाहीत. जगण्याचा आधार फक्त जंगल. हे लोक शेती करत होते, पण फक्त भाताची. बाकीची धान्यं, भाजीपाला त्यांना माहितीच नव्हता. त्यामुळे एकजात सगळी पोरं कुपोषित आणि नाना रोगांनी ग्रासलेली. आधी म्हटल्याप्रमाणे बाहेरचं माणूस आलं की लोक घाबरून जंगलाच्या दिशेने पळत सुटत. मन विषण्ण करणारा अनुभव होता तो.

भरपूर भटकल्यावर आम्ही एका जागी विसावलो तेव्हा बाबांनी इथे राहून काम करण्याची इच्छा व्यक्त केली. तेव्हा बाबांची साठी जवळ आलेली होती, पण त्यांचा उत्साह आम्हा तरुणांना लाजवेल असा होता. बाबांच्या डोक्यात होतं, की सोमनाथच्या श्रमसंस्कार छावणीतून तयार झालेल्या तरुण मुलांनी हे काम अंगावर घ्यावं. या तरुणांमध्ये कोण कोण होतं? अजित मळकर्णेकर, कुमार शिराळकर, दीनानाथ मनोहर, नागेश हटकर, राज सुलाखे, मोहन हिराबाई हिरालाल, दादा पांचाळ, जगदीश गोडबोले, जगन मचकले अशी बरीच मंडळी. हा प्रकल्प आदिवासींच्या सर्वांगीण विकासासाठी असला तरी आरोग्याच्या बाबतीत फारच भीषण परिस्थिती होती. त्यामुळे इथे पहिल्या टप्प्यात डॉक्टरची गरज आहे, असं बाबांचं म्हणणं होतं. ते ऐकून प्रकाशने हेमलकशात काम करण्याची इच्छा व्यक्त केली.

एकदा ठरल्यावर बाबा वेगाने कामाला लागले. ते साल होतं १९७१. तेव्हा वसंतराव नाईक महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. ते बाबांचे वर्गमित्र. बाबांनी त्यांच्याकडे भामरागडमधली पन्नास एकर जमीन प्रकल्पासाठी मागितली. १९७३ च्या शेवटाला 'महारोगी सेवा समिती'ला भामरागडच्या जंगलातल्या हेमलकसा गावाजवळची जागा मिळाली. अर्थात गाव वगैरे म्हणायचं ते फक्त लिहिण्याच्या सोईसाठी. प्रत्यक्षात हा सगळा भाग म्हणजे घनदाट जंगलच होतं.




हेमलकशातील पहिल्या झोपडीसमोर रेणुका, ताई, बाबा, डॉ.विकास
डॉ.प्रकाश (खाली बसलेले)

जागा मिळाल्याचं पत्र हातात येताच नागेश हटकर, राज सुलाखे, मी आणि आणखी काही कार्यकर्त्यांना घेऊन बाबा हेमलकशात दाखल झाले. पुढच्या टप्प्यात अजित मळकर्णेकर, कुमार शिराळकर वगैरे इतर मंडळी आली. त्या वेळी प्रकाश नागपूरच्या कॉलेजमध्ये हाऊस जॉब करत होता. त्याचा हाऊस जॉब संपल्यावर तोही हेमलकशाला पोहोचला. तो येईपर्यंत बाबांच्या नेतृत्वाखाली आमचं काम सुरू झालं होतं. बाबांनी या प्रकल्पाचं नाव ठेवलं 'लोकबिरादरी' प्रकल्प. पहिलं काम होतं तिथलं जंगल साफ करून राहण्याजोग्या झोपड्या उभ्या करण्याचं. बाबांनी झोपड्या उभारण्याचं काम आमच्यावर सोपवलं आणि ते स्वतः आसपासच्या आदिवासी पाड्यांवर जाऊ लागले. पण आधी माणसं समोर थांबण्याची मारामार. कोणी थांबलंच, तर भाषेचा प्रश्न होता. त्यांना मराठी समजत नव्हती आणि बाबांना माडिया भाषा. पण हळूहळू खुणांची भाषा काम करू लागली. आम्ही त्यांना अपाय करण्यासाठी आलेलो नाही, एवढं त्यांना पटलं. जेवढ्या आदिवासींना आमच्याबद्दल विश्वास वाटत होता त्यांना आम्ही (मी डॉक्टर असल्याने) थोडी वैद्यकीय मदतही करू लागलो. मी नुकताच डॉक्टर झालेलो होतो आणि आनंदवनात डॉक्टर म्हणून कार्यरत झालेलो नव्हतो. त्यामुळे 'लोकबिरादरी' प्रकल्पातच माझ्या डॉक्टरकीला मुहूर्त लागला, असं म्हणता येईल. त्या वेळेचे आमचे अनुभव अक्षरशः मन विदीर्ण करणारे होते. मला आठवतं, अगदी सुरुवातीच्या काळात फिट आल्याने शेकोटीत हात जळून कोळसा झालेला एक रुग्ण आमच्याकडे आला होता. मी त्याच्या हाताला मलमपट्टी केली. त्या वेळी आनंदवनात अजून बँडेज तयार करायला सुरुवात झाली नव्हती. त्यामुळे आम्ही विकतचं बँडेजच वापरायचो. मी या रुग्णासाठी वापरलं ते उत्तम दर्जाचं बँडेज होतं. त्या रुग्णाला पुन्हा चार-आठ दिवसांनी यायला सांगितलं. तो आला तेव्हा हातावर बँडेज नव्हतं. त्याबद्दल त्याला विचारलं, तर त्याची आई मोडक्या-तोडक्या खाणाखुणांच्या भाषेत म्हणाली, "एवढं चांगलं कापड जखमांना कसं काय वापरायचं?

त्यामुळे मी त्याचे लंगोट शिवले." आता यावर काय बोलणार सांगा! जाता जाता आणखी एक गंमत. आम्हाला माडियांची भाषा येत नसल्याने सूर्य-चंद्र वगैरेंच्या मदतीने आम्ही त्यांना औषध घेण्याचं दिवस-रात्रीचं शेड्यूल समजावून सांगायचो. ते समजल्यासारखं दाखवायचे, पण चार दिवसांसाठी दिलेल्या औषधाच्या गोळया एकाच वेळी मटकावून टाकायचे. असा सगळा प्रकार.

प्रकाश येईपर्यंत चार-पाच महिने बाबा आणि आम्ही कार्यकर्ते तिथे मुक्काम ठोकून होतो. त्यानंतर प्रकाश आणि पुढे आणखी काही महिन्यांनी त्याची बायको डॉ. मंदा हेमलकशात दाखल झाले. त्या काळात जंगल तोडून जागा वापरण्याजोगी करण्याबरोबरच आनंदवनातून सामानसुमान इथे आणणं हेही मोठंच काम होतं. त्या वेळी भामरागडला कोणत्याच वस्तू मिळायच्या नाहीत. त्यामुळे बांधकामासाठी विटा-सिमेंटपासून ते स्वयंपाकाची भांडी, शिधा, कपडेलत्ते, औषधं, सगळं सगळं आनंदवनातूनच आणावं लागायचं. हे हमाली काम मी आणि आमच्या कुष्ठमुक्त कार्यकर्त्यांनी मोठ्या आनंदाने केलं. मी सुरुवातीची काही वर्षं स्वतः ट्रक चालवत हेमलकशाला सामान पोहचवण्याचं काम करत होतो. आपले सगळे कार्यकर्ते दुर्गम जंगलात राहून काम करताहेत, त्यांना कोणतीही गोष्ट कमी पडता कामा नये, हा विचार आमच्या सर्वांच्याच डोक्यात सतत असायचा. त्यामुळे हेमलकशाच्या खडतर फेऱ्या करताना आम्हाला कधी तो त्रास वाटला नाही.



लोकबिरादरी प्रकल्पाला
रसद पुरवण्यासाठी आनंदवनातून
स्वतः ट्रकच्या खेपा करणारे डॉ.विकास

आनंदवन-हेमलकसा हे अंतर जवळपास अडीचशे किलोमीटर. एकदा का आलापल्ली सोडलं की रस्ता असा नाहीच, अशी तेव्हाची परिस्थिती होती. आम्ही ट्रक किंवा जीपमध्ये सामान घेऊन आनंदवनातून निघायचो आणि मजल-दरमजल करत हेमलकशाला पोहोचायचो. त्यात पावसाळयात नद्यांना, विशेषतः बांदिया नदीला पूर यायचा आणि भामरागडशी संपर्कच तुटून जायचा. कधी कधी हा पाच-सहा तासांचा रस्ता पार करायला आम्हाला तीन-तीन दिवस लागायचे. जीप अनेकदा सामानसाकट नदीमध्ये अडकून बसायची. मग खाली उतरून गाडी अक्षरशः उचलून वर काढावी लागायची. पुन्हा पुढे गेलं की आणखी एखादी नदी वाट अडवून बसलेली असायची. मग त्या नदीचं पाणी उतरेपर्यंत तिथेच मुक्काम ठोकून बसायचं. हेमलकसा उभारण्यासाठी आणि तिथली घडी नीट

बसवण्यासाठी आम्ही अशा किती चकरा मारल्या असतील त्याची गिनतीच नाही.

तिकडे प्रकाश, मंदा, रेणुका, विलास मनोहर, दादा पांचाळ, गोपाळ फडणीस, मनोहर यम्पलवार असे कार्यकर्ते होते आणि त्यांच्याबरोबर आनंदवनातल्या कुष्ठमुक्त कार्यकर्त्यांची एक मोठी फौजही होती. 'लोकबिरादरी' प्रकल्प उभा केला तो या सर्वांनी. भर जंगलातच जाऊन पडले होते हे सगळे. कोणत्याही सोई-सुविधा नव्हत्या. दोन किलोमीटरवर असलेल्या नदीवरून पाणी आणावं लागायचं. आसपास जंगली जनावरांचा आणि विषारी सापांचा वावर. बोलायला माणसं नाहीत की करमणुकीची साधनं नाहीत. ज्यांच्यासाठी हे काम सुरू केलं ते आदिवासीही घाबरून औषधोपचारांसाठी यायला तयार नाहीत. ते पहिले दिवस त्यांनी कसे काढले असतील कल्पना करा.



लोकबिरादरी प्रकल्पातल्या सुरुवातीच्या काळातले तीन कार्यकर्ते मित्र
– सीताकांत प्रभू, डॉ.प्रकाश आमटे, विलास मनोहर.


पुढे हळूहळू आदिवासी उपचारांसाठी येऊ लागले. सोई वाढू लागल्या. काम उभं राहिलं. प्रकाश आणि मंदाने या दुर्गम भागात ठाण मांडून आदिवासींच्या आरोग्याच्या प्रत्येक प्रश्नाला हात घातला. हाती असतील त्या साधनांसोबत ते तिथल्या प्रश्नांशी लढत राहिले. पुढे हेमलकशात आदिवासी मुलांसाठी आश्रमशाळाही सुरू झाली.

या काळात हेमलकशाला आनंदवनातून कार्यकर्त्यांचाही पुरवठा होत राहायचा. आनंदवनात ताज्या दमाचा कार्यकर्ता दाखल झाला की बाबा त्याला सोमनाथ किंवा हेमलकशाला पाठवायचे. वेगवेगळया ठिकाणच्या वेगवेगळया परिस्थितीत कार्यकर्ते तावून-सुलाखून तयार व्हायचे. काही आनंदवनात परतायचे, काही त्या त्या प्रकल्पांमध्येच स्थिरावायचे. अशी किती तरी उदाहरणं. सध्या आनंदवनात पाहुण्यांच्या निवास-भोजन व्यवस्थेचा प्रमुख असणारा आमचा सीताकांत प्रभू सुरुवातीला हेमलकशातच काम करत होता. तो १९८१ मध्ये आनंदवनात आला. दोन महिन्यांनी बाबांनी त्याला हेमलकशाला पाठवलं. जवळपास सहा वर्षं तो इथल्या आश्रमशाळेत काम करत होता. नंतर आनंदवनात परतल्यावर त्याने पत्रव्यवहाराचं काम अंगावर घेतलं. उत्तम अक्षर आणि लिखाणाची जाण असल्यामुळे या कामाला त्याने पुरेपूर न्याय दिला. पुढे ताईच्या 'समिधा' या आत्मचरित्राचं शब्दांकन प्रभूनेच केलं. आज तो आनंदवनाला भेट देणाऱ्या देशी-विदेशी पाहुण्यांची संपूर्ण व्यवस्था सांभाळतो आहे. रोज शेकडोपाहुणे मंडळी आनंदवनात भेट द्यायला येतात. त्यांच्या इमेल्सना-पत्रांना-फोनना उत्तरं देण्यापासून त्यांना प्रकल्प फिरवून

दाखवणं, त्यांच्या जेवणाची-निवासाची व्यवस्था करणं हे काम बरंच दमवणारं आहे, पण प्रभू ते कुशलतेने सांभाळतो. कुठे गडबड नाही की गोंधळ नाही.

तर सांगत काय होतो, की हेमलकशातला दवाखाना स्थिरस्थावर झाल्यावर इतरही कामं जोर धरू लागली. दादा पांचाळने कुष्ठमुक्त कार्यकर्त्यांच्या मदतीने प्रकल्पात छोट्या प्रमाणावर शेती सुरू केली. अर्थात ही सगळी हकीगत प्रकाशने लिहिलेल्या 'प्रकाशवाटा' या पुस्तकात आली आहेच. त्यामुळे इथे त्याची पुनरुक्ती करत नाही.

हेमलकसा प्रकल्प सुरू झाल्यानंतर दहाएक वर्षांनी त्या भागात एक नवीनच प्रश्न उद्भवला. १९८४ मध्ये भामरागडच्या खालच्या बाजूला भोपालपट्टनम इथे इंद्रावती नदीवर आणि इंचमपल्ली इथे गोदावरी नदीवर धरणं बांधण्याची योजना जाहीर झाली. बाबांनी या दोन्ही योजनांना कडाडून विरोध केला. ही धरणं प्रत्यक्षात आली तर भामरागड परिसरातल्या माडिया आदिवासींच्या आयुष्यात मोठीच उलथापालथ होईल, हे बाबांच्या लक्षात आलं होतं. आजवर बाहेरच्या जगाशी काहीच संबंध न आलेली ही आदिवासी जमात धरणामुळे होणाऱ्या विस्थापनाला कशी सामोरी जाईल, असा प्रश्न बाबांना पडला होता. त्याशिवाय महाराष्ट्र, तत्कालीन मध्य प्रदेश आणि आंध्र प्रदेश या तिन्ही राज्यांमधल्या घनदाट जंगलावरही या धरणांमुळे कुऱ्हाड येणार होती. मोठी धरणं चांगली की वाईट हा स्वतंत्र मुद्दा; पण आदिवासींचं विस्थापन टाळण्यासाठी त्यांना विरोध करायला हवा, अशी भूमिका बाबांनी घेतली. आपलं म्हणणं मांडण्यासाठी त्यांनी त्या वेळी 'एथनोसाइड', म्हणजे 'जेनोसाइड ऑफ एथनिक ग्रुप' असा शब्दप्रयोग नव्यानेच वापरला. पुढे हा शब्द आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रचलित झाला. अशा धरणांना विरोध करण्यासाठी मोहन हिराबाई हिरालालने बाबांच्या प्रेरणेने 'जंगल बचाव, मानव बचाव कृती समिती' स्थापन केली. त्याने उभारलेल्या आंदोलनात देशभरातले अनेक कार्यकर्ते सामील झाले होते. 'चिपको' आंदोलनाचे प्रणेते सुंदरलाल बहुगुणा या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी गडचिरोलीला आले. विशेष म्हणजे भामरागडमधले आदिवासी आंदोलनाच्या पाठीशी उभे राहिले. बाबांनी तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्यापर्यंत आपलं म्हणणं पोहोचवलं. परिणामी, हे दोन्ही प्रकल्प आधी लांबणीवर टाकले गेले आणि पुढे देशभरातून दबाव वाढू लागला तसे रद्दच झाले. नर्मदा बचाव आंदोलनाशी बाबा जोडले गेले ते भामरागडातल्या या आंदोलनामुळे. बाबा हेमलकशाच्या प्रकल्पाकडे कशा सर्वंकष पद्धतीने पाहत होते ते कळण्यासाठी हे उदाहरण पुरेसं असावं.



हेमलकसा प्रकल्पाच्या उभारणीत
नागेपल्ली प्रकल्पाचा मोठा वाटा आहे.
या प्रकल्पाची धुरा वाहणारे
मुक्ता आणि जगन मचकले

आणखी एका प्रकल्पाबद्दल सांगितल्याशिवाय लोकबिरादरी प्रकल्पाची गोष्ट पूर्ण होणार नाही. आनंदवनातून हेमलकशाला जाताना वाटेत नागेपल्ली नावाचं गाव लागतं. तिथून हेमलकसा ६५ किलोमीटरवर आहे. हेमलकशाच्या जमिनीबरोबरच बाबांनी या गावात संस्थेसाठी जागा मागितली होती. हेमलकशाचं दुर्गम स्वरूप बघता आनंदवन आणि हेमलकशाच्या वाटेत मुक्काम करण्यासाठी एक निवारा हवा, ही दूरदृष्टी त्यामागे होती. नागेपल्ली गावापासून तीन किलोमीटर अंतरावर आम्हाला वीस एकर जागा मिळाली. हा प्रकल्प 'लोकबिरादरी' प्रकल्पाआधीच सुरू झाला. श्रमसंस्कार छावणीत आलेल्या नांदेडच्या जगन मचकलेला बाबांनी 'नागेपल्लीला राहशील का', असं विचारलं, आणि त्यानेही एका पायावर तयारी दाखवली. खरं तर नागेपल्ली हा तसा एकाकी प्रकल्प. हेमलकशात किमान पाच-पन्नास माणसं तरी एकमेकांच्या सोबतीला होती. नागेपल्लीत तसंही काही नव्हतं. पण जगनने ते आव्हान पेललं. नंतर त्याचं लग्न झालं आणि तो अन् त्याची बायको मुक्ता यांनी नागेपल्लीत कामयचा मुक्काम ठोकला. सुरुवातीच्या काळात जगनने काही सर्वसामान्य आजारांवर औषधोपचार देण्याचं काम सुरू केलं. या जमिनीवर त्यांनी शेती केली, डेअरी उभी केली, आसपासच्या गावांमध्ये शेती आणि डेअरीचं प्रशिक्षण द्यायला सुरुवात केली. त्याबरोबरच हेमलकशाला काय हवं- नको ते बघणं, त्यांना सामान पोहोचवणं, पावसाळयाच्या काळात कधी सायकल मारत, तर कधी तंगडतोड करत इकडचे निरोप तिकडे पोहोचवणं अशी सगळी कामं जगनने पार पाडली. त्या दोघांना बाबा 'बेअरफूट मल्टिपर्पज सोशल मेकॅनिक्स' म्हणायचे. त्यामुळे हेमलकसा उभारण्यात आणि तो चालू ठेवण्यात जेवढा तिथल्या कार्यकर्त्यांचा वाटा आहे तितकाच जगन-मुक्ताचाही, हे निर्विवाद.

किल्लारीत भूकंपरोधी घरं बांधण्याचा प्रयत्न

१९९३ च्या सप्टेंबरमध्ये किल्लारीत विनाशकारी भूकंप झाला. त्यात मराठवाड्यातील काही भाग होत्याचा नव्हता झाला. तिथल्या परिस्थितीविषयी ऐकून असं वाटलं की आनंदवनाने भूकंपग्रस्तांच्या मदतीसाठी जायला हवं. त्या वेळी बाबा

'नर्मदा बचाव' आंदोलनासाठी कसरावदला होते. मी त्यांना भेटून माझं म्हणणं त्यांच्या कानावर घातलं. ते म्हणाले, "आपल्या डोक्यावर छत्र नव्हतं तेव्हा लोकांनी आपल्याला मदत केली. आता आपण छत्र हरवलेल्यांना मदत करायला हवी." त्यांनी पाठिंबा दिल्यावर अरुण कदम, रमेश कोठारे आणखी काही कार्यकर्ते घेऊन सर्व्हे करण्यासाठी किल्लारीत गेले. मी कसरावदहून पुण्याला गेलो. तिथे पुलंचा आशीर्वाद घेतला आणि मीही किल्लारीत जाऊन पोहोचलो.

तिथे फिरल्यावर आमच्या लक्षात आलं की इथली मुख्य गरज आहे ती घरं बांधण्याची. तोपर्यंत आम्ही आनंदवनात स्वतःच्या विटा पाडून अर्धवर्तुळाकार छत असणारी, म्हणजेच न्युबियन व्हॉल्टची घरं बांधण्यात माहीर झालो होतो. ही घरं नेहमीच्या घरांपेक्षा किती तरी स्वस्त होती आणि मुख्य म्हणजे आपल्याकडच्या उष्ण, विषम हवामानाचा विचार करून तयार केलेली होती. मराठवाड्यात नव्याने घरं बांधताना या तंत्रज्ञानाचा उपयोग होईल, असं आम्हा सर्वांना वाटलं.

आनंदवनात येऊन साऱ्यांचा विचार घेतला. तेव्हा सगळ्यांचं म्हणणं पडलं, की आपण किल्लारीत जाऊन तिथल्या लोकांना घरं बांधण्याचं प्रशिक्षण द्यावं. गंमत म्हणजे भूकंपग्रस्तांना आयती घरं बांधून द्यावीत, असं आनंदवनातल्या कुणालाच वाटलं नाही. आपण द्यायचं ते घरं बांधण्याचं प्रशिक्षण, हे जणू गृहीत होतं! सगळं काही ठरल्यानंतर १९९३ च्या डिसेंबर महिन्यात कोठारे काका शंभरेक कुष्ठमुक्तांना घेऊन ट्रकने किल्लारीत दाखल झाले. आनंदवनातली इतर कामं आटोपण्यासाठी मी मागे राहिलो.


आमचे लोक किल्लारीत पोहोचले तेव्हा तिथे सगळा सावळा गोंधळ होता. कुणाचा पायपोस कुणाच्या पायात नव्हता. त्यामुळे सुरुवातीला आमच्या कार्यकर्त्यांचा मुक्काम उघड्यावरच होता. पण एका तहसीलदाराने आमच्या लोकांना काही तंबू पुरवले. त्यामुळे त्यांना थोडा आसरा मिळाला. पण का कुणास ठाऊक, तिथल्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याला ते पाहवलं नाही. भूकंपग्रस्तांसाठी परदेशातून आलेले तंबू बाबा आमट्यांच्या कुष्ठरुग्णांना कसे दिले, अशी विचारणा केली. आमच्या कार्यकर्त्यांनी मला हे कळवल्यावर मी ताबडतोब किल्लारीत दाखल झालो. तिथे बोलताना लक्षात आलं की कुष्ठमुक्त इथे आलेले लोकांना रुचलेलं नाही. इतर संस्थांचा डेरा ज्या ठिकाणी पडला होता तिथेही कुष्ठमुक्तांना घेऊन राहणं अशक्य दिसत होतं. त्यामुळे आम्ही तिथून हलण्याचा निर्णय घेतला आणि तिथून एक किलोमीटर अंतरावर जाऊन मुक्काम ठोकला. राहण्याची सोय केली आणि कामाला लागलो.

भूकंपग्रस्तांच्या मदतीला कुष्ठरुग्ण आले आहेत हे कुणालाही पचत नसल्याचा प्रत्यय पुन्हा पुन्हा येत होता. त्या आपत्तीच्या काळातही लोकांच्या मनात असलेली कुष्ठरोगाबद्दलची भीती उफाळून वर येत होती. एक उदाहरण सांगतो. आमचे कुष्ठमुक्त कार्यकर्ते नळावर पाणी भरायला जायचे, त्याला गावकरी आक्षेप घ्यायचे. एकदा तर तिथले सरपंच मला म्हणाले, "या कुष्ठरुग्णांच्या हातातले जंतू नळातून उलटे आत जातील आणि पाण्यातून इतर ठिकाणी पसरतील. तुम्ही इथून पाणी भरू नका." आता यावर काय

बोलणार? पण अशा वातावरणामुळे आमच्या कामाला सुरुवातच होत नव्हती. उलट, आम्हाला तिथून हुसकावून लावण्याचेही अनेक प्रयत्न झाले; पण आम्ही त्या सगळयाला पुरून उरलो, टिकून राहिलो.

माझ्यासोबत तेव्हा अरुण होता. तो आणि मी तिथल्या मदतकार्य करणाऱ्या अधिकाऱ्यांना भेटलो आणि आमची कल्पना सांगितली. आम्हाला एखादी जागा मिळाली तर आमची वैशिष्ट्यपूर्ण घरं आम्ही लोकांसमोर प्रत्यक्ष बांधू आणि त्यांना प्रशिक्षण देऊ, असं आम्ही त्यांना सांगितलं. अनेक खेटे मारल्यावर अखेर त्यांनी आम्हाला जागा दिली. आमच्या टीमने एकीकडे घरं बांधण्याची तयारी सुरू केली आणि दुसरीकडे आम्ही तिथल्या लोकांशी बोलायला लागलो. पण थोड्याच दिवसांत आमच्या लक्षात आलं, की भूकंपग्रस्तांना मदत करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांचा इथे सुळसुळाट झाला आहे. कोणी घरं बांधून देतंय, कोणी कपडे पुरवतंय, कोणी अन्नपाण्याची सोय करतंय तर कुणी आणखी काही. मदत आली हे चांगलंच होतं; पण त्या मदतीमुळे लोकांची काम करण्याची इच्छा मारली जात होती. आम्ही भूकंपग्रस्तांशी बोलू लागलो, त्यांना आमच्या घरांचं वैशिष्ट्य समजावून सांगू लागलो. खर्च कमी, मजबुती भक्कम, नैसर्गिक वातानुकूलन, देखभाल-दुरुस्ती जवळपास नाही आणि मुख्य म्हणजे एक कुटुंब अल्पावधीत स्वतःच आपलं घर बांधू शकेल, इतकं सोपं वगैरे पटवून देऊ लागलो. आम्ही सगळं प्रशिक्षण द्यायला दिमतीला आहोत, हेही सांगून पाहिलं; पण कुणालाही ते पटताना दिसेना.

आम्ही थोडं सबुरीने घ्यायचं ठरवलं. लोकांना पटवून देण्यावर कष्ट घेण्याऐवजी आमचं मॉडेल घर उभं करण्यावर लक्ष द्यावं असं ठरवलं. म्हटलं, एकदा घर बांधून झालं आणि लोकांनी ते प्रत्यक्ष पाहिलं की त्यांना आपल्या घरांचं महत्त्व कळेल. झालंही तसंच. आम्ही आमच्या ‘आनंदवन फॉर्म्युल्या’प्रमाणे विटा पाडल्या आणि त्या पाण्यात भिजवत ठेवल्या. त्या इतक्या मजबूत झाल्या की विचारू नका. ही बातमी आसपास पसरली. मग त्या तोडता येतात का ते बघायला स्थानिक लोक तिकडे येऊ लागले. दीड महिन्याने आमचं पहिलं घर बांधलं गेलं तेव्हा तर लोक खुळावलेच. आमची घरं मजबूत तर होतीच, पण तिथल्या इतर घरांपेक्षा सुंदर अन् स्वस्तही होती. आमच्या जागेवर आम्ही दोन वेगवेगळ्या प्रकारचीघरं बांधली.



कुष्ठमुक्त कार्यकर्त्यांनी किल्लारीत उभारलेली आनंदवन पॅटर्नची भूकंपरोधी घरं

आम्ही मुक्काम ठोकून होतो त्या काळात बाबा-ताई नर्मदेहून किल्लारीत आले. तीन

दिवस त्यांनी प्रकल्पावर मुक्काम केला. कुष्ठमुक्तांनी भूकंपग्रस्तांसाठी केलेलं काम बघून त्यांना समाधान वाटलं. त्या वर्षी आम्ही श्रमसंस्कार छावणीही किल्लारीतच घेतली. त्यासाठी देशभरातून आलेली सुमारे २००० मुलं-मुली आठ दिवस किल्लारीमध्ये मदतकार्याला भिडली. या छावणीसाठी 'ऑक्सफॅम'च्या अनिल शिदोरे यांनी आम्हाला अन्नधान्य आणि इतर साधनसामुग्री घेण्यासाठी आर्थिक मदत केली.

त्यानंतर 'मराठी विज्ञान परिषदे'तर्फे प्रसिद्ध स्ट्रक्चरल इंजिनियर डॉ. सी. एम. पंडित आणि आणखी काही कार्यकर्ते किल्लारीत दाखल झाले. त्यांनी आमची घरं पाहिली. इतर तज्ज्ञांनी आमच्या घरांच्या प्रयोगाकडे दुर्लक्ष केलं होतं. आमची घरं बांधली जात होती तिथून जवळच ज्येष्ठ वास्तुविशारद लॉरी बेकर राहत होते. न्युबियन घरांच्या डिझाइनमधल्या माझ्या गुरूंपैकी ते एक होते. त्यांना भेटण्याची आणि आमचं काम दाखवण्याची माझी मनापासून इच्छा होती. तसा प्रयत्नही मी अनेकदा केला; पण ते आले नाहीत. का ते कळलं नाही. पण डॉ. पंडित मात्र आवर्जून आमच्या साइटवर आले, त्यांनी आमची अर्धवर्तुळाकार छत असलेली घरं पाहिली आणि आमचं तोंडभरून कौतुक केलं. एवढंच नव्हे, तर परिषदेतर्फे पारधेवाडी इथे एक नमुना घर बांधून दाखवण्याचं कामही त्यांनी आम्हाला दिलं. 'वेस्टर्न कोलफील्ड लि.'च्या अधिकाऱ्यांनाही ही घरं आवडली. त्यांनीही त्यांच्या कोयलावाडी या प्रकल्पावर आम्हाला गावाच्या कमानीशेजारी अशी दोन छोटी घरं बांधून दाखवायला सांगितली. आम्ही ती बांधून दिली. किल्लारीच्या सहकारी साखर कारखान्यात आम्ही आमच्या पद्धतीने एक प्रशासकीय कार्यालय उभं करून दिलं. तसंच त्यांच्या आवारात किल्लारी भूकंपग्रस्तांना श्रद्धांजली वाहणारं एक स्मारकही बांधलं.

पाहता पाहता या घरांची माहिती सगळीकडे पसरली. किल्लारीच्या ग्रामसभेनेही आनंदवनाची घरं हवीत, असा ठराव केला. त्यामुळे किल्लारीच्या आसपासच्या ग्रामपंचायतींनीही तसेच ठराव पास केले. पण त्यात एक अडचण होती. किल्लारी भागात नव्याने बांधली जाणारी घरं प्रमाणित करण्याचं काम महाराष्ट्र शासनाने आयआयटीला (रुरकी) दिलेलं होतं. आयआयटी (रुरकी)तील संबंधित तज्ज्ञांनी आम्हाला कोणत्याही आयआयटीत 'शेक टेबल'वर, म्हणजे एका मोठ्या हलत्या प्लेटवर घर बांधून त्याची भूकंपरोधकता सिद्ध करण्याची अट घातली. आमची घरं भूकंपरोधी आहेत याबद्दल मला पूर्ण खात्री होती. पण मी पडलो डॉक्टर. तिथल्या शास्त्रज्ञांसमोर मी हे सिद्ध कसं करून दाखवणार? शिवाय हे घर बांधण्यासाठी शंभर कुष्ठरोगी घेऊन तिकडे कसं जाणार आणि कुठे राहणार? या प्रश्नांची उत्तरं ना त्यांच्याकडे होती ना माझ्याकडे. किल्लारी परिसरातल्या गावकऱ्यांना आमचीच घरं हवी होती. पण या अशक्य अटीमुळे ते काम पुढे जाऊ शकलं नाही. त्यामुळे आम्ही आनंदवनात परत आलो.

त्यानंतर काही दिवसांनी एका वेगळ्या कामासाठी तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांना भेटायला मी मुंबईत गेलो होतो. त्यांनी आपणहून किल्लारीतल्या आमच्या घरांचा विषय काढला आणि 'किल्लारीतली घरं तुम्हीच बांधा', असं ते मला म्हणाले. ही घरं बांधण्यासाठी तीन कोटींचा निधी देण्याचीही त्यांनी तयारी दाखवली. पण ते आमचं काम

नव्हे याबद्दल मला पुरेशी स्पष्टता होती. मी त्यांना म्हटलं, “आम्ही केवळ घरं बांधणारी नव्हे, तर गावं उभी करणारी माणसं आहोत. आम्ही लोकांना घर बांधण्याचं प्रशिक्षण द्यायला तयार आहोत. त्यांनी ते शिकावं आणि आपली गावं उभी करावीत.”

पुढे काय झालं माहिती नाही, पण प्रशिक्षण देण्याची संधी काही आम्हाला मिळाली नाही. आज किल्लारी व परिसरात शासकीय आणि खासगी संस्थांनी बांधलेल्या बहुतेक घरांना क्रॅक्स गेले आहेत, पण आम्ही तेव्हा बांधलेली घरं मात्र अजूनही भरभक्कम उभी आहेत.

शेतकऱ्यांच्या विकासासाठी मूळगव्हाण मॉडेल

२००३ नंतरचा तो काळ होता. बाबा तेव्हा नुकतेच नर्मदा बचाव आंदोलनातून आनंदवनात परतले होते. हृदयविकाराने त्यांना रुग्णशय्येवर खिळवून ठेवलं होतं. आयुष्यभर केलेले कष्ट आणि अंगावर काढलेले शारीरिक आजार यामुळे ते थकून गेले होते. त्यांचं वयही कमी नव्हतं. नव्वदीला टेकले होते ते. पण तरीही त्यांच्या जाणिवा तल्लख होत्या. आनंदवन, सोमनाथ, हेमलकशातल्या घडामोडींवर तर ते बारीक लक्ष ठेवून असायचेच, पण जगात काय घडतंय हे समजून घेण्यासाठीही ते उत्सुक असायचे. प्रत्येक लहानसहान घटनेवर त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद असायचा. त्याच काळात विदर्भामध्ये शेतकरी आत्महत्यांचं दुर्दैवी सत्र सुरू होतं. आनंदवनाला लागून असलेला यवतमाळ जिल्हा त्यात सर्वाधिक पोळून निघाला होता. आत्महत्यांच्या बातम्या वाचून बाबा अतिशय अस्वस्थ होत. आनंदवन आणि सोमनाथमध्ये कुष्ठरुग्णांनी नापीक जमिनीत सोनं पिकवून दाखवलं आणि हे धट्टेकट्टे शेतकरी शेती पिकत नाही म्हणून आत्महत्या करताहेत, हे त्यांना सहन होत नसे. शेतीतल्या आपल्या अनुभवाचा उपयोग करून आपण त्यांना योग्य दिशा दाखवली पाहिजे, असं त्यांना सतत वाटत असे. रोज संध्याकाळी आम्ही बाबांना घेऊन आनंदवनात फिरायला जात असू तेव्हा हा एकच विषय चर्चेला असायचा. आपण कुष्ठरुग्णांसाठी काम केलं, अंध-अपंगांसाठी काम केलं, दुर्गम भागातल्या आदिवासींपर्यंत आरोग्यसेवा नेली, आता आपण शेतकऱ्यांसाठी काही तरी केलं पाहिजे, या इच्छेने त्यांना पछाडलेलं होतं.

खरं सांगायचं तर आम्हा सगळ्या कार्यकर्त्यांची मनोवस्था बाबांसारखीच होती. स्वतः शेती केलेली असल्यामुळे त्यातले प्रश्न आणि त्यांची उत्तरं आम्हाला माहिती होती. आत्महत्येसारखा टोकाचा पर्याय या लोकांनी स्वीकारता कामा नये, असं आम्हालाही मनापासून वाटायचं. या लोकांना आपण काय मदत करू शकतो, याचा विचार आमच्या डोक्यात घोळत होता. तेव्हा बाबांनी आम्हाला सांगून टाकलं, “तुम्ही यवतमाळ जिल्ह्यात फिरा. तिथल्या लोकांशी बोला. त्याशिवाय तुम्हाला त्यांची व्यथा-वेदना कळणार नाही.” ते खरंच होतं. शेतकऱ्यांच्या भेटीगाठी घेतल्याशिवाय आम्हाला प्रत्यक्ष कामाची दिशा कळणार नव्हती.

आमच्या वरोऱ्याला लागूनच यवतमाळ जिल्हा सुरू होतो. मग चर्चेत जास्त वेळ न

घालवता आमचे चार सेनापती या भागाच्या पाहणीसाठी बाहेर पडले- अरुण कदम, सुधाकर कडू, गजानन वसू आणि अशोक बोलगुंडेवार. वणी, मारेगाव आणि झरी-जामणी अशा तीन तालुक्यांमधल्या अनेक गावांमध्ये या चौघांनी दौरा काढला. हे चौघं थोडे दिवस या गावांमध्ये भटकायचे, पुन्हा आनंदवनात परतायचे. आमच्या चर्चा व्हायच्या आणि ते पुन्हा नव्या दिशेने चालू लागायचे. त्यांनी गावागावांची पाहणी केली. या चौघांची नजर तयार होती. एखाद्या गावात एक चक्कर मारूनही तिथला प्रश्न काय आहे हे ते सांगू शकायचे. चौघांनीही सगळं आयुष्य लोकांसोबत काम करण्यातच घालवलेलं होतं ना!

त्यांनी लोकांना बोलतं केलं. आत्महत्यांमागची कारणं समजून घेतली. कारणं अनेक होती. शेतीव्यवस्थेची दुरवस्था, नुकसानीचं अर्थकारण, नापिकी, अवर्षण, पाण्याचं दुर्भिक्ष, व्यसनाधीनता, कर्जबाजारीपणा अशी अनेक. तीन तालुके पालथे घातल्यावर त्यांच्या लक्षात आलं, की झरी-जामणी हा तालुका सर्वाधिक मागास आणि आत्महत्याग्रस्त आहे. हा तालुका आदिवासीबहुल होता. इथे कोलाम या आदिम जातीची वस्ती आहे. बहुतेक आदिवासींना शेतीची, पाणी साठवण्याची तंत्रंच माहिती नव्हती. कापूस एके कापूस घेतला जात होता. एकदा का कापूस करपला की उत्पन्नाचं दुसरं साधन नव्हतं. आंध्र प्रदेशच्या सीमेलगत असलेल्या या तालुक्यात शेजारच्या अदिलाबादमधील ठेकेदारांचा राबता होता. हे ठेकेदार वर्षाला पाचशे रुपये देऊन आदिवासींकडून जमिनी घ्यायचे. त्यात महामूर रासायनिक खतं टाकून पीक काढायचे आणि निघून जायचे. त्यातून जमीन नापीक होऊन जायची. हे दुष्टचक्र कित्येक वर्षं सुरू होतं.

हे सर्व चित्र पाहून आम्ही झरी-जामणी तालुक्यात काम करायचं असं ठरवलं. एकीकडे हा दौरा चालू असताना आपण या लोकांना नेमकी कोणत्या प्रकारची मदत करू शकतो, याचाही विचार आनंदवनात सुरू होताच. आम्हाला असं वाटत होतं, की आनंदवन-सोमनाथच्या धर्तीवर किफायतशीर शेतीचं, जलसंधारणाचं, उद्योगधंद्यांचं एक मॉडेल तिथल्या एखाद्या गावात उभं करून दाखवावं आणि ते मॉडेल राबवण्यासाठी तिथल्या शेतकऱ्यांना मदत करावी. शेतकऱ्यांना उचलून मदत देणं हा काही आमचा मार्ग नव्हता. बाबांनी ऑस्ट्रेलियातल्या ‘फुड फॉर पीस’ या संघटनेला कळवल्यानुसार धान्य-पैशाची मदत संपून गेली असती. पण धान्य पिकवण्याचं तंत्रज्ञान कायमस्वरूपी उपयोगी पडलं असतं. झरी जामणीतल्या आदिवासींना कायमस्वरूपी उपयोगी पडेल असं ज्ञान-तंत्रज्ञान देणं आणि त्यातून त्यांचा जीवनस्तर उंचावण्यासाठी मदत करणं हे आमचं काम होतं. आनंदवन-सोमनाथमधल्या आमच्या भरभक्कम अनुभवाचा लोकांना नक्कीच फायदा होईल, असा आम्हाला विश्वास होता.

शेतीचं मॉडेल उभं करायचं तर त्यासाठी आम्हाला जमिनीची गरज होती. अरुण आणि सुधाकर वगैरे मंडळी उपविभागीय अधिकारी नरेंद्र फुलझेले यांना जाऊन भेटली. त्यांना आमची कल्पना सांगितली. त्यांना आमच्या बोलण्यातली कळकळ समजली असावी. त्यांनी झरी-जामणी तालुक्यातल्या सरकारी मालकीच्या जमिनींची यादी दाखवली. त्यातल्या काही जागा त्यांनी आम्हाला सुचवल्या. फक्त एक गोची होती. त्यांचं

म्हणणं होतं, "आम्ही संस्थेला जमीन देऊ, पण त्यासाठी त्या गावच्या ग्रामसभेचा तसा ठराव लागेल." कोणत्याही गावात काम करायचं तर आम्हालाही तिथल्या लोकांशी आधी संवाद साधणं गरजेचं होतं. त्यामुळे आमच्या चौघा कार्यकर्त्यांनी तहसीलदारांनी सुचवलेल्या गावांमध्ये बोलणी करायला सुरुवात केली.

हे काम सोपं नव्हतं. एक तर हा सगळा समाज आदिवासी होता. त्यांची भाषा वेगळी होती. गावातल्या अगदीच थोडक्या लोकांना थोडीफार मराठी येत होती. त्यामुळे भाषेचा अडथळा पार करून आमचं म्हणणं त्यांच्यापर्यंत पोहोचवणं अवघड होतं. त्यात बऱ्याचशा गावांमध्ये कोणत्या ना कोणत्या प्रकारच्या संस्था काम करत होत्या. त्यांच्या कामाचं स्वरूप हे साधारणपणे मदतीचं वाटप असंच होतं. त्यामुळे गावकऱ्यांना त्याचीच सवय लागलेली होती. ते स्पष्टपणे विचारायचे, "तुम्ही आम्हाला काय देणार सांगा!" पैसा, कपडे, धान्य, गाई-गुरं, शाळा असं काही तरी त्यांना हवं होतं. 'आम्ही तुमची समस्या समजून ती सोडवण्यासाठी तुम्हाला मदत करू', असं आमचं त्यांना सांगणं असायचं. हा पर्याय त्यांना फारच लाबंचा वाटायचा. त्यामुळे आमचे या गावातून त्या गावात नुसते हेलपाटे सुरू होते. एका गावात मात्र अचानक आशेचा किरण दिसला. मूळगव्हाण या गावामधल्या काही ज्येष्ठ मंडळींनी बाबांचं आणि आनंदवनाचं नाव ऐकलेलं होतं. त्यांनी आमचा प्रस्ताव शांतपणे ऐकून घेतला आणि आम्हाला हिरवा कंदील दाखवला. त्यांनीच ग्रामसभा बोलावून गावकऱ्यांना ही कल्पना समजावून सांगितली आणि आम्हाला दोन एकर जागा देण्याचा ठराव मंजूर केला.

परवानगी मिळाल्याचं बाबांना कळलं तसे ते आजारपणातही उत्साहाने फुरफुरू लागले. मी तेव्हा त्यांच्यासोबत आनंदवनात होतो. ते मला म्हणाले, "तू जातोस का मी जाऊ?" नवा प्रकल्प उभा करण्यासाठी आवश्यक अशा शंभरेक लोकांची टीम आम्ही सज्ज करून ठेवली होते. त्यात मेहनतीची कामं करू शकणारे लोक होते, एक्सकॅव्हेटर चालवणारे लोक होते, शेतीतली दादा मंडळी होती, तंबू ठोकणारे होते, आचारी होते, बांधबंदिस्ती करण्याचा अनुभव असणारे होते. नाना प्रकारची माणसं. आमच्या आनंदवनातली रॉकेट लाँचर्सच होती ही माणसं! ती जे ठरवतील ते करून दाखवतील. त्या सगळयांसोबत मी, अशोक, प्रमोद बक्षी अशा पाच-दहा कार्यकर्त्यांनी मूळगव्हाणला जाऊन मुक्काम ठोकला.

ती तारीखही मला आठवते. गांधी जयंती होती त्या दिवशी. २ ऑक्टोबर २००६. आम्ही इथल्या प्रकल्पाचं नाव ठेवलं 'सामाजिक कृती आणि पर्यावरण संवर्धन केंद्र'. गजानन वगैरे काही मंडळी आधीच जाऊन पोहोचली होती. त्यांनी तिथे एक कामचलाऊ झोपडीही उभारली होती. आम्हाला मिळालेली जागा खूपच वाईट होती. दगडांच्या खाणीच होत्या त्या. वरची खोदली जाऊ शकणारी माती उकरून नेली होती आणि आतला खणायला कठीण असा खडक फक्त मागे उरला होता. शिवाय आमच्या जागेतच गावची स्मशानभूमी होती. आमचे काही मित्र तर म्हणालेही, "या जागेवर काम करणं हेच आत्महत्या करणं आहे." पण असल्या विचारांना आमच्या मनात थारा नव्हता. आमची मानसिकता वेगळी होती. या पडीक जमिनीवर शेत पिकवून दाखवलं तर तिथल्या

शेतकऱ्यांना आणखी बळ मिळेल, असं आम्हाला वाटत होतं. त्यामुळे जिद्दीने आम्ही कामाला सुरुवात केली.

सुरुवातीला फक्त चार तंबू टाकून आम्ही तिथे राहू लागलो. दवाखान्यासाठीही एक तंबू उभारला. कुठेही गेलं तरी आधी मेकशिफ्ट दवाखाना तयार करायचा, हे आमचं ठरलेलं असतं. जागा राहण्याजोगी करण्यासाठीचं काम सुरू असतानाच आम्ही गावकऱ्यांच्या भेटी घ्यायला सुरुवात केली. भाषेचा प्रश्न आणि अज्ञान यामुळे आम्ही काय करू बघतोय हे त्यांना समजावून सांगणं अवघड होतं. त्यातच आमची सगळी सेना कोणत्या ना कोणत्या प्रकारे अपंगत्व असलेली. त्यामुळे 'हे लोक काय करणार?' असा तुच्छ भाव सुरुवातीला त्यांच्या चेहऱ्यावर दिसायचा. आम्हाला गावकरी गांभीर्याने घ्यायचे नाहीत. मग आम्हीही एक रामबाण उपाय काढला. आमची सेना काय करू शकते ते या लोकांना कळावं यासाठी आनंदवन-सोमनाथमधली शेती दाखवावी असं ठरवलं. या दोन्ही ठिकाणची शेकडो एकरांवर पसरलेली हिरवीकंच शेतं आणि ओसंडून वाहणारी गोदामं बघून भली भली माणसं खुळावलेली आम्ही पाहिलेलं होतं. त्यामुळे मूळगव्हाणमधल्या काही ज्येष्ठ, काही तरुण मंडळींना आम्ही आनंदवनात घेऊन गेलो. सोमनाथचा प्रकल्प दाखवला. त्यांची प्रतिक्रिया आम्हाला अपेक्षित अशीच होती. शेती, पाण्याने भरलेले तलाव, डेअरी, दुभती जनावरं, धान्याने भरलेली गोदामं, कुष्ठमुक्तांची सुबक गोलाकार घरं, त्याभोवती त्यांनी उभी केलेली परसबाग असं सगळं पाहिल्यावर त्यांच्या वागण्यात बराच फरक पडला. या संस्थेकडून आपल्याला काय मिळेल, याचा विचार ते आतापर्यंत करत होते. आत्ता पहिल्यांदाच हे सगळं आपल्या गावात कसं करता येईल, हा किडा त्यांच्या डोक्यात गेला.

मूळगव्हाणला परत गेल्यावर त्यांच्याशी भरपूर चर्चा झाल्या. त्यांच्या शेतीचा पॅटर्न, त्यातले प्रश्न, नापिकी कशामुळे होते, पाण्याचे स्रोत काय आहेत, ते कसे वाढवायचे, वगैरे वगैरे. हळूहळू वातावरण बदलत गेलं आणि मग कामाला सुरुवात झाली. कामाचा आवाका मोठा होता. आम्हाला मिळालेली जमीन म्हणजे नुसता कातळ. तो फोडून तिथे शेती उभी करण्यासाठी, घरं बांधण्यासाठी जमिनीवर पहिले घाव घातले गेले. आनंदवनाची लँड आर्मी कामाला लागली. आमची 'लँड आर्मी' म्हणजे आनंदवनातील अंगाने धडधाकट असणाऱ्या पार्शली ब्लाइंड, कर्णबधिर आणि कुष्ठमुक्त तरुणांची एक टीम. शेती करायची तर त्यासाठी आमच्या जमिनीवर चांगली मातीच नव्हती. त्यामुळे सुधाकरने थेट आनंदवनातून ट्रकने माती आणली.

एकीकडे आम्हाला मिळालेल्या सरकारी जमिनीची साफसफाई करायची आणि त्याच वेळी इतर शेतकऱ्यांच्या शेतातही कामं चालू करायची असं ठरलं. त्यासाठी आधी पाण्याचा बंदोबस्त करायला हवा होता. त्यामुळे विहीर खणायला घेतली. विहीर खणण्याचं कॉंट्रॅक्ट आम्ही एका ठेकेदाराला दिलं होतं. त्याने आणखी कोणाशी तरी सबकॉंट्रॅक्ट केलं. त्या माणसाने विहिरीसाठी ब्लास्टिंग केलं आणि दुर्दैवाने एक मोठा अपघात झाला. ब्लास्टिंगमधला एक दगड उडून दोनशे मीटर अंतरावरून चाललेल्या एका तरुण मुलीला लागला आणि त्यात तिचा मृत्यू झाला.

वाटलं, आता संपलं सगळं. काम सुरू होण्यापूर्वीच या गावातून बाहेर पडावं लागणार. प्रसंग बाका होता. मुलीचा मृत्यू झाला म्हटल्यावर गाव बिथरलं. लोक घोळक्या-घोळक्याने प्रकल्पावर येऊन पोहोचू लागले. त्यांची आपापसात त्यांच्या भाषेत चर्चा सुरू होती. प्रत्यक्ष घडत काही नव्हतं, पण वातावरणातला तणाव क्षणाक्षणाला वाढत होता. हळूहळू लोकांची संख्याही वाढू लागली आणि जमाव पेटला. त्यांनी आमच्या कार्यकर्त्यांना मारहाण करायला सुरुवात झाली. काय करावं ते कळेना. मी त्या लोकांना शांत करायचा प्रयत्न करत होतो, पण ते ऐकण्याच्या मन:स्थितीत नव्हते.

त्याच वेळी एक वेगळीच घटना घडली. आमच्या मेकशिफ्ट दवाखान्यात त्याच गावातला एक रुग्ण दाखल होता. आम्ही त्याला रात्रीपासून सलाइन लावून ठेवलं होतं. लाइफ सेव्हिंग उपकरणांचा वापर करून त्याचा जीव वाचवला होता. बाहेरचा हा सगळा गोंधळ ऐकून तो माणूस सलाइन लावलेल्या अवस्थेतच बाहेर आला आणि गावकऱ्यांना त्यांच्या भाषेत म्हणाला, “मी काल अक्षरशः मरणार होतो. या लोकांनी मला मरणाच्या दारातून परत आणलंय, आणि तुम्ही त्यांना मारायला निघाले आहात?” या रुग्णाच्या बोलण्याचा एखाद्या चमत्कारासारखा परिणाम झाला. वातावरण झटकन बदललं. काही मिनिटांपूर्वी जी मंडळी आम्हाला मारायला धावली होती ती शांत झाली. नंतर गावातल्या बुजुर्ग लोकांनी जमावाला समजावलं. आम्ही सगळे एकत्र बसलो. अपघातात आमची काही चूक नाही, हे त्यांना पटवून दिलं. त्या मुलीचा जीव गेला याबद्दल आम्हालाही अतिशय वाईट वाटत होतं. पण आता जे झालं त्यामुळे काम थांबवून काय उपयोग? बऱ्याच चर्चांनंतर अखेर समेट झाला. लोक शांत झाले. कामाला पुन्हा सुरुवात झाली.



मूळगव्हाण प्रकल्पातला टर्निंग पॉइंट.

त्या वेळी भारतीच्या मनात आलं, की कृतज्ञता म्हणून आपण संपूर्ण गावाला जेवण देऊ. आनंदवनात तयार झालेल्या सतरंज्यांवर लोकांना बसवून चांगल्या स्टीलच्या ताटांमध्ये हे जेवण वाढलं. उत्तम जेवण. वरण-भात, भाजी-पोळी, शिरा-भजी-कढी असं साग्रसंगीत. या लोकांना असं चांगलंचुंगलं जेवण माहितीच नव्हतं. ते केवळ कुपोषित होते असं नव्हे, तर आजवर त्यांची उपासमारच होत आली होती. म्हटलं तर किती साधी गोष्ट,

पण या जेवणानेही त्यांचा आमच्याकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला. हे भारतीलाच सुचू जाणे. त्यामुळेच या प्रकल्पाबद्दल गावकऱ्यांमध्ये आपलेपणाची भावना निर्माण करण्यात भारतीची फार महत्त्वाची भूमिका आहे असं मला वाटतं.

लोकांच्या मनात प्रवेश मिळण्यासाठी आणखीही एक निमित्त झालं. हे सगळं रामायण झाल्यानंतर काही दिवसांनी ताई मूळगव्हाणला आलेली होती. बाबांचा देवाधर्मावर विश्वास नसला तरी ताई अतिशय धार्मिक. मी तिला मंदिरमार्गी म्हणायचो. जिथे जाईल तिथे ती देव शोधून काढायची. इथेही तिला गावाचे उपेक्षित देव दिसले. तिच्या मनाने घेतलं की आपण या देवांसाठी मंदिर उभं करू. आम्ही गावकऱ्यांशी बोललो. त्यांना कल्पना पसंत पडली. पण ते म्हणाले, "तुम्ही आमच्या देवांना हात लावायचा नाही. आम्ही देव हलवतो, मग तुम्ही मंदिर बांधा." मग लोकांनी त्यांचे सोपस्कार पार पाडून देव हलवले आणि त्या जागी आम्हाला मंदिर बांधण्याची परवानगी दिली. माझा 'चीफ इंजिनियर' दत्तू कामाला लागला. लोक रोज काम बघायला यायचे. लोकांना आश्चर्य वाटायचं, की लाकूड-लोखंड न वापरता हे बांधकाम कसं काय होणार? पण दत्तू आणि त्याच्या सहकाऱ्यांनी असं काही सुंदर देऊळ बांधलं की गावकरी बघतच राहिले. सारा गाव देवळापाशी जमला आणि त्यांनी त्या देवांची देवळात प्रतिष्ठापना केली. एवढंच नव्हे, तर आम्ही नको म्हणत असतानाही त्यांच्या पद्धतीनुसार माझे, गजाननचे पाय धुतले. गावकऱ्यांनी आम्हाला जेवण दिलं. काही दिवसांपूर्वी आमच्या अंगावर चालून आलेली ही मंडळी पूर्णपणे बदलून गेली होती. तिथून कामाने वेग घ्यायला सुरुवात केली.

आमचा मुख्य अजेंडा होता तो गावात बारमाही पाणी मिळायला पाहिजे आणि त्या जोरावर गावाला कापसाखेरीज इतरही पिकं आणि भाजीपाला घेता यायला पाहिजे. त्यामुळे पाण्यासाठी गावात बंधारा बांधायचं ठरवलं. आम्ही आनंदवनाच्या जवळच्या गावांमध्ये प्लास्टिक आणि टायरचे अफलातून बंधारे बांधले होते. त्याची गोष्ट पुढच्या प्रकरणात येईलच. तोच प्रयोग इथेही करून बघायचं ठरवलं. त्यासाठी गजाननने आणि मी गावाची पाहणी केली. गावातून एक नाला जात होता. लोकांशी बोलल्यावर कळलं की हा नाला जवळपास बारमाही असतो. लोक त्याचंच पाणी वापरतात. त्याच्यावर बंधारा बांधायचं ठरलं.



मूळगव्हाणमध्ये 'आनंदवन लँड आर्मी'ने बांधलेला प्लास्टिक-टायर-काँक्रीट बंधारा.

गजानन लँड आर्मीसोबत कामाला भिडला. अक्षरशः रात्रंदिवस काम करून त्यांनी प्लास्टिक-टायर-कॉंक्रिटचा बंधारा उभा केला. हे काम सुरू असताना गावकरी अधूनमधून तिकडे चक्कर मारायचे, आमचं काय चाललंय बघायचे आणि परत जायचे. हे लोक नेमकं काय करत आहेत याचा त्यांना अंदाज येत नव्हता. पण जसा बंधारा बांधून झाला आणि पहिल्या पावसाळ्यात त्यात पाणी साठलं, तसा त्यांना आमचा हेतू लक्षात आला. हे सर्व होईपर्यंत आमच्या ताब्यातील जमिनीचा छोटा तुकडा शेतीसाठी तयार झाला होताच. आम्ही त्यात नमुन्यादाखल वेगवेगळी पिकं लावली, भाजीपाला लावला आणि थोड्या प्रमाणात गुरांसाठी हाय प्रोटीन चाराही लावला.

पहिल्याच वेळी आम्हाला चांगलं पीक मिळालं. लोकांनी ते आमच्याकडे येऊन येऊन पाहिलं. पावसाळा संपल्यावरही बंधाऱ्याच्या पाण्यातून आणखी एक पीक घेतलं. हळूहळू शेती वाढू लागली, बहरू लागली. जिथे एके काळी केवळ खडकाळ दगड होता तिथे विहिरी आल्या, ट्यूबवेल्स बसल्या. बारा महिने पाणी नांदू लागलं. आम्हाला मिळालेली जमीन चढ-उताराची होती. ओसाड टेकड्याच. पण गजानन आणि अशोकने एक्सकॅव्हेटरच्या साह्याने या भागाचा कायापालट करून टाकला. या टेकड्यांचा आम्ही मल्टिटियर वापर केला. मल्टिटियर म्हणजे टप्प्याटप्प्याने सपाटीकरण करून त्या जागेचा वापर करणे. आकाशातून पावसाच्या रूपाने पडणारं एक थेंबही पाणी आम्ही वाया जाऊ दिलं नाही. गजानन, अशोक आणि इतर कार्यकर्ते अक्षरशः दिवसरात्र या जमिनीवर काम करत होते. बाबांनी सुरुवातीच्या काळात केलेल्या कामाची आठवण व्हावी असंच काम होतं हे. शून्यातून विश्व तयार करण्याचं.

आदिवासी शेतकऱ्याच्या जमिनीत नंदनवन फुलवणारं शेततळं.



हे सगळं बघता बघता लोकांचा आमच्याकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला. शेती करण्याची ही पद्धत आपलं आयुष्य बदलवून टाकू शकते याचा त्यांना अंदाज आला. मग हळूहळू काही उत्साही शेतकऱ्यांनी त्यांच्या शेतीत काम करू देण्याची तयारी दाखवली. अर्थातच, आम्ही त्यांची शेती करायला घेणार नव्हतो, त्यांना आधुनिक शेतीची तंत्रं शिकवणार होतो. त्यानुसार आमच्या लोकांनी अनेक शेतकऱ्यांच्या शेतात काम सुरू केलं. खोल नांगरटी करून दिल्या, बांधबंदिस्ती घालून दिली. बी-बियाणांबद्दल, वेगवेगळ्या


पिकांबद्दल त्यांना मार्गदर्शन केलं. पहिल्या वेळेस त्यांना बियाणंही पुरवलं. तेव्हाच 'सारस्वत बँके'च्या एकनाथ ठाकुरांना आनंदवनातून या नव्या प्रकल्पाबद्दल कळलं. ते त्यांच्या संचालकांची सगळी टीम घेऊन इथे दाखल झाले. इथली परिस्थिती बघून त्यांनी लगेचच एक कोटी रुपयांची मदत देऊ केली. त्यातून मूळगव्हाणसोबत आसपासच्या खेड्यांमध्ये जल आणि मृद्संधारणाचं पायाभूत काम वाढायला मदत झाली. 'राष्ट्रीय सेवा योजने'अंतर्गत (एन.एस.एस.) मूळगव्हाणमध्ये आम्ही शिबिरं घेतली. त्या शिबिरांची आम्हाला मोठीच मदत झाली. पुढे २००९ मध्ये आम्हाला आणखी नव्वद एकर जमीन मिळाली. त्यामुळे कामाचा आवाका आणखी वाढला. आनंदवनात गेल्या पासष्ट वर्षांमध्ये विकासाचं एक फुलप्रूफ मॉडेल आकाराला आलं आहे. जलसंधारण, सुधारित शेती, डेअरी, उद्योगधंदे अशा नाना क्षेत्रांमध्ये आम्ही भरपूर प्रयोग अन् प्रयत्न करून यश मिळवलं आहे. त्या पासष्ट वर्षांचा अनुभव वापरून आम्ही मूळगव्हाणच्या प्रकल्पावर आनंदवनाची प्रतिकृतीच निर्माण केली. शेती, डेअरी, उद्योगधंदे, दवाखाना- सारं काही. जिथे एके काळी ओसाड टेकाड होतं तिथे एक समृद्ध गाव नांदू लागलं.


आनंदवनातील अनुभवाच्या आधारावर
मूळगव्हाणमध्येही आनंदवनाची प्रतिकृती उभी राहिली.

हे काम उभं करत असताना गावकरीही आमच्याशी जोडले जाऊ लागले. दवाखाना आणि शेती प्रशिक्षण ही दोन परिवर्तनाची साधनं आमच्याजवळ होती. पण आणखीही किती तरी परींनी आम्ही गावाशी नातं तयार केलं. अगदी छोटं उदाहरण सांगतो. इथल्या प्रकल्पाचा पसारा वाढला तसा आनंदवनातून आम्ही ताटं-वाट्या, भांडी, खुर्च्या, सतरंज्या असं सामान इथे आणून ठेवलं होतं. एकदा मनात विचार आला, तसंही बहुतेक वेळा हे सामान प्रकल्पात पडूनच असतं. मग ते गावकऱ्यांना वापरायला का देऊ नये? आम्ही पाहिलं होतं, की लग्नकार्यांमध्ये हे लोक अव्वाच्या सव्वा खर्च करून शहरातून हे सगळं सामान आणायचे. मग आम्ही त्यांना हे सामान पुरवायला सुरुवात केली. असे आणखीही काही उपक्रम सुरू झाले.

आता गेली आठ वर्षं आम्ही मूळगव्हाणमध्ये स्थिरावलो आहोत, त्या गावचेच झालो आहोत. सुरुवातीचा काही काळ प्रमोद बक्षींनी या प्रकल्पाची जबाबदारी सांभाळली. आता आमचा कुष्ठमुक्त कार्यकर्ता अनिल लेले या प्रकल्पाची धुरा वाहतो, तर अरुण सोमनाथहून जाऊन येऊन असतो. काही कुष्ठमुक्त तिथे स्थायिक झाले आहेत. आम्ही सारे तर जात-येत असतोच. गेली काही वर्षं आम्ही तिथे शेती प्रशिक्षण शिबिरं घेतो आहोत.

मूळगव्हाण आणि आसपासच्या अनेक शेतकऱ्यांनी कापसाखेरीज इतर विविध पिकं आपल्या शेतात लावली आहेत आणि त्यांचं विक्रमी उत्पादनही काढलं आहे. एकाचं बघून दुसरा, त्याचं बघून तिसरा, अशी विकासाची लागण या भागात झालेली दिसते आहे. जिल्ह्यातले अनेक अधिकारी मुद्दामून हे काम बघायला येऊ लागले. इतर गावांमध्ये त्याचं उदाहरण सांगू लागले. त्यातून पुढे महाराष्ट्र शासनाने जीआर काढला, की आदिवासी शेतजमिनीच्या जल आणि मृद्संधारणाचं काम करायचं असेल तर ते एक तर 'बायफ' करेल किंवा 'महारोगी सेवा समिती'. अर्थात आम्ही उठून कुठे काम सुरू करण्याची शक्यता नाही; पण मार्गदर्शनाचं काम करायला आमचे शिलेदार मागेपुढे पाहणार नाहीत.



डॉ.शीतल आमटे यांची उघड्यावरची ओपीडी. शीतलमुळेच मूळगव्हाणचं काम बायकापोरांपर्यंत पोहोचलं.

लोकांच्या हातात एकदा पैसा आला की त्यामागून इतरही अनेक गोष्टी येऊ लागतात, असं आमचं म्हणणं होतं. ते इथेही खरं ठरलं. शेतीचं रूप पालटल्यामुळे गावातलं वातावरण बदललं. महिलांमध्ये उत्साह निर्माण झाला. अर्थात माझी मुलगी शीतल इथे आली नसती तर ते शक्यही झालं नसतं. आम्ही सगळे बाप्ये लोक. त्यामुळे बायका आमच्यापासून लांबच असायच्या. त्यामुळे त्यांचं आरोग्य सुधारणं आणि त्यांना त्यांच्या पायावर उभं राहण्यासाठी मदत करणं आम्हाला शक्य नव्हतं. पण शीतल इथे येऊन दाखल झाल्यामुळे आमचा प्रकल्प प्रत्येक घरातल्या महिलेपर्यंत पोहोचू शकला. मुख्य म्हणजे शीतल डॉक्टर असल्याने तिथे महिलांच्या आरोग्य तपासणीची सोय झाली. आमच्यासोबत आधीपासून एक कंपाउंडर होताच. शिवाय मी डॉक्टर होतोच. त्यामुळे छोटी-मोठी औषधं देण्याचं काम आधीच सुरू झालं होतं. शीतलमुळे ते बायका आणि मुलांपर्यंत वाढलं. शीतलने तिथे उघड्यावरची ओपीडीच सुरू केली. ती दीडेक वर्ष चालली असेल. आता किनवटचे डॉ. अशोक बेलखोडे तिथे महिन्यातून एकदा तपासणीसाठी येतात. ज्यांच्यावर जागच्या जागी उपचार होऊ शकत नाहीत, त्यांना आम्ही एक तर आनंदवनात घेऊन येतो किंवा वर्ध्याच्या सेवाग्राम मेडिकल कॉलेजमध्ये घेऊन जातो. या

आरोग्यसेवेमुळेही गावाशी आमचं नातं अधिक पक्कं झालं आहे.

महिलांसाठी शिलाई मशिन उपलब्ध करून देणं, त्यांना आनंदवनात नेऊन शिवणकाम शिकवणं हा उपक्रमही आम्ही मूळगव्हाणमध्ये सुरू केला. मुख्य म्हणजे तिथल्या तरुण मुलांना आनंदवनात युवाग्राममध्ये आणून वेगवेगळ्या सेवाकौशल्यांचं प्रशिक्षण द्यायला सुरुवात केली. त्यामुळे शेतीबरोबरच उत्पन्नाचा आणखी एक स्रोत तयार झाला. माझ्या डोक्यात होतं, की इथे कृषितंत्रनिकेतन सुरू करायचं. अकोल्याच्या 'डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठा'ला तसं पत्रही लिहिलं. पण झरी-जामणी तालुका त्यांच्या प्राधान्यावर नव्हता. मग हे तंत्रनिकेतन आनंदवनात यावं, यासाठी आम्ही प्रयत्न करायचं ठरवलं. बरीच खटपट केल्यानंतर डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाने त्याला मान्यता दिली. 'सिंजेंटा फाउंडेशन, इंडिया'ने यासाठी अर्थसाह्य करण्याचं मान्य केलं. आणि अशा रीतीने आनंदवनात ग्रामीण आणि आदिवासी युवक-युवतींसाठी कृषी तंत्रनिकेतन सुरू झालं. या तंत्रनिकेतनमध्ये आम्ही झरी-जामणी तालुक्यातल्या मुलांना आणलं. आता या तंत्रनिकेतनमधून प्रत्येक वर्षी साठ विद्यार्थ्यांच्या बॅचेस बाहेर पडताहेत. यातल्या काही मुलांना वेगवेगळ्या बियाणं-खतं अशा कंपन्यांमध्ये नोकऱ्या लागतात. कोणी सरकारी खात्यात जातं, तर कोणी पुन्हा गावी येऊन नव्या पद्धतीने शेती करण्यासाठीही धडपडतं आहे. आनंदवनातली तरुण कार्यकर्ती हर्षदा पोतदार या तंत्रनिकेतनची प्राचार्य म्हणून काम बघते.

मजा म्हणजे आमच्या प्रकल्पामुळे फक्त गावांमधलंच नव्हे, तर त्या भागातलं सरकारी यंत्रणेतलं वातावरणही बदलू लागलं आहे. झरी-जामणी तालुका म्हणजे सरकारी अधिकाऱ्यासाठी शिक्षाच मानली जाते. त्यामुळे अधिकारी कामावर आहेत आहेत, नाहीत नाहीत असा सगळा प्रकार होता. आता बरेच शिक्षक वेळच्या वेळी शाळेवर येतात. तलाठी कामावर येतो. ग्रामसेवक कामं करतो. कामं केली नाहीत तर इथले लोक आपल्याला जाब विचारू शकतात, असा दाब त्यांच्यावर तयार होतो आहे. असं काही घडत असल्याचं अधिकारीच आम्हाला सांगत असतात.

आज आम्ही या प्रकल्पाकडे पाहतो तेव्हा आनंदवनाने समाजाकडून घेतलेली मदत कोणत्या ना कोणत्या प्रकारे पुन्हा समाजापर्यंत पोहचवली, याचं समाधान आम्हाला मिळतं. मूळगव्हाणमध्ये काम उभं राहिलं हे ठीकच, पण त्यापलीकडे सर्वत्र प्रश्नच प्रश्न आहेत. अजून भरपूर काम करण्याची गरज आहे. आम्ही जास्तीत जास्त ठिकाणी पोहोचण्याचा प्रयत्नही करतो आहोत; पण प्रत्येक ठिकाणी आनंदवनाची लँड आर्मीच जाऊन उतरेल अशी शक्यता नाही. पण आम्ही उभी केलेली मॉडेल्स आपापल्या ठिकाणी राबवण्याची प्रेरणा अशा प्रकल्पांमधून मिळू शकते हे नक्की!

•



नव्या प्रयोगांच्या दिशा

भारतातलं कोणतंही छोटं खेडेगाव असो सगळीकडे प्रश्नांचा ढीग लागलेला आहे. शेती करायला जमीन नाही, जमीन असली तर पाणी नाही, शेती सोडून दुसरं काही करावं म्हटलं तर रोजगाराची संधी नाही, त्यामुळे पैसा नाही... अशा किती तरी अडचणी. आनंदवनातल्या अडचणी थोड्याफार वेगळ्या; पण तरीही अशा अडचणींशी सामना करतच आम्हाला वाटचाल करावी लागली. बाबांच्या काळात त्यांच्यासमोर अडचणींचे डोंगर उभे होते. ते डोंगर पार करायला त्यांनी श्रमांची जोड घेतली. अथक काम करत राहिलं तर प्रत्येक अडचण सुटू शकते, असा त्यांचा विश्वास होता. आणि झालंही तसंच. आमच्या भागात पाणी नाही, असं म्हणत ते हातावर हात धरून बसले असते, तर आज आनंदवनाचं जे रूप दिसतं ते कधी दिसलंच नसतं. त्यांनी स्वतः श्रम केले आणि श्रमांमुळेच आपल्याला आत्मसन्मान मिळेल हे तत्त्व कुष्ठरुग्णांनाही पटवून दिलं. त्यामुळे अपंग कुष्ठरुग्णांना एखादं काम करायला इतरांपेक्षा जास्त वेळ लागला असेल, पण कामं उभी राहिली. अडचणी मागे पडत गेल्या.

मी आणि माझ्या सहकाऱ्यांनी आनंदवनात काम करायला सुरुवात केली तेव्हाही समोर समस्या होत्याच. आव्हानंही होती. त्यावर मात करण्यासाठी आपल्याला श्रम आणि तंत्रज्ञानाचा मेळ घालावा लागेल याची जाणीव मला झाली होती. पण त्याचबरोबरीने प्रश्नांची उत्तरं शोधण्याची आपली पद्धत बदलायला हवी, असंही मला फार प्रकर्षाने वाटे. किंवा असं म्हणा, की अनेकदा प्रश्नांच्या कचाट्यात मी असा काही सापडत असे की त्या कोंडीतून सुटका करून घेण्याच्या धडपडीत नव्या कल्पनांचा, इनोव्हेशन्सचा जन्म होत असे. प्रयोग करून बघू, हा मूलमंत्र ठेवला तर काही वेळा अपयश येईल, पण नव्या उत्तरांचा जन्म नक्की होईल असं वाटे. त्यामुळे पाणी, आरोग्य, शिक्षण, उद्योग अशा सगळ्या विभागांमधले प्रश्न सोडवायला कोणती नवी पद्धत स्वीकारता येईल, याचा विचार माझ्या डोक्यात सतत चालू असे. फक्त आनंदवनातल्याच अडचणींसाठी नव्हे, तर समाज म्हणून आपल्याला पडलेल्या अनेक प्रश्नांची उत्तरं आम्हाला या नव्या दृष्टिकोनामुळे मिळत गेली. मी तर असं म्हणतो, की हे प्रयोग म्हणजे ग्रामीण परिवर्तनाची साधनं आहेत. त्यामुळेच त्यांची चर्चा केवळ आनंदवनापुरती मर्यादित राहता कामा नये...

घरबांधणी

आनंदवनात आम्ही बांधलेल्या अर्धवर्तुळाकार छत असलेल्या घरांचं उदाहरण घेऊ. १९७८-७९ च्या सुमारास आम्ही आनंदवनात पहिल्यांदा ही घरं बांधली. ही घरं अतिशय कमी खर्चात होतात. पण याचा अर्थ त्या घरांचा दर्जा कमी आहे असं नव्हे. कारण आपल्याकडे ‘लो कॉस्ट’चा अर्थ होतो ‘लो क्वालिटी’. पण ही घरं ‘लो ऑन कॉस्ट’ आणि ‘हाय ऑन क्वालिटी’ आहेत. ही घरं बांधताना योग्य ती काळजी घेतली तर त्यांना शंभर वर्षं मरण नाही, असं मी पैजेवर सांगू शकतो. अगदी भूकंपप्रवण क्षेत्रातही. आपल्याकडे महाराष्ट्रात चक्रीवादळांचा फारसा धोका नाही. पण तिकडे ओरिसा-आंध्र प्रदेशात या घरांचा उपयोग होऊ शकतो. या घरांना सज्जा नसल्यामुळे वेगवान वाऱ्यातही ती घरं

टिकाव धरू शकतात.

भारताच्या ग्रामीण भागात कित्येक लोक पैशांअभावी पक्क्या घरांपासून वंचित आहेत, हे वास्तव मला कायम खटकायचं. आमच्याकडेही साधारण १९८०च्या सुमारास आनंदवनातली लोकसंख्या झपाट्याने वाढू लागल्यानंतर आम्हाला मोठ्या प्रमाणावर घरं बांधण्याची गरज निर्माण झाली होती. पण संस्थेला घरबांधणीचा खर्च परवडणारा नव्हता. आमच्याकडे मनुष्यबळ कमी नव्हतं पण पैशाची चणचण होती. शिवाय कुष्ठरुग्णांसाठी घरं बांधून देण्यासाठी गवंडी मिळण्याची मारामार. यामुळे आपली घरं आपणच बांधायची असं आम्ही ठरवलं. सुरुवातीच्या काळात आनंदवनातलं सगळं बांधकाम लाकूड, माती आणि चुन्याचं होतं. ते फारसं टिकणारं नव्हतं. दहा-पंधरा वर्षांमध्येच ती घरं वाळवीने पोखरून गेली होती. मधल्या काळात सिव्हिल इंजिनियर असलेला माझा आतेभाऊ अविनाश पटवर्धन याच्या मदतीने लोखंडी फ्रेमवर्क असलेली घरं मी बांधून पाहिली. हाही नवीनच प्रयोग होता. पण लोखंड आणि लाकूड या दोन्ही महागड्या कच्च्या मालांशिवाय घरं बांधता येऊ शकतात का, हे मला बघायचं होतं.

माझ्यासमोर आव्हान होतं ते कमीत कमी खर्चात जास्तीत जास्त टिकाऊ आणि आमच्याच लोकांना बांधता येईल अशा प्रकारचं घरबांधणीचं तंत्रज्ञान शोधून काढण्याचं. शिवाय आखूड शिंगी बहुदुधी म्हशीसारख्या या घरांकडून माझ्या आणखीही अपेक्षा होत्या. म्हणजे काय, तर घरं अशी हवीत की जिथे एअर कूलर्सची गरज लागणार नाही. जी घरं हिवाळ्यात गरम आणि उन्हाळ्यात थंड राहतील. शिवाय, आमच्या कुष्ठरुग्णांना उंदरांपासून संरक्षणाची गरज असते. त्यांच्या हातापायाला संवेदना नसल्यामुळे रात्री झोपल्यावर उंदरांनी चावे घेतले तरी सकाळी उठून बघेपर्यंत कुष्ठरुग्णांना त्याचा पत्ता लागत नाही. त्यामुळे या घरात उंदरांना लपण्यासाठी जागा मिळता कामा नये, ही आणखी एक गरज. हे सगळे गुण एकाच घरामध्ये असण्याची शक्यता दुरापास्त असल्याने अनेक पद्धतींचा अभ्यास करून स्वतःची अशी वेगळी पद्धत मला शोधून काढावी लागणार होती.

घरांबद्दल वाचताना माझ्या असं लक्षात आलं, की घरं म्हटलं की ती सिमेंटचीच हवीत, असा सरसकट अर्थ काढल्यामुळे घरांच्या किमती आवाक्याबाहेर जातात. खरं तर अॅप्रोप्रिएट टेक्नॉलॉजी आणि स्थानिक कच्चा माल या दोहोंच्या संगमातून कमी खर्चात घरं बांधण्याचे प्रयोग जगभरात भरपूर झाले आहेत; पण या प्रयोगांचा मास स्केलवर वापर झालेला दिसत नाही. कदाचित जगभरातील यशस्वी प्रयोगांचं स्थानिकीकरण करण्याचं काम आपल्याला जमलं नाही, हे त्यामागचं कारण असावं. मला या सगळ्या प्रयोगांबद्दल अतिशय कुतूहल होतं. आपल्या देशातले ग्रामीण प्रश्न सोडवण्याची क्षमता या अॅप्रोप्रिएट टेक्नॉलॉजीमध्येच आहे, यावर माझा विश्वास होता. त्यामुळे जगभरातल्या अशा प्रयोगांवर मी लक्ष ठेवून असायचो. भरपूर वाचायचो. शक्य त्या तज्ज्ञांशी पत्रापत्री करून शंकानिरसन करून घ्यायचो.

याच सुमारास आमच्याकडे चायनीज पद्धतीच्या बायोगॅस प्लांटचं काम सुरू होतं.

त्यातलं अर्धवर्तुळाकार छत बघून मला असं वाटलं, की आपण आपल्या घरांचं छत अशा प्रकारे का बांधू नये? हा विचार मनात आल्यावर मी अशा प्रकारचं काम कुणी केलं आहे का याची शोधाशोध करायला सुरुवात केली, तेव्हा मला हसन फाथींबद्दल कळलं. फाथी मूळ इजिप्तचे, पण इंग्लंडमध्ये स्थायिक झालेले आर्किटेक्ट. ज्या काळात इतर अनेक क्षेत्रांप्रमाणे घरबांधणीमध्येही पाश्चिमात्यांचं अंधानुकरण सुरू होतं, तेव्हा फाथींनी इजिप्तमधल्या पारंपरिक मातीच्या घरबांधणीमध्ये सुधारणा करून ती पद्धत पुन्हा एकदा रूढ केली. फाथींनी केलेला आणखी एक प्रयोग म्हणजे न्युबियन टाइप हाफ राऊंड बॅरल व्हॉल्ट. इजिप्त आणि सुदान या दोन देशांच्या सीमावर्ती भागातल्या लोकांना न्युबियन असं म्हटलं जातं. या भागात पूर्वी मातीची अर्धवर्तुळाकार घरं बांधली जात. आश्चर्य म्हणजे हे अर्धवर्तुळाकार छत बांधताना आधारासाठी लाकडाचा किंवा लोखंडाचा वापर केला जात नसे. फाथींनी हे तंत्रज्ञान पुनरुज्जीवित केलं, पुन्हा उपयोगात आणलं. लॉरी बेकर हे माझे या क्षेत्रातले दुसरे गुरू. आपापल्या भागातील घरबांधणीचं पारंपरिक ज्ञान आणि आपल्या आसपास मिळणारा कच्चा माल वापरून आपल्या परिसराशी-हवामानाशी मिळतीजुळती लो कॉस्ट घरं बांधली पाहिजेत, असं लॉरी बेकर यांचं म्हणणं. आज आपल्याकडे घरबांधणीत जे जे उत्तम ते ते मला हवं, अशी फॅशन आली आहे. त्यामुळे टाइल्स गुजरातहून मागवलेल्या, विटा आणखी भलतीकडून, मार्बल तिसरीकडून, असा प्रकार सुरू आहे. त्यातून माल एकीकडून दुसरीकडे घेऊन जाण्याचा खर्च वाढतो आणि घराची किंमत अव्वाच्या सव्वा होते. पर्यावरणाची हानी होते ती वेगळीच. आसपास उपलब्ध असलेल्या मालातून उत्तम दर्जा आणि सौंदर्यदृष्टी असलेली घरबांधणी शक्य आहे हे बेकर यांनी सिद्ध करून दाखवलं. माझे आणखीही एक परदेशी मार्गदर्शक होते. ते म्हणजे बकमिन्स्टर फुलर. त्यांनी तयार केलेला घराचा डोमही अतिशय प्रसिद्ध आहे. त्याला जिओडेसिक डोम म्हणतात. गंमत म्हणजे आपल्याकडे, अगदी महाराष्ट्रातही अनेकांनी बकमिन्स्टर फुलर डोमची कॉपी केली आणि तो शोध स्वतःचा म्हणूनच खपवला! पण आनंदवनातल्या घरांचं श्रेय मात्र आम्ही या सगळया तज्ज्ञांना देतो.

या तिघांपासून प्रेरणा घेऊन मी कामाला सुरुवात केली. अर्थात मी यांना गुरू मानलं आहे हे या मंडळींच्या गावीही नव्हतं. पण माझे सगळे गुरू असेच. फाथींना भेटण्याचा प्रश्नच नव्हता. १९८९ मध्ये त्यांचं निधन झालं. बेकर आपल्या भारतातलेच. त्यांनी आनंदवनात यावं यासाठी मी खूप प्रयत्न केले, पण ते काही जमलं नाही. असंच काहीसं काम औरंगाबादचे बांधकाम व्यावसायिक माजिद जमाल यांनीही केलं आहे. त्यांना मात्र मी आवर्जून भेटलो. त्यांना मी आनंदवनातही बोलावलं. त्यांच्याकडूनही मला घरासाठी अनेक टिप्स मिळाल्या.



अथक प्रयोगांनंतर साकारलेलं न्युबियन व्हॉल्ट पद्धतीचं 'लो ऑन कॉस्ट, हाय ऑन क्वालिटी' घर

मातीची घरं बांधण्यातली मुख्य अडचण म्हणजे ही घरं टिकाऊ होत नाहीत. कारण सगळ्याच प्रकारची माती बांधकामासाठी योग्य नसते. आपल्याकडे महाराष्ट्रात प्रामुख्याने ब्लॅक कॉटन सॉइल आणि रेड सॉइल अशा दोन प्रकारची माती आढळते. यातली रेड सॉइल ही कोकणाकडच्या भागात असते. ती बांधकामासाठी तुलनेने चांगली असते. पण इतरत्र आढळणारी काळी माती मात्र बांधकामासाठी उपयोगी नसते. ही माती बराच काळ पाणी धरू ठेवू शकते. त्यामुळे ओली असताना या मातीचा आकार वाढतो आणि वाळल्यावर तो इतका कमी होतो की त्यामुळे त्याला भेगा पडायला सुरुवात होते. पण या मातीत थोडं सिमेंट किंवा लाइम सोडा किंवा दोन्ही मिसळलं, तर मात्र ती बांधकामासाठी उपयोगी पडू शकते.

आम्ही तोच प्रयोग करायचं ठरवलं. सुरुवातीला मातीमध्ये तेवढीच रेती आणि फक्त पाच टक्के सिमेंट मिसळून सिमेंट ब्लॉक्स पाडण्याच्या मशिनमधून ब्लॉक्स पाडले. हे ब्लॉक्स दहा-पंधरा दिवस पाण्यात भिजत टाकले आणि नंतर वाळवले. ते इतके घट्ट झाले की हातोडा मारूनही तुटेनात. आमचं काम झालेलं होतं.

सगळे उत्साहाने कामाला लागले. या घरासाठी सिमेंटच्या घरांप्रमाणे खोल पाया खणण्याची गरज नव्हती. मी जे डिझाइन ठरवून ठेवलं होतं त्यानुसार सिमेंट ब्लॉक्सचं अर्धवर्तुळाकार छत होतं. या छताचं सेंटरिंग करण्यासाठी गिरिधर आणि चंद्रमणी यांच्या चमूने प्रचंड रिसर्च केला. सुरुवातीला हे छत उभं करायला आम्हाला जवळपास महिना लागायचा. नंतर प्रयोग करत करत हा काळ आम्ही कमी केला. आता कोलॅप्सिबल लोखंडी शटरिंग वापरून तीन तासांत छत सेट होऊ लागलं. एरवी आरसीसी स्ट्रक्चरने छत उभं करताना आधारासाठी किमान २१ दिवस सेंटरिंग ठेवणं आवश्यक असतं. पण इथे मात्र हे ब्लॉक्स 'हेरिंग बोन बाँड' पद्धतीने, म्हणजेच एका प्रकारच्या झिगझॅग पॅटर्नमध्ये लावल्याने ४८ तासांत सेंटरिंग खाली उतरवता येतं आणि भक्कम छत तयार होतं. शिवाय या छताच्या रचनेमुळे सूर्यकिरण सर्वत्र पसरले जातात. त्यामुळे छत तापत नाही आणि उन्हाळयात थंड, तर हिवाळयात उबदार राहतं. कामाला सुरुवात झाल्यावर तीन दिवसांत आम्ही एक छोटी खोली बांधून काढली. आमचा पहिलाच प्रयोग यशस्वी झाला.

आम्ही तयार केलेल्या विटांना ‘लो एक्सटर्नल इनपुट टेक्नॉलॉजी’ असं म्हणतात. म्हणजे काय, तर त्या तयार करण्यासाठी बाहेरचे पदार्थ कमीत कमी लागलेले असणं. आपल्याला माती आणि वाळू आपल्या गावातच मिळते, फक्त सिमेंट बाहेरून आणावं लागतं. हे तत्त्व लॉरी बेकरचं. खरं तर ते महात्मा गांधींचं. गांधीजी म्हणायचे, पाच किलोमीटर परिसरातून मिळणाऱ्या वस्तूच आपण वापरायला हव्यात. बेकरने तेच तत्त्व अंगीकारलं. आम्हीही. त्यामुळे आमचं घर हे पर्यावरणपूरक म्हणायला हवं. त्याला जोडून आणखी एक गोष्ट म्हणजे एखादं घर बांधताना जेवढ्या विटा वाया जातात, तेवढ्या विटांमध्ये आमचं घर बांधलं जातं. शिवाय या घरामध्ये एकही कण लाकूड किंवा लोखंड नाही. त्यामुळे सुतार-लोहाराचा खर्च वाचला.

आनंदवनातल्या मित्रांगण कम्युनमधील न्युबियन व्हॉल्ट पद्धतीच्या घरांची रांग



एक घर बांधण्याचा प्रयोग यशस्वी झाल्यानंतर आमच्याकडे अशा घरांचा कारखानाच सुरू झाला. कुष्ठरुग्णांसाठीची किती तरी कम्युन्स स्वतः कुष्ठरुग्णांनीच अशा पद्धतीने बांधली. स्वतःचं घरं स्वतःच्या हाताने बांधून त्यात राहायला जाण्याचा आनंद त्यांच्यासाठी अवर्णनीय होता. पुढे घरबांधणीमध्येही आम्ही बरेच प्रयोग केले. काही घरं आत दोन-तीन खोल्या असलेली बांधली, तर काही ठिकाणी तीन स्वतंत्र खोल्या मिळून एक घर बांधलं. अशी रचना कशासाठी? आपल्याकडे खेड्यांमध्ये घर बांधताना आई-वडिलांच्या, मुलांच्या खासगीपणाचा विचारच केला जात नाही. पण आमच्या घरांच्या रचनेमध्ये म्हटलं तर तीन घरं आहेत, म्हटलं तर एकच घर आहे. असे अनेक प्रयोग. आज आनंदवनात ‘मित्रांगण’ कम्युनमध्ये अर्धवर्तुळाकार छत असलेल्या घरांची रांगच लागली आहे. या घरांसाठी खर्च असा काही नव्हताच. शिवाय दिसायला किती सुंदर! समोरासमोरच्या खिडक्यांमुळे खेळती हवा, नैसर्गिक वातानुकूलन आणि घराच्या छताला कोपरे नसल्याने उंदरांना लपायला जागा नसल्याने कुष्ठरुग्णांसाठी पूर्ण सुरक्षित. अर्धगोलाकार असल्यामुळे छतावर पाणी साठून ते गळण्याचा धोका नाही. अशी आमची बहुगुणी घरं. १९९० साली तिबेटचे धर्मगुरू दलाई लामा आनंदवनात आले होते. आमची न्युबियन व्हॉल्टची घरं बघून ते म्हणाले, “तिबेट स्वतंत्र झाल्यावर आम्ही तिथे अशीच घरं बांधू.” त्यानंतर या घरांच्या बांधणीचा अभ्यास करण्यासाठी त्यांच्याकडून एक टीमही आनंदवनात येऊन गेली.


घरबांधणीतला आणखी एक अफलातून प्रयोग

एकीकडे घरबांधणी सुरू असताना दुसरीकडे ब्लॉक्ससाठी वापरण्याच्या सामग्रीमध्ये आणखी काय प्रयोग करता येतील का, याबद्दल माझा विचार सुरू होताच. टाकाऊ पदार्थांचा वापर करण्याचं खूळ कायमच माझ्या डोक्यात होतं. मुख्यतः पर्यावरणाला हानीकारक ठरणारे पदार्थ आपण बांधकामामध्ये वापरू शकतो का याची चाचपणी सुरू होती. तेव्हाच मी विटांमध्ये फ्लाय अॅश वापरण्याबद्दल ऐकलं. औष्णिक वीज प्रकल्पांमधून बाहेर पडणारी फ्लाय अॅश पर्यावरणासाठी अतिशय हानीकारक असते. ती बांधकामामध्ये वापरली गेली तर ती उघड्यावर राहिल्यामुळे होणारं प्रदूषण रोखलं जाऊ शकतं. मी तो आमच्याकडेही प्रयोग करून पाहिला. तोही यशस्वी झाला. त्यामुळे ब्लॉक्ससाठीच्या मसाल्याचं नवं प्रमाण तयार झालं. आता तर गेल्या काही वर्षांपासून आम्ही आणखी एक भन्नाट पदार्थ या मसाल्यात घालायला सुरुवात केली आहे. तो म्हणजे बारीक केलेलं प्लास्टिक. त्यामुळे आमच्या सध्याच्या घरबांधणीतला विटा तयार करण्याचा फॉर्म्युला आहे : ६० घमेली माती, ४० घमेली वाळू, ५ घमेली सिमेंट, १ घमेलं फ्लाय अॅश आणि १ घमेलं प्लास्टिक. प्लास्टिक का याबद्दल पुढे सांगतोच.

यानंतर घरबांधणीमध्ये आम्ही आणखी एक प्रयोग केला. १९८९ दिल्ली क्लॉथ मिल्सचे अशोक करंदीकर आनंदवनात भेट द्यायला आले होते. त्यांनी आमची न्युबियन व्हॉल्टची घरं बघितली. त्या वेळी त्यांनी त्यांचे दिल्लीस्थित मित्र जे. डी. जेठी यांच्या स्पायरल रूफ असलेल्या नावीन्यपूर्ण घरांबद्दल मला सांगितलं. दिल्लीला परतल्यानंतर त्यांनी जेठींनाही आनंदवनातल्या घरबांधणी प्रयोगांची माहिती दिली. जेठींनी त्यांचा एक सहकारी आनंदवनात पाठवला. त्याने आम्हाला त्यांच्या पद्धतीबद्दल मार्गदर्शन केलं. आमच्या राजप्पा, दत्तू, दामू आदी बांधकामतज्ज्ञांनी त्याच्याकडून हा नवा प्रयोग शिकून घेतला. काय होतं या घराचं वेगळेपण? एक जोडपं, एक स्टूल, एक थापी आणि एक घमेलं एवढ्या साधनांनिशी आठ तासांत या घराचं छत बांधता येऊ शकतं. गवंडी नाही, गुण्या नाही, ओळंबा नाही आणि मुख्य म्हणजे सेंटरिंग नाही. या घरामध्येही लोखंड किंवा लाकूड वापरलेलं नाही. त्यामुळे सुतार आणि लोहार या दोन्ही एजन्सींची गरज नाही. हे घर बांधतानाचा व्हिडिओ आम्ही काढला होता. ज्या लोकांनी तो पाहिला त्यांना तो

एखाद्या हॉरर फिल्मइतकाच धक्कादायक वाटायचा. या प्रयोगाकडे नॅशनल जिऑग्राफिकचं लक्ष गेलं, पण दुर्दैवाने महाराष्ट्राला या प्रयोगाची किंमत कळली नाही. आम्ही आनंदवनात अशा प्रकारची सात घरं बांधली आहेत.

आता आपल्या देशात सगळीकडेच एकावर एक मजले चढवण्याची चढाओढ सुरू झाली आहे. शहरांमध्ये जागा आणि माणसांचं प्रमाण इतकं व्यस्त होत चाललं आहे की आता शहरांना वरच्या दिशेने वाढण्याशिवाय पर्याय नाही. पण उद्या जेव्हा आपल्याला खेड्यांचा विकास करावासा वाटेल तेव्हा आम्ही विकसित केलेलं हे तंत्रज्ञान उपयोगी पडेल. आम्हाला ना कुठल्या श्रेयाची अपेक्षा आहे ना फळाची. महाराष्ट्रातील गोरगरीब लोकांना आमच्या प्रयोगांचा काही लाभ व्हावा, एवढीच काय ती आमची इच्छा आहे.

प्लास्टिक पुनर्वापर

असं म्हणतात की परमेश्वर जगात सर्वत्र भरून राहिलेला आहे. ते खरं की नाही याबद्दल आस्तिक-नास्तिकांमध्ये वादविवाद होऊ शकतात. पण जगात सर्वत्र प्लास्टिक विखुरलेलं आहे, याबद्दल वाद होणं शक्यच नाही. कारण प्लास्टिकचं अस्तित्व सर्वव्यापी आहे. हिमालयापासून गंगेपर्यंत किंवा अंटार्क्टिकापासून वाळवंटांपर्यंत कोठेही जा, तिथे तुम्हाला प्लास्टिकचा कचरा सापडणारच. प्लास्टिक साचल्याने नदीनाले तुंबतात, पूर येतात. जनावरांच्या पोटात गवताबरोबर प्लास्टिक जातं... असा बराच उच्छाद प्लास्टिकने मांडला आहे. प्लास्टिकचा शोध लागल्यामुळे मानवी आयुष्य सुकर झालं हे खरं; पण या प्लास्टिकची कायमस्वरूपी विल्हेवाट लावणं शक्य नसल्यामुळे सगळ्या जगासमोर एक भस्मासुर तयार झाला आहे. तो संपवायचा कसा यावर जगभरातले शास्त्रज्ञ काम करताहेत.

साधारण नव्वदीच्या दशकात आमच्याकडे आनंदवनाच्या आसपासही प्लास्टिकचा संचार वाढलेला जाणवू लागला. आनंदवनात बाहेरून विकत आणण्याची पद्धत फारशी नाही. दूध, भाजी, सगळं आतल्या आतच तयार होतं. त्यामुळे आमच्याकडे कॅरीबॅग्जचं प्रस्थ नाही. पण बाहेरच्या जगात, अगदी वरोऱ्यासारख्या छोट्या गावातही प्लास्टिक पिशव्यांचा सुळसुळाट फार. त्यामुळे कचराकुंडीत, गटारीच्या तोंडाशी, नाल्यांमध्ये, नदीत, रस्त्यावर जिथे बघावं तिथे प्लास्टिकच्या फाटलेल्या पिशव्या, बिस्किटांचे-चॉकलेट्सचे रॅपर्स, धान्य घालून आलेल्या पिशव्या, असं नाना प्रकारचं प्लास्टिक आणि त्याबरोबरीला गुटख्याच्या अगणित पुड्या. आनंदवनातून बाहेर पाऊल ठेवलं की या पुड्या पायाखाली येणारच. हे चित्र मला फार अस्वस्थ करत होतं. हे चित्र बदलायचं तर प्लास्टिकचा वापर कमी करा, असं सांगत राहणं हा झाला त्यावरचा एक पर्याय. तो किती लागू पडेल माहिती नाही. शिवाय प्लास्टिक आता अत्यावश्यक झालं आहे हेदेखील मान्य करायला हवं. त्यामुळे प्लास्टिक वापरणं पूर्ण बंद होईल अशी अपेक्षा करणंही चुकीचंच. परिणामी, प्लास्टिक कमी वापरा, ते रस्त्यावर टाकू नका याबद्दल लोकांना जागृत करत असतानाच रस्त्यावर पडून राहिलेल्या प्लास्टिकची विल्हेवाट लावणंही महत्त्वाचं आहे, ही गोष्ट मला जाणवत होती. मी विचार केला, हे सगळं उघड्यावर पडलेलं प्लास्टिक

गोळा तरी करावं. मग त्याचं काय करायचं ते पुढे बघता येईल. मग डोक्यात काही काही कल्पना उगवायला सुरुवात झाली. गोळा केलेलं प्लास्टिक जमिनीत गाडून टाकता येईल का, असा विचार मनात आला. उदा. घरांसाठी पाया खोदल्यावर त्यात प्लास्टिक डंप करता येऊ शकतं. दुसरी शक्यता म्हणजे आनंदवनाच्या आसपास दगडाच्या अनेक खाणी होत्या. त्यातलं खाणकाम संपल्यावर त्या तशाच उघड्या पडलेल्या होत्या. त्या बुजवण्यासाठी आधी प्लास्टिक घालून मग वर मातीचा भराव घालता आला असता. यात बऱ्याच मोठ्या प्रमाणात प्लास्टिक खपलं असतं. मुख्य म्हणजे इतक्या आत गाडलं गेल्यावर ते पुन्हा बाहेर येऊन परिसरात मिसळलं जाण्याचा प्रश्न उद्भवला नसता.


प्लास्टिकच्या कचऱ्याच्या विल्हेवाटीसाठी आनंदवनाने भन्नाट उपाय शोधला.

आणखीही काही सुचेल या आशेवर आम्ही प्लास्टिक गोळा करायचं ठरवलं. मग विचार केला, की प्लास्टिक गोळा करत गावभर फिरायचंच आहे तर मग त्या निमित्ताने लोकांचं थोडंफार प्रबोधन झालेलं काय वाईट? आमच्या या उपक्रमाला आम्ही अभियानाचं रूप दिलं. आम्ही एक बॅनर तयार केलं, एक घंटागाडी घेतली आणि निघालो. सोबत कार्यकर्ते होतेच. त्या वेळी आनंदवनात काही परदेशी पाहुणे काम बघण्यासाठी, काही दवाखान्यात काम करण्यासाठी आले होते. तेही आनंदाने या 'प्लास्टिक हटाव' यात्रेत सहभागी झाले. या परदेशी पाहुण्यांमुळे आमच्या या अभियानाकडे गावकऱ्यांचं चांगलंच लक्ष वेधलं गेलं. लोक कुतूहलाने गोळा व्हायचे, पण आम्हाला हसायचेही. आमच्याही अनेक कार्यकर्त्यांना माझं हे काय चाललंय कळत नव्हतं. प्लास्टिकचा भस्मासुर वगैरे गोष्टी ऐकायला ठीक होत्या, पण गोळा केलेल्या या कचऱ्याचं आपण काय करणार आहे हे कुणाला कळत नव्हतं. पण त्यांचा माझ्यावर विश्वास होता, त्यामुळे सगळ्या शंका बाजूला ठेवून त्यांनी कामं केली.

वरोरा गाव आणि आसपासच्या परिसरातलं प्लास्टिक गोळा करत आम्ही जवळपास आठवडाभर फिरलो. भरपूर प्लास्टिक गोळा झालं. नाना प्रकारचं प्लास्टिक होतं त्यात. त्यामुळे सर्वांत पहिलं त्याचं वर्गीकरण करणं आवश्यक होतं. आणलं प्लास्टिक की करा वापरायला सुरुवात, असं करता येणार नव्हतं. त्यानंतर ते स्वच्छ करण्यासाठी पाण्याने धुऊन वाळवणं गरजेचं होतं. गजाननने ही जबाबदारी उचलली. प्लास्टिकचं वर्गीकरण कसं करायचं, ते धुवायचं कसं, वाळवायचं कसं या सगळ्याची माहिती मी मिळवून ठेवली होती. ते सगळं गजाननला समजावून सांगितलं. गजानन आणि मीच नव्हे, तर आनंदवनातले सगळेच लोक त्या वेळी प्लास्टिकमय झाले होते. सगळेजण आपापलं काम

सांभाळून ‘प्लास्टिक डेपो’वर चक्कर मारायचे आणि तिथेच आमच्या गप्पा रंगायच्या.

गप्पांमधून अनेकदा नव्या कल्पना बाहेर पडायच्या. स्वच्छ धुऊन वाळवलेलं प्लास्टिक बारीक कसं करायचं यावर एकदा चर्चा सुरू होती. गजानन म्हणाला, “कापूस पिंजण्याचं मशिन वापरून बघू.” झालं, एक नवा प्रयोग. कापूस पिंजण्याच्या मशिनवर प्लास्टिकचे एका वेळी दोन-चार तुकडे होत होते, पण ते अगदी बारीक मात्र होतं नव्हतं. मग ते तुकडे पुन्हा पुन्हा मशिनमध्ये टाकून पाहिले. पुन्हा पुन्हा प्रयत्न केल्यावर आम्हाला हवं तसं बारीक प्लास्टिक मिळालं. घरबांधणीवेळी थोडा पाया खणला जायचा त्यात हे प्लास्टिक कामी आलं. पण आणखी काय करता येईल याचा विचार सतत सुरू होताच.

अशी विचारचक्रं सुरू असली की बऱ्याचदा दुपारी विश्रांती घेता घेता मला अचानक काही तरी नवं सुचून जायचं. प्लास्टिकबाबतही असंच झालं. अचानक एके दिवशी डोक्यात आलं, की हे प्लास्टिक विटांमध्ये घालून पाहिलं तर? दुसऱ्याच दिवशी तो प्रयोग करून पाहिला. सोबतीला गजानन, अशोक वगैरे आमचे उत्साही कार्यकर्ते होतेच. ६० घमेलं माती आणि ४० घमेलं वाळूत एक घमेलं प्लास्टिक घातल्यामुळे काहीही बिघडणार नाही याची मला खात्री होती. उलट, बारीक केलेल्या प्लास्टिकच्या अंगभूत चिवटपणामुळे सिमेंट आणि माती-वाळूचं बाइंडिंग आणखी चांगलं झालं असतं, असा माझा अभ्यास होता. झालंही तसंच. प्लास्टिक मायक्रो काँक्रीट घालून तयार झालेली आमची वीट आधीच्या विटेइतकीच भक्कम होती. मग त्यानंतरच्या सगळ्या बांधकामात विटा बनवताना प्लास्टिकचा वापर आम्ही सुरू केला. आता आनंदवनातले सगळे कार्यकर्ते विटा बनवण्याचा हा फॉर्म्युला अभिमानाने पाहुण्यांना दाखवतात.

थोड्या दिवसांनी प्लास्टिक बारीक करण्यासाठी आम्ही एक श्रेडर मशिन आणलं. त्यामुळे काम बरंच सोपं झालं. हा सगळा प्लास्टिक कचरा बारीक होऊन आमच्या समोर पडू लागल्यावर नव्या कल्पना काढणं भागच होतं. सगळयांच्याच कल्पनाशक्तीला त्यामुळे धुमारे फुटले.

प्लास्टिकच्या गाद्या वॉशेबल आणि हलक्या होऊ शकतात, असं मला वाटत होतं. त्यामुळे प्लास्टिकचा भुगा गाद्यांमध्ये घालून पाहिला; पण ही गादी खूपच आवाज करत होती. शिवाय गादी ही रात्रभर शांत झोपेसाठी वापरण्याची वस्तू. प्लास्टिकमुळे शरीराचं तापमान वाढण्यासारखे दुष्परिणाम व्हायला नकोत, याची काळजी घेणं गरजेचं होतं. त्यावर उपाय म्हणून प्लास्टिकच्या सोबतीने पॉलिएस्टर फायबर वेस्ट टाकून बघायचं ठरवलं. कारण गादी वॉशेबल हवी असेल तर त्यात कापूस घालून उपयोग नव्हता. फायबर आणि प्लास्टिक हे गणित छान जमलं. उत्तम गादी तयार झाली. प्लास्टिकचा आवाज जवळपास नाहीसा झाला. ही गादी वजनाला हलकी आणि धुता येण्याजोगी होती. या गाद्या-उशा आम्ही आनंदवनात तर वापरल्या. अजूनही वापरतो आहोत. एक-दोन संस्थांनीही आम्हाला या गाद्यांची ऑर्डर दिली. हे प्रमाण कमी असलं तरी एक नवा प्रयोग करून बघितल्याचं समाधान आम्हाला नक्की मिळालं.

स्पिल ओव्हर डॅम्स

प्लास्टिक कचरा सत्कारणी लागल्याचं सर्वाधिक समाधान दिलं ते स्पिल ओव्हर डॅम्सनी. स्पिल ओव्हर डॅम्स म्हणजे छोट्या नाल्यांवर घातलेले बंधारे. हा बंधारा नाल्याच्या लांबी-रुंदी-उंचीचा विचार करून घातलेला असतो. त्यामुळे नाल्याच्या आसपासची जमीन बुडीत क्षेत्रात येत नाही.


आनंदवनात पाण्यावर काम सुरू झालं तेव्हापासून माझ्या डोक्यात अशा स्पिल ओव्हर डॅम्ससाठी काही वेगळी सामग्री वापरता येईल का, असा विचार सुरू झाला होता. एरवी बंधारे बांधले जातात ते माती किंवा सिमेंटचे. मातीचे बंधारे फारसे टिकाऊ ठरत नाहीत, तर सिमेंटचे अव्वाच्या सव्वा महाग पडतात. त्यामुळे डॅम्ससाठी रिसायकल्ड मटेरियल वापरता आलं तर बंधाऱ्याचा खर्च कमी होऊ शकेल, असं माझ्या डोक्यात फिरत होतं. या विचारांना गती मिळाली ती सोमनाथमधल्या बंधाऱ्यांची डागडुजी करताना. सोमनाथमध्ये सुरुवातीच्या काळात जे बंधारे बांधलेले होते त्यांची डागडुजी करावी लागायची. त्यातलं लोखंड गंजायचं, लाकूड सडायचं. ते बदलत राहणं हे फार कटकटीचं काम होतं. कोल्हापूर पद्धतीचे बंधारे आपल्याकडे मोठ्या प्रमाणावर आहेत, पण त्या बंधाऱ्यांमधलं लोखंड चोरीला जाण्याचं प्रमाण खूप मोठं आहे. हे सगळे प्रश्न निकाली निघतील अशी पद्धत शोधण्याचा ध्यास मला लागला होता.

ट्रकसारख्या मोठ्या वाहनांचे वापरून टाकून दिलेले जुने टायर्स मला खुणावत होते. हे जुने टायर्स लोखंडी सळयांच्या मदतीने एकावर एक रचून त्यांच्या मधली जागा सिमेंटने भरून काढली तर काय, असा विचार मनात घोंघावत होता. सिवाय सिमेंटमध्ये प्लास्टिकचा चुरा खपवला तर विटांप्रमाणे सिमेंटचाही भक्कमपणा वाढेल, असंही वाटत होतं. पण वाटणं आणि होणं याच्या मध्ये अंतर असतं ते प्रयोगाचं.

माझ्या अभ्यासावरून मी काढलेला हा निष्कर्ष बरोबर आहे की नाही हे तपासणं मोठं काम होतं. याही वेळी ही जबाबदारी घेतली गजाननने. त्याला कल्पना सांगितल्यावर त्याचा डायलॉग ठरलेला होता. “भाऊ, तुम्ही काय म्हणताय ते सगळं माझ्या डोक्यावरून जाऊन राहिलं, पण आपण करून बघू.” असं म्हणून तो कामाला लागला. मुख्य काम होतं जुने टायर्स आणि बाकीचं सामान गोळा करण्याचं. बंधारा बांधण्यासाठी आनंदवनात नाला नसल्यामुळे लगतच्या सालोरी गावाजवळच्या लेंडी नाल्यावर हा स्पिल ओव्हर डॅम उभारावा, असं आम्ही ठरवलं. गजाननने आमच्या ‘लँड आर्मी’ची मीटिंग बोलावली. कुठे काही मोठं काम करायचं असेल, कुठे मोठ्या सामानाची हलवाहलव करायची असेल तर ही टीम कायम सज्ज असते. तर ही टीम घेऊन गजानन आणि मी लेंडी नाल्यापाशी पोहोचलो.

बंधारा बांधायचा म्हणजे आधी नाल्याचा प्रवाह वळवून घ्यावा लागणार. त्याशिवाय प्रवाहात बांध बांधणं शक्य नव्हतं. मग गजाननने शेतकऱ्यांशी चर्चा करून लँड आर्मीच्या मदतीने प्रवाहाची दिशा बदलून घेतली. मग खालच्या बाजूला फाउंडेशनसाठी टायर्स मावतील एवढा लोखंडाच्या सळयांचा कॉलम तयार केला. त्या कॉलममध्ये एकावर एक टायर ठेवत गेलो. आता मुख्य काम होतं ते यात सिमेंट भरण्याचं.

त्यासाठीचा आमचा फॉर्म्युला तयार होता. आठ घमेली रेती, आठ घमेली खडी आणि चार घमेली बारीक केलेलं प्लास्टिक. पण प्रश्न होता तो या टायरमध्ये हा मसाला आतपर्यंत कसा घालायचा हा. वरून सिमेंट ओतलं की ते खालच्या टायरपर्यंत जाईल हे खरं, पण टायरच्या आतल्या बाजूला ते कसं पोहोचणार? त्यावर बराच खल झाला. मग आम्हाला आठवलं, आपल्याकडे कशासाठी तरी आणलेलं एक व्हायब्रेटर मशिन आहे. ते साइटवर मागवलं आणि टायरच्या मध्ये लावून वरून सिमेंट ओतायला सुरुवात केली. सिमेंट आपोआप टायरच्या आतल्या बाजूला फेकलं जाऊ लागलं. काम फत्ते झालं. या टायरच्या सांगाड्याला बाहेरून सिमेंटचा गिलावा केला. आम्ही दीड महिना अहोरात्र हे काम करत होतो, पण आमच्या मेहनतीतून एक जगावेगळा बंधारा बांधून तयार झाला होता. मला खात्री होती, की आता या बंधाऱ्याला पन्नास वर्षं तरी काही होणार नाही.



प्लास्टिक-टायर-काँक्रीट वापरून बांधलेला
एकमेवाद्वितीय स्पिल ओव्हर डॅम.

बंधारा बांधला आणि महिन्याभरातच पावसाला सुरुवात झाली. एके दिवशी त्या गावातलं कोणी तरी धावत-पळत गजाननकडे आलं आणि म्हणालं, “तुमचा बंधारा पडला.” गजाननला कळेना हे कसं काय झालं. मी त्याला म्हटलं, “आधी जाऊन काय झालंय ते स्वतःच्या डोळ्यांनी बघ.” त्याने पाहिलं, तर बंधारा पडला नव्हता, उलट तो ठणठणीत उभा होता. त्यावरून पाणी वाहून चाललं होतं. दोन दिवसांनी पाऊस कमी झाल्यावर आम्ही पुन्हा त्या जागी गेलो. बंधारा आहे तसाच उभा होता. दरवर्षी वाहून जाणारं किती तरी पाणी त्याने आडवलं होतं. आमचा प्रयोग चांगला यशस्वी झाला होता. या बंधाऱ्याच्या मागच्या बाजूच्या शेतकऱ्यांना पावसाळ्यानंतर त्याचा चांगला उपयोगही झाला. ज्या ठिकाणी गेल्या वर्षीपर्यंत पावसाळ्यात कसंबसं तांदळाचं एक पीक निघत होतं, तिथे त्यांनी वर्षातून तीन पिकं घ्यायला सुरुवात केली. बोअरिंगला पाणी आलं, विहिरी पाण्याने तुडुंब भरू लागल्या. हँडपंपला बारा महिने पाणी मिळू लागलं. हा बंधारा बांधून आता जवळपास दहा वर्षं झाली आहेत. अजूनही तो आहे तसाच भक्कम आहे. आमच्या गजानन महाराजांच्या खास शब्दांत सांगायचं, तर या बंधाऱ्यामुळे तीन किलोमीटरपर्यंत ‘बॅकवॉटर रिव्हर्स’ तयार झाला आहे. ते पाणी खेचून घेण्यासाठी त्यावर शेतकऱ्यांनी जवळपास २८ डिझेलपंप बसवले आहेत, म्हणजे बघा!

या प्रयोगानंतर आम्ही आनंदवनाच्या आसपासच्या नाल्यांवर आणखी दोन,

सोमनाथला एक आणि मूळगव्हाणमध्येही एक टायर-प्लास्टिक-काँक्रीट बंधारा बांधला. आनंदवनाजवळच्या एका नाल्यात तर लोखंडी सळयांबरोबर प्रक्रिया केलेल्या बांबूंचा वापर केलेला आहे. जमिनीवर लाकूड किंवा लोखंडाऐवजी प्रक्रिया केलेल्या बांबूंचा उपयोग करणारे प्रयोग अनेक झाले आहेत, पण पाण्याखाली बांबूचा वापर करणारा हा भारतातला पहिला प्रयोग होता. हे सगळे बंधारे आज उत्तम काम करत आहेत. हे सगळे बंधारे नॉन-थर्मल, नॉन केमिकल! या बंधाऱ्यांमुळे खर्चही वाचला आणि प्लास्टिक कचऱ्याची विल्हेवाटही लागली, असा दुहेरी फायदा झाला आहे.

रस्ते आणि प्लास्टिक

बारीक केलेलं प्लास्टिक बांधकामात उपयोगी पडतंय हे लक्षात आल्यावर मला आणखी एक प्रयोग करून बघण्याचा मोह आवरला नाही. आपल्याकडे रस्ता म्हटलं की त्याला खड्डे पडलेलं असणं स्वाभाविकच असतं. एक पावसाळा होऊन गेला की नवा रस्तासुद्धा उखडला जातो. तो कधी दुरुस्त होईल आणि दुरुस्त झाला तरी पुन्हा उखडणार नाही याची काही शाश्वती नाही. मी विचार केला, प्लास्टिक घातलेलं सिमेंट या खड्ड्यांमध्ये टाकलं तर कदाचित ते जास्त काळ टिकेल. प्लास्टिकमधल्या टेनॅसिटीमुळे सिमेंटचा भक्कमपणा वाढेल, असं माझा अनुभव सांगत होता. म्हटलं, करून बघायला काय हरकत आहे? वाळू, सिमेंट, खडी, टायरचे तुकडे आणि प्लास्टिक घालून मसाला तयार केला आणि प्रयोग म्हणून चिमूर रोडवरचे अनेक खड्डे बुजवले. हे खड्डे उखडले तर गेले नाहीतच, शिवाय त्यातल्या टायर-प्लास्टिकमुळे ते पॅचेस डांबरापेक्षा अधिक गुळगुळीत झाले.

खरं तर हा प्रयोग सर्वच शहरांमध्ये राबवता येण्याजोगा आहे. अगदी पुण्या-मुंबईतही खड्ड्यांमुळे पावसाळयात रस्त्यांची काय अवस्था झालेली असते ते आपण पाहतोच. मग बाकीच्या शहर-गावांबद्दल बोलायलाच नको. त्यामुळे हे नवं तंत्रज्ञान आपल्याला मोठ्या स्केलवर उपयोगी पडू शकतं, असं माझं म्हणणं. पण इतक्या सहजपणे बदल स्वीकारला तर आपलं वैशिष्ट्य काय उरेल? आम्ही दुरुस्त केलेल्या रस्त्यांवर आपल्या शासकीय यंत्रणेने चक्क 'कारवाई' केली. 'हमारे खड्डेमें तुम्हारा क्या काम है?' असं म्हणत सार्वजनिक बांधकाम विभागाने आम्ही तयार केलेले सगळे पॅचेस उखडून टाकले. आम्ही अक्षरशः थक्क झालो. हा प्रयोग इतरत्र राबवण्याइतकी इच्छाशक्ती आपल्या सरकारी यंत्रणेकडे नाही हे मान्य, पण केलेलं कामही उद्ध्वस्त करून टाकावं असं या लोकांना का वाटलं, त्यांचं त्यांनाच माहिती!

आनंदवनातलं अभयारण्य

तुम्ही आनंदवनात आलात तर विस्तीर्ण पसरलेलं अभयारण्य तुम्हाला दिसेल. आता हे वाचताना 'अभयारण्यात नवं ते काय' असा प्रश्न तुमच्या मनात येऊ शकेल. पण हे अभयारण्य आम्ही ज्या जागेवर उभं केलं त्या दृष्टीने आणि ज्या पद्धतीने वनीकरण केलं त्या दृष्टीनेही या अभयारण्याचं महत्त्व वेगळं आहे. ६०-६५ एकरांत पसरलेलं, जैववैविध्याने भरपूर असं मानवनिर्मित जंगल म्हणजे आनंदवनातल्या हिरव्या संपत्तीचं आणखी एक


उदाहरणच. हे जंगल कसं उभं राहिलं याची गोष्ट मजेशीर आहे. आनंदवनातल्या जमिनीला लागून दगडांच्या अनेक खाणी होत्या. त्या खाणींचं काम संपलेलं होतं, पण तरीही त्या उघड्याच होत्या. खरं तर अशा खाणी ताबडतोब बुजवणं गरजेचं असतं. पण आपल्याकडे पर्यावरणाच्या दृष्टीने आवश्यक नियमांचं पालन वगैरे कुठे होतं? आपल्या आसपास अशा उघड्या खाणी आहेत, ही गोष्ट मला फार खटकायची, पण त्यावर उपाय काय करावा कळत नव्हतं.

एकदा १९८४च्या सुमारास 'रीडर्स डायजेस्ट'मध्ये डॉ. रेने हालर नावाच्या एका स्विस पर्यावरण कार्यकर्त्याने केनियातल्या मोंबासा येथील उघड्या सिमेंट खाणींमध्ये केलेल्या कामावर लेख आला होता. तो वाचला आणि मी पागल झालो. या माणसाने खाणींचं पुनर्वसन करत तिथे अक्षरशः जंगल फुलवलं होतं. मी वेड्यासारखा वाचत गेलो. लेखात त्याचा पत्ता दिलेला नव्हता, अन्यथा मी लगेचच त्याला पत्र टाकून संपर्क केला असता. नंतर बाबांची जर्मन मानसकन्या मरियाना हिचा अचानक फोन आला. योगायोगाने तेव्हाच तिने रेने हालरच्या कामावरची एक फिल्म पाहिली होती आणि आमचं त्याबद्दल काहीही बोलणं झालेलं नसतानाही तिला ती फिल्म पाहिल्यावर माझी आठवण आली होती. आमचं बोलणं झाल्यानंतर तिने ती फिल्म मला पाठवली. कुठून तरी व्हीसीआर मिळवून मी ती फिल्म पाहिली. काय प्रचंड काम केलं होतं त्या माणसाने! त्याने केनियातल्या खाणींमध्ये दहा लाखांहून जास्त स्थानिक झाडंझुडपं, वनस्पती, वृक्ष लावले. त्या खाणींमध्ये शेण टाकलं, किडे-फुलपाखरं सोडली. आणि पाहता पाहता शून्य जैवविविधतेतून एक भरगच्च जंगल उभं राहिलं. आज ही जागा 'हालर पार्क' म्हणून ओळखली जाते.

ते बघून मी चक्रावून गेलो. खाणींचं पुनर्वसन हा शब्द मला कमालीचा भावला. मला असं वाटलं, की आपल्या आसपासच्या खाणींमध्येही आपल्याला असंच जंगल रुजवता येऊ शकतं. आम्ही आमची योजना तयार करून सरकारकडे ती जमीन मागितली. अर्थातच त्याला थंडा प्रतिसाद मिळाला. पण मग आम्ही शेवटी आमच्या आसपासच्या सत्तर एकर परिसरात काम सुरू करण्याचं ठरवलं. रेने हालरचं उदाहरण समोर होतंच. त्याचा पत्ता मिळाल्यावर मी त्याच्याशी पत्रव्यवहारही सुरू केला. खाणींचं पुनर्भरण आणि एकूणच सामाजिक वनीकरण याबद्दल अभ्यास सुरू केला.

आपल्याकडे सामाजिक वनीकरण म्हटलं की 'सरकारचा काहीच काम न करणारा विभाग' एवढंच चित्र डोळ्यांसमोर येतं. पण खरं तर या शब्दाला मोठा अर्थ आहे. सामाजिक वनीकरणाचं काम केलेल्या लोकांची माहिती जसजशी वाचत गेलो, तसतसे या क्षेत्रातले अनेक गुरू सापडत गेले. गुजरातमधले कालिदास पटेल आणि विठूभाई पटेल हे त्यांच्यापैकीच. या दोघांनी गुजरातमध्ये मल्टिटियर सिल्व्हिपाश्चर सिस्टीम असलेली जंगलं तयार केली. म्हणजे काय? जैवविविधतेने संपूर्ण असं जंगल उभं करण्यासाठी जेव्हा जागा कमी असते, तेव्हा छोट्या जागेत एकावर एक अशा स्तरांमध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या वनस्पतींची लागवड करणे. सगळ्यात वरचा स्तर प्रामुख्याने जळण-सरपण, बांबू आणि लाकडाच्या इतर उपयोगांसाठी वापरायचा, मधल्या स्तरातल्या द्विदल

वनस्पती आणि कंदमुळं हा जनावरांचा चारा म्हणून उपयोगात आणायचा, तर सगळ्यात खालचा, जमिनीलगतचा स्तर हा वेली, छोट्या वनस्पतींनी, झाडाझुडपांनी भरलेला ठेवायचा. प्रत्येकाचा वेगळा उपयोग. प्रत्येक स्तरामध्ये नाना जाती-प्रजातींची झाडं. यात हवेच्या स्तरांचाही विचार केलेला असतो. कोणत्या झाडांना कशी हवा लागते, किती ऊन लागतं, किती पाणी लागतं, याचा विचार करून सर्व झाडांची एकाच ठिकाणी लागवड करायची. मी हे करून बघायचं ठरवलं.



आनंदवनालगतच्या दगडांच्या खाणींचं पुनर्वसन करून उभारलेलं 'हाय डेन्सिटी' जंगल

माझ्या साथीला होते आमच्या आनंद निकेतन कॉलेजमधले बॉटनीचे प्राध्यापक विश्वास काळपांडे. खरं तर वनस्पती अन् पक्ष्यांमध्ये मला रस निर्माण झाला तो त्यांच्यामुळेच. त्यांचा अभ्यास दांडगा होता आणि प्रत्यक्ष काम करण्याची ऊर्मीही पुरेपूर. सामाजिक वनीकरणाच्या प्रयोगात त्यांना कमालीचा रस होता. त्यामुळे आम्ही दोघंही आनंदवनाच्या रानावनात भरपूर भटकायचो. नव्या योजना आखायचो. खाणींमुळे तयार झालेले छोटे-मोठे खड्डे आम्हाला प्रामुख्याने खुपत होते. ते आधी भरणं गरजेचं होतं. मग मी विचार केला, की हे प्लास्टिकने का भरू नयेत? मग ते प्लास्टिक या खड्ड्यांमध्ये टाकून खड्डे बुजवले. त्याच वेळी तलावांच्या खोलीकरणाचं काम सुरू होतं. तिथे मातीचे ढीगच्या ढीग बाहेर काढले जात होते. ते सगळे या प्लास्टिकवर टाकले आणि मग तिथे झाडांची लागवड करायला सुरुवात केली. कोणतंही काम करताना तुम्हाला तुमच्या आसपासच्या परिस्थितीचा विचार करावा लागतो. मी आमच्या इथल्या स्थानिक वनस्पतींचा वापर केला. पण पद्धत हालर आणि पटेल यांची. हळूहळू पेरलेलं उगवू लागलं आणि काही काळातच तिथे जंगल माजलं. हा परिसर पाहिलात की 'माजलं' हाच शब्दप्रयोग कसा योग्य आहे हे तुमच्या लक्षात येईल. हे सगळं 'हाय डेन्सिटी' जंगल आहे. सगळं एकमेकांत गुंतलेलं. बघायला गेलात तर खालची जमीन दिसणार नाही एवढं दाट. पण तरी प्रत्येक झाडाझुडपाचं स्वतःचं असं काम तिथे सुरू आहे. तुम्ही नाव सांगा आणि त्या प्रकारातलं झाड इथे असणारच. त्याला 'आर्बोरेटम' म्हणतात. या जंगलामुळे आज इथे फुलपाखरांपासून मोरांपर्यंत आणि रानडुकरांपासून ते बिबट्यापर्यंत किती तरी पशुपक्षी आले आहेत. याचा उपयोग फक्त माणसांना नाही, सर्व पशुपक्ष्यांना आहे. सांगायचा मुद्दा

असा, की एखाद्या पूर्ण ओसाड जागेवरही नवी परिसंस्था तयार करणं शक्य आहे. आम्ही ते करून दाखवलंय. याचा उपयोग काय म्हणाल, तर निव्वळ व्यवहाराचा विचार करायचा तर या जंगलातून कित्येक लाखांचं सुबाभळीचं उत्पादन आम्हाला मिळालेलं आहे.

हाही चमत्कार एका दिवसात झालेला नाही, किंवा एका माणसानेही तो घडवलेला नाही. नवी परिसंस्था उभी करण्याचं स्वप्न मी अन् काळपांडे सरांनी पाहिलं; पण ते पूर्ण केलं सुधाकर कडू, महम्मद अरबसारख्या आमच्या अनेक कार्यकर्त्यांनी. महम्मदला तर आनंदवनात 'ग्रीन थंब' असंच म्हणतात. आनंदवन, सोमनाथ, मूळगव्हाण- सगळीकडे त्याने लाखो झाडं लावली आहेत. त्याच्या हातांची बोटं बघाल तर कुष्ठरोगामुळे पूर्ण वाकडी झालेली आहेत, पण त्या हातांमध्ये उजाड माळरान हिरवंगार करण्याची अन् करवून घेण्याची जबरदस्त किमया आहे.

आनंदवनात हे काम चालू होतं तेव्हा बाबा नर्मदेत होते. ते परत आले तेव्हा हे जंगल बघून त्यांना आश्चर्याचा धक्काच बसला. बाबा आनंदवनातून गेले तेव्हा इथे अक्षरशः काडीही नव्हती. असं घनदाट जंगल आनंदवनात कधी बघायला मिळेल असं त्यांना कधीच वाटलं नव्हतं. त्यामुळे हे बदललेलं चित्र बघून ते अतिशय आनंदित झाले. अगदी शेवटच्या काळापर्यंत ताई आणि ते या अभयारण्यात फिरायला यायचे. ते गेल्यानंतर त्यांचं पार्थिवही आम्ही इथेच दफन केलं. या परिसराचं नाव ठेवलं 'स्मृतिवन'. बाबांसोबत ताईचं पार्थिवही इथेच विसावलेलं आहे. एवढंच काय, अपंगांसाठीच्या कामाचं रोपटं लावणारा ऑर्थर तार्नोवस्की, बाबांचे पुण्यातले मित्र डॉ. धैर्यशील शिरोळे, बाबांचे वरोऱ्यातले मित्र डॉ. संतदास सैनानी आणि आनंदवनातल्या इतर अनेक कार्यकर्ते इथे चिरविश्रांती घेत आहेत. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ इथे झाडं लावलेली आहेत. तिथे आम्ही सारे फिरायला जातो. ही स्मशानभूमी आहे, असं कुणाला सांगूनही खरं वाटणार नाही.

स्वरानंदवन

हाही एक प्रयोगच. कसला, तर अपंगांना आत्मसन्मानाने आणि आनंदाने जगण्याचा हक्क आहे, हे समाजाला ठामपणे, ताठ मानेने सांगण्याचा. आपलं व्यंग विसरून, त्याचा न्यूनगंड न बाळगता समाजाला सामोरं जाण्याचा आणि त्याआधारे समाजाची दृष्टी बदलण्याचा.

कुष्ठरुग्णांप्रमाणेच समाजाने अव्हेरलेल्या सर्वांना आत्मसन्मानाने जगता आलं पाहिजे, हे बाबांचं स्वप्न होतं. त्यासाठीच बाबांनी आनंदवनात अंधांसाठी शाळा उघडली होती. ऑर्थर तार्नोवस्की आनंदवनात आला आणि त्याच्या आग्रहाने अन् आर्थिक मदतीने इथे अपंगांच्या पुनर्वसनाचं काम सुरू झालं. अपंगांना व्यावसायिक प्रशिक्षण देण्यासाठी संधिनिकेतन सुरू झालं आणि आमच्याकडे अपंगांचा ओघ वाढू लागला. त्या निमित्ताने एक संपूर्ण वेगळं जग मला सामोरं आलं. अपंगत्वाच्या इतक्या नाना तऱ्हा, त्या अपंगत्वावर मात करून आनंदाने जीवन जगणारी माणसं आणि त्यांना खिजगणतीतही न धरणारा आपला समाज. वास्तवाच्या या तिन्ही पैलूंची सांगड कशी घालायची, असा

माझ्यासमोरचा प्रश्न होता.

आनंदवनात येणारी काही अपंग मंडळी प्रशिक्षण घेऊन समाजात परत जात, तर काहींचं व्यंग असं असे की त्यांना समाज स्वीकारेल अशी शक्यताच नसायची. एवढंच काय, परत गेलेल्यांनाही समाजात कायमच दुय्यमत्वाची वागणूक मिळायची. त्याचा परिणाम या तरुण मुलामुलींवर व्हायचा. त्यांच्या मनात न्यूनगंड इतका खोल घर करून असायचा, की एक वेळ आपण त्यांचं व्यंग विसरू पण त्यांना ते विसरणं शक्य व्हायचं नाही. ही परिस्थिती मला अस्वस्थ करत होती. खरं तर ही अपंग मंडळी तुमच्या-माझ्यासारखीच सर्वसामान्य माणसं. त्यांनाही इच्छा-आकांक्षा होत्या, त्यांनाही आवडीनिवडी होत्या, वेगळ्या क्षमता होत्या, काही छंद होते; पण अपंगत्वामुळे ते फुलवायला त्यांना कधीही संधीच मिळालेली नव्हती. काहींना गोड गळ्याचं वरदान लाभलेलं होतं. काहींचं तालासुराचं भान पक्कं होतं. काहींना नृत्याची चांगली जाण होती. प्रत्येकात असं काही ना काही होतंच, पण त्याचं कोडकौतुक करायला कोणी नव्हतं. मला वाटलं, यांनी आपली कला सगळ्या समाजासमोर का सादर करू नये?



स्वरानंदवन वाद्यवृंदातील कलाकारांच्या आवाजात आवाज मिसळणारे 'कल्ला'कार डॉ.विकास.

या प्रश्नातून आनंदवनातल्या कलावंतांचा एक वाद्यवृंद तयार करावा, असं उत्तर वर येऊ लागलं. या वाद्यवृंदात कुष्ठरुग्ण, अंध-अपंग, कर्णबधिर असे सारेच असतील. हा संच घेऊन गावोगावी प्रयोग करावेत, अशी कल्पना मी आनंदवनात माझ्या सहकाऱ्यांना बोलून दाखवली. ते साल असावं २०००. सुरुवातीला कुणालाच ही कल्पना पटेना. हा कसला बालिशपणा, असंच सगळ्यांना वाटत होतं. आनंदवनाबाहेरच्या काही मित्रांनाही कल्पना सांगितली. त्यांचीही प्रतिक्रिया साधारण तशीच होती. एक मात्र झालं, आमच्या अंध-अपंग कलावंत मित्रांना ही कल्पना मनापासून आवडली. समाज आपल्याला कसा स्वीकारेल याची शंका त्यांनाही होती; पण त्यांनी आजवर इतके अपमान आणि नकार पचवले होते की आता त्यांना कशालाच घाबरण्याचं कारण नव्हतं. त्यामुळे इतर कोणालाही न जुमानता आम्ही कामाला सुरुवात केली. कोण काय करू शकतं बघू लागलो. गाण्याचा सराव करू लागलो. हळूहळू आनंदवनातल्या इतर सहकाऱ्यांच्याही ते पचनी पडू लागलं. 'युनिसेफने'ही राज्य सरकारमार्फत या उपक्रमाला आर्थिक पाठबळ देण्याचं

मान्य केलं. तसंच ‘शेअर अँड केअर’ या अमेरिकेतील आणि ‘नोव्हेल प्लॅनेट’ या स्वित्झर्लंडमधली संस्थेनेही आम्हाला आर्थिक मदत केली. त्यामुळे अगदी सुरुवातीलाच आमच्या वाद्यवृंदामध्ये उत्तम इन्स्ट्रुमेंट्स दाखल झाली. पण ही इन्स्ट्रुमेंट्स शिकवण्यासाठी बराच काळ आम्हाला कोणी मिळतंच नव्हतं. मग आमचं आम्हीच शिकायला सुरुवात केली. आणि १४ जुलै २००२ मध्ये आम्ही ‘स्वरानंदवन’चा पहिला प्रयोग केला. माझ्या मते सर्व प्रकारच्या अपंग-उपेक्षित-वंचितांना व्यासपीठ देणारा जगातला हा एकमेव उपक्रम असावा.

‘स्वरानंदवन’ हे नाव दिलं अशोक हांडेने. हा वाद्यवृंद उभा करण्याच्या सुरुवातीच्या काळात अशोकने आम्हाला खूप मदत केली. त्याने त्याच्या वाद्यवृंदातली अनेक जुनी वाद्यं तर दिलीच, पण आमच्या चमूला मार्गदर्शनही केलं. त्या वेळी आमचा चमू अगदी कमी लोकांचा होता. सुरुवातीच्या काळात आम्ही प्रामुख्याने बाबांनी लिहिलेल्या प्रेरणादायी कविता आणि जुनी हिंदी गाणी म्हणायचो. हो, मीही त्यात असायचो. मी काही गायक वगैरे नाही. उलट, भारती तर मला ‘कल्लाकार’च म्हणते. माझ्या मुलीचं, शीतलचं म्हणणं असं, की मी ‘व्होकली डिसेबल्ड’ असल्यामुळेच मला ‘स्वरानंदवन’मध्ये गाण्याची परवानगी मिळते. ते काहीही असो, आमच्या कलावंतांचा उत्साह अन् जोश इतका असायचा, की त्यात सहभागी होण्यापासून स्वतःला रोखणं मला अवघड होऊन जायचं. त्यामुळे सराव करता करता मी त्यांच्यासोबत गायलाही लागलो. माझ्यासोबत भारतीनेही अनेक वेळा बाबांच्या कविता गायल्या. स्वतःतल्या कमतरतांवर मात करत आत्मविश्वासाने बाबांची जोमदार गाणी गाणाऱ्या मुलांच्या स्वरांमध्ये आपला आवाज मिसळणं हा अंगावर रोमांच आणणारा अनुभव असायचा. त्या अनुभवात आम्ही कित्येकदा न्हाऊन निघालो.

पण नंतर माझ्या लक्षात आलं, की आपल्याला हा वाद्यवृंद सर्वसामान्यांपर्यंत घेऊन जायचा असेल तर केवळ बाबांची गीतं आणि जुन्या गाण्यांवर अवलंबून राहून चालणार नाही. त्यात नवं संगीत आणायला पाहिजे. मग आम्ही बेधडक नव्या सिनेमांमधली गाणी गायला अन् त्यावर नाच बसवायला सुरुवात केली. कारण माझ्या मते तेच खरं लोकसंगीत होतं. आमची पोरं तर ती गाणी गाऊन खूष असायचीच, पण पब्लिकही त्या गाण्यांवर नाचायचं. त्या गाण्यांवरून ‘स्वरानंदवन’वर आणि मुख्य म्हणजे माझ्यावर खूप टीका झाली. आनंदवनाच्या नावाने हा काय थिल्लरपणा सुरू आहे, असं काही लोकांना वाटलं. पण त्या वेळी मला पुलंच्या एका वाक्याची प्रकर्षाने आठवण झाली. हिंदी सिनेमातल्या गाण्यांना नाकं मुरडणारे लोक पाहिले की ते म्हणायचे, “ज्यांनी ही गाणी गायली त्यांना आपण भारताचा सर्वोच्च सन्मान बहाल करतो आणि ती गाणी मुलांच्या तोंडात आली की संस्कृती रसातळाला गेली अशी बोंब मारतो. अशी गाणी म्हटल्याने जर एखादी संस्कृती रसातळाला जात असेल तर ती संपलेलीच बरी!” मला त्यांचं हे म्हणणं तंतोतंत पटायचं. मुख्य म्हणजे ज्या लोकांनी माझ्यावर टीका केली त्यांनी आमचा हा प्रयोग पाहिलाच नव्हता. ज्यांनी तो पाहिला त्यांना गाण्यांमधल्या थिल्लरपणापलीकडे जाऊन आमच्या कलावंतांच्या भावनेशी एकरूप होण्याचा अनुभव घेता आला. हा प्रयोग पाहिलेल्यांनी

कधीही त्याबद्दल वेडावाकडा शब्द उच्चारला नाही.

'स्वरानंदवन'चा प्रयोग म्हणजे अदम्य उत्साह अन् आत्मविश्वास. त्यातील कलावंतांपैकी कुणाला डोळे नाहीत, कुणाचे दोन्ही पाय गेलेले, कुणाच्या हातापायांची बोटं कुष्ठरोगामुळे झडून गेलेली, तर कुणी शारीरिक वाढ खुंटल्यामुळे खुरटलेलं. पाय लुळे पडलेला एखादा मुलगा हातांवर चालत चालत विंगेतून स्टेजच्या मध्यभागी येतो, आत्मविश्वासाने माइक हातात घेतो आणि गाणं सुरू करतो तेव्हा तो खरोखरच स्वतःचं व्यंग विसरून गेलेला असतो. डोळयांच्या खाचा झालेली माणसं कुठेही न अडखळता स्टेजवर येतात आणि थेट आपल्याकडे बघत आपल्याशी संवाद साधतात. अंध मुली अचूक पदन्यास करतात. त्यांच्यातला समन्वय डोळस नृत्यांगनांनाही लाजवेल असा असतो. कुठे एखादी चूक नाही की कुठे गबाळेपणा नाही. मूकबधिर मुलांच्या ब्रेकडान्समधला जोश तुम्हाला थक्क करून सोडतो. त्यांच्यातला समन्वय आणि प्रेक्षकांना कळूही न देता होणाऱ्या खाणाखुणा लाजवाब! आमच्या चमूतल्या गायकांबद्दल तर काय बोलावं! एकेकाला आवाजाची देणगी तर मिळालेली आहेच, पण प्रत्येकाने त्यावर परिश्रमही भरपूर केले आहेत. या सगळया कार्यक्रमाचं सूत्रसंचालनही एक अपंग तरुणच करतो. त्याच्या निवेदनालाही प्रेक्षकांकडून दाद मिळते. मला वाटतं, या प्रयोगाचं यश या सर्व कलावंतांच्या कलेत आणि परिश्रमांमध्ये तर आहेच, पण त्याहूनही अधिक त्यांच्या आत्मविश्वासात आणि आपलं व्यंग विसरून ते ज्या सहजतेने रंगमंचावर वावरतात त्यात आहे. त्यांची अदाकारी बघताना आपल्यालाही त्यांच्या व्यंगांचा विसर पडतो. तिथे सहानुभूती किंवा दया वगैरे नसते. असते ती फक्त दिलखुलास दाद. आणि दाद मिळते ती केवळ त्यांच्या कलेला. याहून आणखी काय हवं?

गेल्या बारा-तेरा वर्षांमध्ये स्वरानंदवनमध्ये अनेक बदल, सुधारणा होत गेल्या आहेत. या प्रयोगाबद्दल माहिती कळायला लागल्यावर अनेक अपंग बांधव या कलायात्रेत सहभागी झाले आहेत. आमचा वाद्यवृंद समृद्ध होत गेला आहे. आजवर महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात आणि गोवा आणि आंध्र प्रदेशात मिळून या कार्यक्रमाचे पाचशेहून अधिक प्रयोग झाले आहेत. अजूनही होताहेत. हे यश माझ्या दृष्टीने अनेक अर्थांनी मोलाचं आहे. अंध-अपंग-कुष्ठरुग्ण हे आपल्यातलेच एक आहेत; त्यांच्याकडे बघण्याचा चष्मा आपण बदलला पाहिजे, ही जाणीव 'स्वरानंदवन'च्या निमित्ताने समाजापर्यंत पोहोचते आहे. दुसरीकडे, या प्रयोगाच्या निमित्ताने समाजाने ज्यांचं अस्तित्वच नाकारलं आहे अशांना आपल्या क्षमता ताठ मानेने समाजासमोर सादर करण्याची संधी मिळाल्यामुळे त्याचा उपयोग थेरपी म्हणूनही झाला आहे. त्यामुळे मी या प्रयोगाला 'थेरप्युटिक थिएटर' असंच म्हणतो. ही थेरपी फक्त आत्मसन्मानाची नव्हे, तर त्याचे क्लिनिकल फायदेही आहेत.

या प्रयोगाचं आणखी एक वेगळेपण असं, की सहसा शारीरिक व्यंग असलेली व्यक्ती न्यूनगंड आणि शारीरिक हालचाली करण्यात येणाऱ्या अडचणी अशा दोन्ही कारणांमुळे स्वतःला एका कोषात बंदिस्त करते. त्रास होत असेल तर त्यापेक्षा हालचाली न केलेल्याच बऱ्या, अशी तिची साहजिक मानसिकता असते. त्यामुळे होतं काय, की व्यंग कमी होण्याऐवजी वाढत जातं. पण स्वरानंदवनमध्ये सारेच अंध-अपंग. त्यामुळे कोणी कोणाला

लाजत नाही की आखडून बसत नाही. उलट, एकमेकांना मदत करत माणसं इतर सर्वसामान्य माणसांप्रमाणे वावरतात, वागतात. त्यामुळे शारीरिक हालचाली वाढतात, व्यायाम होतो आणि त्याचा चांगला परिणाम दिसू लागतो. असे किती तरी मुद्दे सांगता येतील. उदाहरणार्थ, आपल्याकडे अंध-अपंगांची स्थिती अशी असते की त्यांना जगण्यापुरतं खायला मिळालं तरी पुष्कळ. त्यामुळे त्यांना मनोरंजनाची साधनं उपलब्ध असतील ही अपेक्षा करणं दूरच. पण आमच्या कलावंतांना ‘स्वरानंदवन’मुळे त्यांच्या आवडीचाच पेशा मिळाला आहे. स्वतःचं मनोरंजन करतानाच ते दुसऱ्यांचाही ताण कमी करण्याचं काम करत आहेत. आमच्या स्वरानंदवनाची बडदास्त ठेवण्याचं काम आहे ते सदाशिव ताजनेकडे. तो आनंदवनातला खंदा कार्यकर्ता. स्वतः दोन्ही पायांनी अपंग असल्यामुळे इतरांच्या गरजा त्याला नेमक्या कळतात. पण ते सोडा. स्वरानंदवनमधला त्याचा आत्मविश्वासपूर्ण वावर बघण्यासारखा असतो. तो ज्या पद्धतीने स्वरानंदवनाचं व्यवस्थापन सांभाळतो ते पाहून भले भले मॅनेजर्स गारद होतात!



आत्मविश्वासाने समाजासमोर कला सादर करणारे स्वरानंदवनमधील कलाकार.

समाजाने कुष्ठरुग्णांना नाकारलं, तरी बाबा म्हणायचे, की ‘कुष्ठरुग्ण समाजाचं ऋण फेडतील.’ त्याप्रमाणे कुष्ठरुग्णांनी वरोऱ्यातल्या विद्यार्थ्यांसाठी शाळा-कॉलेजं सुरू केली. ‘स्वरानंदवन’ हेही त्याचंच पुढचं पाऊल आहे. स्वरानंदवनमधून जमा झालेला निधी आज आनंदवनातल्या विविध कामांसाठी वापरला जातोय. त्यातून अपंगांच्या पुनर्वसनाची कामं होताहेत. एक प्रकारे या अंध-अपंगांनी समाजाला केलेली ती परतफेडच आहे. आज वाटतं, लोकांनी सुरुवातीच्या काळात आमच्या वाद्यवृंदावर टीका केली तेव्हा मी दबलो असतो, माघार घेतली असती तर पैलू न पाडलेले हे असंख्य हिरे आज असे अभिमानाने चमकले नसते!

तर अशी आहे आमची प्रयोगगाथा, आनंदवनाला प्रयोगवन बनवणारी काही ठळक उदाहरणं. प्रश्नांना उत्तरं शोधण्याचा, आहे ती परिस्थिती अधिक सुकर-सुसह्य बनवण्याचा प्रयत्न करत राहिलं की आपल्या जगण्याला दिशा मिळते. स्वतःच्या छोट्या

वर्तुळातले प्रश्न सुटले की मोठ्या वर्तुळातल्या समस्या खुणावू लागतात, असा आमचा आनंदवनातला अनुभव आहे. आनंदवनात हे कसं घडलं त्याचा लेखाजोखा मी तुमच्यासमोर मांडला. बाहेर समाजात प्रत्येक ठिकाणी परिस्थिती वेगवेगळी असेल. तिथे आनंदवनातली उत्तरं अशीच्या अशी लागू होणार नाहीत, याची आम्हाला कल्पना आहे. पण गांधीजी म्हणायचे तसं 'कर के देखो' हा मंत्र जपायचं ठरवलं तर आनंदवनासारखी कामं बाहेरही उभी राहणं अशक्य नाही.

पुढची वाटचाल

या 'कर के देखो' मंत्राशी घट्ट नाळ जोडूनच आनंदवनाचाही पुढचा प्रवास सुरू आहे. मी सुरुवातीला म्हटलं तसं 'आनंदवन' हा एक प्रवाह आहे, एक प्रवृत्ती आहे. ती आनंदवनातल्या प्रत्येक व्यक्तीमध्ये भिनलेली आहे. त्यामुळे आनंदवनाचं रोपटं रुजवणाऱ्या ताई-बाबांनंतरही आनंदवनाचं काम थांबलं किंवा मंदावलं नाही. यापुढेही ते थांबणार नाही. आनंदवनातल्या पुढच्या पिढीने याआधीच आमच्याकडून कामाची जबाबदारी स्वतःच्या शिरावर घेतली आहे.

बाबांच्या कामात सामील होण्याऐवजी वेगळं काही करावं, असा विचार माझ्या किंवा प्रकाशच्या मनात कधीही आला नाही. बाबा सक्रिय असतानाच मी आनंदवनाच्या कामात दाखल झालो आणि स्वतंत्र दृष्टीने या सगळ्या पसाऱ्याकडे पाहू लागलो. पुढच्या आव्हानांचा वेध घेऊ लागलो. करावा लागला तर बाबांना थोडा विरोध करूनही काम करत राहिलो. माझी बायको भारती ताई-बाबांच्या प्रेरणेनेच आनंदवनात दाखल झाली अन् आनंदवन नावाच्या एका मोठ्या परिवाराची वहिनी बनून गेली. आज आसपासच्या नव्या पिढीकडे पाहतो तर वाटतं, या इतिहासाची पुनरावृत्ती होतेय की काय?

मी काय किंवा बाबा काय, कुणीच आमच्या मुलांवर त्यांनी आनंदवनात काम केलं पाहिजे असं बंधन घातलं नाही. पण आनंदवनाच्या संस्कारांतच ते वाढले, त्यामुळे त्यांच्याही मनात वेगळं काही करण्याचा विचार आला नाही. एवढंच काय, कौस्तुभ आणि शीतल ही आमची मुलंच नव्हेत, तर त्यांचे जोडीदारही आज आनंदवनात कार्यरत आहेत. कौस्तुभची बायको पल्लवी म्हणजे श्रमसंस्कार छावणीतून आम्हाला मिळालेली खंदी कार्यकर्ती. शीतलचा नवरा गौतमही अनेक वर्षांपासून आनंदवनातल्या कामाशी जोडलेला आहे. अशा रीतीने आमचं सगळं कुटुंब आज आनंदवनात काम करतं आहे, याचं मला अतिशय समाधान वाटतं. सध्या आनंदवनात सुरू असणारं काम तर ते पुढे नेत आहेतच, पण काळाप्रमाणे निर्माण होणारी कित्येक आव्हानंही त्यांना खुणावत आहेत. कधी माझ्या मदतीने, तर कधी माझं म्हणणं थोडं डावलून ही मंडळी आगेकूच करताहेत. फक्त आनंदवनातच नव्हे, तर हेमलकशात प्रकाश आणि मंदाचा मुलगा डॉ. दिगंत, त्याची बायको डॉ. अनघा, तसेच अनिकेत आणि त्याची बायको समीक्षा, रेणुका-विलासची मुलं अजिंक्य आणि मोक्षदा अशी पुढची पिढीही प्रकल्पाचं काम वाढवण्यात सहभागी झालेली आहे.

माझा मुलगा कौस्तुभ चार्टर्ड अकाउंटंट आणि कंपनी सेक्रेटरी आहे, तर मुलगी शीतल डॉक्टर. 'टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स'मधून तिने सोशल आंत्रप्रेन्युअरशिपमध्ये पदवीही घेतली आहे. कौस्तुभने गेल्या चार-पाच वर्षांपासून आनंदवनाचं जवळपास सगळं व्यवस्थापन सांभाळायला सुरुवात केली आहे. आनंदवनाचं व्यवस्थापन म्हणजे फक्त पैशा-पाण्याचं अन् कामाचं नियोजन नसतं, तर त्यात माणसांची आयुष्यं गुंतलेली असतात. एक गाव एकत्र बांधून ठेवण्याचं काम तो करतो आहे म्हणा ना! मुख्य म्हणजे 'मागच्या पानावरून पुढे चालू' असं या मुलांच्या कामाचं स्वरूप नाही. अनेकदा होतं काय, की इतका मोठा पसारा असणाऱ्या संस्थेतल्या 'मायक्रो' समस्यांना तोंड देता देता संस्थेच्या 'मॅक्रो' स्वरूपाचा विचार करत राहण्याचं भान सुटून जातं. भविष्याचा वेध घेण्यासाठी उसंत मिळत नाही, किंवा पुढच्या पिढ्यांमध्ये ती क्षमता नसते. आनंदवन त्या बाबतीत सुदैवी आहे. कारण बाबांनी या मातीतच ते भान रुजवलं आहे. आजच्या काळात आनंदवनासारख्या संस्थेचं उद्दिष्ट काय हवं आणि आपली पुढची वाटचाल कशी असणार आहे, याचा विचारही कौस्तुभ करतो आहे. त्याला शीतल, पल्लवी आणि गौतमची साथ आहे.

आनंदवनाचा आजचा डोलारा पेलण्यासाठी आणि नवी स्वप्नं पाहण्यासाठी आर्थिक बाजू मजबूत करणं हे सध्या आमच्यापुढचं पहिलं काम आहे. कौस्तुभ गेल्या दहाएक वर्षांपासून आनंदवनाची आर्थिक घडी बसवण्याच्या प्रयत्नात आहे. त्याने आर्थिक बाबींची जबाबदारी स्वीकारली तेव्हा आनंदवनाची स्थिती नाजूक होती. शेती-उद्योगातून मिळणाऱ्या उत्पन्नापेक्षा खर्च जास्त होते. शिवाय आमची अर्थव्यवस्था बहुतांशाने शेतीवर अवलंबून असल्यामुळे दुष्काळ, अतिवृष्टी, गारपीट अशा आपत्तींमुळे आमची अर्थव्यवस्था विस्कळीत होत असायची. अगदी सुरुवातीच्या काळात आनंदवनात आलेले कुष्ठरोगी, अपंग-अंध माणसं थकली होती. त्यामुळे त्यांना काम करणं शक्य नव्हतं, पण त्यांचा खर्च होताच. शिवाय सरकारी अनुदान अतिशय कमी होतं. होतं ते पूर्ण आणि वेळेत मिळत नव्हतं. अशा अनेक अडचणींमुळे खर्च जास्त आणि उत्पन्न कमी अशी परिस्थिती होती. त्यावर पहिला उपाय म्हणून कौस्तुभने खर्च कुठे कमी होऊ शकतील याचा अंदाज घेऊन त्याप्रमाणे काम करायला सुरुवात केली. त्यासाठी संस्थेच्या जमा-खर्चाचा नव्याने आढावा घेतला आणि त्यातून अनेक छोट्या-मोठ्या सुधारणा लक्षात येऊ लागल्या. त्या अमलात आणल्यावर त्याचा उपयोग होत असल्याचंही जाणवू लागलं. आता गेल्या तीन-चार वर्षांमध्ये आनंदवनातल्या आर्थिक समस्या आटोक्यात आल्या आहेत, त्याचं श्रेय कौस्तुभला.



आनंदवनातलं आमटे कुटुंब-डॉ.विकास आणि डॉ.भारती यांच्यासोबत कौस्तुभ-पल्लवी, डॉ.शीतल-गौतम.

हे काम करत असतानाच कौस्तुभ आणि शीतलच्या असं लक्षात आलं, की अधूनमधून निर्माण होणाऱ्या अनिश्‌चितितेवर मात करायची असेल तर आपल्याला या पलीकडेही विचार करायला हवा. त्यातूनच आनंदवनासाठी कॉर्पस फंड उभा करण्याची कल्पना समोर आली. बाबांचा अनफिनिश्ड अजेंडा प्रत्यक्षात आणण्याचा मोठा प्लॅन त्यांनी आखला आहे. त्यासाठी १०० कोटींचा कॉर्पस फंड (शाश्‌वत निधी) उभा करण्याची महत्त्वाकांक्षी योजना या पोरांनी आखली आहे.

आनंदवनासारखी संस्था म्हटलं की तिथे पावला पावलाला सरकारशी संबंध येतो. त्यातून सरकारी पातळीवर धोरणात्मक बदल होण्याची निकड संस्थांना अनेकदा जाणवत असते. पण बहुतेक वेळा संस्था हे आपलं काम नाही म्हणून गप्प बसतात. पण तिथेही आनंदवनाची नवी पिढी मुसंड्या मारते आहे. एक उदाहरण सांगतो, म्हणजे मी ‘मुसंड्या’ हा शब्द का वापरला ते कळेल. महाराष्ट्रात आजवर कुष्ठरुग्णांसाठी काम करणाऱ्या संस्थांना प्रत्येक कुष्ठरुग्णामागे दिवसाला साडेपंधरा रुपये अनुदान मिळत होतं. प्रत्यक्षात प्रत्येक रुग्णामागे होणारा खर्च जवळपास शंभराच्या घरात जातो. पण आजवर त्याबद्दल कोणीही सरकारी पातळीवर आवाज उठवला नव्हता. तक्रार करून काही उपयोग नाही, किंवा सरकारच्या मागे लागण्याएवढा वेळ नाही, अशी अनेक खरी कारणं त्यामागे होती. पण कौस्तुभ आणि शीतलने हे प्रकरण पार वरपर्यंत नेलं. शिवाय फक्त अनुदान वाढवण्याची मागणी करून ते थांबले नाहीत. वेगवेगळया राज्यांमध्ये कुष्ठरुग्णांसाठी किती अनुदान दिलं जातं, राज्य सरकार इतर रुग्णांसाठी सरकारी हॉस्पिटलांना किती अनुदान देतं, सरकारी वसतिगृहांमध्ये एका विद्यार्थ्यावर दर दिवशी किती रुपये खर्च होतात, या सगळ्याचा अभ्यास करून या दोघांनीही सरकारला एक विस्तृत अहवाल सादर केला. तत्कालीन केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार आणि तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी या प्रकरणात लक्ष घातलं आणि अखेरीस हे अनुदान ७० रुपये करण्याचा निर्णय झाला. याचा फायदा आता केवळ आनंदवनालाच नव्हे, तर कुष्ठरुग्णांसाठी काम करणाऱ्या राज्यातल्या सगळ्या संस्थांना होतो आहे. अशी कामं ही पोरंच करू जाणोत.

प्रयोग हा आनंदवनाचा आत्मा. नवी पिढी त्यातही मागे नाही. एक उदाहरण सांगतो. कौस्तुभची बायको पल्लवी महिलांच्या आरोग्यासाठी स्वच्छ आणि स्वस्त

सॅनिटरी नॅपकिन्स तयार करण्याचा प्रयोग करते आहे. अंशू आणि मीनाक्षी गुप्ता या दिल्लीस्थित दाम्पत्याने स्थापन केलेल्या गुँज या स्वयंसेवी संस्थेच्या सहकार्याने हे काम सुरू आहे. पाळीच्या काळात आरोग्याची, स्वच्छतेची काळजी घ्यायला पाहिजे, याची जाणीव अजूनही आपल्याकडच्या ग्रामीण महिलांना नाही. लाजेखातर आणि पैशांच्या अभावी पाळीच्या वेळी कुठली तरी फडकी वापरणं, ती नीट धुता न येणं, संकोचामुळे ती स्वच्छ उन्हात वाळत न टाकणं यामुळे बायकांना किती तरी प्रकारच्या आजारांना सामोरं जावं लागतं. तयार सॅनिटरी नॅपकिन्स त्यांना परवडणारे नसतात. त्यांच्या वापरामुळे शरीराला होणाऱ्या त्रासाबद्दल फारसं बोललं जात नसलं तरी अनेक त्वचारोगांना त्यातून आमंत्रण मिळू शकतं. शिवाय ग्रामीण भागात या निपकिन्सची विल्हेवाट लावण्याचा प्रश्न आहे तो वेगळाच. या सगळयाचा विचार करून पल्लवी त्यांच्यासाठी घरगुती नॅपकिन्स तयार करण्याच्या प्रयत्नात आहे. या कामाचा उपयोगही केवळ आनंदवनातल्या महिलांपुरता मर्यादित नाही. सर्वच महिलांना, विशेषतः ग्रामीण भागातल्या बायकांना याचा फायदा व्हावा, यासाठी पल्लवी प्रयत्न करते आहे. ते पाहिलं की समाधान वाटतं.

आनंदवनातल्या प्रत्येक विभागात आपापल्या परीने असे प्रयोग सुरू आहेत. त्यांचा उपयोग आनंदवनाबाहेरही व्हावा यासाठी प्रयत्न होत आहेत. संस्था चालवणं, वाढवणं आणि नवनव्या सामाजिक प्रश्नांना प्रतिसाद देत राहण्याची कसरत करताना या नव्या पिढीसमोर अशा अनेक अडचणींचे डोंगर उभे आहेत. आमच्या आनंदवनाच्या जागेत आणि आसपास कोळशाचा प्रचंड साठा आहे. चंद्रपूर जिल्ह्यात अनेक ठिकाणी खाणींचं काम सुरू झालेलं आहे. ते आज ना उद्या आनंदवनापर्यंत येऊन भिडणार आहे. त्याच्याशी सामना कसा करायचा हा उद्याचा मोठा प्रश्न आहे.

या सगळया कामांमध्ये आनंदवनातल्या इतर तरुण कार्यकर्त्यांची कौस्तुभ-शीतलला भक्कम साथ आहे. राजू सौसागडे हा हॉस्पिटलमधील माझा जुना सहकारी शालिक सौसागडे या कुष्ठमुक्त रुग्णाचा मुलगा. आज राजू आनंदवन ग्रामपंचायतीचा सरपंच आहे. ग्रामपंचायतीला मिळणाऱ्या निधीतून आनंदवनाच्या रूपाने एक आदर्श गाव उभं करण्यासाठी त्याची धडपड सुरू आहे. त्याचबरोबर आनंदवनातल्या इतरही अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या राजू लीलया पार पाडतो आहे. शेवटी आनंदवनात तयार झालेला टास्कमास्टरच आहे तो! त्याची बायको सारिका ही आनंदवनात नव्याने सुरू झालेल्या अंगणवाडीमध्ये काम करते आहे. शौकत अली, त्याची बायको सबीहा आणि कपूरचंद मदनकर हे तिघं आनंदवनाला भेट देणाऱ्या देशी-विदेशी पाहुण्यांची व्यवस्था बघण्याचं काम करतात. नंदू देवगडे, विजय जुमडे, दीपक शीव, सुधाकर नागापुरे, अनिल लेले, अशोक सोनकुसरे, मिलिंद अंबाडे, आनंदा नहाले, बाळू सणस, सुरेश खलसे अशी कितीजणांची नावं घेऊ? केवळ नावांच्या याद्यांनीच पानं भरतील! यातली काही मुलं आनंदवनातच जन्माला आली, काही अनाथ म्हणून गोकुळात दाखल झाली, तर काही पुढे कार्यकर्ता म्हणून कामाला रुजू झाली. प्रत्येकाची कहाणी वेगळी. प्रत्येकाबद्दल भरभरून बोलण्यासारखं आहे. तेवढं सांगणं इथे शक्य नाही. पण एक सांगतो. स्वतःच्या पलीकडे जाऊन काम करणारी ही माणसं आहेत म्हणूनच आज आनंदवन नवी स्वप्नं पाहतं आहे.

पण माझ्या मते या सगळ्याच पोरांसमोर मोठं आव्हान आहे ते कार्यकर्त्यांची नवी फळी तयार करण्याचं. आनंदवनाचं काम म्हणजे ते आमच्यांच्या कुटुंबाभोवतीच फिरणार, अशी कोणाची समजूत असेल तर ती साफ चुकीची आहे. कौस्तुभ-शीतलला बाबा कायम म्हणायचे, “तुमच्यासारखे अनेक आले नि गेले. तुमच्यामुळे संस्था चालू आहे किंवा तुम्ही नसाल तर ती बंद पडेल, असं बिलकूल समजू नका.” कौस्तुभ-शीतल या कामात आहेत याचं कारण ते काम करणं ही त्यांची गरज आहे. त्यातच त्यांना मजा आहे. ज्यांना हे काम करण्यात आनंद वाटेल असे कार्यकर्ते आम्हाला मिळू शकतात का?


आनंदवनातली कार्यकर्त्यांची तरुण पिढी.
डॉ.शीतल, गौतम, पल्लवी, कौस्तुभ यांच्यासोबत मिलिंद अंबाडे, धर्मराज मुंढरे, सारिका सौसागडे, आनंदा नहाले, सबीहा अली, शौकत अली, राजू सौसागडे.

बाबांच्या काळात त्यांच्या प्रेरणेने अनेक तरुण आणि विचारी मंडळी आनंदवनाकडे ओढली गेली. त्यातले काही आनंदवनात विरघळून गेले, तर काहींनी बाहेर जाऊन स्वतंत्रपणे कामं उभी केली. पण तेव्हाची परिस्थिती वेगळी होती. तेव्हा चळवळींना समाजात स्थान होतं. नोकरी-धंद्यापलीकडे जाऊन समाजासाठी काही तरी करायला पाहिजे अशी आच होती आणि दिशा दाखवायला बाबांसारखी माणसंही होती. आज काळ वेगळा आहे. आजची तरुण पिढी जीवघेण्या स्पर्धेत अडकली आहे. नोकरीच्या स्पर्धेतून बाद झालो तर जीवनातूनच बाद होऊ की काय, अशी भीती त्यांना सतत कुरतडत असते. या परिस्थितीमुळे या तरुण पिढीचं आयुष्य अर्थहीन बनलं आहे, असं मला कायम वाटतं. त्यामुळेच समाजातल्या उपेक्षितांची स्थिती बघून त्यांचा जीव तुटतो, पण पुढचं पाऊल उचलायला ती कचरतात. शिवाय नेमकं काय करावं याचा थांग त्यांना लागत नाही. ‘माझ्या जगण्याचं प्रयोजन काय, समाजाशी माझं नातं काय, समाजाच्या गरजा काय आणि त्यातल्या कोणत्या गरजा पूर्ण करण्यासाठी मी प्रयत्न करू शकतो’, असे प्रश्न स्वतःला विचारण्याएवढी उसंत या पिढीकडे नाही.

या प्रश्नांचा शोध घेण्यासाठी आनंदवनाइतका चांगला मदतनीस दुसरा कोणी नसेल. इथली कधी काळी दुर्लक्षित अन् उपेक्षित असलेली माणसं आपल्या अपुऱ्या शारीरिक क्षमता ताणून केवळ इच्छाशक्तीच्या जोरावर नवी क्षितिजं ओलांडताना बघितल्यावर आपलं आयुष्य बदलू शकतं. हा पोकळ दावा नव्हे, आमचा अनुभव आहे. आनंदवन साध्या साध्या गोष्टींतून जीवनाकडे बघण्याचा नवा दृष्टिकोन देतं. या संस्कारांत वाढल्यामुळेच आमची पोरं बाहेरच्या कार्यकर्त्यांनी आनंदवनाच्या कामात सामील व्हावं यासाठी धडपडताहेत. ‘ केवळ कार्यकर्ता म्हणून नव्हे, तर तुमच्या कौशल्यांना-क्षमतांना

वाव मिळण्यासाठी तुम्ही आनंदवनात या. कुठलंही क्षेत्र निवडा, ते काम तुम्हाला आनंदवनात करायला मिळेल. भरभरून काम करू इच्छिणाऱ्या माणसासाठी आनंदवन ही एक आदर्श शेतजमीन आहे', हे आजच्या तरुण पिढीला सांगण्याचा ते प्रयत्न करताहेत.

मला विशेष वाटतं ते या मुलांच्या कार्यकर्त्यांबाबतच्या दृष्टिकोनाचं. बदलत्या परिस्थितीचं त्यांना भान आहे. कार्यकर्त्यांनी उपाशीपोटी राहून किंवा स्वतःचं मन मारून कामं करावं अशी अपेक्षा आनंदवनाने कधीच केली नाही. पण आता कार्यकर्त्याच्या पारंपरिक व्याख्येत बसण्याच्या धडपडीत तरुणांनी आपली परवड होऊ देता कामा नये, हेही त्यांना समजतं आहे. आयटी सोल्युशन पुरवणाऱ्या हार्डवेअर तज्ज्ञाला महिना दोन लाख रुपये पगार मिळत असेल, तर आयटी सोल्युशन पुरवणाऱ्या 'हार्ट'वेअर विशेषज्ञाला किमान वीस हजार रुपये तरी मिळायला हवेत, असं या तरुण पिढीचं म्हणणं आहे. दुसऱ्या बाजूला केवळ कामाची प्रेरणा असून आता भागणार नाही, तर व्यावसायिक ज्ञान, गुणवत्ता आणि विविध प्रकारचं कौशल्य असणाऱ्या तरुणांनी 'प्रोफेशनल अॅप्रोच' ठेवून सामाजिक कामात सहभागी व्हायला हवं, असं या पिढीला वाटतं. आणि ते मला पूर्ण पटतं. त्यांचे प्रयत्न आता त्या दिशेने सुरू आहेत.


म्हणजे एकीकडे आनंदवनाच्या सध्याच्या कामांसाठी पुरेसा पैसा उपलब्ध होत राहील याची खातरजमा करायची, समाजातल्या नव्या प्रश्नांवर उत्तरं शोधण्यासाठी धडपडायचं आणि त्यासाठी नव्या पिढीला या कामात सामील करून घ्यायचं, अशा त्रिसूत्रीवर या पुढच्या पिढीची वाटचाल होणार आहे. या कामासाठी केवळ एक आनंदवन पुरं पडणार नाही याची त्यांनाही जाणीव आहे. त्यासाठी देशभरात सुरू असलेल्या चांगल्या कामांची जोडणी कशी करता येईल याचाही विचार ही मुलं करताहेत. सोबतीला मी आहेच.

अजून काय हवं? बाबा असते तर त्यांनीही या पोरांकडून वेगळं काही मागितलं नसतं. उलट, ते म्हणाले असते, 'चांगलं काम करताय. तुमच्या प्रत्येक कामात मी सोबत आहेच.'

•

‘समकालीन’ प्रकाशित
समाज घडवणाऱ्या प्रयत्नांच्या कहाण्या!

प्रकाशवाटा
डॉ. प्रकाश आमटे



आदिवासींचं जगणं सुसह्य करण्याचं बाबा आमटेंचं स्वप्न प्रत्यक्षात उतरवणारे, मॅगसेसे पुरस्कार विजेते, डॉ. प्रकाश आमटे यांचं आत्मचरित्र.

मराठीत आणि इंग्रजीतही!
किंमत प्रत्येकी रु.२००

मुक्तांगणची गोष्ट
अनिल अवचट



तीन दशके काम करणाऱ्या मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्राच्या वाटचालीचा खुद्द संस्थापक व लेखक अनिल अवचट यांनी ललित शैलीत घेतलेला वेध.

मराठीत आणि इंग्रजीतही!
किंमत प्रत्येकी रु.२००


जग बदल घालुनि घाव
एकनाथ आवाड



एका पोतराजाच्या पोराने जगण्याशी केलेला संघर्ष आणि नवं जग घडवण्याचा उभा केलेला पॅटर्न सांगणारी अफाट गोष्ट.

किंमत २०० रुपये


या शेताने लळा लाविला
ना.धों. महानोर



५० वर्षांच्या अनुभवातून कळलेलं शेती-पाण्याचं ज्ञान समाजाला देण्यासाठी ही माझी शेती संबंधित आत्मकथा.

किंमत १२५ रुपये

शहाण्यांचा सायकिॲट्रिस्ट
डॉ.आनंद नाडकर्णी



गेली वीस वर्षे अथकपणे सुरू असलेल्या मानसिक आरोग्याच्या उपचारांची कहाणी.
प्रत्येक शहाण्या माणसासाठी!

किंमत २५० रुपये

Jihad-E-Teen Talaq
Sayed Mehboob Shah Qadri



The untold story of a peaceful resistance against the discrimination practice of oral talaq.

Price : 250/-

समकालीन प्रकाशन

BLOOM/14/09/034